



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठीत सवय

▪ अमरावती, रविवार १५ फेब्रुवारी २०२६ ▪ मूल्य ४.०० ▪ पृष्ठ १०+४








## थोडक्यात

### निवडणूक ट्रस्टसकडून भाजपला 3,157.65 कोटींचा निधी

▪ एडीआरने प्रसिद्ध केला 24-25 चा अहवाल

**नवी दिल्ली** : निवडणूक ट्रस्टसकडून २०२४-२५ या आर्थिक वर्षात भाजपला ३,१५७.६५ कोटी रुपये मिळाले असून, हा निधी ट्रस्टांनी



राजकीय पक्षांना वितरित केलेल्या एकूण रकमेपैकी ८२.५२ टक्के आहे. ही माहिती असोसिएशन फार डेमोक्रॅटिक रिफार्म्स (एडीआर) यांनी शुक्रवारी प्रसिद्ध केलेल्या ताज्या अहवालात दिली आहे. हा अहवाल निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आलेल्या देणगी कागदपत्रांच्या विश्लेषणावर आधारित आहे. अहवालानुसार, काँग्रेसला ३९८.७७ कोटी रुपये (७.८१ टक्के) निधी प्राप्त झाला, तर तृणमूल काँग्रेसला १०२ कोटी रुपये (२.६७ टक्के) मिळाले. या तीन प्रमुख पक्षांव्यतिरिक्त इतर १९ राजकीय पक्षांना एकूण २६७.९१ कोटी रुपयांचा ⇨(पान २ वर)

### 17 वर्षांच्या मुलाने 160 च्या स्पीडने पळवली कार
### 7 जणांचा जागीच मृत्यू

**नवी दिल्ली** : हौसेपोटी गाडीचा वेग वाढवणे किती महागात पडू शकते, याचा काळजाचा थरकाप उडवणारा प्रत्यय बेंगळुरूमध्ये आला आहे. एका



१७ वर्षांच्या मुलाने आपल्या अल्पवयीन मित्रांसह १६० किमी प्रतितास वेगाने कार चालवत असताना भीषण अपघात घडवला. या भीषण अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला असून यामध्ये ६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. हा अपघात इतका भीषण होता की, गाडीच्या धडकेमुळे ट्रकचे एक्सल आणि चाके निखळून रस्त्यावर पडली. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी पहाटे ४:१५ ते ४:३० च्या सुमारास डोब्बासपेट-होसकोटे सॅटेलाइट टाऊन रिंग रोडवर हा अपघात झाला. एका १७ वर्षीय मुलाने आपली हाय-स्पीड एसयूव्ही सुसाट वेगाने पळवत असताना आधी समोरून जाणा-या 'गगन' नावाच्या तरुणाच्या दुचाकीला मागून जोरदार धडक दिली. या धडकेत गगनचा जागीच मृत्यू झाला. मात्र, गाडीचा वेग इतका जास्त होता की, बाईकला उडवल्यानंतर ही कार थेट पुढे चाललेल्या ट्रकला जाउन धडकली. ⇨(पान २ वर)

# टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे योद्धे

## ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समकक्ष मानले गेले पाहिजे- हर्षवर्धन सपकाळ

**मालेगांव/ मुंबई/प्रतिनिधी-** मालेगाव महानगरपालिकेचे नवनियुक्त उपमहापौर शान-ए-हिंद निहाल अहमद यांनी आपल्या दालनात टिपू सुलतान फोटो लावल्याने शहरात नव्या राजकीय वादाला तोंड फुटले होते. शिंदेसेना आणि स्थानिक हिंदुत्ववादी संघटनांनी या कृत्याचा तीव्र निषेध केला. हा फोटो तात्काळ हटवण्याची मागणी केल्यानंतर, अखेर शनिवारी हा फोटो दालनातून काढण्यात आला. पण याचदरम्यान, टिपू सुलतानबाबत आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी एक विधान केले असून त्यावरून मोठा वाद सुरु झाला आहे. त्यांनी टिपू सुलताची बरोबरी थेट छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी केल्याने हा वाद वाढण्याची चिन्हे आहेत.

'छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य ज्या पद्धतीचं आहे आणि त्यांनी स्वराज्य नावाचा एक विचार ज्या पद्धतीने दिला आहे, अगदी त्यांच्याच मांदियाळीमध्ये, त्यांच्यानंतर.. त्यांचा बराच कालावधी लोटल्यानंतर, त्यांचा आदर्श घेउन टिपू सुलतान यांनी इंग्रजांच्या विरोधात लढा पुकारला होता आणि त्या अर्थाने टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे एक योद्धे होउन गेले, भारताचे भूमिपुत्र होउन गेले. त्यांनी कधीही कुठल्याही



विषारी, विखारी विचारांना जवळ केलं नाही. तर एक शौर्याचे लक्षण म्हणून आपण टिपू सुलतान यांना शिवाजी महाराजांच्या समकक्ष बघितलं पाहिजे,' अशा शब्दांत हर्षवर्धन सपकाळ यांनी आपले मत व्यक्त केले.

**काँग्रेस प्रदेशाध्यक्षांवर भाजप-शिंदेसेनेचे टीकास्त्र**

फोटोचा वाद शांत होत असतानाच, आता काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याने नवा वाद उफाळून आला आहे. भाजपाचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी सपकाळांवर टीका करत, ⇨(पान २ वर)

### 'यांना लाज वाटली पाहिजे, हे कुठल्या शाळेत इतिहास शिकलेत...'-फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी-** मालेगाव महानगरपालिकेचे नवनियुक्त उपमहापौर शान-ए-हिंद निहाल अहमद यांनी आपल्या दालनात टिपू सुलतान फोटो लावल्याने वाद निर्माण झाला होता. वाद चिघळल्यावर त्यांनी तो फोटो दालनातून काढून टाकला. या वाद शमेल अशी अपेक्षा असतानाच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवरायांची केली. या मुद्द्यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सडेतोड भूमिका मांडली.'काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ज्याप्रकारे टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांची केली आहे, या गोष्टीचा आम्ही निषेध करतो. त्यांना लाज वाटली पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांच्या विरोधात लढाई करून स्वराज्याची




निर्मिती केली. दुसरीकडे हजारो हिंदूंची कत्तल करणा-या टिपू सुलतान आहे. या दोघांना एकसमान आदर दिला जावा अशी जर काँग्रेसची मागणी असेल, तर मतांच्या लांगूलचालनासाठी या लोकांनी कितीही बूट चाटले तरी महाराष्ट्र आणि देश अशा ⇨(पान २ वर)

### मुलुंडमध्ये मेट्रो बांधकामावेळी पिलरचा भाग रिक्षावर कोसळला

● 4 जण जखमी ● भयंकर व्हिडिओ समोर

**मुंबई/प्रतिनिधी-**मुंबई मेट्रोचे बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी मोठा अपघात झाला आहे. मेट्रो स्टेशनच्या पिलरमधील सिमेंटचा भाग उंचावरुन खाली कोसळल्याने दुर्घटना घडल्याचे समोर आले आहे. पूर्व उपनगरातील मुलुंड येथे पिलरचा भाग एका रिक्षावर कोसळून तीन ते चार जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. यावेळी बघ्यांची मोठी गर्दी घटनास्थळी जमा झाली. मेट्रोचा पिलर खाली कोसळून झालेल्या अपघातानंतरचा अंगावर काटा आणणारा व्हिडिओ समोर आला आहे. मुलुंड येथे मुंबई मेट्रोचे बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी सिमेंटच्या पिलरचा भाग कोसळला. शनिवार १४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.१५ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. मुलुंड पश्चिम भागातील लाल बहादूर शास्त्री रोडवर जानसन अँड जानसन कंपनीच्या जवळ मुंबई मेट्रोचे बांधकाम सुरु असताना हा प्रकार घडला. ⇨(पान २ वर)

### आसाममध्ये आपत्कालीन लँडिंग सुविधा सुरू, पंतप्रधानांच्या विमानाचे ऐतिहासिक लँडिंग

**गुवाहाटी/वृत्तसंस्था-**पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी आसाममध्ये पोहोचले. त्यांच्या भेटीदरम्यान त्यांनी गुवाहाटी येथे सांगितले की, काँग्रेसने देशाला धोक्यात आणले. जेव्हा जेव्हा काँग्रेसने सैन्यासाठी शस्त्रे खरेदी केली तेव्हा त्याचा अर्थ हजारो कोटींचा घोटाळा झाला. ते म्हणाले, आजची काँग्रेस अशा लोकांना आणि देशविरोधी विचारांना पाठिंबा देत आहे. जे देश तोडण्याबद्दल बोलतात किंवा अशा घोषणा देतात ते काँग्रेससाठी आदरणीय व्यक्ती बनले आहेत.



पंतप्रधान प्रथम चाबुआ एअरफील्डवर पोहोचले. त्यानंतर ते हवाई दलाच्या सी-१३० विमानाने दिब्रुगडला गेले. विमान मोरन बायपासवरील आपत्कालीन लँडिंग सुविधा (ELF) येथे उतरले आणि असे करणारे ते पहिले पंतप्रधान बनले. पंतप्रधान मोदींचे विमान आज सकाळी १० वाजता मोरन बायपासवरील ईएलएफ येथे उतरले. लष्करी हेतूंसाठी ही हवाई पट्टी धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाची आहे. हा परिसर चीन सीमेपासून अंदाजे ३०० किमी अंतरावर आहे. पंतप्रधानांच्या उपस्थितीत, राफेल आणि सुखोईसह १६ लढाउ विमानांनी मोरन महामार्गावर हवाई प्रदर्शन केले. या दरम्यान, विमानाने महामार्गावरूनच लँडिंग आणि टेकऑफचे प्रात्यक्षिक दाखवले. हे प्रात्यक्षिक ३० मिनिटे चालले.

त्यानंतर पंतप्रधानांनी ब्रह्मपुत्र नदीवरील कुमार भास्कर वर्मन पूल आणि आयआयएम गुवाहाटीच्या तात्पुरत्या कॅम्पसचे उद्घाटन केले. गेल्या तीन महिन्यांत ⇨(पान २ वर)




### झिरवाळांच्याच मागे विरोधकांचा सापळा; राजीनाम्याची मागणी

**मुंबई/प्रतिनिधी-** राष्ट्रवादीचे नेते, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या मंत्रालयातील दुस-या मजल्यावरील कार्यालयात एसीबीने कारवाई करत झिरवाळ यांचा कारकून राजू ढेरिंगे याला ३५ हजारांची लाच घेताना रंगेहाथ पकडले. मंत्र्यांच्या दालनातच हा प्रकार घडल्याने खळबळ उडाली आहे.अर्थसंकल्पीय अधिवेशन काही दिवसांवर असतानाच नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातच लाचखोरीचे प्रकरण घडल्याने भाजपा महायुती सरकारच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. या लाचखोरीची निष्पक्ष चौकशी होण्यासाठी मंत्री नरहरी झिरवाळांनी तात्काळ मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी काँग्रेस, शिवसेनेने केली आहे.

दरम्यान, या लाचखोरीची पाळेमुळे जर माझ्यापर्यंत आली तर निश्चितच मी राजीनामा देईल असे काल झिरवाळ यांनी म्हटले होते. मात्र, आज १४ फेब्रुवारी सकाळपासून मंत्री नरहरी झिरवाळ हे नाट रिचेबल असल्याचे



सांगितले जात आहे. दुसरीकडे नरहरी झिरवाळ यांच्या विभागातील लाचखोर लिपिक राजू संपत ढेरिंगे याला विशेष सत्र न्यायालयाने १६ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. एका मेडिकलचा निलंबित परवाना पुन्हा पूर्ववत करून देण्यासाठी ३५ हजारांची लाच घेताना तो रंगेहाथ सापडला आहे. भाजपा महायुतीने मंत्रालयाचे भ्रष्टाचारालय केले आहे. झिरवाळ यांच्या कार्यालयातील लिपिकाने वरिष्ठांच्या सांगण्यावरून लाच घेतल्याचे लाचलुचपत विभागाच्या अधिका-यांना सांगितल्याची माहिती समोर येत आहे, हे आणखी धक्कादायक आणि गंभीर आहे. त्यामुळे मंत्री झिरवाळ यांच्यासह त्यांच्या कार्यालयातील वरिष्ठ अधिका-यांची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. संबंध आढळल्यास राजीनामा देईन अशी भूमिका मंत्री नरहरी झिरवाळ यांनी मांडली आहे मात्र नैतिक जबाबदारीच्या दृष्टीने, आपल्या कार्यालयात खुलेआम लाचखोरी सुरू असल्याचे समोर आल्यावर निष्पक्ष चौकशीसाठी त्यांनी तात्काळ मंत्रिपदाचा राजीनामा दिला पाहिजे असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. ⇨(पान २ वर)

### शरद पवारांना डिस्चार्ज

**पुणे-**राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या प्रकृतीत सुधारणा होते आहे. त्यांना आज रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. ते पुढचे काही दिवस पुण्यातील घरी विश्रांती घेणार असल्याची माहिती



आहे.शरद पवार यांना खोकला आणि इतर काही व्याधींमुळे पुण्यातील रुबी हॉल रुग्णालयात दाखल करण्यात आलं होत. गेले पाच दिवस त्यांच्यावर उपचार सुरु होते. आता त्यांच्या प्रकृती सुधारणा होते आहे. त्यामुळे डॉक्टरांनी त्यांना घरी विश्रांती घेण्याच्या सल्ला दिला आहे. यासंदर्भात बोलताना डाक्टर म्हणाले, शरद पवार यांच्या प्रकृतीत आता चांगली सुधारणा झाली आहे. आज त्यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे. ते आता पूर्णपणे बरे झाले आहेत. मात्र, पुढील काही दिवस त्यांना विश्रांती घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. पुढे बोलताना, तीन चार दिवस विश्रांती घेतल्यानंतर ते प्रवास करून शकतात, असंही डॉक्टरांनी सांगितलं. रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर शरद पवार हे पुण्यातील त्यांच्या मोदीबागेतील निवासस्थानी पोहचले आहे. खासदार सुप्रिया सुळे देखील त्यांच्या बरोबर आहेत. या ठिकाणी ते पुढील काही दिवस राहण्यार असल्याची माहिती आहे.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

### मादी बिबट्याचे मृत्यू प्रकरण-
# वन विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह


**अचलपूर/प्रतिनिधीः-**
अचलपूर शहरापासून जवळच असलेल्या निजामपूर येथे १३ फेब्रुवारी रोजी मादी बिबट मृतावस्थेत आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. घटनास्थळी पोलिस आणि वनविभागाचे कर्मचारी दाखल होऊन पुढील तपास सुरू केला आहे. दुसऱ्या दिवशी ही वन विभागाकडून तपास सुरू होता पण या गंभीर प्रकरणात वन विभागाकडून अधिकृत माहिती मिळालेली नाही . वन परिक्षेत्र अधिकारी दिनेश वाळके बाहेरगावी असल्याने त्यांचा पदभार देसाई नामक अधिकाऱ्याकडे दिला आहे . मात्र बिबट्याचा मृत्यू नेमका कसा झाला ? याबाबत ची कोणतीही माहिती त्यांच्याशी संपर्क होत नसल्याने मिळालेली नाही. त्या मादी बिबट्याचा मृत्यू प्रकरणी शव विच्छेदनची प्रकिया व पंचनामाची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळालेली आहे. या संदर्भात अधिकारी माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे पाहायला मिळत आहे .१३ फेब्रुवारी रोजी निजामपूर गावालगत असलेल्या शेताजवळ सापन नदीच्या काठावर पडीक जमिनीमध्ये काही ग्रामस्थांना सकाळच्या सुमारास झुडुपांमध्ये बिबट मृतावस्थेत असल्याचे आढळून आले होते. सदर वार्ता गावात पसरताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली होती. घटनेची माहिती वनविभाग, वैद्यकीय पथक तसेच सरमसपुरा पोलिस ठाण्याला देण्यात आली. काही वेळेनंतर पोलिस व वनविभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दाखल होऊन ग्रामस्थांना घटनास्थळी प्रतिबंध केला होता. डॉग



स्कॉड बोलावून घटनेशी संबंधित धागेदोरे शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला . रात्री उशिरापर्यंत घटनेचा पंचनामा प्रक्रिया सुरू होती.आणि आज दुसऱ्या दिवशी ही वन विभागाकडून चौकशी सुरू आहे. बिबट शवविच्छेदन करण्यासाठी पाठविण्यात आल्याची माहिती आहे .सूत्राकडून मिळालेला माहितीनुसार , तारांचा फास बिबट्याच्या गळ्याभोवती आवळल्याने त्याचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. यासंदर्भात वनपरिक्षेत्र अधिकारी दिनेश वाळके यांच्याशी संपर्क साधला असता ते रजेवर असल्याचे त्यांनी सांगितले.मात्र त्यांचा पदभार देसाई नामक अधिकाऱ्याकडे असल्याने या गंभीर प्रकरणी त्यांच्या शी संपर्क केला असता संपर्क झालेला नाही .

# आज हर हर महादेवाच्या घोषाने दुमदुमणार अंबानगरी
## -महाशिवरात्रीसाठी सजले शिवालय

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाशिवरात्रीचा सण रविवारी सर्वत्र आनंदाने साजरा करण्यात येत आहे. यानिमित्य महादेव मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांना सुरक्षित दर्शन घेता यावे या उद्देशाने जयंत तयारी करण्यात आली आहे.रविवारी सकाळ पासूनच मंदिरात भाविकांची गर्दी उसळणार आहे. मंदिरामध्ये अभिषेक,



पूजा आणि प्रसाद वितरण करण्यात येणार आहे. महाशिवरात्रीला महादेवाची पूजा करण्याचे विशेष महत्त्व आहे. यामुळे शहरासह आजूबाजूच्या मंदिरामध्ये भाविक दर्शनासाठी जाणार आहेत. शहरातील ऐतिहासिक गडगडेश्वर, तपोनेश्वर, कोंडेश्वर लोटेश्वर, भूतेश्वर, नागेश्वर, पातालेश्वर, संकेश्वर, नागेश्वर, सतीधाम सह इतर मंदिरामध्ये सकाळपासून भाविक दर्शनासाठी जाणार आहेत. महाशिवरात्र निमित्त विविध धार्मिक आयोजन मंदिरामध्ये करण्यात आले आहे. शहरातील विविध प्राचीन मंदिरामध्ये यात्रा महोत्सव साजरा करण्यात येते. महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर शिव भक्तांची मंदिरात लाट असते. हर हर महादेव.. जय भोलेनाथ.. असा



जयघोष सकाळपासून ऐकायला येणार आहे. शहरासह जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर येथील हेमाडपंथी शिव मंदिर, धामंत्री येथील नागेश्वर मंदिर ,सालबर्डी, देऊरवाडा सह इतर ठिकाणी भाविकांची लाट असणार आहे. लहान मोठ्या मंदिरांमध्ये आकर्षक सजावट करण्यात आली आहे. शिवलिंगावर फुले बेल पत्रे, धतुरा, बेलफळ चढविण्यात येणार आहे. महादेवाचा जलाभिषेक व दुग्धाभिषेक करण्यात येणार आहे. भाविकांची होणारी गर्दी पाहता चोख व्यवस्था मंदिर प्रशासनाकडून करण्यात येत आहे. गडगडेश्वर मध्ये सकाळपासूनच दर्शनासाठी भक्तांच्या रांगा दिसणार आहे. येथे भाविकांना साबुदाणा खिचडी वितरित केली जाणार आहे. भूतेश्वर महादेव मंदिरामध्ये पण ५०० किलो साबुदाणा खिचडी चा प्रसाद केला जाणार आहे. जागोजागी भक्तांना साबुदाणा खिचडी, राजगिऱ्याचे लाडू, केळी, फराळी वितरित केले जाणार आहे. भाविकांमध्ये अपार उत्साह महाशिवरात्रीनिमित्त पाहायला मिळत आहे. सकाळपासूनच दर्शनासाठी जाण्याचे नियोजन अनेकांनी केले आहे. लहान मोठे प्रत्येक शिव मंदिरात भक्तांची मांदियाळी पाहायला मिळणार आहे.

### सालबर्डी साठी अतिरिक्त बसेस-

सालबर्डी मध्ये महाशिवरात्रि उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जाते येथे लाखो भाविक दर्शनासाठी उसळतात. सालबर्डी ला लहान महादेवाचा मान मिळाला आहे. सातशे वर्ष जुनी शिवलिंग येथे आहे. मोठ्या संख्येने भाविक येथे येतात. जिल्ह्यातूनही सालबर्डीला दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने जातात. यामुळे एसटी महामंडळाच्या वतीने अतिरिक्त बसेसचे नियोजन करण्यात आले आहे. हे जागृत देवस्थान आहे. अनेक प्राचीन कथा येथून जुळलेल्या आहे. त्यामुहे भाविक येथे दर्शनाकरिता गर्दि करतात.

## १ व १० वरिल उर्वरित

### निवडणूक ट्रस्टसकडून भाजपला

निधी देण्यात आला. निवडणूक ट्रस्टांना २०२४-२५ आर्थिक वर्षात एकूण ३,८२६.३४ कोटी रुपयांचे योगदान प्राप्त झाले. ट्रस्टांनी राजकीय पक्षांना ३,८२६.३५ कोटी रुपये वितरित केल्याचे अहवालात नमूद आहे. नोंदणीकृत २० निवडणूक ट्रस्टांपैकी १० ट्रस्टांनी संबंधित वर्षात देणगी मिळाल्याची माहिती दिली. मात्र, पाच ट्रस्टांचे अहवाल नियोजित मुदत संपल्यानंतर ३ महिने उलटूनही निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध नव्हते. अहवालात नमूद केल्याप्रमाणे, २२८ क?र्पोरेट किंवा व्यावसायिक समूहांनी ३,६३६.८१ कोटी रुपयांचे योगदान दिले, तर ९९ व्यक्तींनी १८७.६२२७ कोटी रुपये देणगी दिली. एलिव्हेटेड अ‍ॅव्हेन्यू रि?ल्टी एलएलपी हा सर्वात मोठा देणगीदार ठरला असून त्याने ५०० कोटी रुपये दिले. त्यानंतर टाटा सन्स प्रा. लि. (३०८.१३ कोटी रुपये), टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लि. (२१७.६२ कोटी रुपये) आणि मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर लि. (१७५ कोटी रुपये) यांचा क्रमांक लागतो. नियमांनुसार, निवडणूक ट्रस्टांना एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण देणगीपैकी किमान ९५ टक्के निधी राजकीय पक्षांना वितरित करणे बंधनकारक आहे. अहवालानुसार, ट्रस्टांनी या नियमांचे पालन केले आहे. ट्रस्टांमध्ये प्रुडेंट इलेक्टोरल ट्रस्टने १५ राजकीय पक्षांना सर्वाधिक २,६६८.४६ कोटी रुपये वितरित केले, तर प्रोग्रेसिव्ह इलेक्टोरल ट्रस्टने १० पक्षांना ९१४.९७ कोटी रुपये दिले.

### ७ जणांचा जागीच मृत्यू

**ट्रकचे तुकडे झाले, चाके पडली लांब!-**कारची धडक इतकी जोरदार होती की, ट्रकचा मागच्या बाजूचा चाकांचा जोडा आणि एक्सल तुटून थेट रस्त्यावर पडला. ट्रक रस्त्यावरून घसरून थेट सर्व्हिस रोडवर जाउन उलटला. ट्रक चालक बालासुब्रमण्यम या अपघातात गंभीर जखमी झाला आहे. काही क्षणातच संपूर्ण रिंग रोडवर गाडीच्या काचा आणि मृतदेहांचा खच पडला होता. या भीषण अपघातानंतर काही वेळातच दुसरी एक कार ट्रकच्या पडलेल्या भागाला आदळली, सुदैवाने त्यातील प्रवासी किरकोळ जखमी झाले.

**मृतकांमध्ये ५ अल्पवयीन मुले-**या अपघातातील मृतांची नावे समोर आली असून, ती ऐकून पालकांच्या काळजाचे पाणी होत आहे. या अपघातात अल्पवयीन मुलांसह २६ वर्षीय मोहम्मद फरहान आणि दुचाकीस्वार गगन याचाही या अपघातात मृत्यू झाला आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेउन गॅस कटरच्या साहाय्याने मृतदेह बाहेर काढले आणि शवविच्छेदनासाठी पाठवले.

**वेगाची नशा ठरली जीवघेणी-**पोलीस तपासात समोर आले आहे की, कारचा वेग १६० किमी प्रतितास पेक्षा जास्त होता. अपघातानंतर कारचा अक्षरश? पत्रा झाला आहे. अल्पवयीन मुलांच्या हातात गाडी देणे आणि वेगावर नियंत्रण नसणे यामुळे सात हसत्याखेळत्या कुटुंबांवर दु?खाचा डोंगर कोसळला आहे.

### टिपू सुलतान हे शौर्य

काँग्रेसने महाराष्ट्राची माफी मागावी अशी प्रतिक्रिया दिली आहे. तसेच, असे विधान करणं हा छत्रपती शिवरायांचा अपमान आहे असेही ते म्हणाले आहेत. तर दुसरीकडे, काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांना महाराष्ट्रातील जनतेने चपलेने हाणायला पाहिजे, असा संताप शिंदेसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी व्यक्त केला आहे.

मालेगावातील टिपू सुलतान फोटो प्रकरणात उपमहापौर अहमद यांच्या दालनातील एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यात त्यांच्यापाठीमागे टीपू सुलतान फोटो लावल्याचे दिसून आले. त्यानंतर, शिंदेसेनेचे गटनेते नीलेश आहेर यांच्या नेतृत्वाखाली नगरसेवकांनी आक्रमक पवित्रा घेतला. उपमहापौरांच्या दालनातून टिपू सुलतान फोटो हटवण्यासाठी त्यांनी सर्व पदाधिका-यांसह आयुक्त कार्यालय गाठले. 'जोपर्यंत हा फोटो हटवला जात नाही, तोपर्यंत आमचा निषेध सुरूच राहील आणि तो अधिक तीव्र केला जाईल,' असा इशारा नीलेश आहेर यांनी दिला. त्यानंतर हा फोटो हटवला गेला.

### 'यांना लाज वाटली पाहिजे,

गोष्टी सहन करून घेणार नाही,' असे मुख्यमंत्री म्हणाले. 'काँग्रेस पक्षात थोडी जरी नैतिकता शिल्लक राहिली असेल तर काँग्रेस पक्षाने याची दखल घेतली पाहिजे. तसेच काँग्रेसचे जे मित्रपक्ष आहेत, त्यांनी याबाबतची भूमिका काय आहे, ती त्यांनी स्पष्ट केली पाहिजे. असे विधान करणारे लोक कोणत्या शाळेत इतिहास शिकले याचं संशोधन केले पाहिजे. जो नवा इतिहास हे लोक लिहू पाहतात, तो इतिहास महाराष्ट्र खपवून घेणार नाही, भारत खपवून घेणार नाही,' असेही त्यांनी खडसावले

हर्षवर्धन सपकाळ काय म्हणाले होते?

'छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य ज्या पद्धतीचं आहे आणि त्यांनी स्वराज्य नावाचा एक विचार ज्या पद्धतीने दिला आहे, अगदी त्यांच्याच मांदियाळीमध्ये, त्यांच्यानंतर.. त्यांचा बराच कालावधी लोटल्यानंतर, त्यांचा आदर्श घेउन टिपू सुलतान यांनी इंग्रजांच्या विरोधात लढा पुकारला होता आणि त्या अर्थाने टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे एक योद्धे होउन गेले, भारताचे भूमिपुत्र होउन गेले. त्यांनी कधीही कुठल्याही विषारी, विखारी विचारांना जवळ केलं नाही. तर एक शौर्याचे लक्षण म्हणून आपण टिपू सुलतान यांना शिवाजी महाराजांच्या समकक्ष बघितलं पाहिजे,' अशा शब्दांत हर्षवर्धन सपकाळ यांनी आपले मत व्यक्त केले होते.

### मुलुंडमध्ये मेट्रो बांधकामावेळी

एलबीएस मेट्रो स्थानकाच्या बांधकामादरम्यान सिमेंटच्या खांबाचा एक भाग कोसळून खालून जाणा-या रिक्षावर पडला. यावेळी रिक्षातून प्रवास करणारे चालकासह तीन ते चार जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. अग्निशमन दल, पोलिस, मेट्रो कर्मचारी, वार्ड कर्मचारी आणि १०८ रुग्णवाहिका सेवा तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या.रिक्षा पिलरखाली दबल्यामुळे एक जण काही काळ अडकून पडला होता. मात्र अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने स्लॅब हटवून जखमींना रुग्णालयात दाखल केले. यावेळी घटनास्थळी मोठी गर्दी जमा झाल्याचं पाहायला मिळालं. मुंबई मेट्रो ४ या वडाळा-घाटकोपर-मुलुंड-कासारवडवली मार्गे जाणा-या ग्रीन लाइनवरील स्टेशनच्या बांधकामावेळी हा अपघात झाला आहे. ३२.३२ किमीचा एलिवेटेड क?रिडोअर मुलुंडसह भांडुप, कांजुरमार्ग या एलबीएस रोडवरील स्थानकांची कनेक्टिव्हिटी वाढवत मुंबईतील महत्वपूर्ण व्यावसायिक भागांशी जोडेल. यामुळे मुंबई लोकलवरील ताण कमी होणार आहे. तसेच प्रवासाचा वेळ ६०-७५ मिनिटांवरून ३०-४० मिनिटांपर्यंत कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्तकेली जात आहे

### आसाममध्ये आपत्कालीन लँडिंग

पंतप्रधान मोदींचा हा तिसरा आसाम दौरा आहे. या वर्षी आसाममध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. २०१६ पासून सलग दोन वेळा एनडीए राज्यात सत्तेत आहे. यापूर्वी २००१ ते २०१६ पर्यंत काँग्रेस सरकार सत्तेत होते.

**आसाममध्ये तयार झाली ईशान्येकडील पहिली आपत्कालीन लँडिंग सुविधा**

मोरान एअरस्ट्रिप ?क्त१२७ च्या ४.४ किलोमीटर लांब भागावर बांधण्यात आली आहे. ही भारताची पहिली आपत्कालीन लँडिंग सुविधा (ELF) आहे, जी लष्करी आणि नागरी विमानांसाठी वापरली जाउ शकते. ELF म्हणजे युद्ध किंवा आपत्कालीन परिस्थितीत विमाने महामार्गावर उतरू किंवा उड्डाण करू शकतात. यामुळे रस्त्याचा दुहेरी फायदा होतो. दैनंदिन वाहतुकीसोबतच लष्करी गरजांसाठीही. ही एअरस्ट्रिप ईशान्येकडील सामरिक महत्त्व वाढवते, कारण हा प्रदेश चीनच्या सीमेला लागून आहे. पंतप्रधान म्हणाले, काँग्रेसच्या राजवटीत ३जी आणि ४जी तंत्रज्ञान आणि २जी घोटाळा उघड झाला, परंतु काँग्रेस पक्षाने आसाम आणि ईशान्येकडे वेगाने विस्तार करण्यासाठी कठोर परिश्रम केले नाहीत. जेव्हा आम्ही ५जी तंत्रज्ञान आणले तेव्हा आम्ही आसाम आणि ईशान्येकडील प्रत्येक गावात ते उपलब्ध करून देण्यासाठी काम केले. आसाममध्ये एक डेटा सेंटर देखील स्थापन करण्यात आले आहे, ज्याचा फायदा तरुणांना होईल. पंतप्रधान म्हणाले, काँग्रेस पक्षाने अनेक दशकांपासून एम्सच्या विस्ताराकडे दुर्लक्ष केले. २०१४ मध्ये देशात सहा एम्स होते आणि आज २० हून अधिक आहेत. गुवाहाटीसह आसाममध्ये अनेक वैद्यकीय महाविद्यालये उघडण्यात आली. काल, पंतप्रधान मदत योजनेला मंजुरी देण्यात आली. केंद्र सरकार अपघातात जखमी झालेल्यांना १.५० लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार देईल. भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने तरुण आहेत.

ते म्हणाले, जेव्हा देशात व्यवस्थापन आणि उच्च शिक्षणाची चर्चा होत असे, तेव्हा आसाम आणि ईशान्येकडील विद्यार्थ्यांना परदेशात जावे लागत असे. आज आयआयआयएम गुवाहाटीचे उद्घाटन झाले आणि आयआयटी देखील बांधली जात आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले, काँग्रेसच्या तुष्टीकरणाच्या राजकारणाने मतपेढीच्या धोरणांनी नेहमीच राज्याकडे मतपेढीच्या चष्म्यातून पाहिले. काँग्रेसच्या राजवटीत केंद्र सरकारच्या योजना आसामपर्यंत पोहोचण्यास वर्षानुवर्षे लागली. भाजपने नेहमीच ईशान्येकडील विकासाला प्राधान्य दिले आहे. पंतप्रधान म्हणाले, गेल्या १२ वर्षात जेव्हा जेव्हा नवीन उपक्रम सुरू झाला, तेव्हा ईशान्येकडील लोकांना त्याचा फायदा झाला. वंदे भारतच्या लॉंचमुळे आसाम ईशान्येशी जोडले गेले. 'निसरडा वंदे भारत' देखील आसाममध्ये सुरू झाला आणि आसाममध्ये एक सेमीकंडक्टर प्लांट देखील बांधला जात आहे. आसामच्या चहाप्रमाणेच आसामी चिप्सची जगभरात चर्चा होईल. आसामचा विकास प्रवास चहापासून चिप्सपर्यंत दिसतो. पंतप्रधान म्हणाले, आसामचे हे प्रेम मी कसे विसरू शकतो? मी आसामला वचन देतो की, तुम्ही मला दिलेले प्रेम मी विकासाद्वारे व्याजासह परत करेन. पंतप्रधान म्हणाले, २०१४ मध्ये मला देशाची सेवा करण्याची संधी मिळाली. दोन वर्षांनंतर, तुम्ही सर्वांनी येथे डबल-इंजिन सरकार स्थापन केले. भाजप सरकारने ब्रह्मपुत्रेवर पाच मोठे पूल बांधले. काँग्रेसच्या ७० वर्षांच्या सत्तेत तीन पूल बांधले गेले; आम्ही १० वर्षांत पाच बांधले. काँग्रेसने आसामच्या समस्या दिल्या आणि आम्ही त्यावर उपायही दिले. पंतप्रधान म्हणाले, या पुलाचे नाव प्राचीन कामरूपाचे सम्राट कुमार भास्कर बर्मन यांच्या नावावर आहे. हा पूल जलद विकास आणि वारशाचे जतन दर्शवितो. त्याच्या बांधकामामुळे गुवाहाटी देशाचे नवीन विकास केंद्र बनण्यास मदत करेल.

पंतप्रधान म्हणाले, आजची काँग्रेस देशाच्या विरोधात असलेल्या लोकांना आणि विचारांना पाठिंबा देत आहे. जे देशाचे विभाजन करण्याबद्दल बोलतात किंवा अशा घोषणा देतात ते काँग्रेससाठी आदरणीय व्यक्ती बनले आहेत. पंतप्रधान म्हणाले, स्वातंत्र्याच्या वेळी मुस्लिम लीगने देशाचे विभाजन केले. आजची काँग्रेस मुस्लिम लीग बनून देशाचे विभाजन करू इच्छिते. येथील तरुणांना काँग्रेसचे कुशासन आठवणार नाही. काँग्रेसचे सरकार आसाममध्ये असो वा दिल्लीमध्ये, त्यांनी आसामला त्यांच्याच मर्जीने सोडून दिले. पंतप्रधान मोदी म्हणाले, ब्रह्मपुत्रेने आसामच्या विकासात मोठी भूमिका बजावली आहे, ज्यामुळे आसाममधील लोकांचे जीवन सोपे झाले आहे. स्वातंत्र्यापासून २०१४ पर्यंत, त्यांचे पंतप्रधान येथून निवडून आले आणि त्या सर्व वर्षांत त्यांनी फक्त तीन पूल बांधले. अशा परिस्थितीत आसामचा जलद विकास शक्य नव्हता का?

पंतप्रधान मोदी म्हणाले, आज देशाला आणखी एक आपत्कालीन लँडिंग सुविधा मिळाली नाही. आज भारत एका नवीन पद्धतीने सुरक्षेची तयारी करत आहे. ते आपल्या सीमा मजबूत करत आहे. ते शत्रूंना त्यांच्याच देशात घुसखोरी करून प्रत्युत्तर देत आहे. आज पुलवामा हल्ल्याचा वर्धापन दिन आहे. या हल्ल्यानंतर भारताने दहशतवाद्यांना कशी शिक्षा दिली हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. पंतप्रधान म्हणाले, काही लोक अजूनही थरथर कापत आहेत. ऑपरेशन सिंदूरमध्ये तुम्ही भारताची ताकद पाहिली. देशाच्या कल्याणासाठी निर्णय घेण्याची हिंमत काँग्रेसमध्ये कधीच नव्हती का? ते फक्त विधाने करू शकत होते. ते भारत मातेचा अपमान करणारी काँग्रेस कधीही देशाचे रक्षण करू शकत नाही असा प्रश्न करतात. पंतप्रधान म्हणाले, काँग्रेसने देशाला धोक्यात ठेवले. जेव्हा जेव्हा काँग्रेसने सैन्यासाठी शस्त्रे खरेदी केली तेव्हा तो हजारो कोटींचा घोटाळा होता. देश आपल्या सशस्त्र दलांना बळकट करत आहे. भारत सीमेवर भव्य महामार्ग, बोगदे, पूल आणि इतर गोष्टी बांधत आहे, राष्ट्रीय सुरक्षा वाढवत आहे. म्हणूनच काँग्रेस इतकी गोंधळलेली आहे. त्यांना आश्चर्य वाटते की मोदी सगळं कसं करतात.

पंतप्रधान म्हणाले, पर्यटनासाठी आसामपेक्षा चांगले ठिकाण नाही.

पंतप्रधान मोदी म्हणाले, मी देशाला सांगू इच्छितो की पर्यटनासाठी यापेक्षा चांगले ठिकाण नाही. चला, हा माझा आसाम आहे. आज देशाच्या नजरा आसामवर आहेत. आसाम आणि ईशान्येकडील क्षमता सर्वांना दिसली. जेव्हा मी हवाई दलाच्या विमानातून मोरान महामार्गावर उतरलो तेव्हा तो इतिहास बनला. पंतप्रधान म्हणाले, एकेकाळी जेव्हा जेव्हा ईशान्येचे नाव घेतले जायचे, तेव्हा लोक विचार करायचे, 'तुटलेल्या रस्त्यांना विसरून जा, तुम्ही तिथे कधी पोहोचणार?' तो एक काळ होता आणि हाही एक काळ होता. आज, केवळ वाहने धावत नाहीत तर विमाने देखील उतरतात. तुमचा मोबाईल फोन काढा आणि टॉर्च चालू करा आणि मला सांगा की तुम्हाला आसामच्या विकासाचा अभिमान आहे.

### झिरवाळांच्याच मागे विरोधकांचा

**सूत्रधारापर्यंत पोहोचायला हवे : संजय राउत**

मंत्री झिरवाळ यांच्या कार्यालयात झालेले लाचखोरीचे प्रकरण अत्यंत गंभीर आहे. मुळात झिरवाळ यांना अन्न व औषध प्रशासन विभागातले काय कळते, हे मला माहीत नाही, पण त्यांचे अनेक किस्से माझ्याकडे आहेत. कुठला ट्रक सोडा, कुठला कंटेनर सोडा असे अधिका-यांना ते फोन करून सांगत असतात. त्यामुळे जे पकडले गेले आहेत ते फार किरकोळ लोक आहेत. त्यांच्या सूत्रधारापर्यंत पोहोचायला हवे, अशी मागणी शिवसेना (ठाकरे) नेते खासदार संजय राउत यांनी केली.

**लाचखोरीमागे भाजप : यशोमती ठाकूर**

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लाचखोरीच्या प्रकरणामागे भाजपचा हात आहे. झिरवाळ यांच्या कार्यालयातील कारकुनाला लाच घेताना पकडणे हे भाजपचे राजकीय षडयंत्र असू शकते. विरोधकांना आणि मित्रपक्षांना बदनाम करण्यासाठी सरकारी यंत्रणांचा वापर करणे हा यांचा जुना धंदा आहे. स्वतः टक्केवारीच्या चिखलात रुतलेल्या सरकारने दुस-यावर चिखलफेक करू नये. हे टक्केवारीचे सरकार असून प्रत्येक मंत्र्याच्या कार्यालयात उघडपणे टक्केवारी मागितली जाते, अशी टीका काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी केली.

**तर राजीनामा देईन : नरहरी झिरवाळ**

मंत्रालयातील आपल्या दालनात लिपिकला लाच घेताना रंगेहाथ पकडले जाण्याचा प्रकार चुकीचाच आहे. माझ्यावर याची जबाबदारी असून या लाचखोरी प्रकरणाची पाळेमुळे जर माझ्यापर्यंत आली तर मी निश्चितच राजीनामा देईन, अशी भूमिका अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी मांडली होती.

### भरधाव बोलेरोची दुचाकीला धडक,

अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला. काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती; मात्र पोलिसांनी तत्काळ परिस्थिती नियंत्रणात आणत वाहतूक सुरळीत केली. दरम्यान, अपघातातील निष्काळजीपणा आणि कथित बेकायदेशीर वाहतुकीमुळे एका कर्तव्यदक्ष शिक्षकाचा बळी गेल्याने नागरिकांत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पोलिसांनी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील चौकशी सुरू केली आहे.

### राष्ट्रीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेत

प्रशिक्षक सतीशचंद्र भट्ट यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने कौशल्य अधिक पैलू पाडले. रवींद्रच्या या ऐतिहासिक यशामुळे अकोला जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट्ट यांनी त्याचे विशेष अभिनंदन करून पुढील आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

अकोल्याच्या क्रीडा प्रबोधिनीतील खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडण्याची परंपरा कायम राखली असून रवींद्र पाडवीच्या सुवर्णयशामुळे जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

### चाकूचा धाक दाखवून ४० तोळयाचे

रात्री सुमारे ९.१३ वाजता दुकान बंद करून त्यांनी ४५९ ग्रॅम (सुमारे ४५ तोळे) सोन्याचे दागिने आणि १.७० लाख रुपये रोख पिवळ्या कापडी पिशवीत ठेवले. ते मोपेड (एमएच २७/बीडी ०६९२) वरून घरी जात असताना बालाजी नगरच्या फलकाजवळ काळ्या रंगाच्या कारने ओव्हरटेक करून त्यांना कडेला अडवले. कारमधून उतरलेल्या तिघांनी त्यांना खाली ढकलले, चाकू दाखवून धमकावले आणि मोपेडची डिक्की उघडून पिशवीतील दागिने व रोख रक्कम हिसकावली. आरोपी गुरुदेव नगरच्या दिशेने पळून गेले. दरोडेखोरांनी चेहरे पूर्णपणे झाकले होते. स्ट्रीटलाइटच्या उजेडात केवळ डोळे दिसल्याचे पीडिताने सांगितले. या प्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलीस उपनिरीक्षक गजानन लोकडे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. घटनेनंतर गुन्हे शाखेचे पथक आणि स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पाहणी करून तपासाला वेग देण्याचे निर्देश दिले. परिसरातील व शहरातील प्रमुख चौकांवरील सीसीटीव्ही फुटेज जप्त करण्यात आले आहे. संशयित काळ्या कारचा माग काढण्यासाठी विशेष पथके गठित करण्यात आली असून शहरभर नाकाबंदी करण्यात आली आहे. आसपासच्या जिल्ह्यांनाही सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

### रेती वाहतुकीवर नियंत्रणाचा

आहे. अपघात घडण्याची वाट न पाहता संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. अन्यथा एखादी मोठी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल आता सर्वसामान्य नागरिक उपस्थित करत आहेत.

### भिंत अंगावर कोसळल्याने

सोळंके यांच्या अंगावर कोसळली. यात ते गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यांना उपचारासाठी पीडीएमसी रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी मृतकाची मोठी बहीण कल्पना चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीवरून भातकुली पोलिसांनी अमोल शिरोळे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू आहे.

### वायगाव मार्गावर दुचाकीचा अपघात

राखत तत्काळ अ‍ॅम्बुलन्सला कॉल केला आणि जखमींना प्राथमिक मदत केली. दोघांना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले असून त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे. या प्रकरणी संबंधित वलगाव पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून तपास सुरू आहे. परिसरातील नागरिकांनी रस्त्यावरील प्राण्यांबाबत अधिक सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.

### हिंदुत्ववादी संघटनांचा व्हॅलेंटाईन

पोलीस निरीक्षक दिप्ती ब्राह्मणे पोलिसांच्या ताफ्यासह घटनास्थळी पोहोचल्या. कायदा हातात घेऊ नका, व्हॅलेंटाईन डे साजरा करा मात्र अश्लील कृत्य किंवा चाळे खपवून घेतले जाणार नाहीत. अल्पवयीन तरुण-तरुणीवर पोलिसांची करडी नजर राहील, असा इशारा ब्राह्मणे यांनी दिला. शहरातील संभाव्य अश्लील प्रकारावर पोलिसांनी विशेष लक्ष केंद्रित केले. ठिकठिकाणी दामिनी पथक सज्ज ठेवण्यात आले.

### अल्पवयीनांची मोबाईल स्नॅचिंग

शक्यता तपासात पुढे येत आहे. तक्रारदारासमोर आरोपींची ओळख परेड घेण्याची प्रक्रिया हाती घेतली जाणार आहे. तसेच चोरीस गेलेल्या इतर मोबाईलचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके सक्रिय झाली आहेत. या कारवाईमुळे शहरातील मोबाईल स्नॅचिंगच्या घटनांना आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, नागरिकांनीही सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

### शारीरिक चाचणीत ८७३ उमेदवार

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, उपस्थित १,२२७ उमेदवारांपैकी ५९ उमेदवार प्रारंभिक शारीरिक मापदंडांमध्ये (उंची, छाती आदी) अपात्र ठरले. तर १ उमेदवार दस्तऐवज पडताळणीत पात्रता सिद्ध करू शकला नाही. उर्वरित उमेदवारांनी निर्धारित धाव व इतर शारीरिक चाचण्यांमध्ये सहभाग घेतला, त्यापैकी ८७३ उमेदवार यशस्वी ठरले. भरती प्रक्रिये दरम्यान सुरक्षेचे कडक बंदोबस्त करण्यात आले होते. मैदान परिसरात प्रवेशावेळी उमेदवारांच्या कागदपत्रांची प्राथमिक तपासणी करण्यात आली. संपूर्ण प्रक्रियेची व्हिडिओग्राफी करून पारदर्शकता सुनिश्चित करण्यात आली. तसेच वैद्यकीय पथक व आपत्कालीन सेवा घटनास्थळी तैनात करण्यात आल्या होत्या.

### जमील कॉलनी चौकात लागणार

मागणी केली. शुक्रवारी सायंकाळी पण शिष्टमंडळ पोलीस आयुक्तांना भेटले. नागरिकांच्या मागणीकडे गांभीर्याने लक्ष देऊन पोलीस विभागाने याकडे पाऊल टाकले आहे. या मार्गावर नेहमी उभे राहणाऱ्या वाहनांना हटवून वाहतूक सुचारू करण्यासाठी प्रयत्न केले जाईल तसेच अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी येथे सिग्नल व्यवस्था केली जाणार आहे. यासाठी डीसीपी रमेश धुमाळ आणि वाहतूक विभागाचे अधिकारी परिसराचे निरीक्षण करणार आहेत.

### लासूरचे ऐतिहासिक आनंदेश्वर मंदिर

अशाच स्वरूपाचे दिसते. मंदिराचे संपूर्ण बांधकाम दगडीपाड्वा एकावर एक रचून करण्यात आले असून प्रत्येक दगडावर कोरीव काम करण्यात आले आहे. आनंदेश्वर महादेव मंदिरात एकूण १८ खांब आहेत. यापैकी बारा खांब खुले असून सहा खांब हे भिंतींमध्ये आहेत. प्रत्येक खांबावर अतिशय बारीक आणि शिलाईदार कोरीव काम आहे.

मंदिरात एका गाभाऱ्यात शिवलिंग आहे, तर पूर्व आणि पश्चिमेकडे बांधण्यात आलेल्या गाभाऱ्यांमध्ये कोणत्याही मूर्ती नाहीत. याठिकाणी अनेक कोरीव दगड पडलेले असून या गाभाऱ्यांमध्ये स्थापन केल्या जाणाऱ्या मूर्तीचे काम अर्धवट राहिले असावे, असा अंदाज व्यक्त केला जातो.

मंदिराच्या बाहेर भिंतीवर अनेक कोनाडे असून त्यामध्ये विष्णू, शिवब्रम्हा, राधाकृष्ण, गोवर्धन यांच्या कोरीव मूर्ती आहेत. यासोबतच हत्ती, घोडे, लढवय्ये, डोंबारी, नर्तक, भक्तगण, माकड, हनुमान, गणपती आदी अनेक मूर्ती कोरण्यात आल्या आहेत.

लासूर येथील आनंदेश्वर मंदिर हे इसवी सन १२ व्या शतकात यादव राजाच्या काळात देवगिरी राज्याचे प्रधान हेमांद्री पंथ यांनी साडेसातशे वर्षापूर्वी बांधले असावे, असा इतिहासकारांचा अंदाज आहे.याच काळात अल्लाउद्दीन खिलजीने अचलपूर मार्गाने देवगिरी अर्थात दौलताबादवर आक्रमण केले होते.या प्रवासाचा मार्ग अचलपूर वरुन दर्यापूर असा होता. याच काळात मंदिर उभारले जात असतांना अल्लाउद्दीन खिलजिच्या सैन्याची संख्या आणि आक्रमकता पाहता या मंदिराच्या बांधकामासाठी असणारे शिल्पकार, मूर्तिकार, विशारद, मजूर हे सर्वजण पळून गेले असावेत. त्यामुळेच भारताच्या इतिहासात स्थापत्य कलेत वैशिष्ट्य पूर्ण असणारे लासूरचे मंदिर अर्धवट राहिले. अलीकडे गत काही वर्षापासून या ठिकाणी श्रावण महिन्यात व महाशिवरात्रीला भाविकांची गर्दी वाढायला लागली आहे.महाशिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी येथील आनंदेश्वर मंदिरात महाप्रसाद वितरित केला जातो.लासूरच्या महादेवाला पातोडीच्या भाजीचा नैवैद्य अर्पण केल्या जातो आणि हाच महाप्रसाद भाविकांना दिल्या जातो.

### पुलावरून पडल्याने युवकाचा

पुलावरून नदी पात्रात पडला व त्यातच त्याचा मृत्यू झाला.घटनेची माहिती खल्लार पोलिसांना मिळताच ठाणेदार रविंद्र बारड, विशाल हरणे, विजय निमकांडे, गोपाल सोळंके, व्यंकेश नाकील, सागर नागपुरे, माहुलकर यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. या घटनेचा पुढील तपास खल्लार पोलिस करीत आहेत.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, १५ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# क्षयरोग दुरिकरणासाठी सर्व घटकांचा सक्रिय सहभाग आवश्यक - जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**क्षयरोग हा फक्त आरोग्य विभागाचा विषय नसून समाजाच्या सर्व घटकांचा एकत्रित सहभाग आवश्यक असलेला सार्वजनिक आरोग्य प्रश्न आहे. वेळेत निदान, उपचारांची सातत्यपूर्ण पूर्तता आणि रुग्ण उपचारातून बाहेर पडू नये यासाठी प्रत्येक पातळीवर दक्षता आवश्यक आहे. औषधोपचाराला दाद न देणाऱ्या क्षयरोगाचे प्रमाण चिंताजनक असून ते रोखण्यासाठी विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.**

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय टिबी फोरम सभा तसेच टिबी कोमॉरबीडीटी समन्वय समितीची संयुक्त बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आयोजित करण्यात आली यावेळी ते बोलत होते.



आढावा बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान,जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतिष परभणकर, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. महेश चाफे, आयएमएचे अध्यक्ष डॉ. संतोष सारडा, जागतिक आरोग्य संघटनेचे जिल्हा सल्लागार डॉ. सम्यक खैरे, निमा संघटनेचे अध्यक्ष डॉ. सतिश लांडकर, आरएमओ डॉ. पराग राठोड, जिल्हा कार्यक्रम समन्वयक समाधान लोणसूने यांच्यासह व्यापारी संघटनेचे प्रतिनिधी कृष्णा चौधरी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलतांना जिल्हाधिकारी म्हणाले की, खाजगी वैद्यकीय क्षेत्राचा सहभाग वाढविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्व खासगी डॉक्टरांनी टिबी रुग्णांचे नोटीफिकेशन नियमित करावे, यामुळे उपचारांचा मागोवा घेणे सोपे होईल आणि रुग्णांना योग्य वेळी आवश्यक सुविधा देता येतील. टिबीमुक्त पंचायत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करून ग्रामस्तरावर जनजागृती वाढवावी.

सार्वजनिक ठिकाणी माहितीपर होर्डिंग्ज, प्रचार साहित्य आणि आरोग्य विभागाच्या आय ईसी सेलने प्रचार प्रसिद्धीवर भर द्यावा . स्थानिक सहभागाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये क्षयरोगाबाबत जागरूकता निर्माण करावी. जिल्हा प्रशासन, आरोग्य यंत्रणा, स्वयंसेवी संस्था, व्यापारी संघटना व नागरिक यांनी समन्वयाने काम केल्यास जिल्हा क्षयरोगमुक्त करण्याचे उद्दिष्ट निश्चितच साध्य करता येईल.

जिल्ह्यातील क्षयरोग रुग्ण शोध, निदान, उपचार, औषध पुरवठा, टिबी कोमॉरडिटी व्यवस्थापन, निक्षय पोषण योजना, तसेच टिबी नोटीफिकेशन बाबत सविस्तर आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी घेतला.

जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतिष परभणकर यांनी जिल्ह्यातील सद्यस्थिती, रुग्णसंख्या, उपचार यशदर व आगामी उपक्रमांची विस्तृत माहिती सादर केली. आयएमएचे अध्यक्ष डॉ. संतोष सारडा यांनी खासगी वैद्यकीय क्षेत्राच्या सहभागावर भर देत समन्वय वाढविण्याची भूमिका मांडली. जागतिक आरोग्य संघटनेचे जिल्हा सल्लागार डॉ. सम्यक खैरे यांनी तांत्रिक मार्गदर्शन केले.

## महाशिवरात्री निमित्त बेल वृक्षाचे वृक्षारोपण करण्याचे राष्ट्रीय हरीत सेनेच्या चिमुकल्यांचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राष्ट्रीय हरितसेना एस एम सी इंग्लिश स्कूल वाशिम व सामाजिक वनीकरण विभाग वाशीमच यांचा संयुक्त उपक्रम वाशिम स्थानिक एस एम सी इंग्लिश स्कूल वाशिम च्या राष्ट्रीय हरित सेना व सामाजिक वनीकरण विभाग वाशीम यांच्या संयुक्त विद्यमाने महाशिवरात्री निमित्त शाळेच्या परिसरात महाशिवरात्रीच्या पूर्व संध्येला बेल वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. बेल हा वृक्ष हळूहळू विस्मृतीत जाऊ लागला आहे. तसेच महाशिवरात्री निमित्त बेलांच्या पानांची व वृक्षांची होणारी तोड व -हास थांबववविण्यासाठी तसेच पर्यावरणाच्या दृष्टीने बेलाचे जतन करणे आवश्यक असल्याने राष्ट्रीय हरित सेना एस एम सी इंग्लिश स्कूल व सामाजिक वनीकरण विभाग वाशीमच्यावतीने हा उपक्रम शाळेच्या प्राचार्य मीना उबगडे, राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी व सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी अशोक प-हाड वनपरिक्षेत्र अधिकारी राजेंद्र कातखेडे यांच्या मार्गदर्शनात हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी राष्ट्रीय हरीत सेनेचे समन्वयक अभिजीत मुकुंदराव जोशी यांनी विद्यार्थीना बेलवृक्षाचे वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन याचे महत्त्व पटवून सांगितले . वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाचे वनपाल रेणुका केंद्रे, मंगलप्रसाद बेले, वनरक्षक संतोष जुमडे, भगवान वानखेडे, अनिल लेमले तसेच शाळेचे माळी विशाल भंगी व हरित सेनेचे विद्यार्थी श्रावणी गटलेवार, विराज कंगले, श्रुती महाकाळ, वेदीका तोडकर, आस्था कुलकर्णी, अर्णवी बोरकर, नाव्या केळे, स्वरा बोरकर, दिव्या आरू, स्नेहा आरू, रितीका बोरकर, श्रेयांती उचीत, समाराधीनी निरगुडे, रिधीका मोरे, मोक्षदा चांदजकर, उज्ज्वल पैठणे, अल्तमश शेख, ओम जटाळे, राजकन्या खिल्लारी, स्नेहा देशमुख, कृष्णाली काकडे, विरेंद्र मुंदडा यांनी मोलाचे सहकार्य केले.कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी यांनी केले.तसेच या महाशिवरात्रीला बेल वृक्षांची तोड न करता त्याचे वृक्षारोपण करण्याचे आवाहन राष्ट्रीय हरित सेनेच्या चिमुकल्यांच्या वतीने करण्यात आले.



## शिवचरित्रकार डॉ. अशोक बांगर यांचे जाहीर शिव व्याख्यानाचे आयोजन!

■ प्रतिनिधी | कारंजा ■

इतिहासाला जिवंत करत तरुणाईच्या मनात प्रेरणा जागवणारे प्रख्यात शिवव्याख्याते शिवचरित्रकार डॉ. अशोक बांगर (बीड) यांचे दमदार जाहीर व्याख्यान २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता स्थानिक मुलजी जेठा हायस्कूलचे पटांगणावर पार पडणार आहे.

या भव्य कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघ यांच्या वतीने करण्यात आले असून इतिहासप्रेमी, विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी उपस्थित राहून या विचार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघातर्फे करण्यात आले आहे. शिवचरित्रकार

डॉ.अशोक बांगर आपल्या परखड आणि थेट शैलीत छत्रपतींच्या पराक्रमाची, स्वाभिमानाची आणि राष्ट्रनिर्मितीच्या विचारांची मांडणी करतात. परिणामी श्रोत्यांच्या मनात नवचैतन्य निर्माण होते. त्यामुळे कारंज्यातील या शिव व्याख्यानाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मालनेश्वर संस्थान येथे रक्तदान शिबीर संपन्न

### ६ २ रक्तदात्यांनी नोंदविला सहभाग

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शहरातील अतिशय प्राचीन व भाविकांचे आराध्य स्थान असलेले ग्रामदैवत श्री मालनेश्वर संस्थान शिव चौक मालेगांव महाशिवरात्री निमित्ताने भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असून एकूण ६ २ शिवभक्तांनी रक्तदान करीत शिबीर अतिशय भक्तिमय वातावरणात संपन्न झाले



मालेगांव शहरातील अतिशय प्राचीन असलेले आणि भाविकांचे आराध्य स्थान असलेले ग्रामदैवत श्री मालनेश्वर संस्थान शिव चौक येथे महाशिवरात्रीचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिर पार पडले असून यामध्ये मालेगांव चे प्रथम नागरिक मालेगांव चे नगराध्यक्ष ओमप्रकाश मधुकरराव खुरसडे यांनी सर्वप्रथम रक्तदान करीत शिबिराला सुरवात करण्यात आली असून एकूण ६ २ शिवभक्तांनी या शिबिरात सहभाग नोंदवित शिबीर यशस्वीपणे पार पडले असून रक्त संकलन करण्यासाठी शासकीय रक्तपेठी जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम यांना आमंत्रित करण्यात आले असून रक्त संक्रमन अधिकारी म्हणून डॉ. नेमाडे डॉ विनिती इंगळे डॉ पडघण डॉ सुनया तापी जनसंपर्क अधिकारी सचिन दंडे रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी सिद्धविनायक स्वामी , सागर मुके प्रियांका सावंत नरेंद्र सांगळे सुनील सावके अंकुश अंभोरे यांच्यासह शिबिर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी श्री मालनेश्वर संस्थांचे स्वयंसेवक यांनी मोलाचे सहकार्य केले.

## विश्व मांगल्य सभेचा राजाई मासिक सदाचार सभेचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक टिळक चौक शिंपी गल्ली येथील श्री संत नामदेव महाराज मंदिर येथे सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी विश्व मांगल्य सभेचा राजाई मासिक सदाचार सभेचे आयोजन करण्यात येणार असून या उपक्रमातून त्रिलोकीनाथ महादेवाचा अभिषेक व शिवमहिम्न स्तोत्राचे पठण घेण्यात येणार आहे, बाबत समस्त भक्तांकरीत ह्या सदाचार सभेचे आयोजन दुपारी तीन ते पाच या वेळात करण्यात येणार असून या सभेचा लाभ वत्सगुल्म वाशिम ऐतिहासिक नगरीतील महिलांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान आयोजकांनी केले आहे.

## पातूर तालुक्यातील शेतरस्त्यांची दुरुस्ती करा

### शिवसंग्रामचा आंदोलनाचा इशारा



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील पांदन व शेतरस्त्यांची दुरवस्था गंभीर बनली असून तात्काळ दुरुस्ती करावी, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष दिलीप परनाटे यांनी दिला आहे. याबाबत १२ फेब्रुवारी रोजी पातूरचे तहसीलदार यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, तालुक्यातील ग्रामीण भागातील अनेक रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले आहेत. काही ठिकाणी रस्त्यांचे अस्तित्वच धोक्यात आले असून पावसाळ्यात चिखल व पाण्यामुळे परिस्थिती अधिक बिकट होते. परिणामी शेतकऱ्यांना शेतात ये-जा करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

शेतीमाल बाजारपेठेत पोहोचवताना वाहतुकीत मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे वाहनांचे नुकसान होत असून अपघाताचा धोका वाढला आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस उपाययोजना न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. यामुळे आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदर शेतरस्त्यांची तात्काळ पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अन्यथा तहसील कार्यालयासमोर शेतकऱ्यांसह तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिलीप परनाटे यांनी प्रशासनाला दिला आहे.

## भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दलची मालेगाव तालुका बैठक

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दल, तालुका मालेगाव यांच्या कार्यकारिणीतील काही रिक्त पदांचे पुनर्गठन करण्यासाठी गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता तक्षशिला बुद्ध विहार येथे महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. तालुका प्रभारी शालिग्राम पठाडे (जिल्हा उपाध्यक्ष, संस्कार विभाग) यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.

मालेगाव तालुक्यात विविध सामाजिक व प्रबोधनात्मक शिबिरे प्रभावीपणे राबविण्यासाठी संघटन बांधणी मजबूत करण्यावर या बैठकीत भर दिला जाणार आहे. यावेळी देवानंद वाकोडे (जिल्हा सरचिटणीस) तसेच अश्विन खिल्लारे (जिल्हा उपाध्यक्ष, संरक्षण विभाग) यांचे प्रमुख सहकार्य लाभणार आहे.

दि. २४ ऑगस्ट २०२४ रोजी तालुका शाखेची निवड करण्यात आली होती. मात्र अपेक्षित प्रगती न झाल्याने सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. शिबिरे यशस्वी करण्यासाठी तालुका व शहर संघटना बळकट करणे आवश्यक असल्याने, तालुका व शहर शाखेतील रिक्त पदांवर नव्याने निवडी करण्यात येणार आहेत. इच्छुकपदाधिकारी व समता सैनिक दल तसेच भारतीय बौद्ध महासभेचे सर्व पदाधिकारी यांनी या बैठकीला आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन शहर अध्यक्ष कैलास इंगळे व मालेगाव तालुका कार्यकारिणी यांनी केले आहे.

## अपहरण केल्याप्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

### सावरगाव येथील ऊसतोड मजुराला कारमध्ये कोंबून अमानुष मारहाण

■ प्रतिनिधी | खेट्री ■

जिल्ह्यातील पातूर तालुक्यातील सावरगाव येथील ऊसतोड मजुराचे अपहरण करून अमानुष मारहाण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी जानेफळ पोलीस ठाणे येथे चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सावरगाव येथील ऊसतोड मजूर देविदास राठोड (वय ५०) यांना पारखेड येथील ऊसतोड एजंटकडून एक लाख रुपयांची आगाऊ रक्कम देण्यात आली होती. संबंधित रकमेवरील व्याजाची मागणी करत काही दिवसांपासून आरोपींकडून त्यांच्यावर कामासाठी दबाव टाकण्यात येत होता. तसेच अपहरण



करण्याच्या धमक्याही दिल्या जात असल्याचे तक्रारीत नमूद आहे. दरम्यान, ७ फेब्रुवारी रोजी दुपारी पारखेड फाट्यावरून देविदास राठोड यांना कारमध्ये जबरदस्तीने कोंबून नेण्यात आले. कारमध्ये त्यांना अमानुष मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा आरोप आहे. आरोपींच्या तावडीतून सुटका करून घेत राठोड हे ८ फेब्रुवारीच्या सायंकाळी घरी परतले. त्यानंतर ९ फेब्रुवारी रोजी त्यांनी थेट पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

तक्रारीवरून शामराव बाबुसिंग राठोड, संदीप जाधव, तेजराव राठोड आणि धोंडीराम जाधव (सर्व रा. पारखेड) यांच्याविरुद्ध अपहरण, मारहाण व धमकीप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### कठोर कारवाईची कुटुंबीयांची मागणी

भरदिवसा अपहरण करून अमानुष मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्यामुळे देविदास राठोड यांचे कुटुंबीय भयभीत झाले आहेत. कुटुंबात सध्या भीतीचे वातावरण असून संबंधित आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे.

# अकोला पोलीस भरतीत १५०० पैकी ११८९ उपस्थित ; ८३० उमेदवार पात्र

■ प्रतिनिधी | अकोला ■

*अकोला जिल्हा पोलीस दलातर्फे सन २०२४-२०२५ मधील पोलीस शिपाई भरती प्रक्रियेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महाराष्ट्र पोलीस सेवाप्रवेश नियम २०११ नुसार राबविण्यात येणारी ही भरती प्रक्रिया पोलीस मुख्यालय, अकोला येथे पारदर्शक आणि कडक बंदोबस्तात सुरू आहे.*

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली १६१ पोलीस शिपाई पदांसाठी ही प्रक्रिया पार पडत आहे. एकूण ११ हजार ७८४ अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी आज (दि. १३ फेब्रुवारी २०२६) १५०० उमेदवारांना मैदानी चाचणीसाठी बोलावण्यात आले होते. त्यापैकी ११८९ उमेदवारांनी हजेरी लावली. प्राथमिक शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणीनंतर ८३० उमेदवार पात्र ठरले.





भरती प्रक्रियेत शारीरिक मोजमाप, धावण्याची मैदानी चाचणी, तसेच कागदपत्रांची काटेकोर तपासणी यांचा समावेश आहे. उमेदवारांच्या सोयीसाठी पिण्याचे पाणी, वैद्यकीय पथक, रुग्णवाहिका, मोबाइल टॉयलेट, पी.ए. सिस्टीम आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ओळख पडताळणीसाठी डिजिटल फोटो, बायोमेट्रिक प्रणाली आणि इंघ्‌ तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत असून संपूर्ण प्रक्रिया सीसीटीव्ही व व्हिडिओ चित्रीकरणाखाली पार पडत आहे. भरतीदरम्यान गैरप्रकार रोखण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे दोन अधिकारी व २० अंमलदार तैनात आहेत. आवश्यकतेनुसार सूक्ष्म अंगझडती घेतली जात आहे. स्टेरॉईड किंवा अन्य उत्तेजक द्रव्ये आढळल्यास संबंधित उमेदवारावर वैद्यकीय तपासणीनंतर कायदेशीर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. मैदानी चाचणीसाठी सामान्य स्पोर्ट्स शूजना परवानगी असून स्पाईक शूजवर बंदी घालण्यात आली आहे.

### कागदपत्रे अनिवार्य

उमेदवारांनी आधारकार्ड, १२ वी उत्तीर्ण गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला किंवा एसएससी प्रमाणपत्र, अधिवास, जात व नॉन-क्रीमीलेअर (लागू असल्यास), ईडब्ल्यूएस/एसईबीसी प्रमाणपत्र, तसेच समांतर आरक्षणातील वैध प्रमाणपत्रे सोबत आणणे बंधनकारक आहे. सर्व कागदपत्रांच्या एक मूळ प्रतीसह दोन झेरॉक्स प्रती आवश्यक आहेत. सर्व प्रमाणपत्रे ७ डिसेंबर २०२५ पूर्वीची असणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### बाहेरगावच्या उमेदवारांसाठी सोय

बाहेरगावाहून येणाऱ्या उमेदवारांसाठी निमवाडी पोलीस वसाहतीतील मल्टिपर्पज हॉलमध्ये राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच केळी, बिस्कीट व ग्लुकोजचे वाटप करून उमेदवारांची काळजी घेण्यात येत आहे.

### फसवणूक करणाऱ्यांपासून सावध राहा

भरतीच्या नावाखाली पैशांची मागणी करणाऱ्या दलालांपासून सावध राहण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे. 'पोलीस भरती करून देतो' अशा खोट्या आश्वासनांना बळी पडू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. कोणत्याही प्रकारची पैशांची मागणी झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाण्यात, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या १०६४ या मदत क्रमांकावर किंवा पोलीस अधीक्षक कार्यालय व नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

एकूणच, अकोला पोलीस भरती प्रक्रिया शिस्तबद्ध, पारदर्शक आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पार पडत असल्याचे चित्र आजच्या चाचणीतून स्पष्ट झाले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ८१ ■ रविवार, १५ फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मूल्य ३.०० रु.


## हर हर महादेव'च्या गजरात ढगा भुवनात भक्तांचा महासागर

### -महाशिवरात्रीला अडीच लाख भाविकांची उपस्थिती अपेक्षित; पोलिस-वनविभाग सज्ज

**वर्धा जनमाध्यम :** महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त खरांगणा (मो.) नजीकच्या ढगा भुवन येथे १५ व १६ फेब्रुवारी रोजी भव्य यात्रा भरत असून शिवभक्तांचा मोठा मेळा जमणार आहे. यंदा महाशिवरात्री रविवारी आल्याने या तीर्थस्थळी किमान अडीच लाख भाविक भगवान भोलेनाथाच्या चरणी नतमस्तक होतील, असा अंदाज प्रशासनाने व्यक्त केला आहे.

त्यामुळे महाराष्ट्र पोलीस आणि वनविभाग यांनी विशेष तयारी केली आहे.

देवळी तालुक्यातील कोटेश्वर, हिंगणघाट तालुक्यातील पोहणा यांसह परिसरातील श्रद्धाळू मोठ्या संख्येने येथे



दाखल होतात. मंदिरातील शिवलिंगाच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच रांगा लागतात. रविवार व सोमवारी भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित असल्याने प्रवेश व निर्गमन मार्गांचे नियोजन करण्यात आले आहे.

ढगा भुवन परिसर बोर व्याघ्र प्रकल्पच्या बफर क्षेत्रात येत असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने विशेष खबरदारी घेण्यात आली आहे. भाविकांसाठी रस्ता सुस्थित करण्यात आला असून स्वतंत्र वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच स्वयंसेवकांकडून दर्शन रांगा लावणे, वृद्ध-अपंगांना मदत व प्राथमिक उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

यात्रेदरम्यान मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवणाऱ्यांवर कारवाई केली जाणार असून वाहतूक कोंडी टाळण्यासाठी विशेष पथके तैनात राहतील. वनविभागाचे अधिकारी-कर्मचारी, पोलिस कर्मचारी, पोलिस पाटील तसेच स्थानिक वनसमिती सदस्य बंदोबस्तासाठी कार्यरत राहणार आहेत. महाशिवरात्रीच्या निमित्ताने परिसरात उत्साहाचे वातावरण असून भाविकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## बोरखेडीत अस्वलाचा शिरकाव; वनविभागाचा 'ऑपरेशन पिंजरा' सुरू

### -सीसीटीव्ही नजर, रात्रंदिवस गस्त; ग्रामस्थांना दिलासा

**आष्टी शहीद जनमाध्यम :** तालुक्यातील बोरखेडी येथे अस्वलाच्या शिरकावामुळे काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गावातील हनुमान मंदिर परिसरात वारंवार वावर दिसून आल्याने नागरिकांनी प्रशासनाला कळविले. त्यानंतर वनविभाग तर्फे तातडीने हालचाली सुरू करत गावातील विविध ठिकाणी पिंजरे बसवले असून सीसीटीव्हीद्वारे अस्वलावर नजर ठेवली जात आहे.



पहाटेच्या सुमारास गावातील बांधकाम सुरू असलेल्या घराजवळ अस्वल शिरल्याने मोठी धांदल उडाली. पोलीस उपनिरीक्षक अक्षय भागानगरे यांच्या घराजवळ ते आल्याने ग्रामस्थांनी हुसकावण्याचा प्रयत्न केला. पळताना अस्वल एका महिलेकडे झेपावले; मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. त्यानंतर ते मध्यवस्तीतून शेतशिवाराच्या दिशेने निघून गेले.

कारंजा-आष्टी मार्गावरील रात्री सुरू असलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामामुळे पडणाऱ्या तीव्र प्रकाशामुळे वन्यप्राणी दिशाभूल होऊन गावाकडे येत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. याआधीही परिसरात बिबट्या व अस्वलाचे दर्शन झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

घटनेची माहिती मिळताच वनरक्षक राम गायकवाड व वनपाल विकास चौधरी यांनी तातडीने गावात धाव घेत पिंजरे बसवले. दोघेही अधिकारी गावात मुक्काम ठोकून रात्रंदिवस गस्त घालत असून सीसीटीव्हीद्वारे हालचाली टिपल्या जात आहेत.

वनविभागाच्या तत्पर कारवाईमुळे ग्रामस्थांमध्ये काहीसा दिलासा निर्माण झाला असून नागरिकांना रात्री एकटे बाहेर न पडण्याचे व सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अस्वल पकडले जाईपर्यंत उपाययोजना कायम ठेवण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

## 'माता की वैरिणी' नालीवर टाकले नवजात अर्भक; सोनेगाव बाई सुन्न

### -निर्दयी कृत्याने वर्धा हादरला- पोलिस, फॉरेन्सिक व चाईल्ड लाईन तपासात

**वर्धा जनमाध्यम :** मानवतेलाच काळीमा फासणारी हृदय पिळवटून टाकणारी घटना देवळी तालुक्यातील सोनेगाव बाई येथे शनिवारी उघडकीस आली. गावातील वॉर्ड क्रमांक २ परिसरात नालीच्या स्लॅबवर पुरुष जातीचे नवजात अर्भक मृतावस्थेत आढळून आल्याने संपूर्ण गाव सुन्न झाले आहे. पहाटेच्या सुमारास काही नागरिकांना स्लॅबवर पडलेले बाळ दिसताच एकच खळबळ उडाली.

काही क्षण लोकांच्या तोंडून शब्दच फुटेनात इतकं निर्दयी कोण असू शकतं असा प्रश्न प्रत्येकाच्या चेहऱ्यावर उमटला होता.

माहिती मिळताच पोलीस पाटलांनी तातडीने देवळी पोलीस ठाणे येथे कळविले. त्यानंतर पोलिसांनी धाव घेत मृत अर्भक ताब्यात घेतले. पुढील तपासासाठी फॉरेन्सिक पथक आणि चाईल्ड लाईन अधिकाऱ्यांनाही घटनास्थळी बोलावण्यात आले. पंचनामा करत घटनास्थळावरून महत्त्वाचे नमुने संकलित करण्यात आले.

बाळाचा मृतदेह उत्तरिय तपासणीसाठी वर्धा जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. हे अर्भक येथे कोणी आणले, जन्मानंतर किती वेळात मृत्यू झाला आणि या अमानुष प्रकारामागे नेमके कारण काय, याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे.

दरम्यान, गावात हळहळ व्यक्त होत असून आईच्या कुशीत विसावण्याऐवजी नालीवर पडलेल्या या निष्पाप जीवाने अनेकांच्या डोळ्यात पाणी आणले. मानवतेला काळिमा फासणाऱ्या या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे. दोषींना कठोर शिक्षा झालीच पाहिजे, अशी एकमुखी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## देवळी-यवतमाळ मार्गावर भीषण अपघात; दुचाकीस्वार ठार, एक जखमी

### अज्ञात वाहनाची धडक; पोलिसांकडून गुन्हा नोंद

**देवळी जनमाध्यम :** देवळी-यवतमाळ मार्गावरील इसापूर शिवारात भरधाव अज्ञात वाहनाने दुचाकीला दिलेल्या धडकेत तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या अपघातात मोहनिश लुंगसे (वय २३, रा. कोल्हापूर राव) याचा मृत्यू झाला असून किशोर कन्नाके (वय २७) हा जखमी झाला आहे.

माहितीनुसार, दोघेही एमएच-३२-बीबी-२६४१ क्रमांकाच्या दुचाकीने देवळी येथून पेट्रोलपंपाकडे जात होते. इसापूर शिवारातील पेट्रोलपंपाजवळ मागून आलेल्या भरधाव अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी तीव्र होती की मोहनिश लुंगसे याचा जागीच मृत्यू झाला, तर किशोर कन्नाके गंभीर जखमी झाला.

अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी जखमीला तातडीने उपचारासाठी हलविले. घटनेची माहिती मिळताच देवळी पोलीस ठाणे येथील पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.

या प्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. नागरिकांनी या मार्गावरील भरधाव वाहनांवर नियंत्रण ठेवण्याची मागणी केली आहे.

## रानडुकरांचा कहर शेतकऱ्यांच्या घामाची राख अर्धा एकर टरबूज पिकाची चिरफाड

### -वन्यप्राण्यांचा उच्छाद वाढला; नुकसानभरपाईसाठी शेतकऱ्यांचा आक्रोश

**सेलु जनमाध्यम :** तालुक्यातील वडगाव खुर्द येथे रानडुकरांनी अक्षरशः धुमाकूळ घालत शेतकऱ्यांच्या कष्टावर पाणी फेरले. अर्धा एकर क्षेत्रातील टरबूज पिकावर रात्रीच्या सुमारास कळपाने हल्ला चढवत वेली तुडवल्या, फळे फोडून टाकली आणि संपूर्ण शेताची चिरफाड केली. पहाटे शेतात पोहोचलेल्या शेतकऱ्यांना सर्वत्र फोडलेली टरबूजे आणि उद्ध्वस्त वेलींनी विदारक दृश्य पाहायला मिळाले.



या घटनेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असून उर्वरित क्षेत्रातही पिकांची नासधूस झाली आहे. दिवस-रात्र कष्ट करून उभे केलेले पीक एका रात्रीत संपल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत.

माहिती मिळताच वनविभाग चे क्षेत्र सहाय्यक सुनील कोटझावरे व वनरक्षक एम. एम. कुकडे यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. पीडित शेतकरी आकाश बारके यांनी तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी करत वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

परिसरात वन्यप्राण्यांचा वाढता वावर शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत असून प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलली नाहीत तर आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांकडून देण्यात आला आहे.

## उद्यापासून भक्तिरसाचा महापूर; जैन मंदिरात शतकोत्तर रजत जयंती महोत्सवाला प्रारंभ

### रथयात्रा-ध्वजारोहणासह विविध धार्मिक विधी

**सेलू जनमाध्यम :** वर्ध्यातील श्री जैन श्वेतांबर चंद्रप्रभ स्वामी मंदिर येथे उद्या १६ फेब्रुवारीपासून शतकोत्तर रजत जयंती महोत्सवाला प्रारंभ होत असून संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. मंदिराच्या १२५ वर्षांच्या ऐतिहासिक प्रवासानिमित्त आयोजित या सोहळ्यात सहा दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांची पर्वणी भाविकांना अनुभवायला मिळणार आहे.



मंदिराला शताब्दी वर्षी तीर्थपद प्राप्त झाले असून त्या गौरवाला २५ वर्षे पूर्ण होत असल्याने यंदाचा उत्सव विशेष महत्त्वाचा ठरत आहे. यानिमित्त प्राचीन प्रतिमांसह नव्याने साकारलेल्या श्री गौतम स्वामी महाराजांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना करण्यात येणार असून भक्तांमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

पूज्य गुरुदेव प्रशमविजयसूरीश्वरजी महाराज यांच्या सान्निध्यात धार्मिक कार्यक्रमांची सुरुवात अष्टाह्निका अभिषेक व प्रवचनाने होईल. त्यानंतर महिला मंडळातर्फे कल्याणक पूजा, मेहंदी व भक्तिसंगीताचे आयोजन करण्यात आले आहे. १९ फेब्रुवारी रोजी भव्य रथयात्रा आणि धर्मसभा पार पडणार असून १७ फूट ध्वजारोपण हा सोहळ्याचा आकर्षणबिंदू ठरणार आहे. २० फेब्रुवारीला मुख्य ध्वजारोहण व स्वामीवात्सल्य तर २१ फेब्रुवारीला ध्वज उत्थापनाने महोत्सवाची सांगता होणार आहे.

मंदिर परिसरात आकर्षक रोषणाई, सजावट व भाविकांच्या सेवेसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन श्रीसंघाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचा संगम अनुभवण्यासाठी भाविकांची पावले आता मंदिराकडे वळू लागली आहेत.

## हिंदी विद्यापीठ रोडवर भीषण अपघात

### -भरधाव कारची दुचाकीला धडक; दोन युवक गंभीर

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील त्रिमूर्ती नगर परिसरातील हिंदी विद्यापीठ रोडवर भरधाव कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात संकेत महेंद्र कळमकर (वय २८) व अजय पातडे (वय २५) हे दोन युवक गंभीर जखमी झाले असून शहरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जखमी युवक त्रिमूर्ती नगर येथून बाजाराकडे दुचाकी (क्र. MH-32-AX-7026) ने जात होते. दरम्यान हिंदी विद्यापीठ परिसरातून आर्वी नाक्याकडे भरधाव वेगात येणाऱ्या कारने (क्र. MH-32-AX-0452) त्यांच्या दुचाकीला





समोरून धडक दिली. धडकेचा जोर इतका होता की दोघेही रस्त्यावर फेकले गेले व गंभीर जखमी झाले.

घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ धाव घेत जखमींना उचलून डॉ. भूषण पाटील यांच्या दवाखान्यात दाखल केले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली.

सदर कार ही दिनेश पुंडलिक मंडळकर, रा. तुकडोजी वॉर्ड, हिंगणघाट यांच्या नावावर असल्याचे समोर आले आहे. दरम्यान जवळच महात्मा गांधी हिंदी विद्यापीठाच्या प्रांगणात जिल्हा महसूल विभागाच्या क्रीडा स्पर्धा सुरू असल्याने विविध तालुक्यांतील कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते. त्यामुळे संबंधित वाहन हे महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांचे असल्याची चर्चा घटनास्थळी रंगली होती.

घटनेची माहिती मिळताच रामनगर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. वृत्त लिहेपर्यंत गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती.

## पुलावरून पडल्याने युवकाचा मृत्यू

**खल्लार/प्रतिनिधीः-** खल्लार पोलिस स्टेशन हद्दीत येणाऱ्या चिंचोली शिंगणे येथील २७ वर्षीय युवकाचा भुलेश्वरी नदीच्या पुलावरुन पडल्याने जागीच मृत्यू झाल्याची घटना दि.१३ फेब्रुवारी रोजी सकाळी उघडकीस आली. विशाल प्रेमदास तायडे (२७)रा. चिंचोली शिंगणे असे मृत युवकाचे नाव आहे.

त्यास दारु पिण्याचे व्यसन होते. दारुच्या नशेतच तो पुलावरून जात असतांना त्याचा तोल जाऊन तो (दि. १२) ला अंजनगाव रोडवरील चिंचोली फाट्यानजिकच्या असलेल्या भुलेश्वरी नदीच्या ३० फूट पुलावरून नदी पात्रात पडला व त्यातच त्याचा मृत्यू झाला.घटनेची माहिती खल्लार पोलिसांना मिळताच ठाणेदार रविंद्र बारड, विशाल हरणे, विजय निमकांडे, गोपाल सोळंके, व्यंकेश नाकील, सागर नागपुरे, माहुलकर यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. या घटनेचा पुढील तपास खल्लार पोलिस करीत आहेत.

## दिव्यांग विद्यार्थ्यांना श्रवणयंत्रांचा आधार; शिक्षणाचा नवा स्वर खुलला

**वर्धा जनमाध्यम :** श्रवणबाधित मुलांच्या आयुष्यातील शांततेला आज नवा आवाज मिळाला. महिला विकास संस्था संचालित मूकबधिर विद्यालयाच्या वतीने शालेय कर्णबधिर दिव्यांग विद्यार्थ्यांना श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात आले. बी.टी. देशमुख हॉल, इंद्रप्रस्थ न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज येथे हा भावनिक व प्रेरणादायी कार्यक्रम पार पडला.

समेकित क्षेत्रीय केंद्र दिव्यांगजन, नागपूर यांच्या सौजन्याने तब्बल ५१ गरजू विद्यार्थ्यांना श्रवणयंत्रे देण्यात आली. या उपकरणांमुळे विद्यार्थ्यांची ऐकण्याची क्षमता वाढून संवाद साधणे आणि शिक्षण समजणे अधिक सुलभ होणार आहे. अनेक पालकांच्या डोळ्यांत समाधानाचे अश्रू तर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर नव्या आत्मविश्वासाची चमक दिसत होती.



कार्यक्रमास सीआरसी नागपूरचे प्रकल्प संचालक प्रफुल्ल शिंदे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) रुपेश कांबळे, महिला विकास संस्थेचे सचिव डॉ. अभिजीत विरुळकर, वर्धा जिल्हा दिव्यांग कल्याण समिति सदस्य संजय जाधव, ऑडिओलॉजिस्ट एल. अनुरुपा, वाचा उपचार तज्ञ राहुल तायडे, शाळा प्रमुख गोपाल वानखेडे, अधीक्षक मंगेश देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक काकपुरे सर यांनी केले.नालवाडी येथील मूकबधिर शाळा, शारदा मूकबधिर विद्यालय नालवाडी, तसेच यवतमाळ जिल्ह्यातील वसंतराव नाईक मूकबधिर विद्यालय आर्णी येथील विद्यार्थ्यांनाही या उपक्रमाचा लाभ मिळाला. या उपक्रमामुळे केवळ श्रवणशक्तीच नव्हे तर आत्मविश्वास, संवाद आणि शिक्षणाची दारे विद्यार्थ्यांसाठी अधिक खुली झाली, आणि त्यांच्या आयुष्यात नवा आवाज उमटला.

## जाहिर सुचना


कु. सारिका मिलिंद रंगारी, सिं.से. ईजी. (रेलपथ) वर्धा, मध्य रेल्वे में. TM-II के पद पर कार्यरत है। कर्मचारी का नाम सेवापुस्तीका मे कु. सारिका मिलिंद रंगारी है। कर्मचारी ने महाराष्ट्र शासन राजपत्र. भाग दोन - नाव, वय, व धर्म, बदलण्याच्या जाहिरातीचा विभाग. तारिख 14-20 जानेवारी 2021 पंजीकरण क्र. NR - 2025213 के अनुसार कर्मचारी का विवाह पश्चात नया नाम सौ, सारिका अभय वावरे (SARIKA ABHAY WAWARE) सेवापुस्तीका मे दर्ज करने हेतू आवेदन प्रस्तुत किया है।

# संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे पहिले सत्र गोंधळात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा शुक्रवारी गोंधळ आणि आरोप-प्रत्यारोपांच्या वातावरणात संपला. अवघ्या १३ दिवसांत माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकासंदर्भातील दावे आणि भारत-अमेरिका अंतरिम व्यापार करारावरील वादामुळे विरोधकांचे ८ खासदार संपूर्ण सत्रासाठी निलंबित करण्यात आले.लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि केंद्रीय मंत्री रवनीत सिंग बिट्टू यांच्यातील देशद्रोही मित्र विरुद्ध देशाचे शत्रु अशी शब्दयुद्धही चर्चेचा विषय ठरली. या घटनांमुळे सत्ताधारी आणि विरोधकांमधील दरी अधिकच वाढली असून ९ मार्चपासून सुरू होणा-या दुस-या टप्प्यातही त्याचे पडसाद उमटण्याची शक्यता आहे.**

**पंतप्रधानांना लोकसभेत उत्तर देता आले नाही-** विरोधकांनी पंतप्रधानांच्या आसनासमोर घोषणाबाजी करत घेराव घातल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावाच्या चर्चेला लोकसभेत उत्तर देता आले नाही. मात्र त्यांनी राज्यसभेत आपली भूमिका मांडली. वादाची सुरुवात २ फेब्रुवारी रोजी झाली. राहुल गांधींनी २०२० मधील भारत-चीन संघर्षाचा उल्लेख करत नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकातील काही दावे मांडले. यावरून त्यांची केंद्रीय मंत्री अमित शाह आणि राजनाथ सिंह यांच्याशी तीव्र शब्दांत खडाजंगी झाली. त्यानंतर गोंधळ सुरूच राहिला.काँग्रेसचे ७ आणि माकपचे १ खासदार यांनी अधिका-यांच्या



टेबलावर चढणे व कागदपत्रे फाडल्याचा आरोप करत त्यांना उर्वरित अधिवेशनासाठी निलंबित करण्यात आले.

**विशेषाधिकार प्रस्तावाची चर्चा-**संसदीय कार्यमंत्री किरेन रिजीजू यांनी सांगितले की, पंतप्रधानांविरोधात कथित असंसदीय भाषेचा वापर केल्याप्रकरणी सरकार राहुल गांधी यांच्याविरोधातील प्रस्ताव स्थगित ठेवत आहे. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी राहुल गांधींची सदस्यता रद्द करून त्यांना आजीवन निवडणूक लढवण्यास बंदी घालण्याची मागणी केली आहे. हा विषय लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या सल्ल्यानुसार विशेषाधिकार समितीकडे पाठवला जाउ शकतो. दरम्यान, विरोधकांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पदावरून हटवण्यासाठी नोटीस दिली असून हा प्रस्ताव दुस-या टप्प्यात मांडला जाउ शकतो.


**कामकाजावर परिणाम-**किताब विरुद्ध किताब या वादात ४ मार्च रोजी काही विरोधी खासदार स्पीकर चेंबरमध्ये गेले. या घटनेचा व्हिडिओही समोर आला. सत्ताधा-यांनी विरोधकांवर गैरवर्तनाचे आरोप केले असून अंतर्गत चौकशी सुरू आहे. अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यातील गोंधळामुळे लोकसभेचे कामकाज मोठ्या प्रमाणात बाधित झाले. पीआरएस लेजिस्लेटिव्हच्या माहितीनुसार लोकसभेची उत्पादकता केवळ ४३ टक्के राहिली आणि एकूण २६.६ तास काम झाले. राज्यसभेत मात्र ९७ टक्के उत्पादकता नोंदवली गेली आणि ५८.२ तास कामकाज झाले. गेल्या २८ जानेवारी रोजी राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने अधिवेशनाची सुरुवात झाली होती. एकूण ६५ दिवस चालणा-या या अधिवेशनाचा दुसरा टप्पा ९ मार्चपासून सुरू होउन २ एप्रिलला समाप्त होणार आहे. दरम्यानच्या विश्रांतीत विविध मंत्रालयांच्या अनुदान मागण्यांचा आढावा घेण्यासाठी स्थायी समित्यांच्या बैठकांचे आयोजन करण्यात येणार आहे.

# पुलवामा हल्ल्यातील शहीद जवानांना पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांकडून अभिवादन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** १४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मूहून श्रीनगरला जाणा-या केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) ताफ्यावर एका आत्मघाती हल्लेखोराने स्फोटकांनी भरलेले वाहन आदळले. या भीषण हल्ल्यात भारताचे ४० जवान शहीद झाले होते. या घटनेमुळे संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली होती. या हल्ल्याचा बदला म्हणून भारताने अवघ्या काही दिवसांतच पाकिस्तानमधील बालाकोट येथील दहशतवादी तळांवर एअर स्ट्राईक करून शत्रूला चोख प्रत्युत्तर दिले. पुलवामा येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात आपल्या प्राणांची आहुती देणा-या वीर जवानांना आज संपूर्ण देशाने अभिवादन केले. या निमित्ताने उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडियाद्वारे शहीद जवानांच्या बलिदानाचे स्मरण करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

**जवानांच्या त्यागामुळेच देश सुरक्षित - पंतप्रधान**

पंतप्रधान मोदींनी त्यांच्या आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये जवानांच्या अदम्य साहसाचा गौरव केला. त्यांनी लिहिले की, ‘२०१९ मध्ये आजच्या दिवशी पुलवामामध्ये आपल्या प्राणांची आहुती देणा-या शूर वीरांचे स्मरण करताना, त्यांची भक्ती, दृढनिश्चय आणि देशसेवा नेहमीच




आपल्या मनात राहील. प्रत्येक भारतीय त्यांच्या धाडसातून शक्ती मिळवतो. जवानांच्या या त्यागामुळेच देश सुरक्षित असून त्यांचे शौर्य प्रत्येक पिढीला प्रेरणा देत राहील’, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

**एक मजबूत आणि सुरक्षित भारत निर्माणासाठी प्रेरणा** - उपराष्ट्रपती

उपराष्ट्रपतींनी देखील या प्रसंगी जवानांच्या सर्वोच्च त्यागाचा गौरव केला. ते म्हणाले, ‘पुलवामा दहशतवादी हल्ल्यात आपले प्राण अर्पण करणा-या शूर सैनिकांना मी श्रद्धांजली वाहतो. त्यांचे सर्वोच्च बलिदान देशाच्या स्मृतीत नेहमीच कोरले जाईल. एक मजबूत आणि सुरक्षित भारत निर्माण करण्यासाठी आपल्याला प्रेरणा देत राहील.‘

**दहशतवाद हा मानवतेचा सर्वात मोठा शत्रु** - अमित शाह

पुलवामा दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या आपल्या शूर सैनिकांच्या शौर्याचे मी स्मरण करतो आणि त्यांना अभिवादन करतो. दहशतवाद हा मानवतेचा सर्वात मोठा शत्रू आहे आणि भारत त्याचा पूर्णपणे नायनाट करण्यासाठी दृढनिश्चयी आहे. दहशतवादाचा सामना करणा-या आपल्या सुरक्षा दलांच्या आणि सुरक्षा संस्थांच्या धाडसाचे, समर्पणाचे आणि बलिदानाचे राष्ट्र नेहमीच ऋणी राहील.

**सर्व प्रकारच्या दहशतवादाशी लढण्यासाठी भारत अढळ** - राजनाथ सिंह

पुलवामा येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्या शूर सीआरपीएफ जवानांना मी स्मरण करतो आणि त्यांना मनापासून श्रद्धांजली अर्पण करतो.

## संक्षिप्त

### छत्तीसगडमध्ये ट्रक-कारचा भीषण अपघातात चार जवानांचा मृत्यू

**रायपुर/वृत्तसंस्था :** छत्तीसगडमधील धमतरी जिल्ह्यातील अर्जुनी पोलिस स्टेशन परिसरात शनिवारी पहाटे खापरी-धमतरी बायपासजवळ ट्रक आणि कारची समोरासमोर धडक होउन बस्तरहून परतणा-या केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या (सीआरपीएफ) चार जवानांचा मृत्यू झाला. कार पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आणि जवान आतमध्ये अडकले होते.पोलिसांच्या माहितीनुसार, जगदलपूर



बटालियनची डिझायर कार खापरी बायपासजवळ समोरून येणा-या ट्रकला धडकली. धडकेची तीव्रता इतकी होती की दोन सैनिकांचा जागीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या दोघांचा रुग्णालयात दाखल केल्यानंतर मृत्यू झाला. आणखी एक जण गंभीर जखमी आहे आणि त्याच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच, वरदान परमार्थ रुग्णवाहिका सेवा संस्थेचे शिवा प्रधान, दुमन साहू आणि हेमंत प्रधान तात्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांनी नुकसान झालेल्या वाहनात अडकलेल्या सैनिकांना वाचवले आणि त्यांना जिल्हा रुग्णालयात नेले. मृतांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. मृत सैनिकांची नावे मुकेश कुमार, सौरभ तोमर, राजकुमार गोंड आणि चालक हिरा लाल नागर अशी मृत सैनिकांची नावे आहेत, तर अभियान राय नावाचा एक सैनिक जखमी झाला आहे आणि त्याच्यावर उपचार सुरू आहेत.अपघाताची बातमी जिल्हा रुग्णालयात पोहोचताच, लष्करी जवान आणि अधिका-यांची गर्दी जमली. जिल्हाधिकारी अविनाश मिश्रा, महापौर रामू रोहरा आणि अनेक लोकप्रतिनिधी घटनेची चौकशी करण्यासाठी रुग्णालयात पोहोचले. संपूर्ण रुग्णालय परिसरात शोक आणि दु:खाचे वातावरण पसरले. मिळालेल्या माहितीनुसार, हे जवान जगदलपूरहून रायपूरला प्रवास करत होते. ते घरी जात असताना हा दुर्दैवी अपघात झाला. अपघाताच्या कारणाबद्दल माहिती गोळा केली जात आहे. या प्रकरणाचा तपास करणा-या पोलिसांचे म्हणणे आहे की, चालकाला झोप लागली असेल आणि खापरीजवळ उभ्या असलेल्या ट्रकला धडकली असेल, ज्यामुळे कार पूर्णपणे चिरडली गेली असेल. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की अपघातानंतरचे दृश्य इतके भयानक होते की त्यांचे हातपाय थंड पडले होते. पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे आणि अपघाताचे कारण शोधण्यास सुरुवात केली आहे.

### जयपूर-कोटा महामार्गावर भीषण अपघात; मध्य प्रदेशातील पाच जणांचा मृत्यू

**जयपूर/वृत्तसंस्था :** राजस्थानमधील जयपूर-कोटा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वर शनिवारी पहाटे भीषण अपघात घडला. जयपूरजवळील चाक्सू परिसरात टिगरिया मोडजवळ सकाळी सुमारे साडेपाच वाजण्याच्या सुमारास भरधाव कार पुढे चाललेल्या ट्रेलरवर आदळली. धडक इतकी जबरदस्त होती की कारचा अक्षरशः चक्काचूर झाला आणि त्यामध्ये प्रवास करणा-या पाच जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एका महिलेचा समावेश असून सर्वजण मध्य प्रदेशातील जबलपूर येथील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. प्राथमिक माहितीनुसार कार मध्य प्रदेशातून जयपूरकडे जात



होती. चालकाला झोपेची डुलकी लागल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार पुढील ट्रेलरला जोरात धडकली. अपघातानंतर कारमधील प्रवासी आतमध्येच अडकून पडले होते.घटनास्थळीच चार जणांचा मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या एका युवकाने रुग्णालयात नेत असताना प्राण सोडले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मृतांची ओळख अखिलेश श्रीवास्तव यांची पत्नी रेशमा श्रीवास्तव, राजेश राय यांचा मुलगा पियूष राय, बबलू रजक यांचा मुलगा रजक राहुल आणि चालक अनुराग अशी झाली आहे. पाचव्या मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही.अपघातामुळे राष्ट्रीय महामार्गावर काही काळ मोठी वाहतूक कोंडी झाली होती. स्थानिक पोलीस आणि अपघात प्रतिसाद पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहने बाजूला करण्यात आली आणि वाहतूक सुरळीत करण्यात आली. सर्व मृतदेह चाक्सू उपजिल्हा रुग्णालयाच्या शवागारात ठेवण्यात आले असून नातेवाईक आल्यानंतर शवविच्छेदन प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

### अमेरिकेत 4 दिवसांपासून भारतीय विद्यार्थी बेपत्ता

**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था-**अमेरिकेत शिक्षण घेणारा २२ वर्षीय भारतीय विद्यार्थी बेपत्ता झाल्याची तक्रार करण्यात आली आहे. साकेत श्रीनिवासय्या हा विद्यार्थी कर्नाटकचा होता आणि बर्कले येथील कॅलिफोर्निया विद्यापीठात पदव्युत्तर पदवी घेत होता. सॅन फ्रान्सिस्कोमधील भारतीय दूतावासाने विद्यार्थ्याच्या बेपत्ता होण्याबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे. विद्यार्थ्याच्या बेपत्ता होण्याबद्दल चिंता व्यक्त करत, वाणिज्य दूतावासाने एक्सवर एका पोस्टमध्ये लिहिले आहे की, ‘सॅन फ्रान्सिस्कोमधील भारतीय वाणिज्य दूतावासाला कर्नाटक राज्यातील रहिवासी असलेल्या युसी बर्कले येथील भारतीय पदव्युत्तर पदवीधर साकेत श्रीनिवासय्या याच्या बेपत्ता होण्याबद्दल तीव्र चिंता आहे. वाणिज्य दूतावास कुटुंबाच्या संपर्कात आहे आणि विद्यार्थ्याला शोधण्यासाठी संबंधित स्थानिक अधिका-यांशी देखील संपर्कात आहे.‘श्रीनिवासय्याचा रूममेट, बनीत सिंगने त्याच्या बेपत्ता झाल्यानंतर लिंक्डइनवर पोस्ट केले आणि त्याला शोधण्यात मदत करण्याची विनंती केली. लिंक्डइनवरील एका पोस्टमध्ये, बनीत सिंगने लिहिले की, ‘सर्वांना नमस्कार, माझा रूममेट, साकेत श्रीनिवासय्या, सोमवार, ९ फेब्रुवारीपासून बेपत्ता आहे.

# महाराष्ट्रासह 3 राज्यांतील 12 जिल्ह्यांसाठी तीन बहुमार्गी प्रकल्पांना मंजुरी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील आर्थिक व्यवहारविषयक मंत्रिमंडळ समितीने रेल्वे मंत्रालयाच्या तीन (३) प्रकल्पांना तसेच १८,५०९ कोटी रुपयांच्या प्रकल्पांच्या एकंदर खर्चाला काल मंजूरी दिली.

**हे प्रकल्प खालीलप्रमाणे आहेत-**

**अ) कसारा - मनमाड ३ रा व ४ था रेल्वेमार्ग**

**ब) दिल्ली -अंबाला ३ रा व ४ था रेल्वेमार्ग**

**क) बल्लारी -होस्पेट ३ रा व ४ था रेल्वेमार्ग**

- भारतीय रेल्वेच्या मार्गांमध्ये 389 किलोमीटरची वाढ
- प्रकल्पाचा अंदाजे खर्ज 18,509 कोटी रुपये आणि 2030-31 मध्ये पूर्ण होईल
- प्रकल्पामुळे बांधकामाच्या वेळी सुमारे 265 लाख कामाचे दिवस इतकी रोजगार निर्मिती होईल



या वाढलेल्या रेल्वेमार्ग क्षमतेमुळे वाहतुकीत लक्षणीय सुधारणा होईल, कार्यक्षमता वाढेल आणि भारतीय रेल्वेच्या सेवेची विश्वासार्हतादेखील वाढेल. या बहुमार्गी प्रकल्पांचा उद्देश रेल्वेच्या कामात सुसूत्रता आणणे व वाहतूक कोंडी कमी करणे हा आहे. हे प्रकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नव्या भारताच्या संकल्पनेशी निगडीत आहेत. या प्रकल्पांमुळे त्या भागात सर्वसमावेशक विकास होईल आणि नागरिक आत्मनिर्भर होतील तसेच रोजगार अथवा स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील.पीएम गती शक्ती राष्ट्रीय बृहद् आराखड्यानुसार या प्रकल्पांचे नियोजन करण्यात आले आहे. एकात्मिक आराखडा व संबंधितांशी सल्लामसलतीद्वारे बहुस्तरीय दळणवळण सुविधा आणि माल वाहतूक कार्यक्षमता वाढवण्यावर यामध्ये भर देण्यात आला आहे. या प्रकल्पांमुळे नागरीक, वस्तू आणि सेवा यांच्या वाहतुकीसाठी सुलभ दळणवळण सुविधा उपलब्ध होईल.

दिल्ली, हरियाणा, महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातील १२ जिल्ह्यांमधील या तीन प्रकल्पांमुळे भारतीय रेल्वेमार्गाचा सध्याचा विस्तार ३८९ किलोमीटरने वाढेल. या प्रस्तावित बहुमार्गी प्रकल्पामुळे सुमारे ९७ लाख लोकसंख्या असलेल्या ३,९०२ गावांच्या संपर्क व्यवस्थेत सुधारणा होईल.या प्रस्तावित क्षमता वाढीमुळे देशातील अनेक प्रमुख पर्यटन स्थळांच्या रेल्वे संपर्क व्यवस्थेत सुधारणा होईल. भावली धरण, श्री घाटणदेवी, त्र्यंबकेश्वर ज्योतीर्लिंग, श्री माता वैष्णोदेवी कटरा/श्रीनगर यासह हम्पी युनेस्कोचे जागतिक वारसा स्थळ), बल्लारी किल्ला, दारोजी अस्वल अभयारण्य, तुंगभद्रा धरण, केंचनगुड्डा आणि विजया विठ्ठल मंदिर इत्यादी पर्यटन स्थळांचा यामधे समावेश आहे.हे प्रस्तावित प्रकल्प कोळसा, पोलाद, लोह खनिज, सिमेंट, बाक्साईट/चुनखडी, धान्य, साखर, खते, इंधन इत्यादी मालाच्या वाहतुकीसाठी गरजेचे आहेत. क्षमता वृद्धीच्या या प्रकल्पांमुळे ९६ दशलक्ष टन प्रतिवर्ष इतकी अतिरिक्त माल वाहतूक होउ शकते. रेल्वे हा वाहतुकीचा पर्यावरण पूरक व उर्जा सक्षम पर्याय आहे. यामुळे हवामानविषयक उद्दीष्ट साध्य करण्यात आणि देशाचा माल वाहतुकीवरचा खर्च कमी मदत होईल. इंधन आयात कमी होईल (२२ कोटी लिटर) आणि कार्बन डाय ऑक्साइडचे उत्सर्जन कमी होईल (१११ की किलोग्रॅम). याचा परिणाम ४ कोटी झाडे लावण्याइतकाच आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या आवाहनामुळे 305 एकरांवर होणार फळबाग व देशी वृक्षलागवड

**पुणे /प्रतिनिधीः** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हरित वृक्षलागवड वाढवून शेतक-यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासोबतच पर्यावरणीय समतोल राखण्याचे केलेले आवाहन हर्बालाइफ (कार्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व उपक्रम) आणि फार्मर्स फार फारेस्ट या संस्थांनी सकारात्मकरीत्या स्वीकारले आहे. या पार्श्वभूमीवर शेतक-यांच्या जमिनीवर फळबाग व देशी वृक्षलागवड करण्यासाठी सुमारे ३०५ एकर क्षेत्रावर दीड कोटी रुपयांच्या निधीचा सामंजस्य करार हर्बालाइफ आणि फार्मर्स फार फारेस्ट यांच्यात करण्यात आला आहे.

सद्यस्थितीत पर्यावरणीय समतोल राखणे तसेच शेतक-यांचे शेतीतून मिळणारे उत्पन्न वाढवणे ही अत्यंत महत्त्वाची गरज आहे. याच धर्तीवर महाराष्ट्र शासनामार्फत विविध पर्यावरणपूरक व शाश्वत शेतीविषयक उपक्रम राबविण्यात येत असून, या प्रयत्नांना बळ देण्यासाठी तसेच शेतक-यांचा सहभाग वाढवून दीर्घकालीन शाश्वत उत्पन्नाचा स्रोत निर्माण व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम जाहीर करण्यात आला आहे. जैवविविधतेचे क्षेत्र वाढविणे आणि शेतक-यांना दीर्घकालीन उत्पन्न देणारी फळबाग व वृक्षलागवड करण्यास प्रोत्साहन देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू आहे.



या उपक्रमांतर्गत बीड व पुणे जिल्ह्यांतील शेतक-यांच्या पडीक, कमी कसदार तसेच लागवडीयोग्य शेतजमिनींवर फळबाग व देशी वृक्षलागवड आणि संवर्धनाचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये आंबा, लिंबू, संत्रा, मोसंबी, आवळा, जांभूळ, चिंच आदी विविध प्रकारची दर्जेदार कलम केलेली फळझाडे तसेच स्थानिक व पर्यावरणपूरक देशी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. यासोबतच योग्य बाग व्यवस्थापनाच्या माध्यमातून शेतक-यांना आंतरपीक पद्धतीने उत्पन्न घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या उपक्रमांतर्गत विकसित होणा-या फळबागांमधून चौथ्या वर्षापासून उत्पन्न सुरू होईल. त्यामुळे सध्याच्या स्थितीत कार्यक्रमात सहभागी शेतक-यांचे प्रतिएकर प्रतिवर्ष सरासरी ५०,००० असलेले उत्पन्न वाढून प्रतिएकर प्रतिवर्ष सरासरी २,००,००० पर्यंत पोहोचेल, असा आमचा अंदाज आहे. हर्बालाइफच्या कार्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व निधीतून शेतक-यांना अनुदान तत्त्वावर दर्जेदार कलमी रोपे, देशी वृक्षांची रोपे, ठिबक सिंचन संच, माती परीक्षण, सेंद्रिय खते तसेच फळबाग लागवडीसाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन पुरविले जाणार आहे. या संपूर्ण कार्यक्रमाची अंमलबजावणी फार्मर्स फार फारेस्ट ही संस्था करणार असून, लागवडीनंतरही शेतक-यांना सातत्यपूर्ण तांत्रिक सहाय्य मिळावे यासाठी विशेष यंत्रणा उभारण्यात आली आहे. दुस-या व तिस-या वर्षातही खतांचा पुरवठा करण्यात येणार आहे.लागवड करण्यात आलेल्या झाडांची देखरेख व वाढीची नोंद घेण्यासाठी ड्रोनद्वारे छायाचित्रण, उपग्रह माहिती तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे डिजिटल निरीक्षण प्रणाली राबविण्यात येणार आहे.

# गडचिरोलीत ‘नीव’ प्रकल्पासाठी सामंजस्य करार

**गडचिरोली/प्रतिनिधी :-** महाराष्ट्र शासनाच्या विकसित विदर्भ दृष्टीकोनाशी सुसंगत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून गडचिरोली जिल्ह्यात ‘नीव’ (NEEV – Nurturing Equitable Empowerment & Livelihoods in Vidarbha) प्रकल्प राबविण्यासाठी जिल्हा प्रशासन व प्रधान या संस्थेमध्ये दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. जिल्हा प्रशासनातर्फे जिल्हाधिकारी अविश्यंत पंडा व प्रधान संस्थेचे कार्यकारी संचालक श्री सरोज महापात्रा यांनी करारावर स्वाक्षरी केली.

हा उपक्रम टाटा ट्रस्टच्या सहभागातून पुढील पाच वर्षांच्या कालावधीत (२०२५-२०३०) राबविण्यात येणार असून, जिल्ह्यातील सुमारे १५,००० ग्रामीण व आदिवासी कुटुंबांना थेट लाभ देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. प्रकल्पाच्या माध्यमातून पुनरुत्पादक शेती पद्धतींचा प्रसार, जलस्रोत विकास व संवर्धन, वनाधारित उपजीविकांचे बळकटीकरण, पशुधन व मत्स्यपालनाला चालना तसेच महिलांच्या नेतृत्वाखालील संस्थांचे सशक्तीकरण यावर विशेष भर दिला जाणार आहे.

हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेती आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाद्वारे ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्याचा या प्रकल्पाचा हेतू आहे. तसेच ग्रामपंचायत स्तरावर नियोजन प्रणाली मजबूत करून स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका अधिक प्रभावी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

सामंजस्य कराराद्वारे प्रधान संस्था व गडचिरोली जिल्हा प्रशासन यांच्यात समन्वयाधिष्ठित अंमलबजावणी, उपजीविका उपक्रमांची प्रभावी देखरेख आणि क्षमता विकास यासाठी औपचारिक चौकट निश्चित करण्यात आली आहे. एमओयू स्वाक्षरी समारंभास जिल्हाधिकारी श्री अविश्यंत पांडा प्रधान संस्थेचे श्री सरोज महापात्रा (कार्यकारी संचालक), डा. हर्षा वशिष्ठ (सीओई लीड), श्री कुंतल मुखर्जी तसेच श्री दिगंबर चौधरी उपस्थित होते.

# मुक्त जागतिक व्यापार करारात भारताच्या हिताशी कोणतीही तडजोड नाही-पीयुष गोयल

**मुंबई/प्रतिनिधी :** आत्मनिर्भर भारताच्या संकल्पपूर्तीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली देश आज प्रचंड, आत्मविश्वासानिशी वाटचाल करत असून यामध्ये भारत आपल्या हिताशी कोणतीही तडजोड करणार नाही, अशी ग्वाही केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पीयुष गोयल यांनी शनिवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत गोयल बोलत होते. मुंबई भाजपा अध्यक्ष अमित साटम, प्रदेश सरचिटणीस श्वेता परुळकर, राजेश शिरवाडकर, प्रदेश प्रवक्ते अतुल शाह, ओमप्रकाश चौहान आदी उपस्थित होते.




पंतप्रधानांच्या पुढाकाराने जगातील ३८ राष्ट्रांसोबत भारताच्या मुक्त व्यापार करारांची वाटचाल सुरू झाली असून जगातील व्यापारक्षेत्राचा ७० टक्के भाग भारतासाठी खुला झाला आहे. भारतासाठी सर्वतोपरी लाभदायक ठरणा-या या करारातून देशाचे संपूर्ण हित जपले जाईल, व शेतकरी वा अन्य कोणात्याही क्षेत्राच्या हितास बाधा येणार नाही, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली. पंतप्रधान मोदी यांच्या विकसित भारत संकल्पाच्या पूर्ततेमध्ये आता कोणतीही शक्ती बाधा आणू शकणार नाही, असा इशाराही गोयल यांनी दिला.देशहिताचे ध्येय डोळ्यासमोर ठेवूनच पंतप्रधान मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली देश विकासाच्या गतीने पुढे वाटचाल करत असून स्वातंर्त्याच्या अमृतकाळात विकसित भारताचे स्वप्न साकार होणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पातून पंतप्रधानांच्या संदेशातून व्यक्त होणारी कर्तव्यभावना प्रतिबिंबित होत असल्याचा विश्वासही गोयल यांनी व्यक्त केला.

जागतिक व्यापारक्षेत्रातील संधींचे दरवाजे भारतासाठी खुले होत असल्याने, अन्य कोणत्याही देशाच्या तुलनेत भारतास या करारांचा अधिक लाभ होणार असून भारतातील शेतकरी, दूध, जीएम फूड यांना या करारातून वगळून शेतक-यांचे हित जपले जात आहे. अन्य क्षेत्रांतील उत्पादनांस जगाच्या पाठीवरील नव्या बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्याची अभूतपूर्व संधी या करारांमधून मिळणार असून, यामुळे निर्यात, रोजगार आणि गुंतवणूक क्षेत्रात मोठी वाढ होणार आहे. मोदीजींच्या नेतृत्वाखाली देशाच्या अमृतकाळात विकसित भारताची वाटचाल अधिक बलशाली करणारे महत्वाचे पाउल या अर्थसंकल्पाद्वारे केंद्र सरकारने टाकले आहे, असे ते म्हणाले.

**केंद्रीय अर्थसंकल्पामुळे महाराष्ट्राला मोठा फायदा**

आर्थिक प्रगती, आत्मनिर्भरता, मूलभूत सुविधांना वेग, यांमुळे अर्थव्यवस्थेस साडेतीन पट अधिक बळ प्राप्त झाले आहे. १४० कोटी देशवासीयांच्या आशाअपेक्षा पूर्ण करणे, देशातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग तसेच उत्पादनक्षेत्रास गती देणे, रोजगारनिर्मिती करणा-या क्षेत्रास प्रोत्साहन व रोजागाराच्या नव्या संधी देणे, पतहमी योजनेस प्रोत्साहन, विदेशी गुंतवणूकीतून रोजगार वाढविणे, विदेशी चलननिर्मिती, नवीनीकृत उर्जानिर्मितीस प्रोत्साहन अशा बहुपेडी उद्देशातून देशाच्या प्रगतीची नवी वाटचाल पंतप्रधानांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाली आहे. व त्याचा थेट लाभ महाराष्ट्राला व मुंबईला मिळणार आहे. तीन नवे केमिकल पार्क, टेक्स्टाईल पार्क, विदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करणारे प्रकल्प, ‘सबका साथ सबका विकास ’ या ध्येयानुसार देशातील प्रत्येक नागरिकाचा विकास या कर्तव्यभावनेतून अर्थसंकल्पाची मांडणी केली आहे. महाराष्ट्रात या नीतीचा मोठा फायदा होणार आहे.रेल्वे प्रकल्पासाठी अर्थसंकल्पात मोठ्या प्रमाणावर तरतूद करण्यात येत असून महाराष्ट्राकरिता २४ हजार कोटींची तरतूद करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेस प्रोत्साहन देणा-या योजना, पुणे, नागपूरमध्ये ग्रोथ हबच्या रूपाने येत्या पाच वर्षांत विकास साधला जाणार असून त्यासाठी प्रत्येक शहराकरिता पाच हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मुंबई-पुणे व पुणे हैदराबाद हायस्पीड रेल क?रिड?रची योजना आखली जात आहे. अर्थसंकल्पाच्या प्रत्येक पैलूमध्ये महाराष्ट्राचा लाभ आणि महाराष्ट्राचे योगदान प्रतिबिंबित होत आहे. दिल्ली-मुंबई एक्स्प्रेस वे होईल, मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे होईल, वाढवण बंदर विकसित होईल, तिसरे विमानतळ कार्यान्वित होईल, पर्यटनास प्रोत्साहन दिले जाईल, तेव्हा स्वाभाविकच महाराष्ट्राला त्याचा लाभ होणार आहे. मुंबई आणि महाराष्ट्राकरिता या अर्थसंकल्पातून व मोदी सरकारच्या सर्व योजनांतून मोठा फायदा होणार असून पंतप्रधानांच्या रिफार्म एक्स्प्रेसद्वारे देशात एक परिवर्तनाची लाट येत आहे.

# लाडक्या बहिणींना आता एकदमच मिळणार 6000 रूपये

**मुंबई/प्रतिनिधीः**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थींना ई-केवायसी बंधनकारक आहे. पण, ई-केवायसी करताना झालेल्यांना त्रुटी दुरुस्तीसाठी पर्याय खुला करून दिला आहे. दुसरीकडे ई-केवायसी राहिलेल्या महिलांसाठी मुदतवाढही दिली आहे.तसेच संशयित लाभार्थींची अंगणवाडी सेविकांमार्फत पडताळणीही सुरू आहे. ही सर्व प्रक्रिया ३१ मार्चपर्यंत पूर्ण करण्याचे शासनाचे आदेश आहेत. त्यामुळे लाडक्या बहिणींना आता डिसेंबर २०२५ ते मार्च २०२६ या चार महिन्यांचे सहा हजार रुपये एप्रिलमध्ये एकदम मिळतील.लाडकी बहीण योजनेतील लाभार्थींना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत लाभ वितरित होईल, असा शासन निर्णय झाला आहे. राज्यातील सव्वादोन कोटी पात्र लाडक्या बहिणींसाठी दरमहा सरासरी ३२०० कोटी रुपये लागतात. मात्र, डिसेंबरपासून लाडक्या बहिणींसाठी निधी मिळालेला नाही. आता ज्या लाडक्या बहिणींची ई-केवायसी परिपूर्ण तथा अचूक झाली आणि निकषांनुसार त्या योजनेच्या लाभासाठी पात्र ठरत असतील तर त्यांना लाभ मिळेल, अशी चर्चा आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## ‘डिजिटल अरेस्ट’

माहितीचा प्रस्फोट झाल्यामुळे जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली. इंटरनेटमुळे विविध व्यवहार करण्यामधील दगदग आणि त्रास कमी झाला; परंतु त्याचबरोबर डिजिटल किंवा ऑनलाईन घोटाळ्यांमध्ये वाढ झाली. हे घोटाळेबाज दररोज वेगवेगळ्या पद्धतींचा आणि युक्त्यांचा अवलंब करतात. अलीकडील काळात ‘डिजिटल अरेस्ट’ हा नवीन प्रकार उदयाला आला. एखादी व्यक्ती पोलीस, ईडी किंवा सीबीआय अधिकारी असल्याचे सांगून मेसेज पाठवते वा थेट व्हिडीओ कॉल करते. ड्रग्ज किंवा मनी लाँडरिंगच्या प्रकरणात ‘डिजिटल अरेस्ट’ करत असल्याची बतावणी करते. या कथित गुन्ह्यातून जामीन हवा असेल, तर पैशाची मागणी केली जाते.अशावेळी घाबरून आणि घोटाळेबाजांच्या दबावाला बळी पडून व्यक्ती पैसे पाठवून देते. वास्तविक, ‘डिजिटल अरेस्ट’ नावाचा कोणताही प्रकार अस्तित्वात नसला, तरीदेखील अशा घटना वारंवार घडत आहेत. वेगवेगळ्या प्रकारच्या डिजिटल फसवणुकीमुळे देशात ५४ हजार कोटी रुपयांच्या फसवणुकीच्या घटना घडलेल्या आहेत. ही रक्कम अनेक लहान राज्यांच्या अर्थसंकल्पापेक्षाही जास्त आहे. हे सर्व प्रकार म्हणजे दरोडा किंवा लूटच असून, यावर नियंत्रण मिळवण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करा, असा रास्त आदेश सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केंद्र सरकारला दिला. हे गुन्हे बँक अधिकाऱ्यांच्या संगनमताने किंवा निष्काळजीपणामुळे होऊ शकतात, अशी टिप्पणीही न्यायालयाने केली. ‘डिजिटल अरेस्ट’च्या बळींना नुकसानभरपाई देण्यासाठी रिझर्व्ह बँक, दूरसंचार विभाग आणि इतर बँकांनी मिळून एक आराखडा तयार करावा, तसेच रिझर्व्ह बँक व दूरसंचार विभागाच्या नियमांचा अभ्यास करून चार आठवड्यांत मसुदा तयार करावा, असा आदेशही न्यायालयाने दिला. वास्तविक संबंधित यंत्रणांनी ही गोष्ट अगोदरच करणे आवश्यक होते. न्यायालयाने या सर्व प्रकरणांची चौकशी यापूर्वीच सीबीआयकडे सोपवली आहे. हरियाणातील वृद्ध दाम्पत्याने केलेल्या तक्रारीवर सुनावणी करताना सायबर गुन्हेगार ज्या पद्धतीने देशातून मोठ्या प्रमाणावर रक्कम बाहेर पाठवत आहेत, त्याबद्दल न्यायालयाने चिंता व्यक्त केली होती. पीडितांना नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी ठोस पावले उचलण्याचेही आदेश मागच्याच महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने दिले होते.सध्याचे ऑनलाईन माध्यमांतील गुन्हे अत्यंत गंभीर आहेत. याचे कारण, त्यामुळे गोरगरीब, कष्टकरी व्यक्ती तसेच ज्येष्ठ नागरिकांची आयुष्यभराची बचत लुटली जात आहे. कष्टाने जमवलेली पुंजी काही सेकंदांत गायब झाल्यावर अशा माणसांना कोणाचाही आधार नसतो. शिवाय न्यायपालिकेचे नाव, शिक्का आणि बनावट आदेशांचा गैरवापर करून न्यायव्यवस्थेवरील विश्वासावरच हे चोर हल्ला करत असतात. म्हणूनच ‘डिजिटल अरेस्ट’, बनावट न्यायालयाचे आदेश आणि न्यायाधीशांच्या नावाचा गैरवापर करणाऱ्या टोळ्यांविरोधात राष्ट्रीय स्तरावर कठोर कारवाई करण्याबाबतच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सूचना योग्यच आहेत.अर्थात, आयटी इंटरमिजिअरी म्हणजेच सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स, मेसेजिंग ॲप्स आणि इतर ऑनलाईन सेवा देणाऱ्या कंपन्यांनी सीबीआयला संपूर्ण तांत्रिक माहिती देऊन सहकार्य केले पाहिजे. कारण, जे या मंचांचा वापर करून लोकांना फसवतात, त्यांचा शोध घेणे अशा सहकार्यामुळे शक्य होईल. बऱ्याच टोळ्या परदेशांतून आणि खासकरून टॅक्स हेवन देशांमधून कार्यरत असतात. भारतातील लोकांच्या खात्यांतून त्या अनेकदा पैसे उकळत असतात. डिजिटल फसवणुकीचे बळी ठरलेल्या बँक ग्राहकांना २५ हजार रुपयांपर्यंतची भरपाई देण्याची घोषणा रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी नुकतीच केली. ग्राहकाने चुकून आपला ओटीपी शेअर केला असेल, तरीदेखील ही भरपाई मिळणार आहे. रिझर्व्ह बँकेकडील ८५ हजार कोटी रुपयांच्या फंडातून ही रक्कम दिली जाणार आहे. अर्थात, ही भरपाई ग्राहकाला आयुष्यात फक्त एकदाच मिळणार आहे. शिवाय फसवणुकीच्या एकूण रकमेपैकी १५ टक्के रकमेचा बोजा ग्राहकाला स्वतःला उचलावा लागणार आहे.एकूण डिजिटल फसवणुकीपैकी दोन तृतीयांश गुन्हे ५० हजार रुपयांच्या आतील आहेत. अशा तुलनेने लहान रकमेच्या व्यवहाराला या निर्णयाचा काही अंशी फायदा होईल; मात्र ग्राहकाचा कोणताही गैरहेतू त्यात नसावा, अशी अट त्यात आहे. तसे पाहता हे संरक्षण तुटपुंजे आहे आणि त्याने मूळचा प्रश्न सुटणारा नाही. फसवणूक रोखण्यासाठी रिझर्व्ह बँक लवकरच अतिरिक्त सुरक्षा साधने आणणार आहे. यामध्ये लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा होण्यासाठी काही कालावधीची मर्यादा आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष पडताळणीचा समावेश असेल. हे पाऊल स्वागतार्हच म्हणावे लागेल. आजकाल बहुतांश राज्यांमध्ये विशेषतः वरिष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणात सायबर गुन्ह्यांचे बळी ठरत आहेत. डिजिटल अरेस्ट इन्व्हेस्टमेंट स्कॅम, पार्टटाईम जॉब स्कॅम हे प्रकार गंभीर सायबर क्राईमच्या अंतर्गत असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. आश्चर्याची बाब म्हणजे, अनेक राज्यांनी सीबीआय चौकशीस मान्यता न दिल्यामुळे न्यायालयाला त्यांनीही अशा तपासास सहमती देण्याचे आदेश द्यावे लागले होते. भविष्यात सिमचा दुरुपयोग टाळण्यासाठी सर्व दूरसंचार कंपन्यांना कठोर प्रणाली लागू करावी लागेल. आता सर्वोच्च न्यायालयाने बँक खाते उघडण्यास सामील असलेल्या बँक अधिकाऱ्यांची भूमिका तपासण्याचे अधिकारही सीबीआयला दिले. त्याचप्रमाणे ज्या खात्यांचा वापर डिजिटल अरेस्ट घोटाळ्यासाठी झाला, त्याचीही सखोल चौकशी करता येईल. हे सर्व व्यवहार बँकेमार्फत होत असतात. रिझर्व्ह बँक ही देशाची मध्यवर्ती बँक असून, तिचे बँकांवर नियंत्रण असते. त्यामुळे आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशिन लर्निंग प्रणाली लागू करून संशयास्पद खात्यांची ओळख पटवा आणि गुन्ह्यातील रकमेचा प्रवाह थांबवा, अशा सूचना न्यायालयाने रिझर्व्ह बँकेला दिल्या. ‘माहिती व तंत्रज्ञान कायदा २०००’ ला २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. इतका काळ लोटूनही या कायद्यात ज्या सुधारणा व्हायला हव्या होत्या त्या झालेल्या नाहीत. शिवाय या क्षेत्रात लोकांमध्ये डिजिटल साक्षरता व जनजागृती निर्माण करण्याची गरज आहे. डिजिटल गैरव्यवहार आणि सायबर क्राईम हा देशाच्या अर्थव्यवस्थेवरीलच हल्ला आहे. तो रोखण्यासाठी गरज आहे, ती आणखी कडक पाऊल उचलण्याची.

# तामिळनाडूतील सत्ता समिकरण !



**तामिळनाडूमध्ये गेली अनेक वर्षे द्रमुक आणि अण्णा द्रमुक हे पक्ष आलटून पालटून सत्तेवर येत आहेत.मात्र या खेपेस सिनेस्टार विजय याचा टीव्हीके (तमिलगा वेत्री कळघम) हा पक्ष निवडणूक रिंगणात असणार आहे.विजयच्या सभांना त्याच्या फॅन्सची होणारी प्रचंड गर्दी लक्षात घेता,त्याचा पक्ष तामिळनाडूतील प्रस्थापित पक्षांना, म्हणजेच द्रमुक आणि अण्णा द्रमुक यांना चांगली लढत देईल अशी चर्चा आहे..**

तामिळनाडूमध्ये लवकरच होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी राजकीय पक्षांची जोरदार तयारी सुरू झाली आहे.सत्ताधारी द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीचे जागावाटप पुढील महिन्यात होणार असल्याचे बोलले जात आहे.त्या दरम्यान तामिळनाडू मधील कॉंग्रेसचे खासदार मणिक्कम टागोर यांनी अशी मागणी केली आहे की, येत्या विधानसभा निवडणुकीत द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीला पुन्हा एकदा विजय मिळाला तर, द्रमुकने आघाडीतील घटक पक्ष असलेल्या कॉंग्रेसला सत्तेत सहभागी करून घ्यायला हवे.अर्थात ही मागणी टागोर यांनी यापुर्वीही केली होती.टागोर यांचे असे म्हणणे आहे की २००६ साली जेंव्हा द्रमुकला स्वबळावर बहुमत मिळाले नव्हते तेंव्हा, बहुमताचा आकडा गाठण्यासाठी द्रमुकला पाठिंबा देणाऱ्या कॉंग्रेसने,आपल्याला सत्तेत सहभागी करून घेण्याचा आग्रह, द्रमुक जवळ धरायला हवा होता.कॉंग्रेसने तसे केले नाही,ही कॉंग्रेसची चूक झाली, असे वक्तव्य टागोर यांनी केले आहे.

२००६ साली झालेल्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत द्रमुकला ९६ जागांवर विजय मिळाला होता.२३४ सदस्यांच्या तामिळनाडू विधानसभेत साध्या बहुमतासाठी आवश्यक असणाऱ्या ११८ या जादुई आकड्यापासून द्रमुक दूर होती.अशा परिस्थितीत हा जादुई आकडा गाठण्यासाठी, द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीत घटक पक्ष असलेल्या कॉंग्रेस,पीएमके आणि सीपीएम यांनी पाठिंबा दिल्यामुळेच, द्रमुकला सरकार स्थापन करणे शक्य झाले होते.२००६ मध्ये झालेल्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसला ३४ जागा मिळाल्या होत्या तर पीएमकेला १८ जागा मिळाल्या होत्या आणि सीपीएमला ९ जागा मिळाल्या होत्या.अशा परिस्थितीत आपल्याला सत्तेत सहभागी करून घेण्याचा आग्रह तेंव्हा कॉंग्रेसने, द्रमुक जवळ धरायला हवा होता, परंतु कॉंग्रेसने आग्रह केला नाही आणि सत्तेत सहभागी होण्याची चांगली संधी गमावली,अशी खंत, मणिक्कम टागोर यांनी व्यक्त केली आहे.

कॉंग्रेसचे आणखी एक नेते प्रवीण चक्रवर्ती यांनीही त्या बाबतीत भाष्य केले आहे.ते म्हणाले की इतर राज्यांमध्ये आघाडीची सरकारे अस्तित्वात असताना, फक्त तामिळनाडूमध्ये सिंगल पार्टीच्या सरकारचा आग्रह का धरला जातो.आघाडीतील इतर घटक पक्षांना सरकारमध्ये स्थान का दिले जात नाही.कॉंग्रेस जर सरकारमध्ये सहभागी झाली तर पक्षाला राज्यात आणखी बळकटी मिळेल.मात्र तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांनी कॉंग्रेसची ही मागणी फेटाळून लावली आहे.त्यांचे असे म्हणणे आहे की आघाडीचे सरकार तामिळनाडूसाठी सोयिस्कर ठरणार नाही.मणिक्कम टागोर यांनी तर थेट असे जाहीर केले आहे की, लवकरच होणाऱ्या तामिळनाडू विधानसभेच्या निवडणुकीनंतर, सत्तेवर येणारे सरकार हे सिंगल पार्टीचे असावे की आघाडीचे असावे,याचा निर्णय तामिळनाडूतील जनताच घेईल.

तामिळनाडूमध्ये गेली अनेक वर्षे द्रमुक आणि अण्णा द्रमुक हे पक्ष आलटून पालटून सत्तेवर येत आहेत.मात्र या खेपेस सिनेस्टार विजय याचा टीव्हीके ( तमिलगा वेत्री कळघम ) हा पक्ष निवडणूक रिंगणात असणार आहे.विजयच्या सभांना त्याच्या फॅन्सची होणारी प्रचंड गर्दी लक्षात घेता,त्याचा पक्ष तामिळनाडूतील प्रस्थापित पक्षांना, म्हणजेच द्रमुक आणि अण्णा द्रमुक यांना चांगली लढत देईल असे बोलले जात आहे.अर्थात विजयची समस्या अशी आहे की त्याच्याकडे मजबूत अशी पक्ष संघटना नाही.त्याच्या फॅन्सकडे प्रचंड उत्साह आहे परंतु जेव्हा तुम्ही अनेक वर्षांचा अनुभव असलेल्या आणि बळकट पक्ष संघटना असलेल्या द्रमुक आणि अण्णा द्रमुक या पक्षांशी दोन हात करता तेव्हा नुसता उत्साह कामाला येत नाही. या पुर्वी जे सिनेस्टार दाक्षिणात्य राज्यांत मोठा गाजावाजा करून राजकारण उतरले, त्यापैकी दोन - चार सिनेस्टार सोडल्यास इतरांना विधानसभा निवडणुकीत फारसे यश मिळालेले नाही.तामिळनाडूत मोठा गाजावाजा करून राजकारणात प्रवेश केलेल्या सिनेस्टार विजयकांतला विधानसभा निवडणुकीत मोठे यश मिळाले नाही.त्याचा पक्ष डीएमडीकेला तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त फक्त २९ जागा मिळाल्या होत्या.सिनेस्टार कमल हासन याच्या पक्षाला तर विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव पत्करावा लागला.मात्र सिनेस्टार एम.जी. रामचंद्रन यांच्या अण्णा द्रमुक पक्षाने विधानसभा निवडणुकीत प्रचंड विजय मिळवून सत्ता काबीज केली आणि ते तामिळनाडूचे मुख्यमंत्रीही बनले.तिकडे आंध्र प्रदेशात सिनेस्टार चिरंजिवी याने मोठ्या थाटामाटात राजकारणात प्रवेश केला, परंतु त्याच्या पक्षाला विधानसभा निवडणुकीत अपेक्षित असे यश मिळाले नाही.मात्र सिनेस्टार एन.टी.रामाराव यांनी राजकारणात प्रवेश केल्यापासून, वर्षभरात आंध्रप्रदेशची सत्ता काबीज केली आणि ते मुख्यमंत्रीही बनले.

या पार्श्वभूमीवर तामिळनाडूमध्ये सिनेस्टार विजय याच्या टीव्हीके या पक्षाला कितपत यश मिळेल, ते पहावे लागेल.तामिळनाडू कॉंग्रेस मधील काही नेत्यांना असे वाटत आहे की, पक्षाने द्रमुकची साथ सोडून,सिनेस्टार विजय याच्या पक्षाबरोबर युती करावी.मात्र त्या नेत्यांना पक्षातील बहुतांश नेत्यांचा पाठिंबा दिसत नाही.कदाचित द्रमुक बरोबरच्या वाटाघाटीत, कॉंग्रेसच्या पदरात जास्त जागा पडाव्यात म्हणून, द्रमुक वर दबाव आणण्यासाठी, कॉंग्रेस मधील काही नेते, द्रमुकची साथ सोडून सिनेस्टार विजय बरोबर जाण्यासंबंधीच्या वावड्या उठवत असतील.एक गोष्ट मात्र निश्चित आहे ती म्हणजे विजयच्या लोकप्रियतेची चाचणी विधानसभा निवडणुकीतच लागू शकेल.सिनेस्टार विजयच्या पक्षाला लवकरच होणाऱ्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत कितपत यश मिळेल हे आताच सांगता येणार नाही, मात्र निवडणूक रिंगणातील त्याच्या उपस्थितीचा परिणाम द्रमुक आणि अण्णा द्रमुक यांच्या नेतृत्वाखालील आघाड्यांच्या कामगिरीवर कितपत होईल,ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**अभय गोखले**


# सर्जनशीलतेमध्ये ‘एआय’ वापराची लक्ष्मणरेषा

**एकोणीसाव्या शतकात फोटोग्राफीचा शोध लागला, तेव्हा चित्रकारांना वाटले की कॅमेरा हा कलेचा शत्रू आहे. मात्र फोटोग्राफीने चित्रकलेची जागा घेतली नाही, तर तिला वास्तववादाकडून अमूर्ततेकडे नेण्यास मदत केली आणि एक नवीन कलाप्रकार जन्माला आला. ‘एआय’च्या बाबतीतही असेच काहीसे घडू शकते. तरीही मानवी सर्जनशीलतेचे पावित्र्य राखण्यासाठी आणि या तंत्रज्ञानाचा गैरवापर रोखण्यासाठी जागतिक स्तरावर एकसमान नियम व धोरणे आखण्याची गरज आहे.**

सर्वच क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर वाढत असताना साहित्य आणि कला यांसारख्या सर्जनशील क्षेत्रांत तो किती प्रमाणात स्वीकारार्ह असावा, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. मानवी सृजनशीलतेवर होणा?या ‘एआय’च्या आक्रमणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन काळ आणि भौगोलिक परिस्थितीनुसार बदलत असला तरी जोपर्यंत ही तंत्रज्ञान प्रणाली एखाद्या नवीन कला प्रकाराला जन्म देत नाही, तोपर्यंत पारंपरिक कलेतील मानवी स्पर्श जपणे आवश्यक आहे.

नुकतीच न्यूझीलंडमधील दोन पुरस्कार विजेत्या लेखकांच्या पुस्तकांना स्टेफनी जॉन्सन यांचा कथासंग्रह ‘ओब्लिगेट कार्निवोर’ आणि एलिझाबेथ स्मिथर यांचा ‘एंजेल ट्रेन’ २०२६ च्या प्रतिष्ठत ‘ओखम बुक अवॉर्ड्स’साठी अपात्र ठरवण्यात आले. विशेष म्हणजे, ही अपात्रता लेखनासाठी नसून पुस्तकांच्या मुखपृष्ठ (कव्हर) डिझाइनमध्ये ‘एआय’चा वापर केल्यामुळे आणि त्यासंबंधीच्या नियमांचे उल्लंघन झाल्यामुळे देण्यात आली. या घटनेने सर्जनशीलतेच्या संदर्भात ‘एआय’ची लक्ष्मणरेखा नेमकी कुठे असावी, हा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित केला आहे.

मानवी रचनात्मकतेमध्ये ‘एआय’च्या समावेशाबाबत जागतिक स्तरावर संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. २०२३ मध्ये जर्मन छायाचित्रकार बोरिस एल्डॅग्सन यांनी सोनी वर्ल्ड फोटोग्राफी अवॉर्ड स्वीकारण्यास नकार देऊन खळबळ माजवून दिली होती. कारण ते छायाचित्र ‘एआय’च्या मदतीने तयार केले होते. याउलट बीजिंगमधील प्राध्यापक शेन यांग यांनी ‘एआय’च्या मदतीने अवघ्या तीन तासांत लिहिलेल्या पुस्तकाला विज्ञान कथा स्पर्धेत दुसरे पारितोषिक मिळाले. जपानी लेखिका री कुडन यांनी तर त्यांच्या टोयो-टू डोजो-टू या कादंबरीतील ५ टक्के मजकूर ‘चॅटजीपीटी’चा असल्याचे कबूल करूनही ‘अकुतागावा’ हा मानाचा पुरस्कार पटकावला.



हॉलीवूडमध्येही ही स्वीकृती वाढत असल्याचे दिसते. ‘द ब्रुटलिस्ट’ चित्रपटातील भूमिकेसाठी एड्रियन ब्रॉडी यांनी हंगेरियन भाषेचा उच्चार सुधारण्यासाठी ‘एआय’ची मदत घेतली आणि ऑस्कर जिंकले. ऑस्करसाठी नामांकित ‘एमिलिया पेरेझ’ चित्रपटातही गायिकेचा आवाज सुधारण्यासाठी ‘एआय लोनिंग’चा वापर करण्यात आला. हे सर्व संकेत पाहता हॉलीवूडने आता या तंत्रज्ञानाला सहचर म्हणून स्वीकारले असल्याचे स्पष्ट होत आहे.

मात्र शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रात ‘एआय’बाबत कडक भूमिका घेतली जात आहे. अनेक शोधनिबंधांमध्ये ‘चॅटजीपीटी’ला सहलेखक म्हणून स्थान देण्यास नियतकालिकांनी विरोध दर्शवला आहे. साहित्याच्या क्षेत्रात सलमान रश्दी आणि मार्गरेट ॲटवुड यांसारख्या ज्येष्ठ लेखकांनी या तंत्रज्ञानाबाबत फारशी भीती व्यक्त केलेली नाही. रश्दींच्या मते, जोपर्यंत ‘एआय’ मानवाप्रमाणे विनोदी बुद्धी दाखवत नाही, तोपर्यंत लेखकांना धोका नाही.

दुसरीकडे केंब्रिज विद्यापीठाच्या एका अभ्यासात लेखक वर्गामध्ये मोठी चिंता व्यक्त करण्यात आली आहे. सर्वेक्षणात सहभागी झालेल्या ५१ टक्के लेखकांना वाटते की, ‘एआय’ भविष्यात त्यांच्या पेशाचे स्वरूप पूर्णपणे बदलून टाकेल. ५९ टक्के लेखकांचा असा दावा आहे की, त्यांच्या संमतीशिवाय आणि कोणताही मोबदला न देता त्यांच्या साहित्याचा वापर ‘एआय’ मॉडेल्सना प्राशिक्षित करण्यासाठी केला गेला आहे.

जेव्हा एकोणीसाव्या शतकात फोटोग्राफीचा शोध लागला, तेव्हा चित्रकारांना वाटले की कॅमेरा हा कलेचा शत्रू आहे. मात्र फोटोग्राफीने चित्रकलेची जागा घेतली नाही, तर तिला वास्तववादाकडून अमूर्ततेकडे नेण्यास मदत केली आणि एक नवीन कलाप्रकार जन्माला आला. ‘एआय’च्या बाबतीतही असेच काहीसे घडू शकते. तरीही मानवी सर्जनशीलतेचे पावित्र्य राखण्यासाठी आणि या तंत्रज्ञानाचा गैरवापर रोखण्यासाठी जागतिक स्तरावर एकसमान नियम व धोरणे आखण्याची गरज आहे.

**शहाजी शिंदे**

## संवाद

### चित्रपटाचा उपयोग विधायक कार्यासाठा?

‘द्रष्टा दृश्य वशात बद्धः’याचा अर्थ दृश्य हे पाहणाऱ्याच्या मनावर खोल परिणाम करून जाते, त्या सूत्रात त्या विचारात माणूस आपोआप गोवला जातो.चांगल्या चित्रपटांमुळे समाजामध्ये योग्य विचारांचे बीज पेरले जाते. हे ओळखून भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक भालजी पेंढारकर यांनी राजा शिवछत्रपती ,मोहित्यांची मंजुळा असे ऐतिहासिक तर कालिया मर्दन, संतसखु, संत तुकाराम असे पौराणिक आणि शेजारी,कुंकू असे सामाजिक चित्रपट निर्माण केले. अलीकडेच प्रसारित झालेल्या धर्मवीर संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित ‘छावा’ चित्रपटाने इतिहास घडवला. ‘काश्मीर फाइल्स’ पाठोपाठ अनेक चांगले चित्रपट प्रसारित झाले.चित्रपट हे दुधारी शस्त्र आहे. अलिकडील काळात मात्र असे चित्रपट तयार केले गेले की ज्यामुळे समाज दुभंगला जाईल विभागला जाईल.काही चित्रपट तर हिंदू संस्कृती,संत,देवदेवता यांना अपमानित करण्याच्या उद्देशाने केले गेले. काही चित्रपटातून तर अश्लीलतेचे बिभत्स दर्शन घडवले जाते.अशा चित्रपटांमुळे समाजावर विशेषतः तरुणांवर त्याचे घातक परिणाम दिसतात.‘घुसखोर पंडत’म्हणजे ’ घुसखोर पंडित हा चित्रपट ओटीटीवर प्रसारित झाला आहे. सर्वांनी एकत्रित येऊन देशाचा गौरव वढवून भारत ‘विश्वगुरु’ होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असताना ‘फोडा आणि झोडा’ या ब्रिटिशांनी कार्यरत केलेल्या सूत्राचा वापर करून समाजात गट- तट पाडून समाज बिघडवण्याचे, सामाजिक स्थिरता नष्ट करण्याचे काम काही चित्रपटांच्या माध्यमातून होत आहे .

**संध्या काटदरे**

### देशभक्ती जागवणारा ‘वंदे मातरम्’ निर्णय

भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने ‘वंदे मातरम्’ या देशभक्तीपर गीताबाबत घेतलेला निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहे. हा निर्णय देशाचा अभिमान वाढवणारा असून जनतेमध्ये राष्ट्रप्रेम आणि देशभक्ती अधिक दृढ करणारा ठरेल.स्वातंत्र्यलढ्यात स्वातंत्र्यसैनिक आणि क्रांतिकारकांचा घोष मंत्र म्हणजे ‘वंदे मातरम्’. या गीतामुळे अनेकांच्या मनात मातृभूमीप्रेम जागृत झाले आणि त्यांनी देशासाठी बलिदान दिले. स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षांनंतर या गीताला योग्य तो मान मिळाला, ही आनंदाची बाब आहे.केंद्र शासनाने शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालये आणि सरकारी कार्यक्रमांमध्ये राष्ट्रगीत ‘जन गण मन’ पूर्वी ‘वंदे मातरम्’ म्हणणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये देशाविषयी आदर आणि प्रेम अधिक वाढेल, यात शंका नाही. या निर्णयाचे सर्वांनी स्वागत करावे.या राष्ट्रहिताच्या निर्णयाबद्दल भारत सरकारच्या गृह मंत्रालयाचे मनःपूर्वक अभिनंदन!

**रमा देशमुख**

### संरक्षण सामर्थ्य वाढणार

आज शेजारी पाकिस्तान कुरापती काढतो आहे.शेजारी असलेला चीन सुद्धा अधून मधून काहीतरी कुरबुरी काढत आहे.अशा परिस्थितीत आपली संरक्षण सिद्धता मजबूत करणे अत्यंत आवश्यक आहे.या दृष्टीने भारत सरकारने काही पाऊले उचलली आहेत. फ्रांस देशाकडून ११४ राफेल विमाने खरेदी करण्या करिता प्रस्तावाचा मार्ग भारत सरकारने मोकळा केला आहे.याशिवाय ३;६० रुपयांच्या इतर संरक्षण साहित्याच्या खरेदीला सुद्धा मंजुरी दिली आहे.राफेल कराराचे वैशिष्ट्य असे आहे की,फक्त १८ विमाने आपण फ्रांस कडून खरेदी करणार आहोत.बाकीच्या विमानांची निर्मिती भारतातच होणार आहे . साहजिकच अनेकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.यामुळे आपली संरक्षण सिद्धता वाढणार आहे.अचूक लक्षभेदाची क्षमता सुद्धा वाढेल गेल्या वर्षी खरेदी केलेली ३६ राफेल विमानेहवाई दलाच्या ताफ्यात आहेत.भारत सरकारने संरक्षण सिद्धतेच्या दृष्टीने घेतलेले पाऊल स्तुत्य आहे

**शांताराम वाघ**

# पोहरादेवीत उद्योग निर्मितीला चालना देणार : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सवाचे उपमुख्यमंत्र्यांच्याहस्ते उद्घाटन

**जनमाध्यम प्रतिनिधी**





यवतमाळ - संत सेवालाल महाराज यांनी समाजाला स्वाभिमान, सदाचार आणि सेवाभावाचा मार्ग दाखविला. त्यांचे विचार आजच्या काळात अधिक प्रेरणादायी आहेत. पोहरादेवी परिसराचा नियोजनबद्ध विकास करताना श्रद्धेचा सन्मान राखून सुविधा अधिक सक्षम करण्यात येईल. बंजारा समाजाच्या कायम पाठीशी असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पोहरादेवी ( जि. वाशीम) येथे आज शनिवारी आयोजित श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमात दूरदृश्यप्रणालीव्दारे संदेश देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. पर्यटन विकास हा केवळ आर्थिक प्रगतीपुरता मर्यादित नसतो, तर तो स्थानिक संस्कृती, परंपरा आणि मूल्यांचे संवर्धन करणारा असतो. यावेळी महोत्सवाचे उद्घाटन करताना, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, संत सेवालाल महाराज यांचे विचार समाजात समता, बंधुता आणि सेवाभाव रुजवणारे आहेत. पोहरादेवी हे केवळ धार्मिक स्थळ नसून, पर्यटनाच्या दृष्टीनेही मोठी क्षमता असलेले केंद्र आहे. या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी शासन आवश्यक त्या पायाभूत सुविधा, रस्ते, निवास व पर्यटक सुविधांसाठी सातत्याने प्रयत्न करत असल्याचे सांगितले. संत सेवालाल महाराज यांचा वारसा जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. पोहरादेवी सारख्या तीर्थक्षेत्रांचा विकास झाला, तर स्थानिक नागरिकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. शासन विकास आणि सामाजिक समरसतेसाठी कटिबद्ध आहे. पोहरादेवीत उद्योग निर्मितीला चालना देणार असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमाला मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खासदार संजय देशमुख,आमदार धर्मगुरू बाबुसिंग महाराज, आमदार किरण सरनाईक, आ.सई डाहाके, आ.राजेश राठोड , आ.किसन वानखडे,पुसदच्या नगराध्यक्षा मोहिनी नाईक,जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, पर्यटन उपसंचालक विजय जाधव, माजी खासदार हरिभाऊ राठोड यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी प्रास्ताविक भाषणात पर्यटन महोत्सवाची रूपरेषा विषद केली. समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी कायम प्रयत्नशील आहे. संत सेवालाल महाराज यांच्या विचारांवर समाज चालत आहे. संत सेवालाल महाराज यांची जयंती शासन स्तरावर साजरी करण्यात येते, असे ते म्हणाले. विकासकामांची माहिती देताना शासनाचे भक्कम पाठबळ पोहरादेवी विकासासाठी मिळत आहे. बंजारा काशीची परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल होत आहे, असे ते म्हणाले. यावेळी महंत जितेंद्र महाराज यांनी मनोगत व्यक्त करताना संत सेवालाल महाराज यांनी शांतीचा संदेश दिला, राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी, संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सवामुळे पोहरादेवीचा नावलौकिक वाढत आहे. अशा उपक्रमांतून युवा पिढीला संस्कृतीची ओळख होते, असे सांगितले. पर्यटन राज्यमंत्री म्हणून पोहरादेवी विकासासाठी सदैव प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. महोत्सवाच्या निमित्ताने समाजसेवा, सांस्कृतिक कार्य आणि सामाजिक बांधिलकीच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या सात मान्यवरांना सेवारत्न पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी पुरस्कारप्राप्त व्यक्तींचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले. या भव्य आयोजनामुळे पोहरादेवी येथील श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव राज्यपातळीवर विशेष लक्षवेधी ठरला असून, भविष्यात या परिसराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.या महोत्सवामुळे श्रद्धा, संस्कृती आणि पर्यटन विकास यांचा प्रभावी संगम घडून येत असल्याचे चित्र दिसून आले. कार्यक्रमाला विविध मान्यवर महंत, विश्वस्त, ट्रस्टी, देशभरातून आलेले हजारो समाजबांधव नागरिक उपस्थित होते.

# अखिल भारतीय ग्रा.क.प.च्या राज्य सहसचिव पदी पवन थोटे यांची नियुक्ती

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - अखिल भारतीय ग्राहक कल्याण परिषद महाराष्ट्रच्या राज्य कार्यकारिणी मध्ये यवतमाळ जिल्हा सचिव पदावर कार्यरत असलेले कर्तव्यदक्ष पदाधिकारी पवन थोटे यांनी संघटनेत केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन नुकतीच त्यांची अखिल भारतीय ग्राहक कल्याण परिषदचे राष्ट्रीय चेअरमन विख्यात सेनई, राष्ट्रीय प्रधान सचिव देवेंद्र तिवारी, राज्याध्यक्ष गजानन मुदगल व सर्व राष्ट्रीय कार्यकारिणीचे सन्माननीय पदाधिकारी यांच्या संयुक्त अनुमतीने अ.भा.ग्राहक कल्याण परिषद, महाराष्ट्र राज्याच्या सहसचिव पदावर नियुक्ती नुकतीच घोषित करण्यात आली.

याकरिता त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.पवन थोटे यांच्या नियुक्ती मुळे सर्वत्र आनंद झाला असून संघटने मध्ये नव चैतन्य निर्माण झाले आहे संघटनेचे कार्य यापुढे निश्चितच प्रगती पथावर जाईल अशी खात्री आहे. अ.भा.ग्राहक कल्याण परिषद, राज्य कार्यकारिणी व यवतमाळ जिल्ह्याच्या वतीने कैलास गावनर, विलास अवघड, निखिल गोफने, डॉ. अनुज चिंचे, डॉ. संदीप धवने, डॉ. अशोक पूनसे,डॉ.श्याम गाढवे, चिंतामण चहांदे,सुरेश भावेकर, डॉ. प्रियंका धवने, मीनाक्षी गाढवे, शोभा पुनसे, लतिका शेळके, माला पुनसे, प्रेमा पत्रिवार तसेंच सर्व पुरुष व महिला विंगचे सर्व पदाधिकारी,सदस्य यांच्या वतीने पवन थोटे यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# वेचक

## ईशान मिनरल्सविरोधात अडेगाव ग्रामस्थांचे उपोषण ; संजय खाडे यांचा पाठिंबा

वणी - अडेगाव परिसरातील ईशान मिनरल्स कंपनीमुळे होणाऱ्या प्रदूषण आणि कथित बेकायदेशीर उत्खननाविरोधात ग्रामस्थांनी १० फेब्रुवारीपासून उपोषण सुरू केले आहे. धुळीमुळे पिकांचे मोठे नुकसान होत असून शेतकऱ्यांचे आर्थिक हाल होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गुरुवारी उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी काँग्रेसचे प्रदेश सचिव संजय खाडे यांनी आंदोलनस्थळी भेट देत पाठिंबा जाहीर केला. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, कंपनीमधून मोठ्या प्रमाणात उडणाऱ्या धुळीमुळे शेतीचे नुकसान होत आहे. काहींना नुकसानभरपाई मिळाली असली तरी नवनाथ महादेव क्षीरसागर यांना गेल्या ११-१२ वर्षांपासून कोणतीही भरपाई मिळालेली नाही. दरवर्षी ६० हजार रुपये नुकसानभरपाई तसेच आधीच्या नुकसानीपोटी ३ लाख ३० हजार रुपये देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच बफर झोनमधील उत्खनन तातडीने थांबवावे, उत्खनन केलेल्या जागेचे पुनर्भरण करावे आणि ८० फूटाखालील डी-वॉटरिंग बंद करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. रस्त्यांवर नियमित पाणी मारण्याची मागणीही करण्यात आली आहे. प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## आर्णी रोड रेल्वे पूल प्रश्नावर पुन्हा बैठक ; प्रशासनाला मुदत

यवतमाळ , दि. १४ फेब्रुवारी: आर्णी रोड वनवासी परिसरातील उड्डाण पूल व रेल्वे पुलाच्या बांधकामामुळे नागरिकांना होत असलेल्या गैरसोयीबाबत पुन्हा एकदा प्रशासनासोबत बैठक घेण्यात आली. पर्यायी रस्ता दुरुस्त करणे, मार्गदर्शक फलक लावणे व सुरक्षिततेची उपाययोजना तातडीने करावी, या मागण्यांसाठी तालुका काँग्रेस कमिटी, यवतमाळतर्फे यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले होते. अन्यथा १६ फेब्रुवारी रोजी आंदोलनाचा इशाराही देण्यात आला होता. दरम्यान, या प्रश्नासंदर्भात यवतमाळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाळासाहेब मांगूळकर यांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक घेतली. बैठकीत संबंधित विभागाची तातडीने बैठक घेऊन प्रश्न निकाली काढण्यासाठी प्रशासनाने काही दिवसांची मुदत मागितली. जनहित लक्षात घेऊन आमदार मांगूळकर यांनी प्रशासनाला मुदत दिली असली, तरी दिलेल्या वेळेत काम पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. यावेळी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष रमेश भिसणकर, शहर काँग्रेस अध्यक्ष प्रा. डॉ. बबलू उर्फ अनिल देशमुख, जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष प्रमोद बगाडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## ३० हजारांच्या व्यवहारातून रक्तरंजित वाद..!

यवतमाळ - ट्रॅक्टर खरेदीसाठी दिलेले ३० हजार रुपये परत न केल्याच्या वादातून युवकावर चाकूने सपासप वार करून हत्या करण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना १३ फेब्रुवारी रोजी धामणगाव-नागपूर बायपास रोडवरील पंचर दुकानाजवळ घडली. या प्रकरणी यवतमाळ शहर पोलीस यांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नेताजी चौक परिसरात राहणारा अभिजीत कमल देशमुख (वय २७) याच्यासोबत बाभुळगाव तालुक्यातील करळगाव येथील रवी शेळके (वय ३०) याने भागीदारीत ट्रॅक्टर खरेदी करण्याचा अलिखित करार केला होता. या व्यवहारासाठी रवी शेळके याने ३० हजार रुपये उसनवारीने दिले होते. मात्र ट्रॅक्टर खरेदीचा व्यवहार पूर्ण न झाल्याने शेळके याने वारंवार पैसे परत देण्याची मागणी केली. देशमुख याला तत्काळ रक्कम परत करता न आल्याने दोघांमध्ये तणाव निर्माण झाला. या रागातून संतप्त झालेल्या शेळके याने देशमुख याला बायपास रोडवरील दुकानाजवळ गाठून चाकूने पोट, छाती, मान, डोके व मांडीवर सपासप वार केले. गंभीर जखमांमुळे देशमुख मोठ्या प्रमाणात रक्तबंबाळ झाला असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. या व्यवहारावेळी जुगल भानुदास शेंद्रे (बेलोरा) व पवन किसन मंडळे (पंचगव्हाण, ता. बाभुळगाव) उपस्थित असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.दरम्यान, आरोपी करळगाव परिसरातील शेतात लपल्याची माहिती निनावी फोनद्वारे मिळाल्यानंतर शहर पोलिसांच्या प्रगटन पथकाने सायंकाळी साडेआठच्या सुमारास त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून हल्ल्यात वापरलेले शस्त्र जप्त करण्याची कारवाई सुरू असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## छत्रपती महोत्सवानिमित्त अशोकभाऊ वानखडे यांचे जाहीर व्याख्यान

यवतमाळ : छत्रपती महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर यवतमाळचे भूमिपुत्र, दिल्लीस्थित प्रसिद्ध पत्रकार, थोर राजकीय विश्लेषक तथा गाजलेले वक्ते अशोकभाऊ वानखडे यांचे जाहीर व्याख्यान बुधवार दिनांक 18 फेब्रुवारी 2026 रोजी सायंकाळी 8 वाजता शिवतीर्थ येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात आयोजित करण्यात आले आहे. ‘छत्रपती शिवाजी महाराजांची राजनीती व आजचे वास्तव’ या समकालीन विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारातील दूरदृष्टी, सुजाण प्रशासन, लोकाभिमुख धोरणे आणि स्वराज्याची संकल्पना यांचा आजच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीशी संबंध जोडत ते विचार मांडणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# “विषारी फवारणीचा विळखा..!

## कीटकनाशकांच्या अती वापरामुळे शेतकरी, कुटुंबे आणि पर्यावरण धोक्यात

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - शेतीचा कणा मानल्या जाणाऱ्या यवतमाळ जिल्ह्यात आज कीटकनाशकांच्या वाढत्या वापरामुळे आरोग्य आणि पर्यावरण धोक्याच्या टोकावर पोहोचले असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. PAN Asia Pacific आणि PAN India यांच्या संयुक्त विद्यमाने डिसेंबर २०२४ मध्ये करण्यात आलेल्या क्षेत्रीय सर्वेक्षणात ही गंभीर बाब उघड झाली. तब्बल १,४८५ शेतकऱ्यांच्या सहभागातून तयार झालेल्या या अहवालाने प्रशासन आणि समाजव्यवस्थेचे डोळे उघडणारे चित्र समोर आणले आहे.

सर्वेक्षणानुसार तब्बल ९७.०९ टक्के शेतकरी कीटकनाशकांचा वापर करत असून, जवळपास निम्मे शेतकरी गेली दहा वर्षांहून अधिक काळ या विषारी रसायनांच्या संपर्कात आहेत. अभ्यासात नमूद केलेल्या ३२ सक्रिय घटकांपैकी ७२ टक्के घटक ‘अत्यंत धोकादायक कीटकनाशके’ (HHPs) म्हणून वर्गीकृत आहेत. विशेष धक्कादायक बाब म्हणजे अत्यंत घातक समजले जाणारे Monocrotophos हे कीटकनाशक अजूनही मोठ्या प्रमाणावर वापरले जात असल्याची नोंद ५६४ प्रतिसादकर्त्यांनी केली आहे.धोक्याची घंटा केवळ फवारणीतच नाही, तर साठवणुकीत आणि विल्हेवाटीतही वाजत आहे. ३३.०९ टक्के शेतकरी कीटकनाशके घरातच ठेवतात, ज्यामुळे निरागस बालकांचे आणि कुटुंबीयांचे आरोग्य धोक्यात येते. ६०.३७ टक्के शेतकरी रिकामे कंटेनर जाळतात, तर ३४.५८ टक्के जमिनीत गाडतात ही दोन्ही पद्धती माती, हवा आणि भूजलासाठी घातक आहेत. चिंतेची पराकाष्ठा म्हणजे १२.५६ टक्के शेतकरी हेच डबे अन्न-पाणी साठवण्यासाठी वापरतात. ही बाब थेट जीविताला आमंत्रण देणारी आहे. आरोग्याच्या आघाडीवर परिस्थिती आणखी भयावह आहे. जवळपास २९ टक्के शेतकऱ्यांनी उलट्या, मळमळ, डोकेदुखी, डोळ्यांची जळजळ, त्वचारोग आणि श्वसनाच्या तक्रारी नोंदवल्या आहेत. तर काहींनी मधुमेह, उच्च रक्तदाब, यकृत व मूत्रपिंडाचे आजार यांसारख्या दीर्घकालीन व्याधींचा अनुभव सांगितला आहे. संरक्षणात्मक साधनांचा अभाव ही आणखी एक वेदनादायक वस्तुस्थिती आहे. अस्वस्थता, खर्चिकपणा आणि अनुपलब्धता यामुळे अनेक शेतकरी PPE चा वापर टाळतात. परिणामी, विषारी रसायनांचा थेट संपर्क वाढून आरोग्याचा प्रश्न अधिकच गंभीर बनतो. शेती वाचवताना शेतकरीच विषाच्या विळख्यात सापडत असतील, तर ही केवळ आरोग्याची नव्हे तर सामाजिक अन्यायाचीही बाब ठरते. प्रशासनाने तातडीने कठोर उपाययोजना, जनजागृती आणि सुरक्षित पर्याय उपलब्ध करून दिले नाहीत, तर ‘अन्नदात्या’चे आयुष्यच धोक्यात येण्याची भीती व्यक्त होत आहे.

# गांजा अंमली पदार्थ विक्री करणा-या इसमावर NDPS कायदया अंतर्गत कारवाई

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - 13/02/2026 रोजी स्थानिक गुन्हे शाखा पथक यवतमाळ कॅम्प पुसद हे उमरखेड व पुसद उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना सायंकाळी 17/05 वाजता सुमारांस गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली कि, पोलीस स्टेशन पुसद ग्रामीण हददीतील मौजे-साई ईजारा ते काळी दौ रोडने एक इसम मोटार सायकल वरुन गांजा अंमली पदार्थ घेवून येणार आहे.

अशी माहोती मिळाल्याने संदभांत प्राप्त माहिती वरुन पथकाने तात्काळ वरिष्ठांना याबाबत अवगत करुन मौजे साई इंजारा गावच्या हददीत फॉरेस्ट मोकळ्या जागेत नाल्याजवळ साई इंजारा ते काळी दौ रोडवर रात्री 20/30 वाजण्याचे सुमारांस सापळा लावला असता साई ईजारा बाजूकडून एक मोटार सायकल त्यावर एक इसम मोटार सायकलच्या पुढे प्लास्टीक थैली घेवून येत असतांना दिसून आल्याने पोलीस कौशल्याचा वापर करुन अतिशय शिताफिने सदर मोटार सायकल रोडच्या बाजूला थांबवली नमूद इसम यास ताब्यात घेवून त्यांना त्याचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्याचे नाव 1) सुनिल दादाराव आगोसे वय 32 वर्ष, सध्या रा. भिलवाडी ता. दिग्रस जि. यवतमाळ मुळ रा. हिवळणी ता. महागांव जि. यवतमाळ असे सांगितल्याने त्वास ताब्यात घेवून त्यांच्याकडील प्लॉस्टीक थैलीची पाहणी केली असता 6 किलो 272 ग्रॅम गांजा अंमली पदार्थ किंमत 1,25,440/- रु तसेच एक मोटार सायकल क्रमांक MH-29 N 2877 किंमत 40,000/- असा एकूण किंमत 1,65,440/- रु चा मुददेमाल जप्तीसह नमूद इसमा विरुध्द अंमली औषधी व मनप्रभावी पदार्थ अधिनियम 1895 चे कलम 8 (c), 20(b), (B) अन्वये पोलीस स्टेशन पुसद ग्रामीण येथे गुन्हा नोंदीसह कार्यवाही करण्यात आली आहे. स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ ही अवैध धंदे, शस्त्र बाळगणा-या, गुन्हे उघड करणे तसेच गुंगीकारक औषधद्रव्याची तरकरी चे उच्चटन करण्यास प्रतिबध्द असुन यापुढे यासंबंधी माहिती असल्यास सदरची माहिती जनतेने पोलीसाची कोणतीही भिती मनात न बाळगता पुरवावी व पोलीसांना सहकार्य करावे ही विनंती. सदरची कारवाई मा पोलीस अधीक्षक यवतमाळ श्री. कुमार चिंता (भा.पो.से) सा. मा. अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ श्री. अशोक थोरात (म.पो.से) सा तसेच मा. सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. हर्षवर्धन बी जे सा. (भा. पो.से) सा मा.पोलीस निरीक्षक श्री. सतीश चवरे, स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ, यांचे मार्गदर्शनात सपोनि/धिरज बांडे, पोउपनि/ शरद लोहकरे, सफी/मुन्ना आडे, पोहवा/ संतोष भोरगे, पोहवा/तेजाब रणखांब, पोहवा/सुभाष जाधव, पोहवा कुणाल मुंडोकार, पोहवा/रमेश राठोड, पोशि/ सुनिल पंडागळे, चापोउपनि रविंद्र शिरामे, चापोशि/राजेश जाधव सर्व नेम-स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

# कुशीनगर, छ.संभाजीनगर,व नांदेड (दाभड) मुळावा येथील भंतेजीची मांडवा बुध्दविहारास भेट



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - तालुक्यातील मांडवा येथील सम्यक संबोधी बुद्धविहारास कुशीनगर येथील तसेच छत्रपती संभाजीनगर, दाभड(नांदेड) आणि मुळावा येथील सहा पु. भन्ते यांनी भेट दिली.

भारतीय बौध्द ज्ञानलंकार शिक्षण सस्था तसेच धम्मदुत बुध्दाविहार मुळावाचे संस्थापक अध्यक्ष पु. भंतेजी धम्मसेवकजी महाथेरो मुळावा गृहस्थ जीवनातील प्रल्हाद ढोले यांची जन्मभूमी असलेल्या पुसद तालुक्यातील मांडवा येथे चौथ्या वर्गात असतांना दगडावर कोरीव प्रतिज्ञा केली होती की, मी भन्ते बनणार तो दगड आजही साक्ष देत आहे. प्रतिज्ञा शिलालेखास तसेच सम्यक संबोधी बुद्धविहारास आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयास पू. भंतेजी एम.सत्यपाल महाथेरो छत्रपती संभाजीनगर, पू. भंतेजी डॉ. इंदवस महाथेरो कुशीनगर,भंतेजी नागसेन,भंतेजी अनिरुध्द थेरो,भंतेजी सुमेधबोधी,भंतेजी पट्टीसेन आदी भन्तेजी यांनी भेट दिली. यावेळी पु.भंतेजी डॉ.एम. सत्यपाल महाथेरो स्वलिखित पु. भंतेजी धम्मसेवकजी महाथेरो जीवनचरित्र पुस्तक संच डॉ. बाबासाहेब आबेडकर सार्वजनिक वाचनालयास भेट देऊन बुध्दविहार आणि वाचनालयाची सुव्यास्थपन पाहुन समितीचे कौतुक केले व शुभ आशीर्वाद दिला.

# राज्य सल्लागार समितीवर प्रो. अनिल काळबांडे यांची नियुक्ती

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - साहित्य सांस्कृतिक अकादमी पुणे व दि इंटरनॅशनल लिटरेचर अँड कल्चर अकॅडमी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथे पार पडलेल्या सर्वसाधारण सभेमध्ये महाराष्ट्रातील ख्यातनाम साहित्यिक तथा पत्रकार प्रोफेसर डॉ .अनिल काळबांडे यांची राज्य सल्लागार समितीवर नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा राज्य समन्वयक प्रतीक्षा पाटील यांनी सभेमध्ये केली.

साहित्य-सांस्कृतिक क्षेत्रात प्रो. अनिल काळबांडे भरीव योगदान आहे त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून साहित्य, पत्रकारिता आणि सामाजिक प्रबोधन या क्षेत्रांत सातत्यपूर्ण कार्य केले आहे. ग्रामीण भागातील साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, नवोदित लेखकांना मार्गदर्शन करणे तसेच सामाजिक प्रश्नांवर परखड लेखन करणे ही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये मानली जातात. त्यांच्या लेखनातून सामाजिक जाणीवा, परिवर्तनवादी विचार आणि संस्कृती संवर्धनाचा संदेश सातत्याने दिला जातो. राज्य सल्लागार म्हणून प्रो. काळबांडे यांच्यावर पुढील जबाबदाऱ्या सोपविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे राज्यातील साहित्यिक उपक्रमांना दिशा व मार्गदर्शन करणे, जिल्हा व तालुका स्तरावर साहित्य संमेलनांचे नियोजन, नवोदित लेखक व कवी यांना प्रोत्साहन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठी साहित्याची ओळख दृढ करणे या उद्देशाने त्यांच्यावर जबाबदारी देण्यात आलेली आहे. सभेमध्ये उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या निवडीचे स्वागत करत शुभेच्छा व्यक्त केल्या. त्यांच्या अनुभवाचा आणि दांडग्या अभ्यासाचा अकादमीच्या कामकाजाला निश्चितच फायदा होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. सभेदरम्यान विविध साहित्यिक, कवी, पत्रकार व पदाधिकाऱ्यांनी प्रो. काळबांडे यांच्या कार्याचा गौरव केला. सामाजिक बांधिलकी जपत साहित्य क्षेत्रात त्यांनी उभा केलेला ठसा प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. ही नियुक्ती उमरखेड व परिसरातील साहित्यप्रेमींसाठी अभिमानाची बाब मानली जात असून, त्यांच्या पुढील कार्यकाळाकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत.

# शिवरामजी मोघे महाविद्यालय येथे ‘सिकलसेल जनजागृती’ कार्यक्रम उत्साहात

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पांढरकवडा : महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे जिल्ह्यात ‘अरुणोदय’ सिकलसेल ॲनिमिया विशेष मोहिम राबविण्यात येत असून, या अनुवंशिक रक्तविकाराबाबत व्यापक जनजागृती करून नागरिकांना तपासणीसाठी प्रवृत्त करणे हा मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

या पार्श्वभूमीवर शिवरामजी मोघे महाविद्यालय येथील प्राणीशास्त्र विभागांतर्गत कार्यरत सिकलसेल समुपदेशन केंद्रामार्फत विविध जनजागृती व समुपदेशन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सिकलसेलविषयी माहिती सर्वदूर पोहोचावी यासाठी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून गावोगावी माहिती प्रसार, शाळा-महाविद्यालयांत जनजागृतीपर व्याख्याने, घरोघरी भेट देऊन समुपदेशन, सोशल मीडियाद्वारे प्रचार तसेच माहितीपत्रकांचे वितरण असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात सिकलसेल ॲनिमियाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना, विवाहपूर्व तपासणीचे महत्त्व, योग्य उपचारपद्धती व समुपदेशनाची गरज याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांसह परिसरातील नागरिकांनी उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दरम्यान, “यवतमाळ जिल्ह्यातील अनुसूचित जमातीतील सिकलसेल व्यक्तींची स्थिती व जनजागृती” या विषयावर प्राणीशास्त्र विभागामार्फत आचार्य पदवीकरिता संशोधनकार्य सुरू असून, प्रा. डॉ. अमर वंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. भूषण घनमोडे हे संशोधन करीत आहेत. जिल्ह्यातील सिकलसेल बाधित रुग्णांची सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक स्थितीचा अभ्यास करून पुढील धोरणात्मक उपाययोजनांसाठी शास्त्रीय माहिती उपलब्ध करून देणे हा संशोधनाचा उद्देश आहे. महाविद्यालयात स्थापन करण्यात आलेले सिकलसेल जनजागृती व समुपदेशन केंद्र विद्यार्थ्यांसह परिसरातील सिकलसेल व वाहक (ट्रेट) रुग्णांसाठी उपयुक्त ठरत असून केंद्रामार्फत नियमित मार्गदर्शन व तपासणीसंदर्भातील माहिती दिली जाते.

# जिनिंग प्रेसिंग च्या अध्यक्ष , उपाध्यक्षांचा मनमानी कारभार मानद सचिवासह ८ संचालकांचा पत्रकार परिषदेतून आरोप !

## गाळे बांधकामात संस्थेचे २५ लाखाचे नुकसान

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड - संस्थेच्या बांधकाम सल्लागार अभियंत्याने दुकाने गाळे बांधकामाचे दर सांगीतले असतांना त्या पेक्षा जास्त दराने ठेकेदाराला बांधकाम देऊन संस्थेचे ४० लाखाचे नुकसान होत असुन सदर निविदा देतांना संचालकांना विश्वासात अथवा बैठक न घेता अध्यक्ष व उपाध्यक्षांनी निविदा फोडून ठेकेदाराला जास्त दराने काम दिले . संचालकांसमोर ठराव न ठेवता सर्वानुमते ठराव मंजूर असल्याचे प्रोसिडिंगला दाखवण्यात आले .या सर्व प्रकाराची सहाय्यक निबंधक यांच्याकडे तक्रार केली असून सदर सुरू असलेले बांधकाम थांबवण्यात यावे अन्यथा आंदोलन व उपोषण करण्याचा इशारा मानत सचिवासह आठ संचालकांनी पत्रकार परिषदेतून दिला आहे.

सहकार क्षेत्रात नावाजलेल्या सहकार महर्षी स्व. भाऊसाहेब माने यांनी स्थापन केलेल्या स्व भाऊसाहेब माने शेतकरी सहकारी जिनींग ॲन्ड प्रेसिंग सोसायटी या संस्थेमध्ये दुकान गाळ्यांच्या बांधकामावरून मोठा वाद निर्माण झाला असून सत्ताधारी दोन संचालकांसह आठ संचालकांनी अध्यक्ष व व्यवस्थापक यांच्यावर मनमानी कारभाराविरुद्ध एल्गार पुकारला आहे. पत्रकार परिषदेमध्ये मानद सचिव चितांगराव कदम यांनी सांगितले दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत जिन क्र. २ मधील १४ दुकान गाळ्यांच्या बांधकामाचा विषय चर्चेला आला. संस्थेने नेमलेल्या सल्लागार अभियंता प्रणव कदम यांनी हे काम ८.७५ रुपये प्रति स्क्वेअर फुट अधिक जीएसटी या दरात होऊ शकते, अशी माहिती सभागृहास दिलेली असताना वैभव कोसलगे या ठेकेदारास १४.२५ रुपये प्रति स्क्वेअर फुट असा दिला. बैठकीत सर्व निविदाधारकांना बोलावून निगोशिएशन करून दर कमी करण्याचे ठरले होते. मात्र अध्यक्षांनी इतर संचालकांना विश्वासात न घेता स्वतःच टेंडर उघडून ठेकेदाराशी केवळ २५ रुपयांची कपात करून काम मंजूर केले. यामुळे अंदाजे २० ते २५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा संचालकांनी केला आहे. याशिवाय, यावर्षी जिनींग व प्रेसिंग युनिट बंद राहिल्यामुळे संस्थेला १२ ते १५ लाख रुपयांचा फटका बसला. चार कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने त्यांना ग्रॅच्युइटी व रजा रोखीकरणासाठी अंदाजे १९ लाख रुपये देण्यात आले, ज्यामुळे संस्थेवर अतिरिक्त आर्थिक ताण पडल्याचे सांगितले. त्यामुळे या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून अध्यक्ष व व्यवस्थापक यांच्यावर योग्य ती कारवाई करावी आणि सुरू असलेले बांधकाम तातडीने थांबवावे, अशी मागणी आयोजित पत्रकार परिषदेतून करण्यात आली अन्यथा संस्थेच्या हितासाठी सभासदांना विश्वासात घेऊन आंदोलन व उपोषणाचा इशाराही यावेळी देण्यात आला.

# बसस्थानकासमोर अवैध वाहतुकीचा हैदोस ; पोलिसांचे पत्र बेदखल, एसटीला कोट्यवधींचा फटका !

**जनमाध्यम प्रतिनिधी**



राळेगाव - शासनाच्या स्पष्ट नियमांनुसार बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरात कोणत्याही प्रकारची खासगी प्रवासी वाहतूक उभी करता येत नाही. मात्र राळेगाव बसस्थानकासमोर हा नियम सर्रास पायदळी तुडवला जात असून अवैध प्रवासी वाहतुकीचा सुळसुळाट सुरू आहे. याबाबत वारंवार पत्रव्यवहार करूनही पोलिसांकडून कारवाई होत नसल्याने प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. राळेगाव येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) बसस्थानकातून ग्रामीण भागासह शहराकडे नियमित बससेवा सुरू आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी मध्यवस्तीत बसस्थानक उभारण्यात आले आहे. मात्र खासगी वाहनचालकांकडून बसस्थानकाच्या अगदी पुढे व आतपर्यंत शिरून प्रवाशांना प्रलोभन देत, बळजबरीने किंवा चुकीची माहिती देऊन नेण्याचे प्रकार उघडपणे सुरू आहेत. शासनाच्या महिला अर्धतिकीट योजनेसह ज्येष्ठ नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सवलतींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून प्रवाशांची दिशाभूल केली जात आहे. परिणामी एसटी महामंडळाचे आर्थिक नुकसान होत असून अधिकृत सेवेवर परिणाम होत आहे. एवढेच नव्हे तर प्रवासी मिळविण्याच्या स्पर्धेत रस्त्यावर गोंधळ निर्माण होत असून अपघाताची भीतीही वाढली आहे. एसटी अधिकाऱ्यांकडून पोलिसांना अनेकदा पत्र देऊन २०० मीटर नियमाची कडक अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तरीही प्रत्यक्ष कारवाई होत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. डेपो व्यवस्थापनाकडूनही ठोस पावले उचलली जात नसल्याची खंत व्यक्त होत आहे. दरम्यान, या अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात तातडीने मोहीम राबवून संबंधित वाहनचालक व वाहनांवर कठोर कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा एसटी कामगार संघटनेच्या विविध संघटनाच्या वतीने देण्यात आला आहे. येत्या काही दिवसांत डेपो व्यवस्थापकांना निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती पुढे आली आहे. राळेगाव बसस्थानक परिसरातील वाढत्या अवैध वाहतुकीकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन नियमांची अंमलबजावणी करावी, अशी सर्वसामान्य प्रवासी व एसटी कर्मचाऱ्यांची मागणी आहे.

# अशोक महाविद्यालयाच्या आपसी वादात विद्यार्थ्यांचे नुकसान

## प्रशासक बेपत्ता; महाविद्यालयीन कागदपत्रे मिळण्यास अडचण, विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाला ठोकले कुलूप, प्रकरण पोलीस ठाण्यापर्यंत

**चांदूररेल्वे/ वार्ताहर**

चांदूर रेल्वे शहरातील स्व मदनगोपाल मुंदड़ा ( अशोक) कला और वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बऱ्याच दिवसा पासून प्राध्यापक, प्राचार्य तसेच संचालक मंडळाचा आपसी वाद सुरू असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची माहिती पुढे आली असून याच महाविद्यालयातील युवकांनी शैक्षणिक कागदपत्रे मिळत नसल्याने आंदोलन सुरू केले असता सदर प्रकार हा चांदूररेल्वे पोलिस स्टेशन मध्ये पोहचला.

तर पोलिसांच्या मध्यस्थीने सदर प्रकरण तात्पुरते संपविले असल्याची माहिती मिळाली आहे.

चांदूररेल्वे शहरातील स्व. मदनगोपाल मुंदड़ा ( अशोक) कला और वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडल्याची चर्चा असून यवतमाळ, अमरावती, अकोला पोलिस भरतीसाठी जात असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक कागदपत्रे महाविद्यालया तर्फे मिळत नसल्यामुळे विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू करत चक्क पोलीस स्टेशन गाठले व सर्व वृत्तांत पोलिसांना सांगितला. त्यावरून पोलिस निरीक्षक अजय आकरे यांनी विद्यार्थ्यांची कागदपत्रे नसल्यामुळे पोलीस भरती टळू नये करिता प्रा जयंत कारमोरे यांना बोनाफाईड पत्र देण्याचे सांगितले.

त्यावरून त्यांनी महाविद्यालयांची पावती पाहून सदर विद्यार्थ्यांना बोनाफाईड पत्र दिले त्यानंतर नितिन राठोड, मुकेश जाधव चिरोडी, विशाल निबरट, किशोर चौधरी मांजरखेड दानापूर, सुरज मोहकार टेंभूर्णी, सम्यक वाघमारे जावरा हे विद्यार्थी पोलीस भरतीसाठी अमरावती, यवतमाळ, अकोला गेल्याची माहिती मिळाली आहे.

### महाविद्यालयातर्फे सहकार्य नाही

मागील बऱ्याच दिवसापासून मध्ये शासकीय कागदपत्र मार्कलिस्ट व इतर प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज केला तरी आजपर्यंतही कुठलीही कागदपत्र देण्यात आले नाही. पोलिस निरीक्षक यांनी मध्यस्थीने बोनाफाईड लेटर मिळाले असल्याची माहिती विद्यार्थी नितिन राठोड ,मुकेश जाधव चिरोडी, विशाल निबरट, किशोर चौधरी मांजरखेड दानापुर, सुरज मोहकार टेंभूर्णी, सम्यक वाघमारे जावरा यांनी दिली.

### विद्यार्थ्यांना बोनाफाईड लेटर दिले

प्रशासकाने १९ जानेवारीला चार्ज व रेकॉर्ड घेतल्यानंतर तो आजपर्यंत माझ्याकडे दिला नाही. मी प्रशासकाने केलेल्या कारवाई विरोधात २९ जानेवारीला नागपूर न्यायालयाने स्टे दिला. ज्यांच्याकडे चार्ज व रेकॉर्ड दिला त्यांनी तो दिला नाही. मी न्यायालयाच्या आदेशानुसार इथे आहे. तरी पोलिस भरती करिता विद्यार्थ्यांना बोनाफाईड लेटर कॉलेज तर्फे देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही याकडे लक्ष देईल.

**प्रा.डॉ जयंत कारमोरे**

# आंतरविद्यापीठस्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धेत सारडा महाविद्यालयाची उत्तुंग भरारी



## सॉफ्टबॉल स्पर्धेत पाच खेळाडूंना सुवर्ण पदक

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने श्री शिवाजी महाविद्यालय, अमरावती येथे आंतरविद्यापीठ स्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या चमूमध्ये स्थानिक श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी येथील ओम सोळंके, दिपेश वानखडे, साक्षी वानखडे, अर्पिता गायगोले , नितू नेमाडे आदी विद्यार्थ्यांची यशस्वीरीत्या सहभाग नोंदवत सॉफ्टबॉल स्पर्धेत विद्यापीठ तसेच महाविद्यालयाकरिता सुवर्ण पदक पटकावले. सदर चमूचे व्यवस्थापक म्हणून डॉ.समीर बिजवे यांनी कार्यभार सांभाळला.

महाविद्यालयतर्फे सर्व यशस्वी विद्यार्थी तसेच चमू व्यवस्थापक यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून प्रा.डॉ.कविता मालोकार, प्रमुख पाहुणे नितीन गोमाश, प्रा.डॉ.सत्येंद्र गडपायले, डॉ.सुवर्णा झिलपे व प्रशांत नांदुरकर आदींची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमादरम्यान सुवर्ण पदक विजेते विद्यार्थी ओम सोळंके, दिपेश वानखडे, साक्षी वानखडे, अर्पिता गायगोले, नितु नेमाडे तसेच चमू व्यवस्थापक डॉ.समीर बिजवे आदींचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमादरम्यान अध्यक्षा डॉ.मालोकार यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून सदर पाच सुवर्ण पदके मिळविने हे महाविद्याल याकरिता ऐतिहासिक सुवर्ण क्षण आहे. महाविद्यालयांतील इतर विद्यार्थ्यांनीसुद्धा यापासून बोध घ्यायला हवा, असे उदगार त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांसमवेत हितगुज साधताना व्यक्त केले.

संचालन प्रा.डॉ.महेंद्र गिरी, आभार प्रदर्शन डॉ.नविता मालाणी यांनी केले.कार्यक्रमाला प्रा.भारती कोरडे, प्रा.आशा बाणाईत, डॉ.नितीन सराफ, डॉ.सतिश मार्डीकर, डॉ.राजेंद्र मानकर, डॉ.अनिकेत भुयार तसेच महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# जनता दरबाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**अचलपूर/ वार्ताहर**

जनतेच्या समस्या सोडवून शासनाच्या योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना व्हावा यासाठी प्रयत्नरत असल्याचे प्रतिपादन अनिल औतकर , सह .जिल्हा निबंधक वर्ग-१ व नोंदणी व मुद्रांक जिल्हाधिकारी त्यांनी नवीन तहसील कार्यालयाच्या सभागृहात सहनिबंधक मुद्रांक विभागाच्या व वतीने आयोजित जनसंवाद व जनता दरबार कार्यक्रमात केले.

अध्यक्षस्थानी मुद्रांक जिल्हाधिकारी अनिल औतकर प्रमुख अतिथी म्हणून अचलपूर नगरीच्या नगराध्यक्षा रुपाली माथने तर प्रमुख उपस्थिती म्हणून नगरसेविका अक्षरा लहाने, अचलपूर येथील सह दुय्यम निबंधक निबंधक रामदास पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. माजी नगरसेवक सल्लूभाई,

एहतेशाम, सामाजिक कार्यकर्ता जब्बार भाई, पत्रकार विलास थोरात, इर्शाद अहमद, दीपक तायडे, आशीष पोटे, संदीप लिखितकर, गोविंद चरपटे, अरुण राऊततसेच मुद्रांक वाईंडर- कर्मचारी वृंद उपस्थित होते .प्रमुख मान्यवराचे शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आले.

यावेळी दुय्यम निबंधक अचलपूर रामदास पाटील यांनी कार्यक्रमाच्या रूपरेषा बाबत माहिती दिली . राज्य शासनाने तुकडे बंदी करण्याचा महत्त्वकांशी निर्णय घेतल्यामुळे गेल्या अनेक वर्षापासून रखडलेले अनधिकृत कृषक वापरण्यात आलेले शेतीचे तुकडे या अभियाना अंतर्गत नियमित केले जाणार असल्याची माहिती दुय्यम निबंधक अचलपूर रामदास पाटील यांनी दिली .जनसंवाद व जनता दरबार कार्यक्रमात अनेक प्रकरणी निकाली काढण्यात आले.संचालन व आभार प्रदर्शन सारिका भेंडे यांनी केले.यावेळी मोठ्या संख्येने तालुक्यातील नागरिक उपस्थित होते.

# उमरीतील श्री.वियोगी महाराज संस्थानला २० लक्ष रुपयांचा निधी मंजूर

## खा. डॉ.अनिल बोंडे यांच्या प्रयत्नांना यश

**दर्यापूर/ वार्ताहर**

तालुक्यातील उमरी येथील श्री संत वियोगी महाराज मंदिराला २० लक्ष रुपयाचा निधी जाहीर झाला आहे.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे हा निधी मिळावा यासाठी राज्यसभेचे खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी या पाठपुरावा केला होता. यानिमित्ताने त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. या निधीतून प्रशस्त अशा भक्तनिवास संकुलाचे बांधकाम होणार असल्याने श्री वियोगी महाराजांच्या भक्त परिवारामध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

राज्यसभेचे खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी दर्यापूर तालुक्यातील विविध गावांमध्ये विकास कामांचा मोठा धडाका लावला आहे. त्याच पार्श्वभूमीवर तालुक्यातील प्रसिद्ध असे उमरी



येथील श्री वियोगी महाराजांच्या मंदिराला जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामार्फत २० लक्ष रुपयांचा निधी जाहीर झाला आहे. या निधीतून प्रशस्त असे भक्तनिवास संकुलाचे बांधकाम केले जाणार आहे.

या संदर्भातील आदेश जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून जारी करण्यात आला आहे. हा निधी दिल्याबद्दल भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी, श्री वियोगी महाराज भक्त परिवार, संस्थांतर्फे खासदार डॉ.अनिल बोंडे यांचे जाहीर आभार मानले आहेत.

ज्या ठिकाणी ऐतिहासिक मंदिर, ऐतिहासिक वास्तू, स्मृती आहेत अशा ठिकाणचा कायापालट करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. ज्या माध्यमातून ऐतिहासिक वास्तूंचे जतन करता येईल, शिवाय श्री वियोगी महाराज यांचे मंदिर अतिशय प्राचीन असून मंदिराचा मोठा इतिहास आहे.

याचं जतन करण्यासाठी पुढच्या काळात आणखीन भरघोस मध्ये शासनाकडून मंजूर करून आणू अशी प्रतिक्रिया या निमित्ताने खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी दिली आहे.

*आ. सुधीर मुनगंटीवार आणि संघटन मंत्री उपेंद्र कोठेकर यांची*

# जुळया शहराच्या सर्वांगीण विकासासंदर्भात चर्चा झाली

**अचलपूर/ वार्ताहर**

अचलपूर - परतवाडा जुळ्या शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अचलपूर नगर परिषद नगराध्यक्षा रुपाली अभय माथने व स्वीकृत नगरसेवक अभय माथने यांनी भाजपचे विदर्भ प्रांत संघटन मंत्री उपेंद्र कोठेकर तसेच राज्याचे माजी मंत्री व भाजपचे ज्येष्ठ नेते आमदार सुधीर मुनगंटीवार यांची नागपूर येथे भेट घेतली.



या भेटीत जुळ्या शहराच्या विविध विकास प्रकल्पांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने यांनी अचलपूर शहरातील पायाभूत सुविधा, रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा तसेच नगर परिषदेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या प्रस्तावित योजनांची माहिती दिली. जुळ्या शहराच्या विकासासाठी शासनस्तरावर भक्कम सहकार्य व मार्गदर्शन मिळावे, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

संघटन मंत्री उपेंद्र कोठेकर व आ. सुधीर मुनगंटीवार यांनी अचलपूरच्या विकासासाठी आवश्यक ती सर्व मदत करण्याची ग्वाही देत नगराध्यक्ष रुपाली माथने यांना शुभेच्छा दिल्या.

जुळ्या शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पक्ष संघटन, भाजपा पालिका सदस्य व शासन यांच्यात समन्वय ठेवून काम करण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

# नवनिर्वाचित महापौर तेजवानी यांचा महानगर चेंबरने केला सत्कार

**अमरावती/ का.प्र.**

महानगर पालीका महापौरपदी निवड झाल्याबद्दल नवनिर्वाचित महापौर श्रीचंदजी तेजवानी यांचा महानगर चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने अध्यक्ष सुरेश जैन यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

याप्रसंगी सचिव घनश्याम राठी यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, महापौरपदी व्यापारी बांधव श्रीचंदजी तेजवानी यांची निवड झाल्याने व्यापारी जगतात आनंदाची लाट आहे. तेजवानी हे व्यापारी असल्याने त्यांना शहरातील व्यावसायिक समस्यांची जाण आहे, त्यामुळे ते त्याकडे अधिक लक्ष देऊन त्या सोडविण्याच प्रयत्न करतील असा आशावाद व्यक्त केला.अध्यक्ष सुरेश जैन यांनी अभिनंदन करताना सांगितले की, अमरावतीच्या इतिहासात भाजपने प्रथमच महापौर पदावर एका व्यावसायिकाची नियुक्ती केली. तेजवानीजींचे त्यांच्या मागील कार्यकाळातील कार्य पाहून त्यांना ही संधी देण्यात आली आणि त्यांची अशीच उत्तरोत्तर प्रगती होत राहो अशा शुभेच्छा दिल्या. शहराच्या समस्यांबाबत सुरेश जैन यांनी



उहापोह केला.यात नेहरू मैदानाच्या भव्य प्रांगणात पारधींच्या अतिक्रमणा मुळे अस्वच्छता वाढली आहे. घाणीचे साम्राज्य झाले आहे आणि शहरात चोरीच्या घटनाही वाढल्या आहेत. त्यामुळे त्या मैदानावर सशुल्क पार्किंग व्हायला हवे. त्यामुळे अतिक्रमणाची समस्या संपून शहरातील पार्किंग व्यवस्था सुरळीत होण्यास मदत होणार आहे. रेल्वे पूल बंद केल्याने - नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून त्यामुळे इर्विन चौकात वाहतुकीची कोडी होते.

या गर्दीमुळे शहरातील व्यापार प्रभावित होत असून ग्राहक ऑनलाईन खरेदीला प्रधान्य देत आहे, व्यवसाईक, शैक्षणिक, धार्मिक कार्यक्रम व आपातकालीन रुग्न यांना मोठी गैरसोय होत असल्याने जोपर्यंत नवीन पुलाचे कार्य सुरु होत नाही तोपर्यंत याची दुरुस्ती करून तो दुचाकी व तीनचाकी वाहनांसाठी तरी खुला करण्यात यावा.

शहरातील फेरीवाल्यांच्या वाढत्या अतिक्रमणामुळे शहरात वाहतूक कोंडी, अस्वच्छता, प्रदूषण, गुन्हेगारी वाढत आहे. यावर तातडीने कार्यवाही करण्याबाबत सुद्धा महापौरांना विनंती केली.गौरक्षणसाठी इन्सीरेशन युनीट देण्याबाबत अनिल नरेडी यांनी सांगितले की, कठोरा रोडवरील (नांदुरा )गोकुलम गौरक्षण येथे गायीचा मृत्यू झाला की त्यांना दफन करण्यासाठी येथे पाठविले जाते.चारही बाजूंनी गायी येतात. त्यामुळे जमीन कमी पड़त आहे. त्यामुळे तातडीने मनपा द्वारे गोकुलम गौरक्षण येथे इन्सिरेशन युनीट बसविन्यात यावे.. यासंदर्भात महापालिका आयुक्तांना पत्रही देण्यात आल्याचे सांगितले.

महापौर तेजवानीजी यांनी शहरातील सर्व समस्या लक्षपूर्वक ऐकून घेतल्या व येणाऱ्या काळात नियमानुसार त्याची तातडीने त्याची नियमानुसार अंमलबजावणी करण्यात येईल असे सांगितले. महापौरांनी सर्वांचे आभार मानून कोणत्याही प्रकारची अडचण आली तर त्यासाठी नेहमीच तत्परतेने काम करणार असल्याचे त्यांनी आश्वासन महानगर चेंबरच्या उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिले. या सत्कार प्रसंगी महानगर चेम्बर तर्फे अध्यक्ष सुरेश जैन, घनश्याम राठी, विजय दातेराव, बकुल कक्कड, महेश पिंजानी, मानिकचंद लुल्ला, शरनपाल अरोरा, कमलकिशोर मालानी, अर्जुन चांदवानी, अनील नरेडी, विनोद सामरा, विनोद जांगडा, बलदेव बजाज, प्रवीण चांडक, विजय शर्मा उपस्थित होते.

**CHANGE OF NAME**
OLD NAME
**MEHUL RAJESH LODHAYA**
NEW NAME
**MEHUL RAJESH LODAYA**
**ADDRESS**
102 Shree Appartment, Krushnarpan colony, amravati 444607

# संक्षिप्त

## २४ फेब्रुवारीला मालमत्ता कर विषयक विशेष जनसंवाद

**अमरावती -** अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांच्या मालमत्ता कर संदर्भातील मोठ्या प्रमाणात तक्रारी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. झोन तसेच मुख्य कार्यालय स्तरावर या तक्रारींचे निवारण अपेक्षित प्रमाणात न झाल्यामुळे मालमत्ता कर वसुली प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहेत.या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ व प्रभावी निवारण करण्यासाठी २४ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, महानगरपालिका कार्यालय, राजकमल चौक येथे मालमत्ता कर संदर्भातील जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या जनसंवाद कार्यक्रमात मालमत्ता करासंबंधी प्रलंबित तक्रारी, नोंद दुरुस्ती, थकबाकी, कर आकारणी आदी विषयांवर प्रत्यक्ष सुनावणी करून तत्काळ मार्गदर्शन व कार्यवाही करण्यात येणार आहे.मालमत्ता धारकांनी आपल्या तक्रारींच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे.

## बाल आरोग्य तपासणी शिबीर



**अमरावती -** महाराष्ट्र होमीओ डॉक्टर्स असोसिएशन तर्फे फुलोर प्री प्रायमरी इंग्लिश स्कूल मध्ये बाल आरोग्य तपासणी शिबीर राहटगाव येथे घेण्यात आले. या वेळी म्हाडा संघटनेच्या अध्यक्षा डॉ.स्वाती पडोळे, सचिव डॉ .नंदकिशोर भुतडा, पूर्वाध्यक्ष डॉ .गुणवंत डहाणे, प्रकल्प प्रमुख डॉ .कपिल वानखडे, डॉ.हमीद अली, डॉ .मीनल चौधरी, डॉ .वैशाली टेंभे, डॉ .प्रज्ञा घाटोळ, डॉ .रश्मी चौधरी, डॉ. स्नेहल खेरडे उपस्थित होते. शाळेचे अध्यक्ष गणेश अर्मळ, मुख्याधपिका भाग्यश्री वानखडे, शिक्षक वृंद, कर्मचारी याचे सहकार्य लाभले. या शिबिरात लहान मुलांची आरोग्य तपासणी करून पालकांना त्यांच्या मुलांच्या आरोग्या विषयी योग्य मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमाला शाळा अणि पालकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाची माहिती संघटनेच्या प्रसिद्धी प्रमुख डॉ .वैशाली टेंभे आणि सहप्रसिद्धी प्रमुख डॉ.प्रज्ञा घाटोळ यांनी माध्यमांना कळविले.

## अभिनेते भारत गणेशपुरे यांचे घरी देवीचा गोंधळ

**अमरावती -** महाराष्ट्रात जवळपास ७० टक्के कुटुंबियांचे कुलदैवत हे तुळजाभवानी देवी आहे. या कुलदेवतेचे स्तवन, स्तुतीपाठ व तिच्या पराक्रमाची गाथा गाणारी लोककला म्हणजे देवीचा गोंधळ. देवी हे कुलदैवत असलेल्या मराठी लोकांच्या घरात कोणतेही लग्नकार्य, नवसाची पूर्तता व इतर मंगल प्रसंगी गोंधळाच्या माध्यमातून देवीच्या जागर केला जातो. अभिनेते भारत गणेशपुरे हे सुद्धा देवीचे निस्सिम परमभक्त आहेत. त्यांच्या घरी कोणत्याही कार्यप्रसंगी देवीचा गोंधळ ते आवर्जून मोठ्या भक्तीभावाने व उत्साहाने करतात. नुकतेच अंजनगाव सुर्जी येथे त्यांच्या कुटुंबातील लग्नप्रसंगी अमोल पाचपोर व त्यांचे बंधू राजेश मुदगल यांनी केलेल्या देवीच्या गोंधळ कार्यक्रमात भारत गणेशपुरे यांनी भक्ती भावाने नाचून -बागडून या गोंधळ कार्यक्रमाचा आनंद घेतला.




## 'मी रमाई बोलते'... एकपात्री प्रयोग सादर

**अमरावती -** श्री.दादासाहेब गवई, चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा संचालित तक्षशिला महाविद्यालय अंतर्गत पाली विभाग व वूमन सेलच्या वतीने रमाई जयंती साजरी करण्यात आली. यामध्ये प्रमुख वक्ता म्हणून द्रोपदी बगाडे, बाल. आचाय.'वैशाली कोठांगडे, प्रा. डॉ. वर्षा गावंडे, प्रा.डॉ. रेखा वानखडे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी आई रमाई यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.माता रमाई यांचे गुण विद्यार्थिनींनी घ्यावे. असे आवाहन मान्यवरांनी केले.यावेळी 'माता रमाई बोलते' या भूमिकेमध्ये साची भटकर या विद्यार्थिनी आपले विचार मांडले.संचालन प्रा. कोमल मनोहर तर आभार वूमन स्टडी सेलच्या समन्वयक डॉ. प्रणाली पेठे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पत्रकारिता विभागातील प्रा. उज्वला सुटे. प्रा मेंडके यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला प्रा डॉ. सोनोबर कहकशा, प्रा. डॉ. रविंद्र तायडे, प्रा. डॉ. पंडित राठोड, प्रा डॉ वानखडे, प्रा. डॉ प्रवीण वानखडे, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## महाशिवरात्री महोत्सवनिमित्त धार्मिक कार्यक्रम

**अचलपूर -** बिलनपुरा येथील प्रसिद्ध श्री पाताळेश्वर मंदिरात तीन दिवसीय महाशिवरात्री महोत्सव निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.गेल्या १४ ते १६ फेब्रुवारी दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन महाशिवरात्री महोत्सव निमित्त करण्यात आले आहे.यामध्ये १४ ,१५ व १६ तीन दिवसात प्रसिद्ध कीर्तनकार किरण बुवा तूळपूले (गोवा) उपस्थितीत राहत आहे.तसेच लघरुद्राभिषेक ,पूजा अर्चना आणि १६ फेब्रुवारी रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.रात्री १० वाजता ह. भ. प अरुण महादेव भाव व भजनी मंडळाचे दिंडी भजनाचे ही आयोजन करण्यात आले आहे.यावेळी भाविक - भक्त मोठ्या संख्येने उपस्थितीत राहण्याचे आव्हान आयोजकांनी केले आहे .महाशिवरात्री निमित्त विविध शहरातून भाविक भक्त दर्शनासाठी श्री पाताळेश्वर मंदिरात येतात. यंदा ही महाशिवरात्री महोत्सव निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केल्याने भक्त मंडळी उपस्थितीत राहून लाभ घेत आहे.



# शिवमहिम्न स्तोत्र - शिवलहरींचा प्रचंड स्त्रोत !!



आज महाशिवरात्र आहे.या मुहूर्तावर लाखो शिवभक्त शिवमहिम्न स्तोत्राचे पाठ करीत असतात.शिवमहिम्न स्तोत्र हे भगवान शिवाचे महिमान सांगणारे सिध्द आणि उर्जावान स्तोत्र आहे.श्रावण महिन्यात संपूर्ण देशात शिवमहिम्न स्तुती श्रद्धेने गायिली जाते.महिम्न स्तोत्र अत्यंत लोकप्रिय , त्वरित फलदायी अशी भगवान महादेवाची सिध्द स्तुती आहे.महिम्न हा शब्द महिमान शब्दाची विभक्ती आहे.आपल्या संस्कृतीत प्रतिपाद्य देवतेच्या नावावरून स्तोत्र, कवच, सहस्त्रनाम,रक्षा प्रसिद्ध आहेत.जसे रामरक्षा,मारुती स्तोत्र, विष्णु सहस्त्रनाम वगैरे वगैरे .महिम्न देखिल यातीलच एक प्रकार आहे.

इतर स्तोत्रामध्ये प्रतिपाद्य देवतेची केवळ स्तुती असते पण महिम्न मात्र इतर स्तोत्रापेक्षा जरा वेगळे असते. महिम्नामध्ये प्रतिपाद्य देवतेच्या सगुण चरित्राची मर्यादित शब्दात विस्तारित स्तुती असते.आपली बरीच स्तोत्र नामे किंवा स्तवनांची नावे त्या त्या रचनेच्या आद्यक्षरावरुनही ठरतात.जसे ईश,केन उपनिषदांची नावे आद्याक्षरावरून आहेत.तद्वतच शिव महिम्नाचा प्रारंभ ' महिम्नः' शब्दापासून आहे.

**महिम्नः पारं ते परमविदुषो यद्यसदृशी।**
**स्तुतिर्ब्रह्मादीनामपि तदवसन्नास्त्वयि ।।**

महिम्न या शब्दाने प्रारंभ झाला आणि प्रतिपाद्य देवता 'भगवान शिव'असल्याने हे शिव महिम्न स्तोत्र आहे.महिम्न प्रकारात केवळ शिवमहिम्न आहे असे नाही.पंचायतन देवता म्हणजे सुर्य महिम्न,गणपती महिम्न,देवीमहिम्न,विष्णुमहिम्न देखिल आहेत.पण शिवमहिम्न अत्यंत लोकप्रिय आणि सुप्रसिद्ध आहे म्हणून ते सर्वश्रुत आहे.शिवमहिम्नाचे एकूण ४३ श्लोक असून त्यातील ३१ श्लोक भगवान महादेवाची लिलास्तुती असून उर्वरित १२ श्लोक फळश्रुती आहे.शिवमहिम्न ही छंदवृत्तबद्ध रचना असल्यामुळे त्याचे लयबद्ध गायन करता येते.शिवमहिम्न स्तोत्र अधिकांश शिखरिणी वृत्तात किंवा छंदात आहे.ह्या शिवाय शिवमहिम्नात हरिणी, मालिनी,वसंततिलका, अनुष्टुप छंदातही श्लोक रचना आहेत.महिम्न स्तोत्रात कारुण्य, वीर आणि रौद्र अशा नवरसादींचा समावेश असल्यामुळे पठण करतांना सहजपणे अष्टसात्विक भाव जागरण होते.शिवाय आद्य शंकराचार्यांनी आणि रामकृष्ण परमहंसांनी शिवमहिम्न सिध्द केल्यामुळे ते उर्जावान आणि बलशाली आहे.शिवमहिम्न हे भगवान शिवाचे नितांत सुंदर महात्म्य 'पुष्पदंत' नावाच्या गंधर्वराजाने लिहिले आहे.याचा उल्लेख शिवमहिम्नात ३७ व्या श्लोकात आहे.

**कुसुमदशननामा सर्वगन्धर्वराजः**
**शिशुशशिधरमौलेर्देवदेवस्य दासः।**
**स खलु निजमहिम्नो भ्रष्ट एवास्य रोषात्**
**स्तवनमिदमकार्षीद् दिव्यदिव्यं महिम्नः।।**

कुसुमदशन म्हणजे फुलासारखे दात असलेला म्हणून त्याचे नाव पुष्पदंत.त्यांनी हे दिव्य दिव्य असे महिमान लिहिले आहे.

शिवमहिम्न कसे रचिले याची एक कथा आहे.इंद्रदेव दररोज भगवान शिवाची पुजा करीत.शिवपुजेसाठी स्वर्गातील नंदनवनातून फुले आणण्याची जवाबदारी गंधर्वांचे राजे 'पुष्पदंत' यांच्याकडे होती.रोज रोज नंदनवनातील तीच ती फुले नकोत म्हणून इंद्राच्या आदेशानुसार गंधर्वराज पुष्पदंत काहीतरी वेगळी आणि नवीन फुले आणण्यासाठी भुतलावर आलेत.पृथ्वीवर प्रभासक्षेत्रीच्या 'चित्ररथ'राजाच्या राजोद्यानात सुगंधित,मोहक,विविधरंगी फुले पाहुन आनंदीत होऊन त्याने दररोज याच बागेतील फुले नेण्याचा सपाटाच लावला.त्यामुळे चित्ररथ राजाला पुजेसाठी फुले मिळेनाशी झाली.आपली फुले कोण नेतो?याचा शोध घेण्याचा खूप प्रयत्न करूनही 'गंधर्वराज पुष्पदंतांच्या' दिव्यसिध्दीमुळे पहारेकऱ्यांना ते दिसत नसत.शेवटी चित्ररथ राजाच्या कुलगुरूंनी राजोद्यानाभोवती शिवनिर्मल्याचे बंधन घातले.हे बंधन ओलांडल्यामुळे पुष्पदंत यांच्या सर्व सिद्धी संपुष्टात येवून ते पकडल्या गेले.चित्ररथ राजाने वृतांत ऐकल्यावर तो हळहळला.फुले जर इंद्रराजांसाठी नेत होतात तर मी स्वर्गात पाठवून दिली असती.आता शिवनिर्माल्याचे उल्लंघन झाल्यामुळे तुझ्या सर्व सिद्धी नष्ट झाल्यात.शिवनिर्माल्य म्हणजे शिवपिंडीवरील फुले,बिल्वपत्र,वाहिलेले जल दूध ओलांडल्या जावू नये म्हणूनच शिवपिंडीला सव्यापसव्य प्रदक्षिणा मारतात.शास्त्रात तिला सोमसुत्री प्रदक्षिणा म्हणजे चंद्रकोरीसारखी प्रदक्षिणा घातली जाते.म्हणून तर शिवपिंडीला पुर्ण प्रदक्षिणा मारत नाहीत.असो.

तेंव्हा व्यथित आणि हताश झालेल्या पुष्पदंत गंधर्वराजांना चित्ररथ राजाच्या कुलगुरूंनी सांगितले की आता यावर एकच उपाय आहे.शिवभगवान आशुतोष आहेत.म्हणजे लवकर प्रसन्न ,संतुष्ट होणारे आहेत.त्यांचे स्तवन करा.म्हणजे तुला तुझ्या सिद्धी प्राप्त होतील. त्यांच्या आज्ञेनुसार गंधर्वराज पुष्पदंत यांनी शिवपिंड स्थापन करुन भगवान शिवाचे महिमा गायन सुरु केले.त्यांच्या मुखातून निघालेले आर्तगायन म्हणजे शिवमहिम्न आहे.या महिम्नाच्या प्रभावाने पुष्पदंतांनी हरवलेले सर्व प्राप्त केले.प्रभास क्षेत्री ज्या पिंडीसमोर शिवमहिम्न निर्माण झाले त्या पिंडीला पुष्पदंतेश्वर महादेव म्हणतात.

शिवमहिम्नामध्ये पुष्पदंतांनी शिवाचे वर्णन भल्या भल्यांना शक्य नाही हे सांगतांना

**असित-गिरि-समं स्यात् कज्जलं सिन्धु-पात्रे।**
**सुर-तरुवर-शाखा लेखनी पत्रमुर्वी।।**
**लिखति यदि गृहीत्वा शारदा सर्वकालं।**
**तदपि तव गुणानामीश पारं न याति।।**

निळा निलगिरी पर्वत कुटून तो कूट समुद्रात मिसळून शाई केली आणि कल्पवृक्षाच्या फांदीचा बोरू करुन संपूर्ण पृथ्वीचा कागद केला .स्वयं शारदा सरस्वती दिवसरात्र लिहीत बसल्या तरी भगवान शिवाचे वर्णन पुर्ण होऊ शकणार नाही.स्वामी विवेकानंदांनी शिकागो धर्मपरिषदेत हिंदू तत्वज्ञान सांगताना शिवमहिम्नाचाच आधार घेतला आहे.

**रुचीनां वैचित्र्याद्दृजुकुटिलनानापथजुषां**
**नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव।।**

शिवमहिम्न स्तोत्रात समुद्रमंथन प्रसंगातील नीळकंठ महादेव वर्णन, रावणाला दिलेले वरदान,जटेत सामावून घेतलेली मंदाकिनी गंगा ,भगवान विष्णूंना दिलेले सुदर्शन चक्र,भगवान विष्णु आणि ब्रह्मदेव यांच्यात झालेला वाद त्यातुन परमात्म शक्तीचा अंतःपार पाहण्यासाठी अग्निस्तंभ विभाजन आणि परब्रह्म स्वरुप,कालभैरव रुप,कामदेवाला भस्म केल्याची कथा,ब्रह्मदेव हरिण रुपात कामातुर झाल्यावर महादेवांनी व्याघ्ररुप घेवून त्यांना परास्त केल्याची कथा,बाणासुर कथा,दक्षयज्ञ विध्वंस कथा,तांडव महत्व,जटा आपटल्याची कथा अशा विविध कथा शिवमहिम्नात गंधर्वराज पुष्पदंत यांनी श्लोकबद्ध करुन आपल्यावर कृपा केली आहे.शिवमहिम्नाची भाषा नितांत गोड आणि अमृताचा कल्लोळ आहे. या श्लोकावरून आपली खात्री पटेल.

**नमो नेदिष्ठाय प्रियदव दविष्ठाय च नमो**
**नमः क्षोदिष्ठाय स्मरहर महिष्ठाय च नमः।**
**नमो वर्षिष्ठाय त्रिनयन यविष्ठाय च नमो**
**नमः सर्वस्मै ते तदिदमिति शर्वाय च नमः ।।**

शिव महिमान कथा भाग अंशतः म्हणजे थोडक्यात काव्यबद्ध असला तरी कथा सहज समजतात. शब्द संस्कृतात असले तरी भाषेच्या सोपेपणामुळे ते आपोआप संक्रमित होतात.शिवमहिम्न ही मानवी रचना नसुन मनुष्यात ते सामर्थ्य नाही. उदात्तभाव लक्षात घेतला तर भगवान शिवांनीच भगवान शिवांची महती सांगावी असेच महिम्न आहे.त्याच्या केवळ पठणाने आपण दोषमुक्त होऊन आपल्या घरातील अवदसा आणि अवकळा नष्ट होतात.मनःशांतीसाठी शिवमहिम्न मार्ग सोपान आहे.श्रावण महिन्यात शिवलहरींचा सर्वत्र संचार असतो.शिवमहिम्न या शिवलहरींना आपल्यापर्यंत खेचून आणते.विस्तारभयाने संपूर्ण विषय मांडता येणे केवळ अशक्य पण त्या निमित्ताने उत्सुकता वाढून तो ग्रंथ वाचण्याची इच्छा उत्पन्न व्हावी हा प्रांजळ हेतू.

शिवकृपेसाठी शिवमहिम्न एकदा तरी वाचावे.सुरुवातीला उच्चारण चुकेल, गेयता हुकेल पण आर्तता कायम ठेवली तर फळ निश्चित आहे.श्रावणात शिवमहिम्नाचे नित्य पठण गतवैभव प्राप्त करुन देते किंवा पुढील वैभवाचा मार्ग खुला करण्यास सहाय्यकृत होते.**तस्मात सर्व प्रयत्नेन महिम्न पाठंच कारयेत!**

**विद्यावाचस्पती प्रा.दिलीप जोशी,वाशिम.**
मो.९८२२२६२७३५


# निंभा येथील सिद्धपीठ बाबा बालकनाथ धाम

अमरावती जिल्ह्यातील भातकुली तालुक्यात पेढी नदी काठी वसलेले निंभा गाव आणि याच गावात असलेले एक अति पौराणिक आणि प्राचीन शिवालय हे बाबा बालकनाथ धाम या नावाने ओळखले जाते. ह्याचा इतिहास खुप पुरातन आणि प्राचीन आहे. निंभा येथील बाबा बालकनाथ मंदिराच्या इतिहासाबाबत जवळपास १०० ते १२० वर्षाअगोदरचा काळ बघता गावाकऱ्यांना याबाबत फारसे काही माहिती नव्हते. गावाच्या उत्तरेला एका उंच टेकडीवर वसलेले हे प्राचीन शिवमंदिर संपूर्ण काटेरी निवडुंगाच्या झाडा झुडूपांनी वेढलेले होते.काटेरी निवडुंगाचे वन एवढ घनदाट होतं की, मंदिर आणि मंदिराचा संपूर्ण परिसर हा हिरव्या काटेरी वनाने आच्छादून गेला होता. या काटेरी वनाच्या आत काय असावे याची उत्सुकता सर्वांनाचे होती, पण नेमका थांगपत्ताच कुणाला लागत नव्हता. त्या काळात त्यावेळेस गावामध्ये काही नागा साधू भिक्षा मागतांना दिसत. मोजून पाच घरी भिक्षा मागून झाली की, ते त्यांच्या कुठल्यातरी निर्जन अशा निवासस्थळी पोहोचत असे. ज्याचा कुणालाचे थांगपत्ता नव्हता. असा त्यांचा नित्यक्रम नेहमीच चालू राहायचा. लोकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली की, क्षणभऱ्यासाठी नेमकीचे भिक्षा मागणारे हे नागा



साधू राहतात तरी कुठे? गावाकऱ्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली आणि एके दिवशी गावातील काही लोक या साधूंचा पाठलाग करत त्यांच्या मागे गेले असता, ते नागा साधू त्या घनदाट निवडुंगाच्या काटेरी वनातून गुहेगत आत शिरले,आणि त्यापाठोपाठ गावकरी देखील आत शिरले. अन काय आश्चर्य गावकऱ्यांना तेथे मंदिरासह भगवान शंकराचे शिवलिंग आणि बाजूला काही नागा साधू धुनी पेटवून तप करत असतांना दिसले.अलौकिक व अद्वितीय अशा परमात्मा स्वरूपाचा दिव्य आभास त्यांना झाला.तेव्हापासून निंभा या गावात एक प्राचीन सिद्धिपीठ शिवालय आहे हे लोकांना कळून चुकले.


निंभा गावामध्ये असलेले हे मंदिर बाबा बालकनाथाचे स्वयंभू सिद्धपीठ आहे. भगवान बाबा बालकनाथ हे महादेव शंकर यांचे अंश अवतार असून, त्यांना अखंड बाल्यावस्थेत असण्याचे वरदान भगवान शंकरांनी दिले तसेच गुरू दत्तात्रयांकडून अखंड ब्रम्हचार्याची दीक्षा घेतली होती. बाबा बालकनाथांनी येथे शिवलिंग प्रगट करून,साधना केली. बाबांनी जेथे साधना केली तेथे आजही एक गोल पानांचे झाडं अस्तित्वात आहे. बाबा बालकनाथांचे अनुयायी आणि त्यानंतर त्यांच्या सांप्रयायातील शिष्य गण येथे धुनी पेटवून साधनेसाठी हिमालयातून येत असते. बाबा बालकनाथ हे



बाल्याअवस्थेतील एक तेजस्वी रूप असून भगवान शंकरांचेच प्रतिरूप आहे. अंगावर लंगोट हातात चिमटा आणि कमंडलू. आजही लोक अशी चर्चा करतात की, बाबा बालकनाथ आणि त्यांचे अनुयायी हे मंदिराच्या आसपास त्यांच्या भक्तांना दर्शन देत असतात. हे एक सिद्धिपीठ असून बाबा बालकनाथांची जो कुणी मनापासून आणि श्रद्धेने त्यांच्या दरबारात पूजा करेल. त्यांचे बाबा बालकनाथ संपूर्ण कष्ट आणि पीडा दूर करून जीवन सुखमय करतात.

बाबा बालकनाथ धाम ही एक अलौकिक अशी तपोभूमी देखील आहे. निंभा येथीलचे विख्यात विदेही संत तानूजी बाबा यांनी याचे ठिकाणी बारा वर्ष तपश्चर्या करून संतत्व प्राप्त केले होते. मागील काही वर्षांपासून हे मंदिर भग्नावस्थेत होते, परंतु या मंदिराचा आता जीर्णोद्धार झाला असून मंदिर आणि मंदिराचे स्वरूप पूर्णता पालटले आहे. बाबा बालकनाथ धाम हे सर्व शिवभक्तांसाठी खुले करण्यात आले आहे. महाशिवरात्रीला येथे शिवमहापुराण कथेसह विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन भक्तिमय वातावरणात करण्यात येते.

**वैभव कन्हेरकर**
निंभा, ता.भातकुली
मो.९६७३१६२३७३



# श्री खंडेश्वर शिवालय हजारो भाविकांचे श्रद्धास्थान

जिल्ह्यातील तालुका म्हणून महत्व असलेल्या नांदगाव खंडेश्वर येथील निसर्गरम्य परिसरामध्ये असलेले सुमारे साडेसातशे वर्षांपूर्वीचे भगवान खंडेश्वराचे शिवालय लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे.या मंदिराचे संपूर्ण बांधकाम दगडी असून या मंदिराला तीन गर्भगृह आहेत.त्यामध्ये खंडेश्वर शिवालय शंकर पार्वती आणि नरसिंह अशी मूर्ती मंदिरे आहे खंडेश्वर हे शिवाचे नाव असून मंदिर शिवास समर्पित आहे. या ऐतिहासिक व पौराणिक मंदिरामध्ये महाशिवरात्रीला भव्ययात्रा महोत्सव दरवर्षी साजरा करण्यात येतो. मंदिराच्या दगडावरील कोरीव व रेखीव बांधकाम प्रेक्षणीय स्थळ म्हणून आकर्षित ठरत आहे.भगवान खंडेश्वराचेही पुरातन देवालय रामदेवराय यादव नुपतीचा प्रधान हेमांद्री उर्फ हेमाड पंडित यांनी प्रचलित केलेल्या शिल्प पद्धतीचे आहे म्हणून याला हेमाडपंती देवालय म्हणतात हे शिवालय राजा रामदेवराय यांच्या कार्यकाळात बांधलेले असल्याचा शिलालेख असून शके ११७७ आनंद संवत्सरी इ.स. सन १२५४--५५ मध्ये सुमारे साडेसातशे



वर्षांपूर्वीचे असल्याचे दिसून येते.या हेमाडपंथी वास्तू शिल्पावर केलेल्या उत्कृष्ट कलाकृती व शिवमंदिरांचे दगडी खांब रेखीव आहे. प्रमुख शिवालयाचे दर्शनी पूर्वेकडील दारावर कोरलेले शिल्पकाम कलाकृतीचे असून प्राचीन शिल्पकारांच्या सौंदर्य सृष्टीची व कलेची साक्ष देत आहे. तसेच दगडी रेखीव चि-यांनी बांधलेल्या या शिवालयावर विशिष्ट पद्धतीने तयार केलेल्या विटाची बांधणी चुण्यामध्ये केली आहे आणि मुख्य शिवालयत प्राचीन शिवलिंगाची स्थापना केली आहे.

दुसऱ्या उत्तरेकडील मंदिरामध्ये शंकर पार्वतीची मूर्ती आहे. पश्चिमेकडील देवळात भगवान नरसिंहाची मूर्ती हिरण्यकश्यपुला मांडीवर घेऊन आपल्या त्रिष्णनाखांनी त्याचे पोट फाडून वध करताना दिसते. या तिन्ही देवालयाचा एक मुख्य गाभारा असून शिवलिंगाचे मंदिरासमोर नंदीची एक मोठी मूर्ती आहे देवळाच्या सभोवताल परकोट बांधला असून या परकोटाला लागून बाहेर भव्य उंच दिपमाळ आहे या दीपमाळ मधून वर जाण्याकरिता आतमधून पायऱ्या आहेत. या दीपमाळ वरून संपूर्ण नांदगाव आणि



गावालगतचे खेडी दिसून येतात ऐतिहासिक दृष्ट्या विशेष महत्व असलेल्या या प्राचीन शिवालयाबाबत जुन्या लोकांचे असे म्हणणे आहे की, कौडण्यमुनीचे शिष्यामध्ये खंड्या नावाचा लाडका शिष्य होता. या नावाच्या शिष्याने स्थापन केलेले शिवालय म्हणजे खंडेश्वर शिवालय होय याचा उल्लेख पुरातन ग्रंथांमध्ये सुद्धा आढळून आल्याची सांगण्यात येते. सोमवार प्रदोष शिवरात्रीला परिसरामधील खंडेश्वर,कोंडेश्वर आणि बोंडेश्वर या तीन शिवतीर्थाची पदयात्रा एकाच दिवशी करणाऱ्याला काशीचे पुण्य मिळते. अशी भाविकांची श्रद्धा आहे या शिवालयात दरवर्षी य महाशिवरात्री महोत्सव मोठ्या भक्ती भावाने भागवत,प्रवचन,कीर्तन, भजन इत्यादी धार्मिक कार्यक्रम व महाप्रसाद या माध्यमातून साजरा केला जातो. खंडेश्वराचे शिवालय आज हजारो भाविकांचे श्रद्धास्थान बनले असून महाशिवरात्रीच्या पर्वावर हरहर महादेव च्या गजरात मंदिराचा परिसर निदानून जात आहे.

**विशाल ढवळे**
नांदगाव खंडेश्वर

# ५हजार वर्षांपासूनचे पुरातन श्री तिर्थक्षेत्र कोंडेश्वर

अमरावती जिल्ह्यातील बडनेरा येथुन पुर्वेस निसर्गरम्य परिसरात डोंगराच्या पायथ्याशी वसलेले अंजनगाव बारी ग्रामपंचायत कक्षेत असलेले श्री तिर्थक्षेत्र कोंडेश्वर हे हेमाडपंथी मंदीर आहे. ५००० वर्षापासूनचे पुरातन एक ऐतिहासिक शिवालय आहे. याठिकाणी महाशिवरात्रीनिमित्त हजारो भाविक शिवपुजेकरीता एकच गर्दी करत असते.असे म्हटले जाते की, प्राचीन काळातील 'भरत' नावाच्या राजामुळे आपल्या देशाला 'भारत' असे नाव मिळाले.भगवान विष्णू हे भरताच्या वंशावळीच्या वृक्षाचे मुळ पुरूष होते. भरताच्या बंधुचे नाव विदर्भ त्याच्या वाटयाला आलेला प्रदेश म्हणजे विदर्भ प्रदेश.विदर्भ राजा हा काशी क्षेत्रा जवळील ब्रम्हवर्तनाचा मुळ निवासी होता या शिवभक्त विदर्भ राजाने स्थापत्य विशारद कौडिण्य मुनीस काशीवरुन पाचारण करुन ५०५१ वर्षापूर्वी आपल्या नव्या विदर्भ प्रदेशात भगवान शंकराच्या पिंडीची व लिंगाची स्थापना व प्राणप्रतिष्ठा केली. कौडिण्य मुनींच्या नावावरून ह्या महादेवाला 'कोंडेश्वर' असे नाव देण्यात आले. भगवान कोंडेश्वराच्या वास्तव्याने हा परिसर पावन झाला आहे. येथे प्राचीन काळी अनेक वेळा अतिरुद्र, महारूद्र, महिम्न आवर्तने रूद्रयान, कोटी लिंगार्चने झालीत.

श्री रामदेवराय यादव व कृष्णदेवराय यादव ह्या यादव घराण्यातील ११ व्या शतकातील राजसत्तेच्या काळात त्यांचे पंतप्रधान हेमाद्रिपंत यांनी राजसत्तेच्या खर्चाने १५ फुट उंचीचे श्री. कोंडेश्वराचे हे हेमाडपंथी रचनेचे मंदीर बांधुन दिले. भोसले राजघराण्याने व माधवराव पेशवे यांनी मंदीराची जोपासना केली. या काळात कोंडेश्वराचे महात्म्य वाढले. काशी



प्रयागराज, ओंमकारेश्वर व अन्य स्थानावरून ऋषी, मुनी, साधु, संत शिवभक्त येथे येत असत. अलीकडेही श्री संत वैराग्यमुर्ती गाडगे महाराज व राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज आदि अनेक महापुरूषांनी येथे समाज प्रबोधणाची प्रेरणा घेतली.

बडनेरा येथील दादाशास्त्री भाडेकर यांच्या प्रेरणेने १९७५ वसंत पंचमीच्या मुहुर्तावर जीर्णोध्दार समिती स्थापन होऊन सभामंडप, प्रार्थना मंदीर, परकोट, धर्मशाळा, कैलास टेकडीवरील पायऱ्या, कैलास मंदीर पाकगृह, भव्य भोजन कक्ष, तीन महाव्दारे व मुख्य मंदीरचे ७१ फुट उंचीचे बांधकाम आदी जिर्णोध्दार कार्य कोट्यावधी रुपये खर्चुन शिवभक्तासाठी आधुनिक सोईच्या दृष्टीने जिर्णोद्धाराचा रथ अविरत सुरु आहे व तसेच सध्या भव्य प्रसादालयाच्या ३ मजली इमरतीचे बांधकाम चालू आहे. या कार्यास भक्तांनी सढळ हातानी मदत करण्याची मागणी संस्थानच्या वतीने करण्यात आली आहे.

श्री कोंडेश्वर मंदिर हे ५००० वर्षे पुरातन 'देवी पार्वती आणि भगवान श्री महादेवाचे' आवडते स्थान श्री तिर्थक्षेत्र कोंडेश्वर स्कन्दपुराणातील कथेनुसार येथे आई पार्वतीने भगवान श्री महादेवांना पती रूपास प्राप्त करण्यासाठी केलेल्या सोमवार व्रताचे उद्यापन येथेच केले भगवान श्री महादेवांचे सर्वात प्रिय असलेले रुद्र सुक्त येथेच अघोर ऋषींनी रचले आणि पुढे कौंडण्य ऋषींच्या तपाने प्रसन्न होऊन येथेच त्यांना भगवान श्री कोंडेश्वराचे दर्शन केल्याने मानवाला धर्म, अर्थ, काम, मोक्ष साध्य होते असे स्वयंभू भगवान श्री कोंडेश्वर नाथ अमरावती जिल्ह्यात निवास करतात ही प्रत्येक शिव-भक्तांसाठी आनंदाचीच बाब आहे पुढे कौंडण्य ऋषींच्या तपाने प्रसन्न होऊन इथेच त्यांना मोक्ष प्रदान केला व भगवान श्री कोंडेश्वर या नावानी येथे निवास करू लागले.

कोंडेश्वर हे एक जागृत देवस्थान असून, भाविकांनी कोंडेश्वराचा गाभारा जलमृत्ताने भरण्यासाठी अनेकदा प्रयत्न करतात. कोंडेश्वरावर पाण्याची सतत धार सुरु राहते. मात्र कोंडेश्वराचे शिवलिंग पुर्णपणे कधीही बुडत नाही. मंदिरातील पाणी बाहेर जाणार नाही याची पुर्णतः दक्षता घेतली जाते. गाभाऱ्याचा तळभाग चुन्याचा पक्का बनवला असतानाही हजारो लिटल पाणी नेमके कुठे जाते याचा शोध आजवर लागला नाही. मंदिराच्या गाभाऱ्यात कोंडेश्वरासह १२ ज्योर्तिलिंगाच्या प्रतिमांची स्थापना देखील करण्यात आली आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात उतरण्यापूर्वी एक मोठा नंदी पायथ्याशी बसलेला आहे. त्याची पुजा करण्याची परंपरा आहे. हा नंदी जणू भगवान शंकराची तपश्चर्या करत असल्यासारखे दिसते. येथील परिसरातील उंचावर कोंडेश्वर येथील 'शिवटेकडी' ही सुमारे ३५० वर्षापुर्वीची आहे. ही पुरातन वास्तू शिवाची व संताची तपोभूमी आहे. तसेच येथी उजव्या सोंडेचा सिद्दी विनायक पुरातन गणपतीचे मंदिर आहे. समोर 'श्री खटेश्वर देवस्थान' असून परिसर निसर्गसंपन्न आहे.

कोंडेश्वर मंदिराच्या बाहेरून बसवलेल्या दगडी चिऱ्यांवरील पायथ्याशी हत्ती कोरलेले आहे.अतिशय कलात्मक रचना असलेल्या या हत्तीच्या दोन शरीरांना एक मुख तर काही ठिकाणी दोन मुखांना एकच हत्तीचा देह दिसतो.यामुळे कोरलेल्या हत्तीची निश्चित संख्या किती हे समजणे कठीण आहे.हे हत्ती एका बाजूने मोजत गेल्यास या हत्तीची जेवढी संख्या भरते. तेवढीच संख्या दुसऱ्या बाजूने मोजत गेल्यास भरत नाही.दरवर्षी प्रमाणे यंदाही ७ ते दि. १६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत दैनंदिन कार्यक्रमात काकडा आरती, अभिषेक व तिर्थस्थापना, संगीतमय श्रीमत् भागवत कथा वाचक - पं. पु. शाखी वाराणसी यांचे शिष्य ह.भ.प. हरीओम महाराज निभोरकर (शास्त्री), हरिपाठ, सुंदरकांड, महाशिवरात्री दिवशी यात्रा महोत्सव होत आहे. रविवार १५ फेब्रुवारी सकाळी'श्री' चा अभिषेक हस्ते अध्यक्ष व सर्व विश्वस्त कोंडेश्वर संस्थान,शिव भक्तांना दर्शन,सोमवार १६ फेब्रुवारीचे मध्यरात्री २ वाजेपर्यंत करता येणार आहे.

**पवन इंगोले**
अंजनगाव बारी

# आजपासून नरनाळा निसर्ग पर्यटन महोत्सव

## निसर्ग पर्यटनाधारित साहसी खेळ, सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

■ प्रतिनिधी | अकोला ■

*जिल्ह्याचे भूषण असलेला मेळघाटातील ऐतिहासिक नरनाळा किल्ला, समृद्ध वनसंपदा आणि स्थानिक संस्कृती यांचे दर्शन घडवणारा नरनाळा महोत्सव येत्या दि. १५ ते १७ फेब्रुवारीदरम्यान उत्साहात साजरा होणार आहे. दीर्घ कालावधीनंतर महोत्सव होत असल्यामुळे जिल्ह्यातील निसर्ग पर्यटनप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण असून, यानिमित्त आयोजिण्यात आलेल्या विविध उपक्रमांत मोठ्या प्रमाणावर नागरिक सहभागी होत आहेत.*



जिल्हाधिकारी कार्यालय व वनविभाग, अकोट वन्यजीव विभाग यांच्या सहकार्याने निसर्गप्रेमींसाठी नरनाळा निसर्ग पर्यटन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनात विविध यंत्रणांच्या सहकार्याने नियोजन व पूर्वतयारी करण्यात आली आहे. महोत्सवाच्या माध्यमातून नरनाळा किल्ल्याचे ऐतिहासिक महत्व, स्थानिक संस्कृती, पर्यावरण संवर्धन आणि इको टुरिझमबाबत जनजागृती करण्याचा हेतू असून, साहसी खेळ, सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच अनेकविध उपक्रम घेतले जाणार आहेत. या महोत्सवाच्या माध्यमातून जिल्ह्यातील पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे. राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते दि. १५ फेब्रुवारी रोजी दु. ४.३० वा. महोत्सवाचा शुभारंभ होणार आहे. मान्यवर लोकप्रतिनिधी, अधिकारी, विविध क्षेत्रांतील मान्यवर, निसर्गप्रेमी व मोठ्या संख्येने नागरिक यावेळी उपस्थित राहणार आहेत.

### विविध स्पर्धांचे आयोजन

महोत्सवात निसर्ग पर्यटनावर आधारित विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचे तिन्ही दिवस सकाळी ६ ते सायंकाळी ६ दरम्यान

### जिल्ह्यांतील निसर्गप्रेमींमध्ये उत्साह; उपक्रमांना मोठा प्रतिसाद

ट्रेकिंग, जंगल सफारी, बोटिंग, नरनाळा किल्ला सफारी असे निसर्गपर्यटनाधारित कार्यक्रम होतील. दि. १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता महिला व पुरूषांसाठी 'मॅरेथॉन- संवर्धनासाठी धाव' होणार आहे. त्यासाठी अकोट फॉरेस्ट डेपो ते श्री संत गजानन महाराज विहीर फाटा असे साधारणत: १२ किमी अंतर असेल.

चित्रकला व नृत्य कला स्पर्धा दि. १६ फेब्रुवारीला सकाळी १० ते २ दरम्यान विहीर फाटा परिसरात होईल व याच दरम्यान शहानूर येथे पाक कला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. वन्यजीव छायाचित्रण स्पर्धाही आयोजिण्यात आली आहे.

### सांस्कृतिक कार्यक्रमांची पर्वणी

महोत्सवात तिन्ही दिवस सांस्कृतिक कार्यक्रम सायं. ५ ते रा. १० वा. दरम्यान होणार आहेत. दि. १५ फेब्रुवारीला 'चला हवा येऊ द्या' टीमचे प्रसिद्ध मराठी कलावंत कार्यक्रम सादर करणार आहेत. दि. १६ फेब्रुवारीला 'शिवशंभो गर्जना टीम'कडून सादरीकरण होणार आहे. इंडियन आयडॉल विनर सलमान अली 'लाईव्ह इन कॉन्सर्ट' सादर करणार आहेत. दि. १७ फेब्रुवारीला पद्मश्री कैलाश खेर यांची 'लाईव्ह इन कॉन्सर्ट' होणार आहे. दि. १७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० कवीसंमेलन होणार आहे. दुपारी २ वा. इन्व्हेस्टर्स मीट होणार आहे. सायंकाळी ५ वा. पारितोषिक वितरण होणार आहे.

निसर्ग संवर्धनाबाबत जनजागृती करणे व मानव आणि पर्यावरण यांच्यातील नाते दृढ करणे हा महोत्सवाचा प्रमुख हेतू आहे. ऐतिहासिक महात्म्य लाभलेला नरनाळा किल्ला व मेळघाटचे समृद्ध जंगल हे अकोला जिल्ह्याचे गौरवस्थान आहे. महोत्सवात अधिकाधिक निसर्गप्रेमी नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना, उपवनसंरक्षक राहूलसिंह टोलिया व जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# आर्ट ऑफ लिव्हिंगची आज भव्य भजन संध्या

■ प्रतिनिधी | अकोला ■



लाखो भक्तांच्या तारणहार श्री श्री रविशंकरजीं च्या आर्ट ऑफ लिव्हिंग अकोला शाखेच्या वतीने पावन महाशिवरात्र व गुरुदेवांच्या ७०व्या जयंती वर्षानिमित्त आज महाशिवरात्री रविवार दि. १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता गांधी रोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुक्त नाट्यगृहात भव्य भजन संध्या होत असून यात आर्ट ऑफ लिव्हिंगचे आंतरराष्ट्रीय भजनकार व गायक विक्रम हाजरा भक्तिमय भजन संध्या सादर करणार आहेत. या भजन संध्येचा लाभ घेण्याचे आवाहन शिक्षकगण संजय शेळके, आरती देशपांडे, रमेश फुंडकर, कैलाश अग्रवाल, रामकृष्णा डालमिया, दीपक व्होरा, ज्ञानेश्वर कापले, सुधीर इंगळे, संतोष मरशेट्टीवार, अम्बादास सिंगानिया, प्रशांत साबळे, प्रवीण शिंदे, अँड कांचन शिंदे, सुधीर घाटोळ, किशोर खोळे, वैभव वाघमारे, गणेश परस्कर, श्रीकांत पाटील, सुनिता तिवारी, उषा शर्मा, राम घायाळकर, डॉ. विजय जाधव, दिनेश मुर्जानी, श्वेता मुर्जानी, डॉ. संकेत अग्रवाल, डॉ. निराली अग्रवाल, अक्षय जोशी, रोहित कनोजे, रूपाली राणे, अनुपमा ठाकूर, देवेंद्र शेकोकर, रोहित गावंडे, आनंद नागले, नीलेश चौधरी, संतोष कापसे, पूजा कापसे, स्वप्नील करोटे समवेत आर्ट ऑफ लिव्हिंगचे जिल्हा विकास समिती सदस्य आणि स्वयंसेवकांनी केले आहे.

# भारत-अमेरिका व्यापार करार शेतकऱ्यांसाठी धोकादायक; कृषी क्षेत्र वगळण्याची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■



प्रस्तावित भारत-अमेरिका व्यापार करारामुळे देशातील कृषी क्षेत्रावर दूरगामी आणि नकारात्मक परिणाम होण्याची भीती व्यक्त करत शेतकरी विकास मंच महाराष्ट्राने तीव्र आक्षेप नोंदवला आहे. हा करार भारतीय शेतकऱ्यांच्या हिताविरुद्ध ठरू शकतो, असा ठाम इशारा मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

मंचाच्या मते, अमेरिकेत शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनुदाने दिली जातात. त्यामुळे त्यांचा उत्पादन खर्च लक्षणीयरीत्या कमी राहतो. याउलट भारतातील शेतकऱ्यांना वर्षाला केवळ सहा हजार रुपयांचा सन्मान निधी दिला जातो, जो वाढत्या बियाणे, खत, औषधे व इंधन दरांच्या तुलनेत अत्यंत अपुरा आहे. अशा असमान परिस्थितीत अमेरिकन आणि भारतीय शेतकऱ्यांमधील स्पर्धा ही भारतीय शेतकऱ्यांसाठी घातक ठरणार असल्याचे मंचाने स्पष्ट केले.

मंचाचे महाराष्ट्र राज्याध्यक्ष हुसैन खान यांनी सांगितले की, करारानंतर अमेरिकेतून जीएम सोयाबीन, मका तसेच पशुखाद्य मोठ्या प्रमाणावर भारतात आयात होण्याची शक्यता आहे. भारतात जीएम पिकांवर निर्बंध असताना, शून्य दराने आयात झालेली कृषी उत्पादने भारतीय बाजारपेठेत आल्यास स्थानिक उत्पादनांचे दर कोसळतील आणि शेतकऱ्यांना योग्य भाव मिळणार नाही. परिणामी, आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांची परिस्थिती अधिक बिकट होईल. तसेच भारतातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या कृषी उत्पादनांवर १८ टक्क्यांपर्यंत शुल्क आकारले जाण्याची शक्यता वर्तवली जात असल्याचा दावा करत मंचाने याला 'दुहेरी निकष' असे संबोधले. एकीकडे अमेरिकन कृषी मालासाठी सवलती आणि दुसरीकडे भारतीय उत्पादनांवर कराचा बोजा, हा स्पष्ट अन्याय असल्याची टीका करण्यात आली.

यावेळी भास्कर डोंगरे, कोच अध्यक्ष अमान इनामदार, सचिव अब्दुल मतीन, कार्यकारी सदस्य अमानुल्ला हारून यांसह इतर पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, शेतकरी विकास मंचाने केंद्र सरकारसमोर काही प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये कृषी क्षेत्राला कोणत्याही आंतरराष्ट्रीय व्यापार करारातून पूर्णपणे वगळणे, आयात धोरणाचा तातडीने पुनर्विचार करणे, जीएम पिकांच्या आयातीवर संपूर्ण बंदी कायम ठेवणे आणि शेतकऱ्यांना जागतिक स्पर्धेसाठी सक्षम करण्यासाठी पुरेशी अनुदाने व हमीभावाला कायदेशीर दर्जा देणे या मागण्यांचा समावेश आहे. केंद्र सरकारने कोणत्याही आंतरराष्ट्रीय दबावाला बळी न पडता देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे आवाहन मंचाने केले आहे.

# गुरुवर्य श्री वासुदेव महाराज जयंती महोत्सवाला भक्तीमय प्रारंभ

## नगराध्यक्ष माया धुळे यांचे प्रतिपादन; श्रद्धासागर येथे भाविकांची मांदियाळी

■ प्रतिनिधी | अकोट ■



वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू संतश्रेष्ठ श्री वासुदेव महाराज यांच्या १०९व्या जयंती महोत्सवाला शुक्रवारी श्रीक्षेत्र श्रद्धासागर येथे भक्तीमय वातावरणात उत्साहात प्रारंभ झाला. गुरुवर्य हे अकोट संत नगरीचे आध्यात्मिक वैभव असून त्यांच्या जयंती महोत्सवात श्रद्धा, भक्ती आणि ज्ञानाचा अपूर्व संगम अनुभवायला मिळतो, असे भावपूर्ण प्रतिपादन नगराध्यक्ष मायाताई धुळे यांनी केले.

श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था यांच्या वतीने आयोजित या महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. संत वासुदेव महाराजांनी समाजकल्याणासाठी आयुष्य चंदनाप्रमाणे झिजविले. ३४ ज्ञानग्रंथांची निर्मिती करून समाजाला सत्याचा सन्मार्ग दाखविला, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी भागवताचार्य ह.भ.प. प्रल्हाद महाराज भांडे, श्रीहरी महाराज सोनेकर, संस्थाध्यक्ष ह.भ.प. वासुदेवराव महल्ले, उपाध्यक्ष बाबाराव बिहाडे, महादेवराव ठाकरे, कोषाध्यक्ष पुरुषोत्तम लाजुरकर, सचिव रवींद्र वानखडे, सहसचिव अवी गावंडे, सुनंदाताई आमले, जयदीप सोनखासकर, अशोकराव पातळी, नंदकिशोर हिंगणकर, ॲड. शिरीष ढवळे, दिलीपराव हरणे, अनिल कोरपे, जयकृष्ण वाकोडे, मधुकरराव पुंडकर, बाळासाहेब आमले, सुरेंद्र चिकटे आदी मान्यवर उपस्थित होते.

महोत्सवानिमित्त भागवत ध्वजपूजन, गुरुपूजन व गुरु वंदना नगराध्यक्ष मायाताई धुळे यांच्या हस्ते करण्यात आले.

संस्थाध्यक्ष वासुदेवराव महल्ले यांनी शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सत्कार केला. 'गुरुवर्यांचा आशीर्वाद माझ्या पाठीशी असून अकोट शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी त्यांचेच बळ मिळेल,' असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. त्यानंतर ह.भ.प. सुभाष महाराज बानेरकर यांचे सुश्राव्य प्रवचन पार पडले.

पहाटे श्रींचा अभिषेक, तीर्थस्थापना व ग्रंथपूजन सचिव रवींद्र वानखडे यांच्या शुभहस्ते सपत्नीक पार पडले. श्री ज्ञानेश्वरी पारायणाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पारायण पिठाचे नेतृत्व ह.भ.प. अंबादास महाराज व अनंत महाराज आवारे यांनी केले. श्रद्धासागर क्षेत्रात उभारलेल्या भव्य मंडपात संतपीठावरील गुरुवर्यांची रजतमूर्ती, आकर्षक सुशोभीकरण, वारकरी पताका आणि गुरु मंदिर परिसर यामुळे भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. संस्थापक अध्यक्ष वै. पंजाबराव हिंगणकर यांच्या स्मृतिद्वाराने परिसराची शोभा अधिकच वाढविली आहे. गावोगावचे सेवेकरी भाविक सेवाकार्यात सहभागी झाल्याने जयंती महोत्सवात उत्साहाचे वातावरण आहे.

# तीर्थक्षेत्र लाखपुरी येथे महाशिवरात्री उत्सवाची जय्यत तयारी



■ प्रतिनिधी | अकोला ■

लाखपुरी येथील भगवान श्री लक्षेश्वर संस्थान येथे महाशिवरात्री महोत्सवासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. मुर्तिजापूर व दर्यापूर तालुक्याच्या सीमेवरील पूर्णा नदीच्या तीरावर वसलेले हे तीर्थक्षेत्र पश्चिम विदर्भातील शिवभक्तांची 'काशी' म्हणून ओळखले जाते. यंदाही हजारो भाविकांच्या उपस्थितीची शक्यता लक्षात घेऊन नियोजन करण्यात आले आहे.

रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी महाशिवरात्री पर्वानिमित्त भाविकांसाठी दर्शनबारीची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. उपवास फराळ व शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली असून सार्वजनिक अभिषेक, काकडा आरती, भावगीत कार्यक्रम आदी धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याच दिवशी गावातील गुणवंत विद्यार्थी, नवनियुक्त व सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी यांचा सत्कार होणार आहे. हरिपाठ व रात्री कीर्तनाचा कार्यक्रमही रंगणार आहे. सोमवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी सकाळी काल्याचे कीर्तन होणार असून दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री श्रींची पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता पूर्णा नदी तीरावर दहीहंडी फोडून महाशिवरात्री महोत्सवाची सांगता होईल. उत्सवानिमित्त मुर्तिजापूर ग्रामीण पोलीस स्टेशन यांच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. आयोजित सर्व धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री लक्षेश्वर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

# विवाहितेचा विनयभंग; एकाविरुद्ध गुन्हा दाखल

### चान्नी ठाणे हद्दीतील घटना; आरोपीच्या अटकेची प्रक्रिया सुरू

**खेट्री :** पातूर तालुक्यातील चान्नी पोलीस ठाणे हद्दीतील एका गावात विवाहितेचा विनयभंग केल्याप्रकरणी पोलिसांनी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना १२ फेब्रुवारी रोजी दुपारी घडली असून रात्री उशिरा तक्रार नोंदविण्यात आली.

पीडित विवाहितेने दिलेल्या तक्रारीनुसार, अंधारसांगवी येथील सुरेश वासुदेव पिंपळकार हा गेल्या काही




दिवसांपासून तिला त्रास देत होता. १२ फेब्रुवारी रोजी दुपारी तिच्या घरासमोर येऊन आरोपीने शिवीगाळ करत मारहाण केली तसेच विनयभंग केला. हा प्रकार कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकीही दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

आरोपीच्या सातत्यपूर्ण त्रासाला कंटाळून पीडितेने १२ फेब्रुवारीच्या रात्री थेट चान्नी पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध विनयभंगासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत चान्नी पोलीस ठाण्याचे ठाणेदार रवींद्र लांडे यांनी सांगितले की, पीडितेच्या जबाबावरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. चौकशीअंती आवश्यक त्या कलमांची वाढ करण्यात येणार आहे. आरोपीला अटक करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# नरनाळा महोत्सवात रंगणार भव्य कवीसंमेलन

■ प्रतिनिधी | अकोला ■

नरनाळा निसर्ग पर्यटन महोत्सव उद्यापासून (दि. १५) दि. १७ पर्यंत होणार आहे. महोत्सवात साहसी खेळ, वनपर्यटन, सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच मंगळवारी भव्य कवीसंमेलन व मुशाय-याचे आयोजन करण्यात आले आहे.

पोपटखेड रोड येथील श्री गजानन महाराज विहीर संस्थान परिसरात विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. त्यात दि. १७ फेब्रुवारी रोजी स. १० वा. भव्य कवीसंमेलन व मुशायरा होणार आहे. प्रसिद्ध मराठी कवी गोपाळ मापारी, विठ्ठल कुलट, विजय सोसे, गजानन मते, मंगेश वानखडे त्याचप्रमाणे, हास्य कवी अकिल साहिल, जमीर अहमद जमीर, राहिल रब्बानी अशा मराठी व हिंदी कवींचा संमेलनात समावेश असेल. जळगाव खानदेश येथील प्रसिद्ध कवी साबीर मुस्तफाबादी हे निवेदन करणार आहेत. अधिकाधिक रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शेतकरीविरोधी व्यापार कराराविरोधात शिवसेनेचा एल्गार

## २६ फेब्रुवारीला जिल्ह्यात ५३ ठिकाणी रास्ता रोको

■ प्रतिनिधी | अकोला ■

*भारत-अमेरिका व्यापार करारामुळे कृषी क्षेत्रावर गंभीर परिणाम होणार असल्याचा आरोप करीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने केंद्र सरकारविरोधात एल्गार पुकारला आहे. हा करार तातडीने रद्द करावा, या मागणीसाठी गुरुवार, २६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता जिल्ह्यातील ५३ ठिकाणी एकाच वेळी रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी शनिवारी शासकीय विश्रामगृह येथे पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली.*



बैठकीला उपनेते तथा आमदार नितीन देशमुख यांच्या नेतृत्वात सहसंपर्कप्रमुख सेवकराम ताथोड, जिल्हाप्रमुख गोपाल दातकर, मंगेश काळे, माजी आमदार संजय गावंडे, जिल्हा संघटिका माया म्हैसने, सरिता वाकोडे, उपजिल्हाप्रमुख दिलीप बोचे, योगेश्वर वानखडे, जिल्हासंघटक भूषण भिरड, तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर गावंडे, गजानन मानतकर, गजानन चौधरी, ब्रह्मा पांडे, शहर प्रमुख आशिष गावंडे, राहुल कराळे, मनपा गटनेते विजय इंगळे, नगरसेवक अभय खुमकर, सागर भारुका, सोनाली सरोदे, मनोज पाटील यांच्यासह जिल्हा व शहर कार्यकारिणीतील पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील सातही तालुक्यांत रास्ता रोको आंदोलन होणार असून जिल्हा परिषदेच्या ५३ सर्कल ठिकाणी हे आंदोलन राबविण्यात येणार आहे. यात तेल्हारा (७), अकोट (९), मूर्तिजापूर (७), अकोला (१०), बाळापूर (७), पातूर (६) आणि बार्शीटाकळी (७) सर्कलचा समावेश आहे.

### शेती संकटात; करारामुळे वाढणार अडचणी

अवर्षण व अतिवृष्टीमुळे पिकांची नासाडी होत असताना उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारे उत्पन्न अपुरे ठरत आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे. अशा परिस्थितीत भारत-अमेरिका व्यापार करारामुळे परदेशी मालाला प्राधान्य मिळून स्थानिक शेतमालाचे भाव आणखी घसरण्याची भीती शिवसेना नेत्यांनी व्यक्त केली.

### 'टॅरिफ' बाबत भाजपची धुळफेक

करारामुळे अमेरिकेने भारतावर लावलेल्या टॅरिफमध्ये २५ टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कपात झाल्याचा दावा भाजप नेत्यांकडून केला जात असला, तरी ही जनतेची दिशाभूल असल्याची टीका आ. नितीन देशमुख यांनी केली. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी व मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात टॅरिफ दर २.७५ टक्के होता, असा दावा करीत सध्याच्या नरेंद्र मोदी सरकारच्या काळात टॅरिफमध्ये वाढ झाल्याचा आरोप त्यांनी केला. शेतकरीविरोधी धोरणांवर सरकारला जाग आणण्यासाठी रस्त्यावर उतरून लढा देण्याचा इशाराही त्यांनी दिला.

### 'लुटारूंच्या फायद्यासाठी करार'

काही उद्योगपती व मोठ्या व्यापाऱ्यांच्या फायद्यासाठीच केंद्र सरकार करार करीत असल्याचा आरोप करताना जिल्हाप्रमुख गोपाल दातकर यांनी शेतमालाचे भाव पाडून शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे सांगितले. राज्यातील महायुती सरकारमधील मंत्र्यांनी केंद्राच्या धोरणाविरोधात मौन बाळगल्याची टीकाही करण्यात आली.

### नवनिर्वाचितांचा सत्कार, पक्षप्रवेश

यावेळी अकोट व बाळापूर नगरपरिषद तसेच महापालिकेतील निवडून आलेल्या शिवसेना नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. तसेच महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १० मधील सकलेन खान पठाण व प्रभाग १८ मधील कृष्णा साठे यांनी समर्थकांसह शिवसेनेत प्रवेश केला.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ७८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# टेंडरचा डंका,रुग्णालय अजूनही कागदावरच!

## ३०० खाटांच्या प्रकल्पावरून श्रेयवाद पेटला; आ.सुमित वानखेडे आणि खा.अमर काळे आमने-सामने

**वर्धा/जनमाध्यम**



निवडणुकीच्या तोंडावर विकासकामांचा गाजावाजा करण्याची परंपरा जिल्ह्यात नवी नाही. तळेगाव येथे प्रस्तावित ३०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयाच्या टेंडरनंतर सत्ताधाऱ्यांनी जल्लोष साजरा केला असला, तरी प्रत्यक्षात प्रकल्प अद्याप प्राथमिक टप्प्यात असल्याची टीका विरोधकांकडून होत आहे. १५५ कोटी ८४ लाख रुपयांच्या निधीची घोषणा आणि ई-टेंडर प्रसिद्ध झाल्याने राजकीय वातावरण तापले आहे.

या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याचा दावा आमदार सुमित वानखेडे यांनी केला आहे. जिल्ह्याच्या आरोग्य सुविधांसाठी हा ऐतिहासिक निर्णय आहे, असे सांगत त्यांनी श्रेय घेतले. मात्र विरोधकांचा प्रश्न सरळ आहे. टेंडर निघाले म्हणजे काम पूर्ण झाले असे समजायचे का? प्रशासनिक मंजुरी, ठेकेदाराची नियुक्ती, प्रत्यक्ष कामाची सुरुवात आणि पूर्णता यासाठी कालमर्यादा काय, याबाबत स्पष्टता नसल्याची टीका होत आहे.दरम्यान, निवडणूक प्रचारादरम्यान खा.अमर काळे यांनी या प्रकल्पाच्या घोषणेला 'लॉलीपॉप' असे संबोधले होते. त्यावरून आता सत्ताधाऱ्यांनी हल्लाबोल सुरू केला आहे. सोशल मीडियावर लॉलीपॉप की कॅडबरी? अशा पोस्ट्स व्हायरल होत आहेत. मात्र काळे समर्थकांचा दावा आहे की, ही टीका प्रकल्पाच्या विश्वसनीयतेवर होती; विकासाच्या विरोधात नव्हती. घोषणांपेक्षा प्रत्यक्ष काम महत्त्वाचे, असा त्यांचा सूर आहे.

राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या धुरळ्यात मात्र मूळ मुद्दा बाजूला पडत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. तळेगाव आणि परिसरातील रुग्णांना आजही गंभीर उपचारांसाठी नागपूर किंवा अमरावतीकडे धाव घ्यावी लागते. अपुऱ्या सुविधा, डॉक्टरांची कमतरता आणि वाढता खर्च यामुळे सामान्य नागरिक हैराण आहेत. अशा वेळी ३०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय उभे राहणे ही काळाची गरज आहे.राजकारणात रूपकांचा वापर नवा नाही. देशपातळीवरही निवडणुकांमध्ये आश्वासनांवरून वाद रंगलेले दिसतात. उदाहरणार्थ, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवडणुकीत केलेल्या १५ लाखांच्या उल्लेखावरून विरोधक आजही टीका करतात. मात्र निवडणुकीतील भाष्य आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यामधील फरक लक्षात घेणे आवश्यक असते.तळेगाव प्रकल्पाबाबतही तसाच प्रश्न उपस्थित होत आहे. टेंडर प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण होईल का कामाला गती मिळेल का ठरलेल्या कालावधीत रुग्णालय उभे राहील का, या सर्व प्रश्नांची उत्तरे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी स्पष्टपणे द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.सध्या श्रेयवादाचे पोस्टरयुद्ध रंगले असले, तरी सामान्य नागरिकांची मागणी एकच आहे, खात्रीशीर आरोग्य सुविधा. राजकीय वाद, रूपके आणि सोशल मीडियावरील टोलेबाजी यापलीकडे जाऊन प्रकल्प पूर्णत्वास नेणे हेच खरी कसोटी ठरणार आहे. टेंडरच्या घोषणांचा डंका वाजवण्यापेक्षा प्रत्यक्ष कामाला गती देणे अधिक महत्त्वाचे असल्याची भावना जिल्ह्यात उमटत आहे.

# विषारी दंशानंतर कुटुंब उघड्यावर न्यायाच्या प्रतीक्षेत गावकरी

## सर्पदंश मृत्यूला २५ लाख मदतीची मागणी; आ.राजेश बकाने यांना निवेदन

**देवळी/जनमाध्यम**



वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास २५ लाखांची मदत मिळते, पण सर्पदंशाने मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबीयांना न्याय का नाही, असा प्रश्न उपस्थित करत विदर्भ सर्पमित्र मंडळ व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने आमदार राजेश बकाने यांना निवेदन देण्यात आले. विधानसभेत विषय मांडून शासन दरबारी पाठपुरावा करावा, अशी मागणी करण्यात आली. सर्प अभ्यासक गजेंद्र सुरकार यांनी सांगितले की वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत वाघ, बिबट, अस्वल, हत्ती यांसारख्या वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू, जखमी किंवा शेती-जनावरांचे नुकसान झाल्यास चौकशीनंतर २५ लाखांपर्यंत आर्थिक मदत दिली जाते. मात्र त्याच कायद्यात समाविष्ट असलेल्या विषारी सापाच्या दंशाने मृत्यू झाल्यास कोणतीही नुकसानभरपाई मिळत नाही, ही मोठी विसंगती असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.निवेदनात देवेंद्र फडणवीस व गणेश नाईक यांच्याकडे पाठपुरावा करून गरीब शेतकरी, शेतमजूर व वनमजूरांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी आहे. सर्पदंशाने व्यक्तीचा मृत्यू झाल्यास २५ लाख रुपये तसेच पाळीव जनावरांच्या मृत्यूवरही समान मदत देण्याची मागणी करण्यात आली.सुरकार यांनी स्पष्ट केले की सापाला इजा करणे किंवा ठार मारणे हा कायद्यानुसार गंभीर गुन्हा आहे, मात्र मदतीच्या बाबतीत दुजाभाव केला जातो. सध्या केवळ गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना अंतर्गत काही अटींवर दोन लाख रुपयांची मदत मिळते, पण सर्व कुटुंबांना त्याचा लाभ होत नाही.गेल्या अनेक वर्षांपासून जनजागृती, ग्रामसभांचे ठराव व निवेदने देऊनही प्रश्न प्रलंबित असल्याचे त्यांनी सांगितले. लवकरच कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्याचा इशाराही त्यांनी दिला.दरम्यान, आमदार बकाने यांनी विषय गांभीर्याने शासनापुढे मांडण्याचे आश्वासन दिल्याचे मंडळाच्या वतीने सांगण्यात आले.

# आधार अपडेटच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या खिशावर डल्ला!

## मोझरी-शेकापूर परिसरात वसुलीचा आरोप; पालक संतप्त

**मोझरी(शेकापूर)/ जनमाध्यम**

प्राथमिक शाळांतील इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचे मोफत आधार अपडेट व बायोमेट्रिक नोंदणी असताना काही केंद्र चालकांकडून पैसे उकळले जात असल्याचा प्रकार उघडकीस आला असून पालकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी पालकांनी केली आहे.

शासनाच्या सूचनेनुसार सहा ते पंधरा वर्ष वयोगटातील विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण व बायोमेट्रिक अद्ययावत करणे आवश्यक आहे. नवीन नोंदणी व पाच वर्षांनंतरचा बायोमेट्रिक अपडेट विनामूल्य असताना कानगाव येथील एका ठराविक केंद्रावर प्रत्येकी १२५ रुपये आकारले जात असल्याची चर्चा आहे. पैसे दिल्याशिवाय काम होणार नाही, अशी तंबी दिल्याचाही आरोप पालकांनी केला आहे.नाव, पत्ता किंवा इतर तपशील बदलण्यासाठी शासनाने केवळ ५० रुपयांचे शुल्क निश्चित केलेले असताना विद्यार्थ्यांकडून जादा रक्कम घेतली जात असल्याने गरीब पालकांच्या खिशाला फटका बसत आहे. मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीने या प्रकारात लक्ष घालावे, अशी मागणी करण्यात येत आहे.दरम्यान, या संदर्भात शिक्षण विभाग अनभिज्ञ असल्याचे समोर आले आहे. प्रकरण दडपले जाणार की संबंधित केंद्र चालकावर कारवाई होणार, याकडे पालकांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणात आमदार राजेश बकाने यांनी हस्तक्षेप करावा, अशी मागणी होत आहे.मोझरी (शेकापूर) केंद्रप्रमुख अजय बोबडे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांचे आधार अपडेट व बायोमेट्रिक करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारणे चुकीचे असून तक्रार आल्यास चौकशी करून संबंधित केंद्र चालकांना विनामूल्य सेवा देण्याच्या सूचना दिल्या जातील.

# गावातून थेट अंतराळाकडे झेप

## भारत विद्यालयाचा निर्मित पोहाणे 'इस्रो' शैक्षणिक सहलीसाठी निवड

**हिंगणघाट/जनमाध्यम**



जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत आयोजित जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी भारत विद्यालयाचा इयत्ता नववीतील विद्यार्थी निर्मित अरुण पोहाणे याची बंगळुरू येथील इसरो तसेच कुप्पम (आंध्र प्रदेश) येथे होणाऱ्या शैक्षणिक सहलीसाठी निवड झाली आहे. या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

ही सहल पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा यांच्या वतीने आयोजित करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विज्ञान व अंतराळ संशोधन क्षेत्राची प्रत्यक्ष ओळख व्हावी, संशोधनवृत्ती वाढावी आणि उच्च शिक्षणाबाबत जागरूकता निर्माण व्हावी हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांना अंतराळ संशोधन केंद्र भेट, शास्त्रज्ञांशी संवाद तसेच कुप्पम येथील वैज्ञानिक प्रकल्पांची पाहणी करण्याची संधी मिळणार आहे. विमान प्रवासासह अंतराळ विज्ञानाचे धडे अनुभवण्याची ही दुर्मीळ संधी ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.निर्मित पोहाणे यांच्या निवडीबद्दल पालकमंत्री तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. मंगेश घोगरे यांचे कौतुक होत आहे. मार्गदर्शक शिक्षिका चैताली मानापुरे यांच्यासह प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष गोकुलदास राठी, उपाध्यक्ष शामभाऊ भिमनवार, सचिव रमेश धारकर, मुख्याध्यापक हरीश भट्टड, उपमुख्याध्यापक किशोर चवरे, पर्यवेक्षिका निलाक्षी बुरीले, मनीषा कोंडावार व सर्व शिक्षकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# हाक देत राहिले कर्तव्यष्ठ पण प्रहरी निघून गेला कायमचा



**वर्धा**-शहर पोलिस ठाण्यातील पोलीस अंमलदार उमेश मारोतराव उईके (वय ४५) यांच्या निधनाने वर्धा शहर स्तब्ध झाले आहे. रोज गणवेशात दिसणारा शांत चेहरा अचानक काळाच्या पडद्याआड गेल्याने पोलिस दलासह नागरिकांच्या मनात हळहळ उसळली आहे.

गजानन नगर येथील रहिवासी असलेले उईके हे सन २००७ बॅचचे पोलीस कर्मचारी होते. कर्तव्य म्हणजेच जीवन मानणाऱ्या या अधिकाऱ्याने सेवेत कधीही आवाज चढवला नाही,पण जबाबदारी मात्र खंबीरपणे उचलली. रात्रीची गस्त असो, तणावपूर्ण परिस्थिती असो किंवा एखाद्या नागरिकाची अडचण  उईके साहेब आहेत ना, हीच लोकांची खात्री होती. सहकाऱ्यांसाठी ते फक्त कर्मचारी नव्हते, तर आधार देणारे मोठे भाऊ होते.त्यांच्या अकाली जाण्याने ठाण्यातील खुर्ची रिकामी झाली नाही, तर एक माणूस हरपल्याची भावना प्रत्येकाच्या मनात घर करून राहिली आहे. गणवेश मागे राहिला, पण त्यातले माणूसपण आठवणीत कायमचे जिवंत झाले आहे.त्यांच्या पश्चात पत्नी रुपाली, मुली गौरी व माही तसेच आई सुमन असा परिवार आहे. वडिलांची वाट पाहणाऱ्या चिमुकल्यांच्या डोळ्यांत आता प्रश्न आहेत, तर आई-पत्नीच्या आयुष्यात अचानक पोकळी निर्माण झाली आहे.

# घर पूर्ण पण हप्ता गायब 'वर्ककोड'च्या नावाखाली गरीबांची थट्टा

## खा.अमर काळे यांची दिल्लीत धाव

**वर्धा /जनमाध्यम**



घरकुल उभं राहिलं, छप्पर बसलं, कुटुंब राहायलाही गेलंय पण सरकारचा दुसरा हप्ता मात्र कागदावरच अडकला, केंद्र-राज्य सरकारच्या पंतप्रधान आवास योजना अंतर्गत हजारो लाभार्थ्यांनी उसनवारी करून घरे पूर्ण केली, मात्र 'वर्ककोड जनरेट होत नाही या तांत्रिक कारणामागे प्रशासनाने हात झटकले आणि गरीब कुटुंबांची आर्थिक घुसमट सुरू झाली आहे.

या गंभीर प्रश्नावर खा. अमर काळे यांनी थेट दिल्ली गाठत केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांची भेट घेतली. तात्काळ दुसरा हप्ता वितरित करा, अन्यथा जनतेचा संताप उसळेल, असा इशाराच त्यांनी दिला आहे.वर्धा लोकसभा मतदारसंघातील वर्धा जिल्ह्यातील आठ तसेच अमरावती जिल्ह्यातील पाच तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर घरकुल मंजूर करण्यात आले होते. शासनाकडून पहिल्या हप्त्याचे वितरण झाल्यानंतर लाभार्थ्यांनी बांधकामास सुरुवात केली. निवाऱ्याची गरज लक्षात घेऊन अनेकांनी दुसऱ्या हप्त्याची प्रतीक्षा न करता उसनवारी व कर्ज काढून घरकुलांचे काम पूर्ण केले.मात्र तांत्रिक प्रक्रियेत वर्ककोड निर्माण न झाल्यामुळे दुसरा हप्ता वितरित होऊ शकला नाही. परिणामी लाभार्थ्यांवर आर्थिक ताण वाढला असून कर्जफेडीचा तगादा सुरू झाला आहे. प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार वर्धा जिल्ह्यात सुमारे ५०० तर अमरावती जिल्ह्यात ३३८७ लाभार्थ्यांना अद्याप दुसरा हप्ता मिळालेला नाही.या संदर्भात खासदारांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान केंद्रीय मंत्र्यांना सविस्तर निवेदन देत परिस्थितीची माहिती दिली.घरकुलधारकांची अडचण लक्षात घेता तांत्रिक त्रुटी दूर करून दुसऱ्या हप्त्याचे वितरण तात्काळ करण्याची विनंती करण्यात आली.यावर केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत संबंधित यंत्रणेला आवश्यक सूचना देऊन वर्ककोड जनरेट करण्याची प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचे तसेच लवकरच अनुदान वितरित करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती देण्यात आली.

# सरस्वती विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**समुद्रपूर/जनमाध्यम**



ग्राम गौरव शिक्षणसंस्था, हिंगणघाट संचालीत सरस्वती विद्यालय, पाईकमारी येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक चंद्रशेखर निमट होते. प्रमुख पाहुण्या म्हणून आरती हरणे, सांस्कृतिक मंत्री  चैताली थुटे तसेच राहुल बगडे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या स्वागताने झाली. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत शिस्त, परिश्रम व आत्मविश्वासाच्या बळावर यश संपादन करण्याचे मार्गदर्शन केले. यानंतर विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.शुभेच्छा भाषणात संजय दोंदल, गजानन साळवे, जगदीश नागरे व तुकाराम पंढरे यांनी आगामी परीक्षेसाठी सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचा सल्ला दिला. दहावीच्या विद्यार्थ्यांनी मनोगतात शाळेतील आठवणींना उजाळा देत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.प्रमुख पाहुण्या आरती हरणे यांनी जीवनातील आव्हानांना धैर्याने सामोरे जाण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वर्गशिक्षक टी. एस. पंढरे, रवींद्र बुटले व इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. दहावीच्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन एसएससी परीक्षेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

दरम्यान, इयत्ता नववीतील विद्यार्थिनी कु. चैताली थुटे हिची १५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या इस्रो अभ्यासदौऱ्यासाठी निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे संचालन कुमारी माही राहटे हिने तर आभार प्रदर्शन पूर्वा राऊत हिने केले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने कार्यक्रमाची सांगता भोजनाने झाली.

## आज प्रा.गणेश शिंदे यांचे व्याख्यान

# विविध क्षेत्रांतील कर्तबगारांचा सन्मानही

**वर्धा/जनमाध्यम**



द इव्हेंटस्,वैद्यकीय जनजागृती मंच आणि इंडियन रेड क्रॉस सोसायटी, वर्धाच्या संयुक्त विद्यमाने मागील सहा वर्षांपासून संत श्री गजानन महाराज प्रकटदिनानिमित्त कावव्य मैफल वा व्याख्यान तसेच सन्मान सोहळा आयोजित असतो. यावर्षी १५ फेब्रुवारीला सायंकाळी ६ वाजता समाजप्रबोधनात्मक काव्ययात्रेसह विविध क्षेत्रांतील कर्तबगार व्यक्तींचा सत्कार करण्यात येणार आहे. यंदा प्रसिद्ध वक्ते प्रा. गणेश शिंदे यांचे 'मुलांना मोठी स्वप्ने दाखवा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

याप्रसंगी पाणी फाउंडेशनद्वारा आयोजित 'फार्मर कप'मध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या गटांचा तसेच कुठल्याही प्रसिद्धीच्या मागे न लागता उत्कृष्ट समाजकार्य करणाऱ्या व्यक्ती व जिल्ह्यात उत्तम कार्य करणाऱ्या प्रशासकीय अधिकारी, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या व्यक्तींचा वर्धेकरांच्या भरगच्च उपस्थितीत सत्कार आयोजित करण्यात आला आहे.मागील ५ वर्षांत आनंद निधेकर व संच यांनी देशभक्तीपर गीत कार्यक्रम, शिव अभ्यासक सुमंत टेकाडे यांचे व्याख्यान, आशिष साबळे यांचे शास्त्रीय गायन, डॉ. सुशील गावंडे यांचे भ्रमणध्वनी वापर व त्याचे दुष्परिणामावरील अनुभवसंपन्न भाष्य, कविवर्य किशोर बळी यांच्या खुमासदार मैफलीची मेजवानी वर्धेकरांनी अनुभवली आहे. मागील वर्षी कविवर्य अनंत राऊत यांच्या काव्ययात्रेचे वर्धेकर रसिक सहप्रवासी झाले. या व्याख्यान आणि सन्मान सोहळ्यात वर्धेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने वैद्यकीय जनजागृती मंचाचे अध्यक्ष डॉ. सचिन पावडे यांनी केले आहे.

## युवतीची गळफास घेऊन आत्महत्या

**कारंजा (घाडगे)**-तालुक्यातील हेटीकुंडी येथील युवतीने गळफास घेऊन आत्महत्या केली. हेटीकुंडी येथील वैष्णवी करनाहके (वय २४) हिने राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली.
आई शेतातून घरी आल्यानंतर त्यांना वैष्णवीने गळफास घेतल्याचे दिसले. आत्महत्येचे कारण कळू शकले नाही. याप्रकरणी तक्रारीवरून कारंजा (घाडगे) पोलिसांनी नोंद केली. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

## तुरीची गंजी पेटविल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

**सेलू**-तालुक्याच्या कोलगाव शिवारात तुरीच्या पेट्या असलेली गंजी पेटविल्याप्रकरणी पोलिसांनी तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. सेलू येथील रहिवासी मयुर अनिल काळबांडे (२६) यांची कोलगाव शिवारात शेती असून त्या शेतात तुरीची लागवड केली होती. तूर पिकाची सवंगणी करून २४०० पेट्यांची गंजी शेतातच लावून ठेवली होती. दरम्यान ११ फेब्रुवारी रोजी रात्री ती गंजी पेटवून दिली. यात मयुर काळबांडे यांचे २ लाख ४० हजारांचे नुकसान झाले. याप्रकरणी काळबांडे यांनी सूल पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत वामन चौधरी, देवीदास राऊत, रुपेश चौधरी सर्व रा. कोलगाव यांची संशयित नावे देण्यात आली. त्यावरून पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# थाटेश्वरात दुमदुमणार 'बम-बम भोले'; १७ फेब्रुवारीला महाप्रसाद

**आजनसरा/जनमाध्यम**



आजनसरा-टाकळी निधा मार्गापासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या सावंगी रिठ येथील हेमाडपंथी थाटेश्वर महादेव मंदिर परिसरात महाशिवरात्री निमित्त भक्तिमय वातावरण रंगणार आहे. देवस्थान कमेटीच्या वतीने ११ ते १७ फेब्रुवारीदरम्यान लिंगपुराण पारायणाचे आयोजन करण्यात आले असून परिसर 'बम-बम भोले'च्या जयघोषाने दुमदुमणार आहे.

वर्धा-यशोदा नदीच्या संगम तीरावर वसलेले हे प्राचीन तीर्थक्षेत्र धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. येथे नुकतेच ४५ फूट उंच महादेव मंदिर उभारण्यात आले असून दोन्ही बाजूंना २५ फूट उंच विठ्ठल-रुक्मिणी व हनुमंत मंदिर डौलात उभे आहेत. काशीशिव पुराणात उल्लेख असलेल्या या स्थळाला सावंगी रिठ म्हणून ओळखले जाते.मंदिराच्या मागील बाजूस वर्धा व यशोदा नदीचा संगम असून येथील पंचधारेमुळे या स्थानाला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. पंचक्रोशीतून नागरिक येथे अस्थी विसर्जनासाठी येतात. संगमाच्या मध्यभागी असलेले हनुमंत मंदिर अनेक महापुरांतूनही अक्षत राहिल्याची श्रद्धा भाविकांमध्ये आहे. परिसरात वट, चिंच व निंब वृक्षांची दाट सावली असल्याने हे स्थळ निसर्गरम्य तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते.या तीर्थस्थळाकडे जाणारा मार्ग अद्याप पूर्णपणे सुकर नसला तरी भाविक पायदळ वारी करीत महादेवाच्या दर्शनासाठी येतात. दरवर्षीप्रमाणे यंदाही महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरणार असून १७ फेब्रुवारी रोजी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या धार्मिक सोहळ्यास जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन थाटेश्वर देवस्थान विश्वस्त मंडळाने केले आहे.

## मालवाहू वाहनांच्या अपघातात दोघे जखमी

**आष्टी**-मालवाहू वाहनांच्या अपघातात दोन जण जखमी झालेत. हा अपघात आष्टी येथे घडला.अमरावती जिल्ह्याच्या गाळेगाव येथील दिलीप सावतकर हे एम. एच. २३ - ५४४५ या क्रमांकाच्या वाहनातून जोलवाडी येथून कापूस घेऊन आष्टी येथे जात होते. वाहनात भूषण पांडे, अविनाश गोंधडे, अमोल भोरे रा. साहूर हे बसून होते.दरम्यान, आष्टी येथील होले नर्सरीसमीप मोर्शीकडे एम. एच. ०४ जी.सी. ६०३१ क्रमांकाच्या वाहनाने कापूस भरलेल्या वाहनाला जोरदार धडक दिली. यात भूषण पांडे आणि अविनाश गोंधडे या दोघांना दुखापत झाली. अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. याप्रकरणी तक्रारीवरुन आष्टी पोलिसांनी फिरोज खा सत्तार खा याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ८१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# श्रीराम हायस्कूल येथे विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**टाकरखेडा शंभू/ प्रतिनिधीः-** जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अमरावती (जिल्हाधिकारी कार्यालय) यांच्या वतीने 'शाळा सुरक्षा कृती' कार्यक्रमांतर्गत श्रीराम हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, टाकरखेडा शंभू येथे 'शाळा सुरक्षा कृती' व आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



या कार्यशाळेत मास्टर ट्रेनर आपदा मित्र कौस्तुभ वैद्य, सचिन धरमकर, आकाश निमकर व सुमित बांबल यांनी विद्यार्थ्यांना महापूर, रस्ते अपघात, आग, भूकंप आदी विविध प्रकारच्या आपत्तींबाबत सविस्तर माहिती दिली. आपत्तीच्या वेळी स्वतःची काळजी कशी घ्यावी, सुरक्षितता उपाययोजना कशा कराव्यात तसेच योग्य प्रकारे व्यवस्थापन कसे करावे याबाबत मार्गदर्शन करत प्रात्यक्षिके व सादरीकरणही करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षिका सविता बेलसरे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य उमेश सोलव व शैलेश डहाके उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रशांत मालवे यांनी केले.

या कार्यशाळेला शिक्षक सुनील प्रांजळे, संतोष देशमुख, संगीता लोहेकर, रीता धनैया, अतुल घुरडे, शिक्षकेतर कर्मचारी दीपक हंबर्डे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुकडेबंदी कायद्यातील सुधारणेचा लाभ घ्या
## अमरावतीत 'जनसंवाद' कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र शासनाने तुकडेबंदी अधिनियमात ऐतिहासिक सुधारणा करून 'सुधारणा कायदा २०२५' मंजूर केला आहे. या कायद्यांतर्गत प्रलंबित प्रकरणांचे निराकरण करण्यासाठी आणि सर्वसामान्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी नोंदणी व मुद्रांक विभागाच्या वतीने अमरावतीत विशेष 'जनसंवाद/जनता दरबार' आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुद्रांक जिल्हाधिकारी अनिल औतकर यांनी उपस्थित नागरिकांना सविस्तर मार्गदर्शन करून शासनाच्या या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अमरावती शहराचे प्रथम नागरिक तथा महापौर श्रीचंदजी तेजवानी यांनी भूषविले. यावेळी आयोजकांच्या वतीने महापौर तेजवानी यांचा विशेष सत्कार करण्यात आला.



आपल्या भाषणात महापौरांनी शासनाच्या या लोककल्याणकारी उपक्रमाचे कौतुक केले आणि नागरिकांनी आपल्या मालमत्तेचे दस्तऐवज नियमाधीन करून घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात उपजिल्हाधिकारी (महसूल) विवेक जाधव यांनी या अधिसूचनेची पार्श्वभूमी स्पष्ट केली. १५ नोव्हेंबर १९६५ ते १५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत प्रमाणीभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे जे व्यवहार (तुकडेबंदी) झाले होते, ते आता ठराविक नियमांच्या अधीन राहून नियमित करता येणार आहेत. सर्वसामान्यांची अडवणूक थांबावी आणि जमिनीचे व्यवहार पारदर्शक व्हावेत, हाच या सुधारणा कायद्याचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

जनता दरबारामध्ये उपस्थित नागरिकांनी आपल्या विविध समस्या मांडल्या. यात प्रामुख्याने अनंत हरणे, लक्ष्मीनारायण शर्मा, ॲड. रिझवानोद्दीन, निलेश वडे, अशरफ पटेल, मनोरमा सर्वटकर आणि नितीन मिराणी यांनी तुकडेबंदी आणि नोंदणी प्रक्रियेबाबत शंका उपस्थित केल्या. मुद्रांक जिल्हाधिकारी अनिल औतकर यांनी प्रत्येक प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देऊन तांत्रिक अडचणी कशा सोडवायच्या, याचे थेट मार्गदर्शन केले. या प्रसंगी मंचावर उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, तहसीलदार विजय लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच कार्यक्रमाला विजय येवले, अमोल गुल्हाने, संजयआप्पा मुंजाळे, निखिल गावंडे, विनोद साऊरकर यांच्यासह अनेक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सारिका भेंडे यांनी केले, तर आभारप्रदर्शन सह दुय्यम निबंधक तथा विवाह अधिकारी सुनील वाडेवाले यांनी केले.

# ऑनलाइन ई लिलावाच्या नावावर पाच लाखाने फसवणुक

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील अलबरार ट्रेडिंग कंपनीच्या संचालकाला स्क्रॅप लिलावाच्या विक्रीची अट न सांगता ऑनलाइन ई लिलावाच्या नावावर ५ लाखांनी गंडविण्यात आल्याची घटना समोर आली आहे. संचालकाने या संदर्भात सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांनी गुजरात आणि तेलंगानाच्या दोन ठगबाजाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार अलबरार ट्रेडिंग कंपनीचे संचालक फिरोज खान मंजूर खान (वय ४५, हबीब नगर) यांना अहमदाबादच्या प्रोक्योर टायगर प्रा. लिमिटेडचे मॅनेजर आशिष वर्मा आणि तेलंगणाच्या असिफाबाद येथील अनिल कुमार मांजेटी यांनी तेलंगणा जिल्ह्यातील सिरपूर कागज नगर नावाने स्क्रॅप लिलावाच्या अटी न सांगता ऑनलाइन लिलावमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले आणि सिरपूर पेपर मिल्स लिमिटेड च्या नावावर बोगस कागदपत्र तयार करून पाच लाखांनी फसविण्यात आले. फिरोज खान यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन्ही आरोपीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करून तपासून केला आहे.

# न्यू कोल्हापुरी ढाब्यामध्ये भीषण आग
## -कंवरनगर मार्गावरील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक कंवर नगर मार्गावरील न्यू कोल्हापुरी ढाब्यामध्ये आज बुधवार ११ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली. अग्निशमन पथकाच्या वाहनाने घटनास्थळावर पोहोचवून आग आटोक्यात आणली पण तोपर्यंत २ लाखांचे नुकसान झाला होते. माहितीनुसार कवर नगर येथे नंदा मार्केट समोर न्यू कोल्हापुरी ढाबा आहे. या ढाब्यामध्ये बुधवारी सकाळी दहा वाजता धूर निघताना दिसताच अखिलेश विजय देशमुख यांनी तात्काळ अग्निशमन विभागाला माहिती दिली. माहिती मिळताच अग्निशमन पथकाचे वाहन तिथे पोहोचले. त्यांनी अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणली पण तोपर्यंत दुकानातील लाकडी व प्लास्टिकचे फर्निचर जळून दोन लाखाचे नुकसान झाले होते. सुदैवाने कुठलीही जीवित हानी झाली नाही. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. आगीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न करताना मोठी अडचण कर्मचाऱ्यांना आली. धुराचे प्रमाण जास्त असल्यामुळे कार्य करताना कर्मचाऱ्यांना येत असलेल्या अडचणीमुळे तात्काळ एक्झॉस्ट फॅन मागविण्यात आला. एक्झॉस्ट फॅनने धूराचे प्रमाण कमी करून अथक



प्रयत्नाने आग नियंत्रणात आणण्यात आली. अग्निशमन अधीक्षक अजय पंधरे, केंद्रप्रमुख प्रेमानंद सोनकांबळे यांच्या मार्गदर्शनात सागर टपके, फरहान अहमद ,सतीश वेताळकर, निखिल बाठे ,अमोल साळुंके ,श्याम भोपळे, निशांत राठोड, रोशन आलुडे यांनी कारवाईमध्ये सहभाग घेतला.

# प्रधानमंत्री आवास योजनेबाबत थेट तक्रार करा - महापौर

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री आवास योजने संदर्भात नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी किंवा तक्रारी असल्यास त्यांनी थेट संपर्क साधावा, असे आवाहन महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी केले आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. या योजनेची प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी व्हावी यासाठी अमरावती महानगरपालिका सातत्याने प्रयत्नशील असून लाभार्थ्यांना सुलभ सेवा देण्यावर भर देण्यात येत आहे. तथापि, अर्ज प्रक्रियेतील अडथळे, मंजुरीतील विलंब, बांधकामासंबंधी समस्या किंवा इतर कोणत्याही तक्रारी असल्यास नागरिकांनी विलंब न लावता थेट महापौरांशी संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. 'पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या योजनेचा लाभ वेळेत व योग्य पद्धतीने मिळावा, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. कोणत्याही प्रकारची गैरसोय सहन केली जाणार नाही,' असे ठाम मत व्यक्त करत महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी नागरिकांना पुढे येऊन तक्रारी नोंदविण्याचे आवाहन केले आहे. महानगरपालिका नागरिकांच्या तक्रारींचे तत्पर निवारण करून योजनेचा लाभ खऱ्या अर्थाने गरजूंपर्यंत पोहोचविण्यासाठी सज्ज असल्याचेही त्यांनी सांगितले.

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती
## -५० लाखांपर्यंत आर्थिक सहाय्य ; ४० विद्यार्थ्यांची निवड

### शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यातील अनुसूचित जमातीच्या गुणवंत विद्यार्थ्यांसाठी परदेशात उच्च शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध असून आदिवासी विकास विभागामार्फत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी आणि पीएचडी करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. या योजनेंतर्गत ४० पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांनी तत्काळ ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन आदिवासी विकास अपर आयुक्त आयुषी सिंह यांनी केले आहे.

शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष पुढीलप्रमाणे : उमेदवार व उमेदवाराचे आई, वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवाराच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे अद्यायावत (२०२६ मधील) क्यूएस वर्ल्ड रँकिंग २०० च्या आत असणे बंधनकारक आहे. विहीत निकषानुसार पात्र विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास क्यूएस वर्ल्ड रँकिंग २०० पासून पुढे चढत्या क्रमाने ३०० पर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.

या शिष्यवृत्तीमध्ये शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, निवास व भोजन खर्च, शैक्षणिक साहित्य व अनुषंगिक खर्च, विमान प्रवास खर्च, व्हीसा शुल्क, आरोग्य विमा तसेच इतर आवश्यक खर्चाचा समावेश करण्यात आला आहे. एका विद्यार्थ्यासाठी कमाल ५० लाख रुपयांपर्यंत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार असून, दरवर्षी एकूण ४० अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे.

उमेदवाराच्या पालकांचे, कुटुंबाचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (२०२५-२६ मधील) एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न ८ लाखांपेक्षा जास्त नसावे. विहीत निकषानुसार पात्र विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास कुटुंबाची उत्पन्न मर्यादा १० लाखापर्यंत शिथील केली जाईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी परदेशातील मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा शिक्षण संस्थेत पदवी, पदव्युत्तर पदवी किंवा संशोधन अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवलेला असणे आवश्यक आहे. तसेच परदेशात उच्च शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या TOEFL, IELTS किंवा तत्सम आंतरराष्ट्रीय प्रवेश परीक्षा उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे.

> राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात पीएचडी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी दरवर्षी शिष्यवृत्ती दिली जाते. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या परदेशातील उच्च शिक्षण घेण्याच्या स्वप्नांना बळ मिळते. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात ४० विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती योजनेंतर्गत निवड केली जाणार आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांनी तात्काळ ऑनलाईन अर्ज करावेत.
>
> **- आयुषी सिंह,** अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती

या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, अनुज्ञेय लाभ, निवड कार्यपद्धती, इत्यादी माहितीसाठी आदिवासी विभागाच्या https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी. इच्छुक उमेदवारांनी https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरावा व मुळ प्रमाणपत्रे, कागदपत्रे ऑनलाईन अर्जासोबत अपलोड करावीत. ऑनलाइन अर्जाव्यतिरिक्त इतर कोणत्याही पद्धतीने केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. शिष्यवृत्ती अर्जाबाबत अर्जदारांना सर्व माहिती, सूचना ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या ईमेलद्वारे देण्यात येईल, असे प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

# ग्रामीण पोलिस भरतीला उत्स्फूर्त प्रतिसाद
## -९४६ उमेदवारांची शारीरिक चाचणी,६५४ पात्र

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती ग्रामीण पोलिस दलाच्या भरती प्रक्रियेला शुक्रवारी १३ फेब्रुवारीला उत्साहात सुरुवात झाली. शारीरिक चाचणीसाठी १२०० उमेदवारांना पाचारण करण्यात आले होते. त्यापैकी ९९१ उमेदवार उपस्थित राहिले, तर २०९ जण गैरहजर होते.

उपस्थित उमेदवारांपैकी ९४६ जणांनी प्रत्यक्ष शारीरिक चाचणीत सहभाग घेतला. एका उमेदवाराने चाचणी दिली नाही. कठोर शारीरिक निकषांनुसार झालेल्या या परीक्षेत ६५४ उमेदवारांनी यश मिळवले, तर २९२ उमेदवारांना अपयशाचा सामना करावा लागला. दरम्यान, शारीरिक मापदंड तपासणीवेळी ४४ उमेदवार आवश्यक निकष पूर्ण करू शकले नाहीत आणि त्यांना अपात्र घोषित करण्यात आले. मात्र दस्तऐवज पडताळणी प्रक्रियेत एकाही उमेदवाराला अपात्र ठरविण्यात आले नसल्याची माहिती प्रशासनाने दिली. संपूर्ण भरती प्रक्रिया पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावी यासाठी पोलिस प्रशासनाने काटेकोर नियोजन केले होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली चाचणी प्रक्रिया सुरळीत पार पडली. यशस्वी उमेदवारांना पुढील टप्प्याबाबतची सूचना लवकरच देण्यात येणार असल्याचे कळते.

# मनपा सभागृहाच्या मध्यभागी बाबासाहेबांची प्रतिमा बसवा
## वंचित आघाडीचे मनपा आयुक्तांना निवेदन

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेच्या नवीन बांधण्यात आलेल्या विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सभागृहात ६ फेब्रुवारीला झालेल्या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला साधे हार सुद्धा घालण्यात आले नाही. बाबासाहेबांच्या प्रतिमेचा योग्य सन्मान करण्यात आला नाही. त्यामुळे सभागृहाच्या मध्यभागी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा लावण्यात यावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, मनपाच्या १७ व्या महापौर-उपमहापौर निवडणुकीच्या वेळी आयुक्त सौम्या शर्मा व संपूर्ण जबाबदार अधिकारी तसेच कर्मचारी यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉक्टर बाबासाहेब



आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्याचा विसर पडला? सभागृहाच्या एका कोपऱ्यामध्ये डॉक्टर आंबेडकरांची प्रतिमा प्रशासनाने का लावली? यामुळे प्रतिमेची अवहेलना होत आहे, म्हणून ही प्रतिमा सभागृहाच्या मध्यस्थानी लावण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी माजी नगरसेविका निर्मला बोरकर, राहुल मेश्राम, सुदाम बोरकर,प्रशांत शेंडे, पंकज ओगले, राजू सोनवणे, नितीन घरड आदि उपस्थित होते.

# तालुका स्तरावर बांधकाम कामगारांना होणार साहित्य वाटप

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदणीकृत जिवंत (सक्रिय) बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच, सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाचे वाटप दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी रेणुका बिहार, खसरा क्र. २९, एम. झेड. ढाबा, नांदगाव खंडेश्वर रोड, जि. अमरावती येथे सुरू करण्यात आले आहे. परंतु जिल्ह्यातील एकूण १४ तालुक्यांमधील कामगारांना या ठिकाणी येऊन गृहपयोगी संच, सुरक्षा संच व अत्यावश्यक संच घेऊन जाणे हे सुरक्षिततेच्या दृष्टीने सोयीचे नाही. वाटपाच्या ठिकाणी दररोज सुमारे ३ हजार कामगारांना संच वाटपासाठी ऑनलाईन अपॉइंटमेंट देण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणावर गर्दी व गोंधळ होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. यासाठी सक्रीय बांधकाम कामगारांना वितरीत करण्याच्या गृहपयोगी वस्तू, सुरक्षा व अत्यावश्यक संचाच्या वाटप तात्काळ बंद करण्यात येत आहे. याबाबत सर्व कामगारांना आपल्या स्तरावरून अवगत करण्यात यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केल आहे.

तसेच तालुका स्तरावर उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व पोलीस विभाग यांच्याशी समन्वय साधून योग्य ते नियोजन करुन साहित्य वाटपाची कार्यवाही सुरू करण्यात येईल. भविष्यात तालुका स्तरावर एका दिवशी जास्तीत जास्त ५०० बांधकाम कामगारांना साहित्य वाटप करण्यात यावे, तसेच कोणतेही वाटप सुरू करण्यापूर्वी या कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य राहील.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५६ नुसार बांधकाम कामगारांना वितरित करण्यात येणाऱ्या गृहपयोगी वस्तू संच, सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाचे वाटप करतांना कोणतीही जिवीत व वित्त हानी होणार नाही, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात याव्यात.

## सायटेशन/ जाहिरनामा
**विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत**

आर.एम.जे.सी.क. ८१/२०२६ ने.ता. १७/०३/२०२६

**अर्जदार - १) श्री. काशिनाथ झाव-याजी वानखडे,** वय-७२ वर्ष,व्यवसाय - शेती
**२) श्री. रामदास झावऱ्याजी वानखडे,** वय ६९ वर्ष, व्यवसाय - शेती
**३) श्री. हरिदास झावऱ्याजी वानखडे,** वय-६६ वर्ष, व्यवसाय - शेती सर्व रा.येवती, ता. मोर्शी, जि. अमरावती.
**४) शिव देई होतीलाल,** वय ४१ वर्ष, बंदा घरकाम (माहेरकडील नांव सोनी झावऱ्या वानखडे) रा. मुहम्मदपूर, आगरा, ता. जि. आगरा (उत्तरप्रदेश)
**५) सुमित्राबाई धनराज किर्तकार,** वय ४५ वर्ष,व्यवसाय - घरकाम रा.यावली (शहीद), ता.जि. अमरावती.

**// विरूध्द // कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोशी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २. बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदारांची **आई कौशल्याबाई झावऱ्याजी वानखडे** ही **दिनांक २४/११/२०१५** रोजी **Yevti, Tq.Morshi, Dist-Amravati** येथे मरण पावलेली आहे. तीचे मृत्युनंतर तीचे वारस है वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय, मोर्शी.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, मोर्शी**

## जाहीर सुचना

**सर्व भंगार (स्क्रेप) व्यवसायीक तसेच ईतर ईच्छूक व्यक्तींना या नोटीस द्वारे कळविण्यात येते की,**

कृषि उत्पन्न बाजार समिती, अंजनगाव समितीचे मुख्य बाजार आवार येथे विविध विकास कामे सुरु आहेत. त्यामध्ये समितीचे जुने शिकस्त झालेले काही बांधकाम पाडण्यात आलेली आहेत. त्या बांधकामातील गर्डर, लोहा, अँगल टिनपत्रे, लोखंडी शर्टर, लोखंडी कैच्या, लोखंडी कमान गेट, विटा, मलबा तसेच ईतर भंगार समिती मुख्य यार्ड मध्ये उपलब्ध आहे.

तसेच आज रोजी विविध विकास कामांचे बांधकाम करावयाचे असल्याने सदर जागेवर पुर्वीचे जुने बांधकाम (Dismantle) पाडायचे आहे. सदर जागेचे सपाटीकरण करावयाचे आहे. सदर दोन्ही कामात निघालेली माती (मलबा) व शिकस्त झालेले तत्सम साहित्य तसेच लोखंडी शिका व त्यामधील भंगार विक्री करणेबाबत समितीने ठरविले आहे.

मा.पणन संचालक, म.रा.पुणे यांनी दिलेल्या परवानगी नूसार तसेच नगर परीपद अंजनगांव सुजी यांनी दिलेल्या परवानगीच्या अधिन राहून बाजार समिती संचालक मंडळ यांनी बनविलेल्या अटी व शर्तीनुसार सदर कामकाज करावयाचे आहे. करीता वर नमूद काम करण्यासाठी ईच्छुक असलेल्या भंगार व्यवसायीक तसेच ईतर ईच्छुक व्यक्तींनी (विनापरतावा) रक्कम १,०००/- (अक्षरी एक हजार रुपये) फॉर्म फी भरणा करुन हर्रास बोली बोलण्याकारीता रक्कम २५,०००/- (अक्षरी पंचविस हजार रुपये) अनामत रक्कम (रोख, समिती खाते मध्ये भरणा पावती दर्शवून अथवा समितीच्या नावे डी.डी.द्वारे) कृषि उत्पन्न बाजार समितीचे कार्यालयीन वेळेत दिनांक १६/०२/२०२६ ते २५/०२/२०६ या कालावधीत भरणा करावा. सदर दोन्ही रक्कम प्राप्त झाले नंतरच होणाऱ्या खुल्या हर्रास मध्ये सहभाग घेण्यास पात्र राहता येईल.

**दिनांक २५/०२/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता सर्वांसमक्ष बाजार समिती कार्यालयात सदरची प्रक्रीया राबविण्यात येईल.**

करीता उत्सूक व्यक्तीनी वर नमूद दिवशी, वेळी तसेच स्थळी उपस्थित राहून खुले हर्रास मध्ये सहभागी होण्या करीता आवश्यक अटी व शर्ती समिती कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास उपलब्ध राहतील. सदर खुले हर्रास मधिल अटी व शर्ती अतीरीक्त वाढ करणे अथवा रद्द करण्याचे सर्व अधिकार बाजार समिती स्वताहा कडे राखून ठेवित आहे. तसेच काही कारणास्तव सदर प्रक्रीया रद्द करण्याचे अधिकार बाजार समितीला राहतील.

**टिप :- निविदा फॉर्म तसेच अधिक माहिती करीता संपर्क मो.नं. ८८ ०६ ०६ ८६ ८५**

**सभापती** **उपसभापती** **प्र. सचिव**
**तथा समस्त संचालक मंडळ, कृषि उत्पन्न बाजार समिती, अंजनगाव सुर्जी**

## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती
**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल / अर्ज क्रमांकः ९०६/२२/२०२५

सार्वजनिक न्यासाचे नाव नोंदणी कमांकः **श्री. समर्थ सदगुरू गजानन महाराज शिक्षण संस्था वरूड, ता. वरूड जि. अमरावती एफ-५१७६**

बाबत अर्जदार :- **श्री पुरूषोत्तम अभिमानजी श्रीराव**

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सहाय्यक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमूद केलेल्या फेरफार अहवाल / अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

**(१)** वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे का ? आणि सदरचा न्यासाचा सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?**(२)** खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाची मालकीची आहे काय ?

**(अ)** जंगम मिळकत (वर्णन) :- निरंक

**(ब)** स्थावर मिळकत (वर्णन):-१. कजबे वरूड भाग-१ मौजा नं.२६९ प्रगणे व नों पो. तु. व पं. स. व त. वरूड जि. पं. अमरावती न. पा. वरूड जि. अमरावती वरूड गावडाणा पासुन १ कि. मी. चे वर बाजारपेठ व स्टॅन्ड पासुन दिड कि.मी. चे वर असलेले भुमापन कमांक ४८४/३,० हेक्टर ८९ आर आ. रू. ३.५० भोगवट वर्ग १

(मौजे वरूड भाग १ तालुका वरूड जि. अमरावती येथील भुमापन कमांक व उपविभाग ४८४/३ भोगवट वर्ग-१ एकुण क्षेत्रफळ ० हेक्टर ८९.०० आर शेत ७/१२ प्रमाणे) चर्तुसिमा पुर्वेसः-नाला, पश्चिमेसः-आंडेवाले शेत, दक्षिणेसः निळकंठ आंडेचे शेत, उत्तरेसः नथ्थुजी कोसेंचे शेत

किंमत रू. २,०१००/- दोन लक्ष एक हजार फक्त

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफीयत विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे शिक्यानिशी आज दिनांक ०४/०२/२०२६ रोजी दिली.

**अधिक्षक न्याय शाखा**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अमरावती**

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १६०**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८

**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# जड वाहतुकीच्या प्रवेशबंद संदर्भात सकारात्मक तोडगा काढू-आ.संजय खोडके

## न्यू अमरावती जनरल गुड्स ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे निवेदन

**अमरावती/का.प्र.**

अमरावती शहरातील सक्करसाथ ट्रान्सपोर्ट लाईन मार्गावरील जड वाहतूक प्रवेश बंदी केल्याने ट्रान्सपोर्टधारकच नाही तर व्यापारी वर्गाला सुद्धा अडचणी निर्माण होणार आहे. याचा परिणाम जीवनावश्यक वस्तूंच्या वाहतुकीवर देखील होणार असून सर्वसामान्यांना सुद्धा याचा नाहक त्रास सहन करावा लागणार असल्याने, याबाबत पोलीस विभाग व सार्वजनीक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करून सकारात्मक तोडगा काढणार असल्याचा विश्वास राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे महासचिव (संघटन )आ.संजय खोडके यांनी व्यक्त केला.



अमरावती शहरातील चित्रा चौक पासून ते नागपुरी गेट पर्यंतच्या मार्गावर जड वाहनास प्रवेश बंद करण्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने सूचना केली असता अमरावती शहर पोलीस वाहतूक शाखेच्या वतीने १५ फेब्रुवारी २०२६ पासून या मार्गावर जड वाहतूकीस प्रवेश बंद करण्यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. या आदेशाने सक्करसाथ ट्रान्सपोर्ट लाईन येथील जीवनावश्यक वस्तूंची वाहतुकीस प्रचंड अडथळा उध्दभवणार असल्याने वाहतुकीसंदर्भात काही उपाययोजना व पर्यायी वाहतूक व्यवस्था होण्याच्या दृष्टीने १४ फेब्रुवारी रोजी न्यु अमरावती जनरल गुड्स ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या शिष्टमंडळाने आ.संजय खोडके यांच्याशी चर्चा केली. या संदर्भात सक्करसाथ ट्रान्सपोर्ट लाईनमधील वाहतूकदारांनी आमदार महोदयांना अवगत केले कि,चित्रा चौक ते नागपुरी गेट मार्गावर अमरावती येथून आजूबाजूच्या ग्रामीण भागात जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करावी लागते.या संदर्भात सर्व ट्रान्सपोर्टच्या जड वाहनास रात्री ९ ते सकाळपर्यंत वलगांव रोड -नागपुरी गेट पासून ट्रान्सपोर्ट गल्लीतुन जड वाहतूकिस परवानगी देण्यात यावी, तसेच सकाळी लोहबाजार ते जवाहर गेट पासून जड वाहनांना जाण्याची परवानगी देण्यात यावी. जेणेकरून जीवनावश्यक वस्तू ने - आण करणे सोपे होईल, असे पर्याय सुद्धा सुविण्यात आल्याने याबाबत पोलीस विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागासोबत संवाद व समन्वय निर्माण करून सकारात्मक तोडगा काढण्यासंदर्भात आ.संजय खोडके यांनी वाहतूकदारांना आश्वस्त केले. निवेदन देतेवेळी न्यु अमरावती जनरल गुड्स ट्रान्सपोर्ट असोसिएशन सक्करसाथ ट्रान्सपोर्ट लाईनचे मोहम्मद अजीमउल्ला, मोहम्मद इस्माईल अब्दुल करीम राराणी, मो.सलीम मोहम्मद हारून लायकारिया, अब्दुल सलीम हाजी मोहम्मद, सलीम शाह नासिर शाह, इमरान काजी, जमील अन्वर, शाहिद वसीम शेख जमील शेख जब्बार, आदींसह अमरावती गुड्स ट्रान्सपोर्ट असोशिएशन, विदर्भ चालक मालक संघर्ष समिती, न्यु अमरावती जनरल गुड्स ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे पदाधिकारी व वाहतुकदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महावितरण अचलपूर विभागाची जनजागृती रॅली



**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

ग्राहकांमध्ये नियमित वीज देयक भरणा, घराच्या छतावर सौर संच (रूफटॉप सोलर) स्थापना करून वीज बिल कमी करणे, दिवसा वीज वापरासाठी मिळणारी सवलत, स्मार्ट मीटरचे फायदे, वीज चोरी प्रतिबंध व सुरक्षित वीज वापर याबाबत जनजागृती करण्यासाठी महावितरण अचलपुर विभागाच्या वतीने परतवाडा–अचलपुर या जुळ्या शहरांत पायी रॅलीचे आयोजन करण्यात आले.

शहरातील विविध मार्गावरून काढण्यात आलेल्या या रॅलीदरम्यान संपूर्ण परिसर पिंजून काढण्यात आला. महावितरणचे तांत्रिक, मानव संसाधन, लेखा, देयक व महसूल विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्वांनी गणवेश परिधान करून अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने, वाहतुकीस कोणताही अडथळा न आणता रॅली मार्गक्रमण केल्याने नागरिकांचे लक्ष वेधले गेले.शहरातील विविध चौकांत थांबून अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ग्राहकांना महावितरणच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. विशेष म्हणजे या रॅलीत महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती लक्षणीय होती. एकूण ३८० अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.सदर रॅलीचे आयोजन अशोक साळुंके, मुख्य अभियंता, अमरावती परिमंडळ यांच्या संकल्पनेतून करण्यात आले.

दीपक देवहाते, अधीक्षक अभियंता, अमरावती मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदीप अंधारे, कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय अचलपुर यांच्या नेतृत्वात रॅली यशस्वीरीत्या पार पडली.रॅलीत प्रशांत फुटाणे, उमेश राठोड, नीलेश बोरीकर, संजय दातीर, नीलिमा गावंडे, राजेश तिवारी, विशाल पसारकर, वंदना भलावी यांच्यासह बहुसंख्य अभियंते, अधिकारी, कर्मचारी, उपकेंद्र सहाय्यक व तांत्रिक कर्मचारी सहभागी झाले होते.

# विद्यापीठाच्यावतीने चिखली येथे शेतकरी प्रबोधन कार्यशाळेचे शुक्रवारी आयोजन

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्र व श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीव्दारा संचालित श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली, जि. बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहामध्ये दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता शेतकरी प्रबोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.



कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते होणार असून समारंभाचे अध्यक्षस्थान श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख हे भूषविणार आहेत. प्रमुख अतिथी व सत्कारमूर्ती म्हणून बुलडाणाचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बुलडाणाचसंतोष डाबरे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र, बुलडाणाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अमोल झापे उपस्थित राहणार आहेत.कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात 'शेतमाल प्रक्रिया उद्योग : संधी - व्याप्ती' या विषयावर डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र, बुलडाणाच्या विशेषज्ञ कृतिका गांगडे मार्गदर्शन करतील. दुपारच्या सत्रात 'अन्न सुरक्षा, गुणवत्ता मानके व परवाने' या विषयावर बुलडाणाचे अन्न व प्रशासन सहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील, तिस-या सत्रात 'प्रक्रिया उद्योगासाठी शासकीय योजना व आर्थिक सहाय्य मार्गदर्शन' या विषयावर जिल्हा विकास प्रबंधक, नाबार्ड, बुलडाणाचे श्री रोहित गाडे, कृषी उपसंचालक, आत्मा, जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालय, बुलडाणाचेबाळासाहेब व्यवहारे, जिल्हा उद्योग केंद्र बुलडाणाचे महाव्यवस्थापक पी.एम. लांडे, कृषी उपसंचालक जिल्हा कृषी अधीक्षक, कार्यालय, बुलडाणाच्या श्रीमती संजीवनी कणखर, जिल्हा अग्रणी बँक, बुलडाणाचे व्यवस्थापक कौशैलेन्द्रसिंग, स्टेक बँक ऑफ इंडिया, चिखलीचे निलंजन हलधर हे मार्गदर्शन करतील.

### विश्व रेडिओ दिनानिमित्त आकाशवाणी येथे कार्यक्रम

# अखिल भारतीय श्रोता महासंघाच्या पुढाकार

**अमरावती/का.प्र.**

विश्व रेडिओ दिनाच्या निमित्ताने अखिल भारतीय श्रोता महासंघ, अमरावती यांच्या वतीने आकाशवाणी अमरावती येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. रेडिओच्या ऐतिहासिक वाटचालीपासून ते आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातील भविष्यातील भूमिकेपर्यंत विविध पैलूंवर या कार्यक्रमात सखोल विचारमंथन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आकाशवाणी अमरावतीचे कार्यक्रम प्रमुख भैय्यालाल टेकाम होते. तर कार्यक्रम विभागाकडून कार्यक्रम अधिकारी आशिष गावंडे तथा अभियांत्रिकी विभागाचे प्रतिनिधी म्हणून वरिष्ठ तंत्रज्ञ नितीन दातीर उपस्थित होते.तत्पूर्वी अखिल भारतीय श्रोता महासंघाचे श्रोते व प्रतिनिधी संजय वाघुळे, वि. दा. पवार, शहा कय्युम शहा, उमेश सेवक आदींनापुष्पगुच्छ देऊन आकाशवाणीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे स्वागत केले.कार्यक्रम अधिकारी आशिष गावंडे यांनी येणाऱ्या काळात प्रत्येकाकडे वेळ कमी असणार आहे. अशा वेळी रेडिओ हे एकमेव असे माध्यम आहे जे ज्ञान, माहिती आणि मनोरंजन एकत्र देत असताना इतर कामे करतानाही ऐकता येते. सध्या रेडिओ इंटरनेट व ॲपच्या माध्यमातून जगात कुठेही ऐकता येतो. मात्र येणाऱ्या काळात इंटरनेटशिवायही साध्या मोबाइलवर, कुठेही रेडिओ ऐकता येईल, अशी शक्यता आहे. रेडिओमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) चा वापर वाढत असून त्यामुळे रेडिओ अधिक आधुनिक स्वरूप धारण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केले.

तर खाजगी एफएम चॅनेल्सच्या स्पर्धेतही समाजातील सर्व घटकांच्या गरजा पूर्ण करणारा दर्जेदार, संतुलित व मूल्याधिष्ठित कंटेंट देण्याची परंपरा आकाशवाणीने कधीही सोडलेली नाही.समाजाकडून कार्यक्रम देण्याची परंपरा आजही आकाशवाणीने जपली आहे. त्यामुळे 'आकाशवाणी म्हणजेच रेडिओ' ही ओळख अधिक दृढ होत असल्याचे श्रोते वि. दा. पवार यांनी नमूद केले.आकाशवाणी अमरावतीने श्रोत्यांच्या मागणीनुसार प्रसारण वेळ दोन तासांवरून चार तासांपर्यंत वाढविला असून, नव्या दर्जेदार कार्यक्रमांची सुरुवात करण्यात आली आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आकाश अटालकर व जीवन माहोरे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्घोषिका सरिता देशमुख यांनी तर आभार उद्घोषिका स्नेहल ठाकरे यांनी मानले.उत्साहपूर्ण, सकारात्मक व प्रसन्न वातावरणात या कार्यक्रमाची सागता झाली . यानिमित्ताने आकाशवाणीचे अधिकारी, कर्मचारी व श्रोते यांच्यात सुसंवाद घडून आला.

# अतुल जगताप विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ



**चांदुर रेल्वे** - येथील अतुल जगताप विद्यालयात दहावी विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक प्रदीप तळोकार होते तर प्रमुख अतिथी म्हणून राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालयाचे प्रा. सुरेंद्र वाणी व ज्येष्ठ शिक्षक काकडे, धोटे, प्रताप बोदिले व मेश्राम आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी शाहूराज वानरे, लावण्य शिदोळकर, गौरी राऊत, समीक्षा बावने, श्रुतिका परतेती, वैष्णवी सोळंके,विशाखा उके यांनी मनोगत व्यक्त केले. शिक्षक हरिदास धोटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणातून मुख्याध्यापक तळोकार यांनी विद्यार्थ्यांना येणाऱ्या प्रत्येक परीक्षेला कठोर परिश्रम करून समोर यश तुमच्या पदरी पडेल असे सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सुरेंद्र वाणी यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रताप बोदिले सर यांनी केले. तर संचालन चेतन मस्के व परिणीती भोंडे व आभार काकडे यांनी मानले. कार्यक्रमाला आठवी, नववी,दहावी च्या विद्यार्थ्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# न.प.च्या नव्या बांधकाम सभापतींसमोर प्रलंबित विकासकामांचे आव्हान

**अचलपूर/वार्ताहर**

अमरावती जिल्ह्यातील 'अ' वर्ग दर्जा असलेल्या अचलपूर नगर परिषदमध्ये गेल्या चार वर्षांच्या प्रशासक कालावधीत अचलपूर–परतवाडा जुळ्या शहरातील अनेक विकासकामे प्रलंबित राहिली आहेत. या सर्व कामांना गती देण्याचे मोठे आव्हान नवनिर्वाचित बांधकाम सभापती दिपाली जवंजाळ यांच्या समोर उभे ठाकले आहे.



महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत प्रकल्प १ व २ साठी मंजूर निधीतून परतवाडा शहरात सिमेंट कॉंक्रीट रस्त्यांची कामे झाली असली,तरी अचलपूर शहरातील मुख्य रस्त्यांची दुरवस्था कायम आहे. देवडी, चावलमंडी, माळवेशपुरा येथील मुख्य रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण, प्रलंबित सौंदर्यीकरणाची कामे, बांधकाम परवानग्यांची रखडलेली प्रकरणे, जलतरण केंद्र व ओपन जिमचा अपुरा वापर, तसेच प्रस्तावित नगर परिषद इमारतीचे काम याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.जुळ्या शहरात वाढते अतिक्रमण हीदेखील गंभीर समस्या बनली असून स्वतंत्र अतिक्रमण निर्मूलन पथकाची मागणी होत आहे. बांधकाम विभागाकडून तक्रारींवर केवळ आश्वासने मिळत असल्याची नाराजी नागरिकांतून व्यक्त होत आहे.२० प्रभाग असलेल्या जुळ्या शहरात रस्ते, नाल्या व मूलभूत सुविधांबाबत मोठ्या प्रमाणावर अपेक्षा व्यक्त होत आहेत. प्रहार पक्षाच्या दिपाली जवंजाळ यांना माजी नगरसेवक महेंद्र जवंजाळ यांचा अनुभव लाभणार असल्याने प्रलंबित विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

# कोंडेश्वर मार्गाचे नुतनीकरण, करणार कोण?

## तिर्थक्षेत्र विकास निधीत मार्गाचा उल्लेख

**अंजनगाव बारी/वार्ताहर**



गेल्या काही वर्षापासुन नुतनीकरणाच्या प्रतिक्षेत असलेला अंजनगाव बारी- कोंडेश्वर मार्ग आता पूर्णतः निकामी झाला आहे. श्री क्षेत्र कोंडेश्वर संस्थानच्या विकास कार्याकरीता शासणामार्फत २५ कोटी रुपये निधी उपलब्ध झाला असून, यामधुन होणाऱ्या विकास कामांमध्ये अंजनगाव बारी- कोंडेवर मार्गाचे नुतणीकरण व डांबरीकरण' असा उल्लेख असतांना, या कामाला विलंब होत असल्याने. मानवरानी जि.प. बांधकाम विभागाकडुन १ कोटी रुपये निधी मंजुरात करून, या मार्गाचे नुकतेच (दि.५ ) भूमिपुजन केले. तेंव्हा ह्या मार्गाचे नुतणीकरण करणार कोण. असा संभ्रम नागरीकांमध्ये निर्माण झाला आहे.२१ ऑगस्ट २०१८ ला झालेल्या शिखर परिषदेत तत्कालीन मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस व पालकमंत्री प्रविण पोटे यांचे उपस्थितीत तिर्थक्षेत्र विकास निधी अंतर्गत २५ कोटी रु. निधी कोंडेश्वर संस्थानचे विकास कार्याकरिता मंजुर करण्यात आला. येथुन एक वर्षानंतर हा निधी उपलब्ध होऊन विकास कामांना सुरुवात झाली. जी अद्यापही सुरुच असल्याचे निदर्शनास येत आहे. मात्र अंजनगाव बारी-कोंडेश्वर भागाचे नुतनीकरण व डांबरीकरण जे महाशिवरात्री आधीच व्हायला पाहीजे होते, ते मात्र अद्यापही झाले नाही.या मार्गाने चालताना एक पाऊल ठेवल्यानंतर दुसरे पाऊल ठेवतांना दक्षता बाळगावी लागते. तेंव्हा महाशिवरात्रीचे दिवशी शेकडो यात्रेकरू कशी ये-जा करणार ही एक समस्याच आहे. तरीही पुढल्या वाहने महाशिवरात्री पर्यंत हि समस्या मिटणार अशी भाविक-भक्तांना आशा आहे.

## संक्षिप्त



### तनसुखदास राठी विद्यालयातील निरोप समारंभ

**तिवसा-**तनसुखदास राठी विद्यालय वऱ्हा येथे १० वी च्या विद्यार्थ्यांकरिता निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय पाचंगे होते. प्रमुख मार्गदर्शक ज्येष्ठ शिक्षक मंगेश भालेराव तसेच प्रमुख अतिथी म्हणून निवृत्ती सातपुते, गंगोत्री गंगन व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापुजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुरेंद्र गणोरकर यांनी केले.तर शेजल बद्रे, पूर्वा देवळे,इशिता किरणापुरे, प्राची माळोदे यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून विद्यालयातील आठवणीला उजाळा दिला.वंशिका मलवार हिने,काजल कोल्हे,श्रावणी मातकर यांनी भाषणे दिली. मुख्याध्यापक संजय पाचंगे यांनी सर्व विद्यार्थ्यांना दहावी बोर्ड परीक्षे करिता शुभेच्छा प्रदान केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इशिका तालन, प्राची माळोदे हिने केले. व आभार प्रदर्शन खुशी भगोले हिने केले.कार्यक्रमाचे मुख्य आयोजन सुरेंद्र गणोरकर व स्वाती मथुरकर यांनी केले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इयत्ता ९ वी च्या सर्व विद्यार्थ्यांनी तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद,शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.



### विद्यार्थिनींची नेट बॉल राष्ट्रीय स्तरावर निवड

**अंजनगाव बारी-**सेंट थॉमस प्रशासकीय महाविद्यालय अमरावती येथील विद्यार्थिनीची नेट बॉल करिता राष्ट्रीय स्तरावर निवड झाली. त्यामध्ये सोनल चव्हाण, वैष्णवी वानखडे, हनी देशमुख, बरखा दुर्वे, कणक यादव, गौरी चुडे, भाग्यश्री येलने, शर्वरी मनवरे, नम्रता सावरकर, लता आठवले इत्यादी विद्यार्थिनीचा समावेश आहे.आता या विद्यार्थिनींना राष्ट्रीय स्तरावर आंध्र प्रदेश मधील कृष्णा यूनिवर्सिटी मध्ये नेट बॉल साठी खेळायला गेलेल्या आहेत. सेंट थॉमस प्रशासकीय महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सिकंदर मनवरे, महाविद्यालयाच्या प्राचार्य संजीवनी मनवरे, प्रा. शांता गाडगे, प्रा. सुमेध गावंडे, प्रा. कल्पना राऊत, प्रा. शिल्पा गजभिये, प्रा. निलेश डोंगरे, तसेच आकाश मेश्राम, पंकज गजभिये, बालू सोळंके यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. तसेच क्रीडा शिक्षक प्रा. स्वप्निल ईखार, नेट बॉलचे कोच व मार्गदर्शक प्रा. नितीन जाधव यांनी विद्यार्थ्यांसाठी खूप मेहनत घेतली. विद्यार्थिनीवर पुढील यशासाठी सर्वत्र शुभेच्छा कौतुकाचा वर्षाव होत आहे.



### दिव्यांग सोशल फाउंडेशन शाखेचे उद्घाटन

**अमरावती-**दिव्यांग बांधवांना केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी दिव्यांग सोशल फाउंडेशनच्या अमरावती शाखेचे उद्घाटन संस्थापक अध्यक्ष डॉ. विशाल कोरडे यांच्या हस्ते डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालयात उत्साहात पार पडले.या शाखेमार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, वाचक-लेखनिक बँक, शासकीय योजनांची माहिती, आरोग्य तपासणी व रोजगार मार्गदर्शन आदी सुविधा दिल्या जाणार आहेत. जिल्हा समन्वयकपदी समाजसेवक ॲड. प्रभाकर वानखडे यांची निवड करण्यात आल्याची माहिती डॉ. कोरडे यांनी दिली.कार्यक्रमास वर्षा वऱ्हाडे अध्यक्षस्थानी होत्या. प्रमुख अतिथी म्हणून नवनाथ इंगोले, अजय भोजने, ॲड. नंदेश अंबाडकर, फ्ला. ले. रत्नाकर चरडे, वनिता फरकाडे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक व आभार प्राची काळे यांनी मानले.संस्थेच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी दिव्यांग बांधवांनी ९८६०२५१३६८ या क्रमांकावर नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले.

### विद्यापीठाच्या लेखी परीक्षांच्या वेळापत्रकात बदल

**अमरावती-**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी - २०२५ लेखी परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. सदर वेळापत्रकातील काही परीक्षांच्या वेळापत्रकात दुरुस्ती/सुधारित/नवीन वेळापत्रक जाहिर करण्यात आले असून विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून कळविण्यात येत आहे. ज्या परीक्षांच्या वेळापत्रकांमध्ये बदल करण्यात आले आहेत, त्यामध्ये बी.ई. (एम.ई.) सेमि-५ (सी.बी.सी.एस.), बी.कॉम. सेमि-१ (एन.ई.पी.), बी.एस्सी. सेमि-३ (एन.ई.पी.), बी.ए. सेमि-३ (एन.ई.पी.) आणि बी.एस्सी. सेमि-३ (एन.ई.पी.) या परीक्षांचा समावेश आहे.यासंदर्भात सर्व प्राचार्य, केंद्राधिकारी, संबंधित महाविद्यालये, परीक्षा केंद्र यांना पत्राव्दारे परीक्षा विभागाकडून कळविण्यात आले असून, संबंधितांनी याची सर्व विद्यार्थ्यांना माहिती करुन द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या वेबसाईटवर परीक्षा विभागाच्या अधिका-यांच्या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.



### निर्मला कडव यांचे निधन

**तळेगाव ठाकूर -** येथील रहिवासी निर्मला मधुकर कडव (वय ७५) यांचे आज १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# भरधाव बोलेरोची दुचाकीला धडक, शिक्षकाचा दुर्दैवी अंत

**नवसारीतील घटना, नागरिकांमध्ये रोष**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील नवसारी टी-पॉईंट परिसरात शनिवारी पहाटे साडेपाच ते सहा वाजताच्या सुमारास गोवंशांची वाहतुक करणा-या भरधाव बोलेरो वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने एका शिक्षकाचा जागीच मृत्यू झाला. अब्दुल साजिद अब्दुल मजीद (वय ४६, रा. चपराशीपुरा) असे मृत शिक्षकाचे नाव आहे.



अब्दुल साजिद अब्दुल मजीद हे अंजनगाव सुर्जी येथील जिल्हा परिषद शाळेत कार्यरत होते. दररोजप्रमाणे ते शनिवारी पहाटे दुचाकीवरून शाळेकडे निघाले होते. नवसारी टी-पॉईंटवर पोहोचताच वेगात येणाऱ्या बोलेरोने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी जबर होती की ते रस्त्यावर कोसळले आणि गंभीर



जखमी झाले. त्यानंतर त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या अपघातानंतर बोलेरो वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जाऊन धडकले. त्यामुळे वाहनाचे मोठे नुकसान झाले. स्थानिकांच्या मते, संबंधित वाहनातून गोवंशाची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याची चर्चा आहे. याबाबत पोलिस तपास सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर पोलीस ठाणे येथील ☞(पान २ वर)

# राष्ट्रीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेत अकोल्याचा रवींद्र पाडवी देशात अव्वल

## अकोल्याच्या शिरपेचात आणखीन एक मानाचा तुरा

**बंगळूरू/अकोलाः** स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया, स्कूल एज्युकेशन डिपार्टमेंट (प्री-युनिव्हर्सिटी) बंगळूरू व बंगळूरू नॉर्थ डिस्ट्रिक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ६९ व्या राष्ट्रीय शालेय बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत अकोल्याच्या क्रीडा प्रबोधिनीचा रवींद्र पाडवी याने देशात प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदकाची कमाई केली. ही स्पर्धा दि. ४ ते ९ फेब्रुवारीदरम्यान बंगळूर येथे उत्साहात पार पडली.

देशभरातील अव्वल खेळाडूंच्या उपस्थितीत झालेल्या या स्पर्धेत ४९ ते ५२ किलो वजनगटात रवींद्रने दमदार आणि तांत्रिक खेळाचे प्रदर्शन करत




प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवले. अंतिम सामन्यातील त्याची आक्रमक रणनीती, जलद पायांची हालचाल आणि अचूक पंच यामुळे त्याने सुवर्णपदकावर नाव कोरले.

रवींद्र पाडवी हा यापूर्वी आंतरराष्ट्रीय स्पर्धेपूर्व प्रशिक्षण शिबिरात सहभागी झाला असून त्याच्या सातत्यपूर्ण सराव व जिद्दीचे फळ या यशातून मिळाले आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी अकोला तसेच आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग ☞(पान २ वर)

# चाकूचा धाक दाखवून ४० तोळयाचे सोने लुटले

## पोलिसांची शहरात नाकाबंदी, - बालाजी नगर ते कठोरा रोड परिसरातील घटना



**यापूर्वीचा असाच गुन्हा पोलिसांनी केला उघड**

याच हद्दीत २०२४ मध्ये सराफा व्यावसायिक अरविंद जावरे आणि उत्तम जावरे यांना मारहाण करून एक किलो चांदी लंपास करण्यात आली होती. त्या वेळी पोलिसांनी आरोपींना अटक केली होती. सद्यस्थितीतील घटना तशाच पद्धतीने घडल्याने तपास यंत्रणेसमोर पुन्हा एकदा आव्हान उभे राहिले आहे. शहरातील व्यापाऱ्यांनी रात्रीच्या वेळी सुरक्षाव्यवस्था वाढवण्याची मागणी केली असून पोलिसांनी आरोपींना लवकरात लवकर अटक करण्याचे आश्वासन दिले आहे.


अमरावती/प्रतिनिधीः- चाकूचा धाक दाखवून एका सुवर्णकाराजवळील तब्बल ४० तोळ्याचे सोने आणि एक लाखांची रोख जबरीने लूटले. ही घटना शुक्रवारी रात्री १० वाजताच्या सुमारास बालाजी नगर ते कठोरा रोड परिसरात घडली. तीन अज्ञातांनी कारमधून येत मोपेडस्वार सुवर्णकाराला अडवले, आणि सुमारे ३८.४२ लाख रुपयांचा मुद्देमाल लुटून पसार झाले. घटनेनंतर व्यापारी वर्तुळात चिंतेचे वातावरण पसरले आहे. माहितीनुसार, सुशांत मनोहर शेरेकर (वय ४३, रा. बालाजी नगर) हे 'सुमित्रा ज्वेलरी आर्ट' या दागिन्यांच्या दुकानाचे मालक आहेत. १३ फेब्रुवारी रोजी ☞(पान २ वर)

# रेती वाहतुकीवर नियंत्रणाचा अभाव

## ट्रॅक्टर ट्रॉलींना मोकळे रान, वर्दळीच्या ठिकाणी अपघाताची शक्यता

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहर परिसरात सध्या रेती वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर-ट्रॉलींची संख्या लक्षणीय वाढली असून, त्यावर कोणतेही ठोस नियंत्रण नसल्याचे चित्र दिसुन येत आहे.

दिवसा व रात्री बेधडकपणे होणारी ही वाहतूक नागरिकांच्या सुरक्षेसाठी धोकादायक ठरत आहे. विशेषतः शहरातील वर्दळीचे चौक, शाळा परिसर आणि बाजारपेठ भागात या ट्रॉलींची मोठ्या वेगाने होणारी वाहतुक अपघातांना आमंत्रण देत



आहे. दर्यापूर, मुर्तीजापुर, अमरावती, अकोट, अकोला, अंजनगाव या मार्गाने रेती वाहतूक करणारे ट्रॅक्टर सुसाट वेगाने धावत असून अपघाताची दाट शक्यता निर्माण झाली आहे. अनेक ट्रॅक्टर-ट्रॉलींवर क्षमतेपेक्षा अधिक रेती भरली जात आहे. काही वाहनांवर क्रमांक फलक नसणे, सिग्नल दिवे बंद किंवा सुरक्षा उपायांचा अभाव ही गंभीर बाब आहे. त्यामुळे दुचाकीस्वार, पादचारी आणि शालेय विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण होत आहे.

स्थानिक नागरिकांकडून वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे. रेती वाहतुकीसाठी निश्चित वेळ, मार्ग आणि कडक तपासणीची अंमलबजावणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत ☞(पान २ वर)

# भिंत अंगावर कोसळल्याने मजूर ठार

## -गणोजादेवी येथील दुर्दैवी घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** भातकुली पोलीस ठाणे हद्दीतील गणोजादेवी येथे भिंत अंगावर कोसळल्याने मजुराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. विष्णू लक्ष्मणराव सोळंके (वय ४७, रा. गणोजादेवी) असे मृत मजुराचे नाव आहे. याप्रकरणात १३ फेब्रुवारी रोजी भातकुली पोलिसांनी अमोल शिरोळे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.



माहितीनुसार, ३० जानेवारी रोजी गणोजादेवी येथे विष्णू सोळंके हे भिंत पाडण्याचे काम करत होते. त्यावेळी त्यांनी अमोल शिरोळे यांना संबंधित भिंत पाडू नये, ती आपोआप कोसळेल असे सांगितले होते. मात्र, तरीही अमोल शिरोळे यांनी भिंत पाडण्यास सांगितल्याचे तक्रारीत नमूद आहे. दरम्यान भिंत पाडताना ती अचानक विष्णू ☞(पान २ वर)

# वायगाव मार्गावर दुचाकीचा अपघात ; पती-पत्नी जखमी

## उपसरपंचाने दिली तत्काळ मदत

**अमरावती/प्रतिनिधीः-** वलगाव–वायगाव महामार्गावरील कृषी उत्पन्न बाजार परिसरात १४ फेब्रुवारी रोजी दुचाकी अपघातात पती-पत्नी गंभीर जखमी झाले. प्राथमिक माहितीनुसार, रस्त्यावर अचानक रोई प्राणी आडवे आल्यामुळे दुचाकीवरील ताबा सुटला आणि वाहन घसरून अपघात झाला.




एमएच २७ एएस ७०५८ या क्रमांकाच्या दुचाकीवरून रामेश्वर विश्वनाथ पांडे (रा. नेरपिंगळाई, सध्या मुक्काम रहाटगाव, अमरावती) पत्नीसमवेत प्रवास करत होते. अपघातानंतर मार्गावरून जात असलेले टाकरखेडा शंभू येथील उपसरपंच प्रदीप शेंडे यांनी प्रसंगावधान ☞(पान २ वर)

# हिंदुत्ववादी संघटनांचा व्हॅलेंटाईन डे ला विरोध

**ऑक्सीजन पार्कसह इतर ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त**

अमरावती/प्रतिनिधीः- व्हॅलेंटाईन डेला शहरात बजरंग दल, विश्व हिंदू परिषद व इतर हिंदुत्ववादी संघटनांनी विरोध दर्शविला आहे. यानिमित्य आज शनिवार १४ फेब्रुवारी रोजी ऑक्सीजन पार्क सह शहरातील इतर उद्यान आणि निर्जनस्थळी पोलिसांचा बंदोबस्त पाहायला मिळाला. व्हॅलेंटाईन डे हे पाश्चात्य संस्कृतीमध्ये साजरा करण्यात येते. या दिवशी पुलवामा हल्ला झाला होता म्हणून हा दिवस काळा दिवस असताना पाश्चात्य संस्कृतीचा प्रचार प्रसार होऊ नये अशी भूमिका हिंदुत्ववादी



संघटनांच्या कार्यकर्त्यांनी घेतली होती. शहरातील विविध उद्यान आणि निर्जनस्थळी बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी पाळत ठेवली होती. विशेष म्हणजे ऑक्सिजन पार्क परिसरात कार्यकर्ते मोठ्या संख्येने दाखल झाले. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी महिला सेलच्या ☞(पान २ वर)

# अल्पवयीनांची मोबाईल स्नॅचिंग टोळी ताब्यात, ९ मोबाईल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात रस्त्याने चालणाऱ्या नागरिकांच्या हातातील मोबाईल हिसकावून पळ काढणाऱ्या अल्पवयीन मुलांच्या टोळीचा पर्दाफाश करण्यात गाडगे नगर पोलीसांना यश आले आहे. पोलिसांच्या वेगवान कारवाईत आतापर्यंत ९ महागडे मोबाईल संच जप्त करण्यात आले असून, आणखी २० हून अधिक मोबाईल हस्तगत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



शुक्रवारी सायंकाळी अशोक कॉलनी परिसरात एका युवतीचा मोबाईल अज्ञाताने हिसकावून नेल्याची घटना घडली होती. तक्रार मिळताच पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे संशयितांचा माग काढला. अल्पावधीतच टोळीचा ठावठिकाणा लागला. पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाने सापळा रचत टोळीतील सदस्यांना ताब्यात घेतले. चौकशीत सर्व आरोपी अल्पवयीन असल्याचे निष्पन्न झाले. त्यांच्याकडून ९ मोबाईल जप्त करण्यात आले असून, शहरातील इतर भागांतही त्यांनी अशाच प्रकारे मोबाईल लुटल्याची ☞(पान २ वर)

# शारीरिक चाचणीत ८७३ उमेदवार उत्तीर्ण

## चौथ्या दिवशी दस्तऐवजांचीही तपासणी; प्रक्रिया पारदर्शक

अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती ग्रामीण पोलिसांतर्फे आयोजित पोलिस भरती प्रक्रियेअंतर्गत शनिवारी १४ फेब्रुवारी रोजी शारीरिक चाचणीसाठी १,५०० उमेदवारांना पाचारण करण्यात आले होते. नियोजित कार्यक्रमानुसार संपूर्ण परीक्षा शांततापूर्ण व सुव्यवस्थित वातावरणात पार पडली.

शनिवारी बोलावण्यात आलेल्या १,५०० उमेदवारांपैकी १,२२७ उमेदवार उपस्थित राहिले, तर २७३ उमेदवार अनुपस्थित होते. शारीरिक चाचणीसाठी १,१६७ उमेदवार पात्र ठरले. त्यापैकी २९४ उमेदवार अनुत्तीर्ण झाले. तसेच २९४ उमेदवार शारीरिक तपासणीत अपात्र ठरविण्यात आले. याशिवाय १ उमेदवार दस्तऐवज पडताळणीत अपात्र आढळला. ☞(पान २ वर)

# जमील कॉलनी चौकात लागणार ट्राफिक सिग्नल

**नागरिकांच्या मागणीवर पोलीस विभाग गंभीर**

**अमरावती/प्रतिनिधीः-** वलगांव मार्गावरील जमील कॉलनी चौकात दोन दिवसांपूर्वी झालेल्या अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी वाहतूक नियंत्रणासाठी येथे सिग्नल व्यवस्था करण्याची मागणी केली आहे. त्यानुसार डीसीपी रमेश धुमाळ हे परिसराचे निरीक्षण करणार असून आवश्यक दिशा निर्देश देणार आहेत. लवकरच येथे सिग्नल व्यवस्था केली जाण्याची शक्यता आहे. यामुळे येथे नेहमी नेहमी होणाऱ्या



अपघाता पासून नागरिकांना दिलासा मिळणार आहे. माहितीनुसार बुधवारी गिट्टीने भरलेल्या टिप्परने एका दुचाकी स्वार मिस्त्रीला चिरडले होते. यामुळे त्याचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी जबरदस्त आक्रोश व्यक्त केला आणि पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्याशी भेट करून वाहतूक नियंत्रण करण्याची ☞(पान २ वर)

# लासूरचे ऐतिहासिक आनंदेश्वर मंदिर, छत नसलेले पुरातन शिवालय


## महाशिवरात्रीची लगबग, विविध कार्यक्रमांचे आयोजन

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यात येणारे लासूर येथील स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना असणारे हेमाडपंथी शैलीचे आनंदेश्वर अर्थात महादेव मंदिर जो कोणी पाहिल तो थक्क होईल. अष्टकोनी आकाराच्या या मंदिरावर छत नाही. याठिकाणी

**लासूरसाठी बसफेऱ्या सुरू**

दर्यापूरपासून लासूर हे गाव पाच किमी असून अमरावतीवरून ५५ किमी आहे, तर अकोल्यावरून ५० किमी आहे. लासूर येथे जाण्यासाठी दर्यापूर ते अकोला बसफेऱ्या सुरू आहेत.





महाशिवरात्रीनिमित्त सप्ताह सुरू असून कीर्तन व प्रवचनाचे कार्यक्रम सुरू आहेत.



महाशिवरात्रीनिमित्त या मंदिर परिसरात अमरावती आणि अकोला, या दोन जिल्ह्यातील भाविकांची गर्दी पाहायला मिळते.

पूर्णा नदीच्या काठावर लासूर या गावात महादेवाचे मंदिर आहे. अष्टकोणी आकाराचे हे मंदिर जणू भल्या मोठ्या रथाला हत्ती जुंपला असावा, ☞(पान २ वर)

# पुलावरून पडल्याने युवकाचा मृत्यू

**खल्लार/प्रतिनिधीः-** खल्लार पोलिस स्टेशन हद्दीत येणाऱ्या चिंचोली शिंगणे येथील २७ वर्षीय युवकाचा भुलेश्वरी नदीच्या पुलावरुन पडल्याने जागीच मृत्यू झाल्याची घटना दि.१३ फेब्रुवारी रोजी सकाळी उघडकीस आली. विशाल प्रेमदास तायडे (२७)रा. चिंचोली शिंगणे असे मृत युवकाचे नाव आहे. त्यास दारु पिण्याचे व्यसन होते. दारुच्या नशेतच तो पुलावरून जात असतांना त्याचा तोल जाऊन तो (दि. १२) ला अंजनगाव रोडवरील चिंचोली फाट्यानजिकच्या असलेल्या भुलेश्वरी नदीच्या ३० फूट ☞(पान २ वर)



# सारांश

जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय

❑ रविवार, १५ फेब्रुवारी २०२६ ❑ E-paper - www.janmadhyam.com

# एआयच्या क्षेत्रात आपण कुठे आहोत?

**वर्ष २०१४ , इयन गुडफेलो कॅनडातील मॉंट्रियाल विद्यापीठात कॉम्प्युटर सायन्स मध्ये पीएच. डी. करत होता. नुकतीच डॉक्टरेट मिळालेल्या सहकाऱ्याच्या सेलिब्रेशन पार्टीतील हा प्रसंग. एका किचकट रिसर्च प्रोजेक्ट विषयी इयनचे काही मित्र त्याचं मार्गदर्शन घेत होते, 'इयन, आम्ही असा एक कॉम्पुटर प्रोग्राम बनवतोय, जो आजवर कुठेही अस्तित्वात नसलेले फोटो पूर्णतः स्वतःच तयार करू शकेल. पण त्यात काही अडचणी आहेत. आम्ही अगदी आधुनिक मशीन लर्निंग मॉडेल्स वापरतोय. क्लिष्ट स्टॅटिस्टिक्सची समीकरणं सोडवून, सखोल अनॅलिसिस करून बघितले. पण रिझल्ट्स खूपच निराशाजनक आहेत. काय करायला हवं आम्ही...?'**

'हा अप्रोच नाही चालणार इथे. काहीतरी नाविन्यपूर्ण करावं लागेल!', असं मोजकंच काहीतरी बोलून इयनने पार्टीतून काढता पाय घेतला. आणि थेट रिसर्च लॅब गाठली. काहीतरी भन्नाट कल्पना त्याला सुचली होती. रात्रभर तो कम्प्युटर प्रोग्राम लिहीत होता. आणि पहाट होता होता, आर्टिफिशियल इंटेलिज न्सच्या क्षेत्रातील संशोधनासाठी त्याने एक नवी दिशा शोधून काढली होती. त्याने लावलेला हा शोध म्हणजेच जनरेटिव्ह अडव्हर्सरियल नेटवर्कस मॉडेल!

इथूनच जनरेटिव्ह एआय मधील संशोधन अतिशय वेगाने पुढे गेले. जनरेटिव्ह अॅडव्हर्स रियल नेटवर्कसनंतर ट्रान्सफॉर्मर मॉडेल्स आले. आणि त्यातूनच २०२२ साली जगाला भुरळ पाडणाऱ्या चॅटजीपीटीचा जन्म झाला. इयन गुडफेलो खऱ्या अर्थाने एआय विश्वातील ओव्हरनाईट सेलेब्रिटी बनला! ह्या संपूर्ण प्रसंगाची आठवण येण्याचं कारणं म्हणजे, एआय क्षेत्रातील महत्वपूर्ण जागतिक शिखर संमेलन १६ ते २० फेब्रुवारी दरम्यान दिल्लीमध्ये होत आहे. आजवर होणारं तसं हे चौथं संमेलन आहे. इंग्लंडमधील ब्लेचले पार्कवर पार पडलेल्या पहिल्या संमेलनावर एआय विषयीच्या भीतीचं सावट होतं. मानवी अस्तित्वासाठी एआयच्या घातक परिणामांवर तिथे जी चर्चा झाली, त्याला हळूहळू एक सकारात्मक वळण मिळत गेलं.

एआय संशोधन, उद्योग, व्यापार इत्यादी क्षेत्रातील अनेक दिग्गज मंडळी ह्या संमेलनात एकत्र येणार आहेत. त्यासोबतच बऱ्याच देशांच्या वरिष्ठ राजकीय नेत्यांची हजेरी इथे लागणार आहे. ह्या संमेलनाचं यजमान पद म्हणजे जी ट्वेंटी नंतर एआय क्षेत्रात ग्लोबल साऊथचं नेतृत्व प्रस्थापित करण्याची भारतासाठीची मोठी संधी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अनेक व्यासपीठांपारून एआय, डीपटेक अशा क्षेत्रांमध्ये भारताने आत्मनिर्भर बनायला हवं आणि त्यासाठी तरुणांनी उत्तम दर्जाचं संशोधन करावं; नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घ्यायला हवेत, असं आवाहन केलं आहे. अमेरिका, चीन आणि काही युरोपातील देशांनी ह्यापूर्वीच त्यात निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केलं आहे. तशात आपण केवळ जागतिक ग्राहकपेठ न होता, स्वतःचं एक स्वतंत्र अस्तित्व निर्माण करायचं असेल, तर इयन गुडफेलोच्या उदाहरणातून बरंच काही शिकण्यासारखं आहे.

एआय इम्पॅक्ट संमेलनाच्या पार्श्वभूमीवर भारताची एआय-डीपटेकमधील विद्यमान स्थिती आणि आत्मनिर्भरतेपर्यंतचा प्रवास एका वेगळ्या दृष्टि कोनातून बघण्याचा हा प्रयत्न.

**एआय प्रतिभा - कौशल्य विकास आणि विस्तार**

इयनची गोष्ट थोडी पुढे नेऊ. पीएच. डी. नंतर इयनने गूगलची एआय रिसर्च टीम जॉईन केली आणि आपलं संशोधन पुढे नेलं. नंतर त्याने ओपन एआय ह्या चॅट जीपीटी बनवणाऱ्या कंपनीच्या रिसर्च टीम मध्ये प्रवेश मिळवला. विद्यापीठात सुरू केलेलं संशोधन व्यावसायिक क्षेत्रातही तितक्याच जोमाने तो पुढे घेऊन जात होता. असं करणारा इयन हा काही एकमेव विद्यार्थी नव्हे. गॉडफादर ऑफ एआय अशी उपाधी मिळालेले आणि २०२४ सालचा नोबेल पुरस्कार मिळवणारे जेफरी हिंटन हेसुद्धा गुगल रिसर्च टीममध्येच संशोधनाला नवी दिशा देत होते. त्यांचाच विद्यार्थी असलेल्या इल्ल्या सुत्स्कीवर ह्याने काही सहकाऱ्यांसह ओपन एआय कंपनीची स्थापना केली. चॅट जीपीटी बनवणाऱ्या टीमचा तोच मुख्य एआय सायंटिस्ट होता. अशी असंख्य उदाहरणं आपल्याला सापडतील.

मूळ मुद्दा असा की अमेरिकेत मूलभूत संशोधनासाठी लागणारी एक अतिशय प्रगल्भ



इकोसिस्टिम आहे. शिक्षण संस्थांसोबतंच व्यावसायिक क्षेत्रातही अशा संशोधनासाठी प्रचंड वाव आहे. आणि त्यातूनच एआयसाठी लागणारं विशेष प्रतिभा-कौशल्य वाढीस लागतं. ह्या अनुषंगाने भारतातील परिस्थितीचा आढावा घेतला तर

निलेश मोडक

शासनातर्फे उचलली जाणारी काही रचनात्मक पावलं ठळकपणे दिसतात. उदाहरणार्थ इंडिया एआय फ्युचर स्किल्स ह्या उपक्रमाअंतर्गत पदव्युत्तर तसेच पीएच. डी. अभ्यासक्रमांमध्ये एआय विषयी अधिक भर देण्याचा प्रयत्न होत आहे. स्टॅनफर्ड विद्यापीठाच्या २०२४ च्या एआय इंडेक्स रिपोर्ट नुसार एआय कौशल्य प्रसाराच्या बाबतीत भारत अगदी अमेरिका आणि जर्मनीच्याही पुढे आहे. इंडिया स्किल्स रिपोर्ट सांगतो की भारतातील व्यावसायिक क्षेत्रातील एआय मध्ये कौशल्य मिळवलेल्यांची संख्या गेल्या ८-१० वर्षांमध्ये १४ पट वाढली आहे, इत्यादी.

पण आत्मनिर्भरतेसाठी हे पुरेसं आहे का खरंचष्ठ?

कारण इथेच एक विरोधाभास दिसतो. आज आपल्याकडे स्पेशलाइज्ड एआय एक्सपर्ट्स आणि एआय इंजिनियर्सची पुरेशी उपलब्धता नाही. विद्यापीठांमधील थिओरिटिकेल नॉलेज आणि व्यवसाय क्षेत्रात लागणारं आधुनिक कौशल्य ह्यात एक दरी निर्माण झाली आहे. पीएच. डी. नंतर त्या संशोधनाला पुढे नेण्यासाठी संधी देणारी दालनं नाहीत. खासगी क्षेत्रातही अशा संधी फार नाहीत. मग टॉप टॅलेंटला परदेशाची वाट धरावी लागते.

अशा परिस्थितीत कौशल्य विकास केंद्रे पुरेशी होणार नाहीत. इथे गरज आहे ती अॅकेडेमिया आणि इंडस्ट्री ह्यांना जोडणाऱ्या प्राविण्यता केंद्रांची (सेंटर ऑफ एक्सलन्स)! सोबतंच आपल्याला शैक्षणिक क्षेत्रात अगदी उद्देशपूर्ण असे आमूलाग्र बदल घडवून आणावे लागतील. अभ्यासक्रमांमध्ये मूलभूत बदल करावे लागतील, प्रकल्प आणि प्रशिक्षणावर अधिक भर द्यावा लागेल.

**संयमी संशोधन आणि आर्थिक गुंतवणूक**

पुन्हा इयनच्या गोष्टीकडे वळूया. त्याने उँ- मॉडेलचा शोध २०१४ साली लावला. आणि चॅट जीपीटीच्या आविष्काराला त्यानंतरही आणखी ७-८ वर्षे लागली. बरं इयन चा शोध हा काही जनरेटिव्ह एआय मधील पाहिला प्रयत्न नव्हता. १९५२ साली ण्प्रिदज्पे ऍम्पब् ह्या ब्रिटिश कंप्युटर सायंटिस्ट ने लव्ह-लेटर प्रोग्रॅम लिहिला होता. लेखी मजकूर संगणकाद्वारे तयार करण्याचा हा खरा पहिला प्रयोग. पुढे १९६६ साली एलिझा हा कंप्युटर प्रोग्रॅम मानसशास्त्र तंज्ञाप्रमाणे संवाद साधू शकत होता. नंतर Naturaled Language Procesing (NLPed) ही शाखा नावारूपाला आली. मग मेंदूच्या रचनेवरून प्रेरणा घेऊन आर्टिफिशियल न्यूरल नेटवर्कसचा शोध लागला, तोवर २००३ साल उजाडलं होतं. हा संपूर्ण पन्नास वर्षांचा प्रवास होता. मूलभूत संशोधनासाठी वर्षानुवर्षांच्या अशाच अविरत प्रयत्नांची, संयमी संशोधनाची आवश्यकता असते.

इथे नाण्याची दुसरी बाजू समोर येते – आर्थिक गुंतवणूक. इंडियाएआय मिशन आणि स्टार्ट अप फंडच्या माध्यमातून शासनाने भक्कम गुंतवणूक केली आहे. पण थोडं खोलवर बघितलं तर असं लक्षात येतं की गेल्या दहा-अकरा वर्षांमधील स्टार्ट अपसाठी मिळालेल्या एकूण (खासगी आणि शासकीय ) गुंतवणुकीपैकी केवळ एक टक्का गुंतवणूक डीपटेकसाठी आहे. रिसर्च आणि डेव्हलपमेंट मध्ये भारतातील गुंतवणूक जीडीपीच्या केवळ ०.६४% एवढीच आहे. चीनमध्ये ही गुंतवणूक जीडीपीच्या २.४% आहे. त्याहून महत्वाचे म्हणजे आपल्या गुंतवणुकीतील शासनाचा वाटा अंदाजे ६० टक्के आहे.

---

# गोंधळातील गुंतागुंत

कन्फ्युजन किंवा मनातला गोंधळ हे खूपदा इतरांच्या खिल्लीचे कारण ठरते, पण त्याचा मानसिक आरोग्याच्या दृष्टीने विचार केला तर ही समस्या समुपदेशनाने वेळीच दूर सारणे आवश्यक आहे. नताशा (नाव बदलले आहे) तशी स्मार्ट होती. मात्र जे तिला जवळून ओळखायचे त्यांना तिचा स्मार्टनेस हा ओढून ताणून आणलेला आहे हे कळत होतं. कारण स्वतला सिद्ध करण्याच्या नादात तिच्याकडून क्षुल्लक चुका होत आणि इतर म्हणजेच तिच्या मित्रमैत्रिणी तिला सांभाळून घेत. तिचा शाळेतला, कॉलेजमधला आणि आता ती काम करत असलेल्या कंपनीतला असा भरपूर मित्रपरिवार होता. त्यामुळे त्या सर्वांच्या आधाराने ती आतापर्यंत होती.

'आधाराने? मला तुझं वाक्य समजलं नाही'' समुपदेशनाला आलेल्या नताशाला जेव्हा हे विचारलं गेलं तेव्हा ती खिन्न हसून म्हणाली, 'मला नाहीतरी छोटी मोठी डिसिजन्स घ्यायला माझे फ्रेंड्सच लागतात. का? ते मलाही माहीत नाही आणि त्यासाठीच मी इकडे तुम्हाला भेटायला आलेय.'' नताशाने एका दमात समुपदेशनाला येण्याचं कारण सांगितलं. नताशाला कायमच कुठलीही गोष्ट पटकन आणि ठामपणे ठरवता येत नव्हती. कुठेही जायचं किंवा काही करायचं असेल तर ती गोंधळलेलीच असायची. 'जाऊ की नको', 'करू की नको' या अवस्थेत असल्यामुळे इतरही मग तिच्या त्या संभ्रमित अवस्थेमुळे गोंधळून जायचे.

नताशा ही शेंडेफळ असल्याने घरात सगळ्यांची लाडकी होती. तिच्यावर तिच्या वडिलांचा भरपूर जीव होता. त्यामुळे तिच्या प्रत्येक खाजगी बाबीमध्ये भरपूर लक्ष घालीत. तिने काहीही ठरवलं तरी ते त्यातून वेगळा पर्याय तरी सुचवत. त्यामुळे तिला कुठलेही निर्णय घेताना संभ्रम व्हायला लागला. कुठेतरी 'आपल्या वडिलांचं मत महत्त्वाचं. कारण त्यांना कळतंय. कदाचित मला नाही कळणार. नंतर माझं चुकलं तरष्ठबाबांनी मला अलर्ट केलंय. जाऊ दे. त्यांचंच ऐकतेष्ठकी, काय करू?' अशा प्रकारचे विचार, स्वगतं यात ती अडकायला लागली. परिणामी ती तिच्या प्रत्येक लहानमोठ्या निर्णयांबाबत त्यांच्यावर आवश्यकतेपेक्षा अवलंबून राहायला लागली. हे तिचं अवलंबित्व एका दिवशी पटकन थांबलं जेव्हा तिच्या वडिलांचा आकस्मिक मृत्यू झाला. तो मानसिक, भावनिक धक्का तिच्यासाठी प्रचंड होता.

त्या धक्क्यातून नताशाने स्वतला सावरलं खरं; पण तिच्यावर त्या प्रसंगाचे दूरगामी परिणाम व्हायला लागले होते. कारण प्रत्येक गोष्टीत तिला बाबा लागायचे. ही पोकळी तिने तिच्या मित्रपरिवारामध्ये शोधली (तिचा मित्रपरिवाराही तिच्या बाबांनी मान्य केला होता). ती स्वतच्या खासगी निर्णयांसाठी त्यांच्यावर अवलंबून राहायला लागली. त्यामुळे झालं असं की, नताशाला स्वतचं असं खाजगी जीवन उरलं नाहीच. शिवाय तिच्या मित्रपरिवारालाही तिच्यात अडकणं म्हणजे एक प्रकारची जबाबदारी आल्यासारखं वाटायला लागलं. त्यातच तिचं लग्न जमलं. त्यावेळी तिने तिच्या आणि होणा?या जोडीदाराच्या गुजगोष्टी मित्रांमध्ये उघड केल्या. त्यावेळी तिच्या मित्रमैत्रिणींनी जी काही मतं त्या मुलाबाबतीत बनवली त्यानुसार ती त्याच्याशी वागायला, बोलायला लागली. अपेक्षितपणे त्या मुलाने लग्न मोडलं. दुस?या वेळी असाच काहीसा प्रकार घडला. त्यावेळी मात्र मित्रांनी आणि मैत्रिणींनी तिला समज दिली आणि तिच्या वैयक्तिक निर्णयांची जबाबदारी स्वतवर घ्यायला सांगितली. याही वेळी अचानक आलेली निर्णय घेण्याच्या जबाबदारीने नताशा गडबडली. तिचा हा गोंधळ तिच्या होणा-या नव-याला समजला. त्याला आपल्या भावी पत्नीकडून खंबीरपणा हवा होता. त्यामुळे हेही नातं तुटलं. नताशा त्यामुळे पुन्हा हादरली आणि तिने समुपदेशनाचा मार्ग निश्चित केला. हा निर्णय तिने स्वतहून घेतला होता.

'माझं तुम्ही कन्फ्युजन दूर करा. मला आता डिपेंडेंट राहण्याचा कंटाळा आलाय. माझ्या फ्रेंड्सनी आता मला नाव ठेवलंय 'कन्फ्युज्ड कॅरॅक्टर' म्हणून. सर्व माझी काळजी घेतात, पण त्यांचं ते कधीतरी खिल्ली उडवणं, मला सगळ्या गोष्टी शिकवणं या सगळ्या मला आता नको आहेत. प्लीज, मला मदत करा'' असं म्हणून नताशाने मान खाली घातली.

कन्फ्युजन किंवा मनातला गोंधळ हे खूपदा इतरांच्या खिल्लीचे कारण ठरतं, पण त्याचा मानसिक आरोग्याच्या दृष्टीने विचार केला तर त्यामुळे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. त्याचं एक महत्त्वाचं कारण म्हणजे त्या व्यक्तीची कौटुंबिक जडणघडण आणि तिच्या आजूबाजूच्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचा ती व्यक्ती कसा विचार करते हे घटक महत्त्वाची भूमिका साकारतात. कारण ब?याचदा त्या घरी कोणाच्या तरी प्रभावाखाली राहतात. मग हा प्रभाव त्यांच्यासाठी इतका प्रखर असतो की, त्या स्वतचा विवेकही वापरत नाहीत.

मग जर त्या प्रभावी व्यक्ती त्यांच्या आयुष्यातून काही कारणास्तव निघून गेल्या तर या व्यक्ती स्वतवरचा विश्वास गमावतातच आणि ब?याच वेळा बाहेर तो प्रभाव (आधार) शोधतात, पण मग अशा वेळी त्या व्यक्तीच्या संपर्कातील इतरांना त्या व्यक्तीचे ओझे वाटू शकते.

---




# बलुच संघर्षाचा निर्णायक अंक

पाकिस्तान सध्या बलुच लिबरेशन आर्मीने पुकारलेल्या 'ऑपरेशन हेरोफ २.०'मुळे प्रचंड दबावाखाली आहे. भारतासाठी या घडामोडी चिंताजनक आहेत याचे कारण पाकिस्तान जेव्हा आदेशांतर्गत संकटात सापडतो, तेव्हा तो भारताकडे लक्ष वळवण्याचा प्रयत्न करतो. जाफर एक्सप्रेसवरील हल्ल्यानंतर काही आठवड्यातच पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला होता. सध्या कश्मीरमध्ये बर्फवृष्टीमुळे परिस्थिती कठीण असताना पाकिस्तान समर्थित दहशतवादी घुसखोरी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेष म्हणजे पाकिस्तानी लष्कराने गुजरात सीमेवरही आपली हालचाल वाढवली आहे. त्यामुळे भारतीय सुरक्षा दलांना आता अधिक सतर्क राहण्याची गरज आहे.

ह पाकिस्तानातील सध्याची स्थिती इतकी भयावह आहे की, खुद्द संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांना संसदेत आपली हतबलता मान्य करावी लागली. पाकिस्तानी सुरक्षा दल बलुचिस्तानचे रक्षण करण्यास पूर्णपणे सक्षम नसल्याची कबुली त्यांनी दिली आहे. भौगोलिक परिस्थितीचे कारण पुढे करत त्यांनी असेही स्पष्ट केले की, बंडखोर वापरत असलेली शस्त्रास्त्रे ही पाकिस्तानी लष्कराच्या शस्त्रास्त्रांपेक्षाही प्रगत आहेत. आसिफ यांच्या दाव्यानुसार, बीएलएचा प्रत्येक लढाऊ सैनिक सुमारे २०००० डॉलर किमतीच्या आधुनिक लष्करी साहित्याने सज्ज आहे. हा साठा त्यांच्याकडे येतो कुठून, हा पाकिस्तानसाठी चिंतेचा आणि जगासाठी कुतूहलाचा विषय ठरला आहे.

भारतासाठी या घडामोडी चिंताजनक आहेत. याचे कारण ऐतिहासिकदृष्टया पाहिले तर पाकिस्तान जेव्हा जेव्हा अंतर्गत संकटात सापडतो, तेव्हा तो भारताकडे लक्ष वळवण्याचा प्रयत्न करतो. जाफर एक्सप्रेसवरील हल्ल्यानंतर काही आठवडयातच पहलगाममध्ये झालेला दहशतवादी हल्ला हे याचेच उदाहरण आहे. सध्या जम्मू आणि कश्मीरमध्ये बर्फवृष्टीमुळे परिस्थिती कठीण असताना पाकिस्तान समर्थित दहशतवादी घुसखोरी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेष म्हणजे पाकिस्तानी लष्कराने गुजरात सीमेवरही आपली हालचाल वाढवली आहे. त्यामुळे भारतीय सुरक्षा दलांना आता अधिक सतर्क राहण्याची गरज आहे. एका बाजूला आर्थिक दिवाळखोरी आणि दुस?या बाजूला बीएलएसारख्या संघटनांनी दिलेले तगडे आव्हान यामुळे पाकिस्तानची अवस्था बिकट झाली आहे. या अस्थिरतेचा फायदा घेऊन भारतविरोधी कारवाया होऊ नयेत, यासाठी भारताला आपली संरक्षण फळी अधिक मजबूत ठेवावी लागणार आहे.

पाकिस्तानातील बलुचिस्तान प्रांतात सध्या उसळलेला हिंसाचाराचा वणवा हा या देशातील राज्यकर्त्यांनी बलुची नागरिकांवर आणि तेथील संसाधनांवर केलेल्या अनन्वित अन्यायाचा परिपाक आहे. गेल्या सात दशकांपासून धुमसणा-या असंतोषाचा हा स्फोट आहे. गेल्या महिनाभरामध्ये बलुच बंडखोरांनी केलेल्या भीषण हल्ल्यांनी पाकिस्तानच्या सुरक्षा यंत्रणेच्या चिंधडय़ा उडवल्या आहेत. ३१ जानेवारी २०२६ रोजी बलुचिस्तान लिबरेशन आर्मी अर्थात बीएलए या प्रतिबंधित संघटनेने 'ऑपरेशन हेरॉफ २.०'अंतर्गत १२ हून अधिक शहरांमध्ये एकाच वेळी हल्ले चढवले. ग्वादरपासून पसनीपर्यंत आणि पाकिस्तान-इराण सीमेपासून थेट राजधानी क्वेटापर्यंत बंडखोरांनी आपले जाळे पसरवले आहे. यात क्वेटा, ग्वादर, नुश्की, मस्तुंग आणि पंजगूरसारख्या महत्त्वाच्या शहरांचा समावेश होता. या हल्ल्यांमध्ये सुरक्षा रक्षक आणि सामान्य नागरिकांसह सुमारे ७० हून अधिक जणांचा बळी गेला, तर पाकिस्तान लष्कराने केलेल्या प्रत्युत्तरादाखल कारवाईत २०० हून अधिक बंडखोर मारले गेल्याचा दावा करण्यात आला आहे. ही चकमक पाकिस्तानच्या अस्तित्वाला मिळालेले मोठे आव्हान आहे.

बलुचिस्तानच्या या बंडाची मुळे १९४७ च्या फाळणीत दडलेली आहेत. ऑगस्ट १९४७ मध्ये जेव्हा भारत आणि पाकिस्तान स्वतंत्र झाले, तेव्हा बलुचिस्तान हा एकसंध प्रांत नव्हता. तिथे 'चीफ कमिशनर्स बलुचिस्तान' आणि कलात,

प्रा. सतीशकुमार

मकरान, लास बेला व खारन ही संस्थाने होती. कलातच्या खानाने सुरुवातीला स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला होता, ज्याला पाकिस्तानचे संस्थापक मोहम्मद अली जिन्ना यांनीही मान्यता दिली होती. मात्र, बलुचिस्तानच्या किनारपट्टीचे मोक्याचे स्थान लक्षात घेऊन पाकिस्तानने दबाव वाढवला आणि २७ मार्च १९४८ रोजी कलातचे विलीनीकरण करून घेतले. तथापि, बलुच जनतेच्या मते हे त्यांचे सक्तीने केलेले विलीनीकरण होते. तेव्हापासून आजपर्यंत बलुचिस्तानने १९४८, १९५८, १९६२, १९७३ आणि २००४ पासून सुरू झालेले सध्याचे पाचवे मोठे बंड पाहिले आहे. प्रत्येक वेळी पाकिस्तानातील सत्ताधा?यांनी हे बंड लष्करी बळाने चिरडण्याचा प्रयत्न केला, पण तो पूर्णपणे शमवण्यात त्यांना यश आलेले नाही.

पाकिस्तानच्या नैऋत्य सीमेवर वसलेला बलुचिस्तान हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने पाकिस्तानचा ४४ टक्के भूभाग व्यापणारा सर्वात मोठा प्रांत आहे. ३,४७,००० चौरस किलोमीटर क्षेत्रफळ लाभलेल्या या प्रांतात जगातील सर्वात मोठे 'न वापरलेले' खनिज भांडार दडलेले आहे, परंतु हेच वैभव आज या प्रदेशासाठी शाप ठरत आहे. हा प्रदेश नैसर्गिक वायू, कोळसा, तांबे आणि सोन्याच्या साठय़ांनी समृद्ध आहे. तरीही हा पाकिस्तानचा सर्वात मागासलेला आणि गरीब भाग आहे. बलुच जनतेचा मुख्य आक्षेप असा आहे की, त्यांच्या भूमीतून निघणारा नैसर्गिक वायू संपूर्ण पाकिस्तानला मिळतो, पण बलुचिस्तानमधील घरांमध्ये आजही चुली पेटवण्यासाठी लाकूड वापरावे लागते. या संसाधनांमधून मिळणारा महसूल इस्लामाबादमधील केंद्र सरकार आणि लष्करी आस्थापनांच्या खिशात जातो, तर स्थानिक जनता मात्र बेरोजगारी आणि उपासमारीने ग्रस्त आहे.

सध्याच्या काळात या संघर्षाचे स्वरूप बदलले असून त्यात 'चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर' अर्थात सीपीईसी या महाकाय प्रकल्पाने भर घातली आहे. चीनने ग्वादर बंदराच्या विकासासाठी आणि रस्ते बांधणीसाठी अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. मात्र, बलुच राष्ट्रवाद्यांच्या मते हा प्रकल्प म्हणजे त्यांच्या संसाधनांची चिनी लूट आहे. बीएलएसारख्या संघटनांचे म्हणणे आहे की, या प्रकल्पांमुळे स्थानिकांना रोजगार मिळण्याऐवजी त्यांच्या जमिनी हिरावून घेतल्या जात आहेत आणि सुरक्षा यंत्रणांचा वावर वाढवून सामान्य लोकांचे जगणे कठीण केले जात आहे. ग्वादर बंदराच्या विकासामुळे स्थानिक कोळी बांधवांचा रोजगार हिरावला जात आहे. म्हणूनच अलीकडच्या काळात बंडखोरांनी चिनी नागरिक आणि त्यांच्या प्रकल्पांना आपले लक्ष्य बनवले आहे.

मानवी हक्कांचे उल्लंघन हा या वादातील सर्वात संवेदनशील मुद्दा आहे. बलुचिस्तानमध्ये एम्फोर्सड् डिसअपीयरन्सेस म्हणजेच लोकांचे अचानक बेपत्ता होणे ही एक मोठी समस्या बनली आहे. हजारो बलुच तरुण, विद्यार्थी आणि कार्यकर्ते सुरक्षा यंत्रणांनी उचलून नेले असून त्यांचा कोणताही ठावठिकाणा लागत नाही, असा आरोप मानवाधिकार संघटना सातत्याने करत आहेत. जेव्हा या बेपत्ता लोकांचे छिन्नविच्छिन्न मृतदेह निर्जन स्थळी सापडतात तेव्हा जनक्षोभ अधिक तीव्र होतो. महरिब बलुचसारख्या महिला कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली आंदोलने या अन्यायाविरुद्धचा बुलंद आवाज ठरत आहेत.

या सर्व संघर्षात पाकिस्तान सरकार नेहमीच परकीय हात असल्याचा आरोप करत आला आहे. लष्करप्रमुख फील्ड मार्शल असीम मुनीर यांनी बीएलएला 'फितना अल हिंदुस्तान' असे संबोधले आहे. 'फितना' या शब्दाचा वापर करून या संघर्षाला धार्मिक वळण देण्याचा हा एक केविलवाणा प्रयत्न आहे. इस्लामच्या नावाखाली बंडखोरांच्या राजकीय आणि हक्कांच्या लढाईला 'अधार्मिक' ठरवून लोकांची सहानुभूती मिळवण्याचा लष्कराचा डाव आहे. मात्र तज्ञांच्या मते, पाकिस्तानचे हे धार्मिक कार्ड आता जुने झाले असून बलुच जनतेमध्ये त्याबद्दल तीव्र संताप आहे. प्रत्यक्षात जोपर्यंत पाकिस्तान आपल्या अंतर्गत राजकीय समस्यांचे लष्करी समाधान शोधण्याचा प्रयत्न करेल, तोपर्यंत ही परिस्थिती सुधारणे कठीण आहे.

सद्यस्थितीत घडणा-या घडामोडी पाहता ही पाकिस्तानसाठी धोक्याची घंटा आहे. बीएलएने या वेळी आत्मघाती हल्ल्यांसाठी महिलांचाही वापर केला असून 'मजीद ब्रिगेड'सारखी त्यांची विशेष पथके अधिक अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज झाली आहेत. पाकिस्तान लष्कराने 'ऑपरेशन रद-उल-फितना'सारखी मोहीम राबवून नियंत्रण मिळवल्याचा दावा केला असला तरी स्थानिक लोकांचा विश्वास पूर्णपणे उडालेला आहे. जोपर्यंत बलुचिस्तानला स्वायत्तता मिळत नाही आणि त्यांच्या संसाधनांवर त्यांचा हक्क मान्य केला जात नाही, तोपर्यंत हा असंतोषाचा ज्वालामुखी अधूनमधून असाच पेटत राहील.

# नव्या आकर्षक पोस्टरसह 'द पॅराडाईज'ची घोषणा

२०२६ मधील सर्वाधिक प्रतिक्षित चित्रपटांपैकी एक म्हणून द पॅराडाईजची ओळख निर्माण झाली आहे. चित्रपटाची घोषणा झाल्यापासून प्रेक्षकांमध्ये याबाबत प्रचंड उत्सुकता आहे. 'दसरा' या मोठ्या यशानंतर दिग्दर्शक श्रीकांत ओडेला पुन्हा एकदा नॅचरल स्टार नानीसोबत या चित्रपटातून काम करत आहेत. 'दसरा'नंतर ही जोडी पुन्हा एकत्र येत असल्याने अपेक्षा आणखी वाढल्या आहेत. निर्मात्यांनी अलीकडेच चित्रपटाच्या नव्या प्रदर्शित तारखेची अधिकृत घोषणा केली असून, त्यासोबत एक तीव्र आणि लक्षवेधी पोस्टरही सादर केले आहे.




या पोस्टरमध्ये दोन लांब वेण्या दाखवण्यात आल्या आहेत, ज्यांच्या टोकांवरून रक्त टपकत आहे, आणि पार्श्वभूमी गडद व रहस्यमय आहे. या दृश्यातून चित्रपटाची गंभीर, रौद्र आणि अ?क्शनने भरलेली कथा सूचित होते.

द पॅराडाईज हा श्रीकांत ओडेला यांचा आणखी एक महत्त्वाकांक्षी चित्रपट मानला जात आहे. त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण कथनशैली आणि बारकाईने केलेल्या दिग्दर्शनासाठी ते ओळखले जातात. 'दसरा' या त्यांच्या पहिल्या चित्रपटाने समीक्षकांची आणि प्रेक्षकांची मोठी प्रशंसा मिळवली होती, तसेच तो १०० कोटी रुपयांहून अधिक कमाई करत नानी यांच्या कारकिर्दीतील सर्वात मोठा हिट ठरला. त्यामुळे द पॅराडाईजकडून अपेक्षा अधिक वाढल्या आहेत. चित्रपटाची तीव्रता अधिक प्रभावी करण्यासाठी अनिरुद्ध रविचंदर यांनी दिलेले मूळ संगीत महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. अनिरुद्ध आणि अर्जुन चांडी यांच्या आवाजातील गीते चित्रपटाच्या कथानकाला आणखी प्रभावी बनवतील.

एस्थ्न् सिनेमाजच्या निर्मितीखाली तयार होत असलेला द पॅराडाईज २१ ऑगस्ट २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट हिंदी, तेलुगू, तमिळ, इंग्रजी, स्पॅनिश, बंगाली, कन्नड आणि मल्याळम अशा आठ भाषांमध्ये रिलीज होणार आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणावर प्रदर्शित करण्यासाठी निर्मात्यांनी हॉलीवूड स्टार रायन रेनॉल्ड्स यांना चित्रपट सादर करण्यासाठी संपर्क केल्याचीही चर्चा आहे. दूरदर्शी दिग्दर्शक, दमदार कलाकार आणि जागतिक पातळीवरील भव्य मांडणी यामुळे द पॅराडाईज हा केवळ एक चित्रपट नसून, एक सांस्कृतिक घटना ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

# 'गिनी वेड्स सनी २' चा फर्स्ट लूक समोर

१२वी फेल या चित्रपटातून लोकप्रियता मिळवलेली अभिनेत्री मेधा शंकर आता पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर आपली जादू दाखवण्यास सज्ज आहे. 'गिनी वेड्स सनी २' या चित्रपटात अभिनेत्री मुख्य भूमिकेत झळकणार असून, या चित्रपटाचा फर्स्ट लूक समोर आला आहे.




चित्रपटाच्या पोस्टरसोबत प्रदर्शनाची तारीखही जाहीर करण्यात आली आहे. निर्मात्यांनी सोशल मीडियावर 'गिनी वेड्स सनी २' चित्रपटाचे पहिले पोस्टर शेअर केले आहे. या पोस्टरमध्ये अविनाश तिवारी एका कुस्तीगीराची भूमिका साकारताना दिसत आहे. तो व्यायाम करताना पुश-अप करत आहे, तर मेधा शंकर त्याच्यावर ध्यानस्थ अवस्थेत बसलेली दिसत आहे.

मेधा शंकर लाल साडीत खूप सुंदर दिसत असून तिच्या चेहऱ्यावर हास्य दिसत आहे, तर अविनाश तिवारी कुस्तीच्या कपड्यात शर्टलेस दिसत आहे. पोस्टर शेअर करताना निर्मात्यांनी कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, 'गिनी आणि सनी परत आले आहेत. नाते निश्चित झाले आहे, फक्त यावेळी थोडा ट्विस्ट आहे.' यासोबतच निर्मात्यांनी चित्रपटाची प्रदर्शनाची तारीख देखील जाहीर केली आहे. हा चित्रपट २४ एप्रिल रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

विनोद बच्चन आणि उमेश कुमार बन्सल निर्मित या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रशांत झा यांनी केले आहे.

चित्रपटाच्या कलाकारांबद्दल आणि कथेबद्दल अद्याप फारशी माहिती समोर आलेली नाही. हा चित्रपट विक्रांत मेस्सी आणि यामी गौतम यांच्या २०२० मध्ये आलेल्या 'गिनी वेड्स सनी' या चित्रपटाचा सिक्वल असणार आहे. मात्र, यावेळी चित्रपटातील मुख्य कलाकार बदलले आहेत. चित्रपटाची कथा देखील पूर्णपणे वेगळी असणार आहे. त्यामुळे बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट कशी कामगिरी करतो हे पाहणे उत्सुकतेचे असणार आहे.

# रोहित शेट्टी गोळीबार प्रकरण – आरोपींना शहरात दहशत निर्माण करायची होती

चित्रपट निर्माते रोहित शेट्टी यांच्या निवासस्थानी झालेल्या गोळीबारात सहभागी असलेल्या आरोपींना शहरात दहशत निर्माण करायची होती, असा दावा पोलिसांनी आज न्यायालयात केला.



दरम्यान याप्रकरणी अटक केलेल्या पाच आरोपींना विशेष कोर्टाने १७ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली

रोहित शेट्टी याच्या घरावरील गोळीबार प्रकरणी पोलिसांनी आदित्य गायकी, सिद्धार्थ येनपुरे, समर्थ पोमाजी आणि स्वप्नील सकट आणि आसाराम फसाळे यांना अटक केली आहे. तर लॉरेन्स बिश्नोई टोळीचा सदस्य शुभम लोणकर हा या प्रकरणातील वॉन्टेड आरोपींपैकी एक आहे. रिमांडसाठी आरोपींना आज बुधवारी विशेष मकोका कोर्टात सादर करण्यात आले. त्यावेळी आणखी १५ दिवसांची कोठडी मागताना पोलिसांनी न्यायालयाला सांगितले की, आरोपींचे संबंध शुभम लोणकरशी आहेत जो फरार आहे आणि त्याचा भाऊ प्रवीण लोणकर जो राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्या प्रकरणात गुन्हेगार असून न्यायालयीन कोठडीत आहे. एका आरोपीकडून जप्त केलेल्या शस्त्रांपैकी एक प्रवीण लोणकरने पुरवले होते आणि या टोळीचा उद्देश मुंबईत दहशत निर्माण करणे होता, असे पोलिसांनी सांगितले. बचाव पक्षाचे वकील सचिन झाल्टे पाटील आणि अजिंक्य मिरगल यांनी नव्याने रिमांड अर्जाला विरोध केला आणि म्हटले की, कोणतेही नवीन कारण नाही आणि केवळ मकोका लागू केल्याने पोलिसांना कोठडीचा अधिकार मिळत नाही.

# 'जेवढं मी कमावते ते सगळ....'

मराठी सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री प्रार्थना बेहेरे नेहमी विविध कारणांमुळे चर्चेत असते. तिने अभिनयक्षेत्रात 'कॉफी आणि बरंच काही' या चित्रपटातून पदार्पण केले. त्यानंतर ती रातोरात स्टार कलाकार झाली. यानंतर तिने एकामागूनएक चित्रपट करत आपल्या अभिनयाची चुणूक दाखवली. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत अभिनेत्रीने तिच्या आलिशान लाईफस्टाईलबद्दल सविस्तर माहिती दिली आहे.

प्रार्थना वेगवेगळ्या भूमिकांमधून प्रेक्षकांसमोर आली. तिची खऱ्या आयुष्यातील आलिशान लाईफस्टाईलचीही नेहमीच चर्चा होते. मात्र अशी लाईफस्टाईल आत्मसात



करण्यासाठी किती खर्च होतो, तसेच अभिनेत्री म्हणून पैसे मिळतात का? या सगळ्यावर अभिनेत्रीने सविस्तर भाष्य केले आहे. 'हो, पैसे मिळतात..भरपूर मिळतात. माझं तरी आयुष्य लक्झरियस आहे. कदाचित माझ्या नवऱ्यामुळे असेल. पण शेवटी आपल्या गरजांवर ते अवलंबून असतं.' असे प्रार्थनाने सांगितले. पुढे बोलताना प्रार्थना म्हणाली, 'मला इंडस्ट्रीत १५ वर्ष झाली पण माझ्या नावावर अजून घर नाही. माझ्या नावावर फक्त कार आहे. मी माझ्या गरजा काय ते पाहिलं. मला घर कधी महत्वाचं नव्हतं.

इतर गोष्टी महत्वाच्या होत्या त्यामुळे मी त्यावर लक्ष दिलं. त्यावर पैसा खर्च केला.' असे तिने सांगितले. आधी नवऱ्याच्या दोन गाड्या आहेत त्यातच मी फिरायचे. तसंच एक अभिनेत्री म्हणून लाईफस्टाईल मेन्टेन करायला लागते आणि सगळ्यात खूप खर्च येतो, असेही ती सांगायला विसरली नाही. 'जेवढं मी कमावते ते सगळं मी लाईफस्टाईलवर घालवते. अगदी नखांपासून ते हेअर ड्रेसर, स्किन या सगळ्यासाठी किती पैसे लागतात. म्हणून तर अभिनेत्री एवढं कमावतात.' असेही तिने नमूद केले.

# रीलस्टार प्रथमेश कदमने आत्महत्या केल्याच्या चर्चांणा पूर्णविराम

प्रसिद्ध मराठमोळा रीलस्टार प्रथमेश कदम याचं २६ जानेवारी रोजी निधन झालं. प्रथमेश कदमच्या अकाली निधनाच्या बातमीने त्याचे चाहते आणि फॉलोअर्सना मोठा धक्का बसला होता. त्याच्या अकाली झालेल्या निधनामुळे प्रथमेशला नेमकं काय झालं होतं? त्याच्या मृत्यूमागील नेमकं काय कारण आहे? यासह काही लोक तर प्रथमेशने आत्महत्या केल्याचंही म्हणत आहेत. समाज माध्यमांवर होणाऱ्या या सर्व चर्चांणा प्रथमेशच्या आईने पूर्णविराम दिला आहे. तसेच त्यांनी प्रथमेशच्या मृत्यूचं कारण सांगितलंय. प्रथमेशच्या आईने सोशल मीडियावर व्हिडीओ शेअर करत ही माहिती दिली आहे.



**प्रथमेशच्या आईने त्याच्या मृत्यूचं कारण सांगितलं?**

प्रथमेशच्या आईने सोशल मीडियावर व्हिडीओ शेअर करत म्हटलं की, 'नमस्कार मी प्रज्ञा प्रकाश कदम, प्रथमेशची मम्मी. काही दिवसांपासून मला खूप म्हणजे खूप त्रास होत होता, म्हणजे असे व्हिडीओ येत होते की प्रथमेशने आत्महत्या केली, प्रथमेशला हे झालं, प्रथमेशला ते झालं. त्याला असं काहीही झालं नव्हतं. त्याचं खरं कारण एकच होतं, त्याच्या ब्लडमध्ये रक्ताची कावीळ मिसळली होती. ती कावीळ म्हणजे सफेद कावीळ असते, ती कोणालाही कळत नाही. जेव्हा मी त्याला अ?डमिट केलं डॉक्टरांनी मला गॅरेंटी दिली होती, डॉक्टर म्हणाले दोन-तीन दिवसांत तो कव्हर होऊन जाईल, रिपोर्ट सर्व नॉर्मल आहेत, पण कावीळने माझ्या मुलाचा घात केला'.

पुढे बोलताना, 'डॉक्टरांनाही कळलं नाही , शेवटच्या क्षणी डॉक्टरांना कळतंय की त्याच्या रक्तामध्ये व्हाइट कावीळ मिसळली. त्याच्या पूर्ण शरीरात रक्ताची कावीळ मिसळली, तेव्हा डॉक्टर मला म्हणाले की, आता तुम्ही देवाला प्रार्थना करा. तेव्हा मी खचून गेले की आता माझ्या मुलाची काही गॅरेंटी नाही. ती कावीळ रक्तात मिसळली की माणूस शेवटी एंडच होतो आणि तेच झालं. २६ जानेवारीला सकाळी प्रथमेशने या जगाचा निरोप घेतला. खूप त्रास झाला मला. मी सर्वांना हात जोडून विनंती करते, कोणतीही खोटी अफवा पसरवू नका. कोणीही काहीही बोलेल त्यावर लक्ष ठेवू नका.

काय झालं, कसं झालं हे मला आणि माझ्या मुलीला मेसेज करून विचारू नका. गैरसमज दूर करण्यासाठी हा व्हिडीओ केला'.

## हिरोईनसारख्या किलर फिगरसाठी १० टिप्स - दिसा फिट आणि सुंदर...

बॉलिवूड अभिनेत्रींसारखी फिट आणि सुडौल फिगर असावी, असं स्वप्न प्रत्येक मुलीचं असतं. मग ती कतरिना असो किंवा दीपिका, त्यांचा फिटनेस पाहून आपल्यालाही तसंच दिसावं असं वाटणं स्वाभाविक आहे. फिट राहणं म्हणजे फक्त वजन कमी करणं नव्हे, तर शरीर सुडौल किंवा आपली फिगर व्यवस्थित शेपमध्ये असणे देखील गरजेचे असते. अनेक मुलींना वाटतं की क्रॅश डाएट किंवा जिममध्ये खूप कष्ट घेतले की सेलिब्रिटींसारखी फिगर मिळेल. पण खरं पाहता, वेळेवर जेवण, पुरेसे पाणी पिणे, स्ट्रेस मॅनेजमेंट, झोपेची शिस्त, मानसिक आरोग्य, आणि लाईफस्टाईल मधील काही आवश्यक बदल यामुळेच त्यांची फिगर कायम मेंटेन राहते. स्क्रीनवर दिसणारी ही परफेक्ट फिगर पाहून अनेकजणी फक्त डाएट आणि जिमवरच भर देतात. मात्र प्रत्यक्षात बॉलिवूड सिलिब्रिटींच्या फिटनेस मागे केवळ वर्कआऊट किंवा खाण्यापिण्याचेच नियम नाहीत, तर त्यांच्या काही खास सवयी यांचाही मोठा वाटा असतो. या अभिनेत्री केवळ तासंतास जिममध्ये व्यायाम करून किंवा कडक डाएट करून स्वतःला मेंटेन ठेवत नाहीत. त्यांच्या फिटनेसचं खरं सिक्रेट हे त्यांच्या रोजच्या जगण्यातील काही छोट्या पण महत्त्वाच्या सवयींमध्ये दडलेलं आहे. मोठमोठ्या सेलिब्रिटी फिटनेससाठी फक्त जिम - डाएटवर अवलंबून नसतात, तर त्यांच्या डेली रुटीनमध्ये असे काही बदल करतात जे फॅट बर्न करण्यास नैसर्गिक पद्धतीने मदत करतात.

# अभिनेता राजपाल यादवच्या भावाने केले मोठे खुलासे

बॉलिवूड अभिनेता राजपाल यादव नऊ कोटी रुपयांच्या कथित आर्थिक वाद प्रकरणी न्यायालयीन कोठडीत आहे. ५ फेब्रुवारी रोजी त्याने न्यायालयाच्या आदेशानुसार आत्मसमर्पण केले. त्यानंतर समाज माध्यम आणि माध्यमांमध्ये अशी चर्चा सुरू झाली की, राजपाल यादवनं म्हटले होते, 'ना माझ्याकडे पैसे आहेत आणि ना माझे मित्र आहेत.' यानंतर चित्रपटसृष्टीतील अनेक नामवंत चेहरे त्याच्या मदतीसाठी पुढे आले आणि फिल्म असोसिएशन फिल्म इंडस्ट्रीला राजपाल यादवला मदत करण्याचे आवाहन केले. राजपाल यादवचे मोठे भाऊ श्रीपाल यादव यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सत्य समोर आणण्याचा प्रयत्न केला आहे.



राजपाल यादव जेलमध्ये जाताना रडत होता आणि म्हणत होता की त्याचे कोणी मित्र नाहीत आणि त्याच्याकडे पैसे नाहीत. या गोष्टीवर बोलताना श्रीपाल यादव म्हटले की, 'आमच्या अनुभवावरून आम्ही सांगू शकतो की या गोष्टी खऱ्या वाटत नाहीत. तो माझा धाकटा भाऊ आहे. आम्ही एकत्र शिकलो, एकाच खोलीत राहिलो, एकाच बिछान्यावर झोपलो आहोत. मला पूर्ण विश्वास आहे की कितीही मोठी अडचण आली तरी तो कोणासमोर गयावया करणार नाही किंवा रडणार नाही आणि अशा प्रकारच्या गोष्टी तर नक्कीच बोलणार नाही. जाण्यापूर्वी त्याने मला फोन करून सांगितले होते. दादा, 'कोणतीही चिंता करू नको' त्यानं आम्हाला खात्री दिली की पैसे कर्ज म्हणून घेतले नव्हते, तर गुंतवणूक म्हणून दिले गेले होते. त्याने काही कागदपत्रांवर सही केली होती, ज्याबाबत आम्हाला सांगण्यात आले होते की ती कागदपत्रे गुंतवणुकीशी संबंधित आहेत. नंतर जेव्हा चित्रपट पुढे जाऊ शकला नाही, तेव्हा त्या कागदपत्रांच्या आधारे त्याला कर्ज म्हणून दाखवण्यात आले आणि परतफेडीची मागणी सुरू झाली. आम्ही चित्रपटाच्या क्रेडिट्समध्ये संबंधित व्यक्तीचे नाव निर्माता म्हणूनही पाहिलंय. सोशल मीडिया आणि माध्यमांमध्ये जे बोलले जात आहे की तो रडत होता किंवा म्हणत होते की त्याचे कोणी नाही- आम्ही मानू शकत नाही की, त्यानं असे काही म्हटले असेल.'

**जेलमध्ये जाताना राजपाल भावाला काय सांगितलं?**

जेलमध्ये जाताना राजपालनं सांगितलं की, 'न्यायालयीन प्रक्रियेनुसार त्याला एक दिवसासाठी जावे लागेल आणि पुढे कायदेशीर प्रक्रिया सुरू राहील. त्याने आम्हाला पूर्ण विश्वास दिला की, दादा, कोणतीही गोष्ट चिंता करण्यासारखी नाही. आम्ही सिद्ध करू की पैसे गुंतवणुकीसाठी होते, कर्ज घेतलेले नव्हते. आम्हाला चित्रपटसृष्टीबद्दल फार माहिती नाही, पण आम्हाला सांगण्यात आले की चित्रपटांमध्ये अनेक जण गुंतवणूक करतात आणि ही एक सामान्य प्रक्रिया आहे.'

'आम्ही देवाकडे प्रार्थना करतोय की...'

माझ्या मनात पूर्ण विश्वास आहे की, तो उद्या बाहेर येईल. आमच्या मुलीचे लग्न आहे आणि त्याची पूर्ण तयारी सुरू आहे. कोणीतरी पत्रकार आला आणि म्हणाला की घरात नैराश्य पसरलंय. अरे जिथे ५०-५० कामगार काम करत आहेत आणि आम्ही सर्व त्यात गुंतलोय. दुपारची वेळ होती, काम करणारे लोक जेवत असतील आणि घरी कोणी दिसलं नसेल तर त्याने फोटो काढून टाकला असेल की इथे नैराश्य पसरलंय वगैरे. कोणत्याही प्रकारे नैराश्य पसरलेले नाही.

आम्ही पूर्ण धैर्याने काम करत आहोत आणि आम्हाला ठाऊक आहे की, तो उद्या बाहेर येईल आणि आम्ही लग्नसोहळा जल्लोषात साजरा करू. लग्न होणारच, कोणतीही अडचण नाही. त्यामुळे लग्नात त्याची उपस्थिती खूप महत्त्वाची आहे. यासाठी आम्ही देवाकडे प्रार्थना करतोय की तो लवकर बाहेर येवो.

१९ फेब्रुवारीला राजपाल यादवच्या पुतणीचे लग्न आहे आणि कुटुंबाला पूर्ण आशा आहे की तो लग्नसमारंभात नक्की सहभागी होतील. तसेच चित्रपटसृष्टीनेही राजपाल यादवला अडचणीतून बाहेर काढण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

# आहारामध्ये शेवगा समाविष्ट करताना...

शेवगा आणि शेवग्याची पाने आपल्या आरोग्यासाठी दोन्ही खूप गरजेची आहेत. शेवगा हा पोषक तत्वांनी परिपूर्ण असून, त्याचे सेवन केल्याने आपल्याला ऊर्जा मिळते. एकूणच आपल्या आरोग्यासाठी शेवगा हा वरदानापेक्षा कमी नाही. शेवग्यामध्ये लोहाचे प्रमाण मुबलक प्रमाणात असल्याने, रक्तनिर्मितीसाठी शेवगा खूप महत्त्वाचा मानला जातो. शेवग्याचे आहारामध्ये कशापद्धतीने वापर करायला हवा हेही जाणून घेणे गरजेचे आहे.



शेवग्याच्या पानांचा चहा: तुम्हाला वजन कमी करायचे असेल तर शेवग्याच्या पानांचा चहा तुमच्या दैनंदिन दिनचर्येचा भाग बनवा. शेवग्याची पाने पाण्यात उकळू शकता किंवा कोमट पाण्यात थोडी शेवग्याच्या पानांची पावडर विरघळवून रिकाम्या पोटी सेवन करू शकता.

यामुळे शरीराचे विषारी पदार्थ देखील बाहेर पडतील, ज्यामुळे वजन नियंत्रण, पचन सुधारणे आणि निरोगी त्वचा यासह अनेक फायदे मिळतील. स्मूदीजमध्ये शेवग्याची पाने घालून आहारात समाविष्ट करु शकता. निरोगी राहण्यासाठी स्मूदीज पित असाल, तर तुमच्या आहारात शेवग्याची पाने समाविष्ट करणे आणखी सोपे आहे. फळे आणि भाज्यांपासून बनवलेल्या स्मूदीजमध्ये थोडी शेवग्याची पाने किंवा पावडर घालता येतात.

हा एक उत्तम नाश्ता पर्याय आहे जो तुम्हाला जास्त काळ पोटभर ठेवेल आणि अस्वस्थ खाण्यापासून रोखेल.

शेवग्याच्या शेंगाचे आणि पानांचे सूप लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकासाठी फायदेशीर आहे. हे एक स्वादिष्ट सूप असून अनेक पोषक तत्व या सूपमध्ये आढळतात. दक्षिणेकडे सांबारमध्ये मोठ्या प्रमाणात शेवग्याच्या शेंगांचा वापर केला जातो. शेवग्याच्या पानांचे पराठे हा देखील एक उत्तम पर्याय आहे. मुलांना हे असे पराठे डब्यातही देता येतील.

सॅलडमध्ये देखील शेवग्याच्या पानांचा वापर योग्यरित्या करता येईल. वजन कमी करण्यासाठी आणि आरोग्यासाठी आहारात शेवग्याच्या पानांचा समावेश करणे खूप गरजेचे आहे. चिरलेला कांदा आणि टोमॅटोसह मूग आणि काळे चणे यासारखे अंकुरलेले धान्य घालून सलाड करता येईल. यामध्ये अर्धा चमचा शेवग्याची पावडर किंवा शेंगांचा गर घालू शकता. यात नंतर थोडे काळे मीठ, काळी मिरी आणि लिंबाचा रस घालावा. यामुळे प्रथिने देखील मिळतील आणि स्नायू सुद्धा मजबूत होतील. शेवग्याच्या पानांची चटणी हा एक उत्तम पर्याय आपल्या आरोग्यासाठी उत्तम मानला जातो.

दक्षिण भारतात, वाळलेल्या शेवग्याच्या पानांपासून चटणी केली जाते. आरोग्यासाठी ही चटणी खूप उपयुक्त मानली जाते.

# ॲसिडीटीचा त्रास

यापुढे ॲसिडीटीचा त्रास वाटल्यास गोळ्या किंवा सिरप घेण्यापेक्षा व्हॅनिला आईस्क्रिमचा आस्वाद घ्या. इतर आईस्क्रिमच्या तुलनेत व्हॅनिला आईस्क्रिममध्ये साखरेचे प्रमाण आटोक्यात असते.

गर्भारपणाच्या दिवसात स्त्रियांना ॲसिडीटी किंवा हार्टबर्नचा त्रास होत असल्यास गर्भवती स्त्रियादेखील कपभर व्हॅनिला आईस्क्रिम खाऊ शकतात.

व्हेनिला आईस्क्रिम हे घरगुती बनवलेले असल्यास तसेच त्यामध्ये आर्टिफिशिअल रंग, स्वादाचा अति वापर केलेले नसल्यास ते फायदेशीर ठरेल.



**केळी** –केळ्यातून शरीराला उच्च प्रतीच्या पोटॅशियमचा पुरवठा होतो त्यामुळे पोटात आम्ल निर्मितीची प्रक्रिया मंदावते. तसेच फायबर शरीराची पचनक्रिया सुलभ करते. फळांमधील काही विशिष्ट घटकांमुळे अम्लांच्या विघातक परिणामांपासून आपले रक्षण होते. पित्त झाल्यास पिकलेले केळ खाल्याने आराम मिळतो. केळ्यातील पोटॅशियम विषहारक द्रव्य म्हणून काम करते व पित्ताचा त्रास कमी होतो.

**तुळस** –तुळशीमधील ॲन्टीअल्सर घटक पोटातील/जठरातील अम्लातून तयार होणाऱ्या विषारी घटकांपासून बचाव करते. तुम्हाला पित्ताचा त्रास जाणवत असल्यास किंवा अस्वस्थ वाटत असेल तर तुळशीची पाने चावून **खा.**

**दुध**–दुधातील कॅल्शियमच्या घटकांमुळे पोटात तयार होणारी विघातक आम्ल निर्मिती थांबते व अतिरक्त आम्ल दुध खेचून त्याचे अस्तित्व संपवते. थंड दुध पिल्याने पित्तामुळे होणारी पोटातील व छातीतील जळजळ कमी होते. दुध हे पित्तशामक असून ते थंड तसेच त्यात साखर वा इतर पदार्थ न मिसळता प्यावे. मात्र त्यात चमचा भर साजूक तूप घातल्यास ते हितावह होते.

**बडीशेप** –बडीशेपमधील एन्टी अल्सर घटक पचन सुधारते व बद्धकोष्ठता दूर करते. बडीशेपमुळे पोटात थंडावा तयार होऊन जळजळ कमी होते. बडीशेपाचे काही दाणे केवळ चघळल्याने देखील पित्ताची लक्षणे कमी होण्यास मदत होते. तसेच पित्तामुळे अस्वस्थ वाटत असल्यास, बडीशेपाचे दाणे पाण्यात उकळून ते रात्रभर थंड करून ठेवलेले पाणी प्यायल्याने आराम मिळतो.

**जिरे** –जिऱ्याच्या सेवनामुळे शरीरात काही लाळ निर्माण होते , ज्यामुळे पचन सुधारते , मेटाबॉलीझम सुधारते आणि शरीरातील वायू व गॅसचे विकार दूर होतात. जिऱ्याचे काही दाणे केवळ चघळल्यानेदेखील आराम मिळतो. किंवा तुम्ही जिऱ्याचे दाणे पाण्यात उकळून ते पाणी थंड करून प्या.

**लवंग** –लवंग चवीला तिखट असली तरीही लवंग अतिरिक्त लाळ खेचून घेते, पचन सुधारते आणि पित्ताची लक्षणं दूर करते. लवंगामुळे पोटफुगी व गॅसचे विकार दूर होतात.

जर तुम्हाला पित्ताचा त्रास असेल तर लवंग दाताखाली पकडून ठेवा , त्यातून येणारा रस काहीकाळ तोंडात राहू द्या. या रसामुळेच पित्ताची तीव्रता कमी होते. लवंगेमुळे घश्यातील खवखवही कमी होते.

**वेलची** –आयुर्वेदानुसार वेलची शरीरातील वात, कफ व पित्त यांमध्ये समतोल राखण्याचे काम करते . स्वादाला सुगंधी व औषधी गुणांनी परिपूर्ण वेलचीच्या सेवनाने पचन सुधारते. पित्ताचा त्रास कमी होतो. पित्तापासून आराम मिळवण्यासाठी वेलचीचे दोन दाणे ठेचून (सालीसकट/ सालीशिवाय ) ती पाण्यात टाकून उकळा. हे पाणी थंड झाल्यावर प्यायल्याने पित्तापासून तात्काळ आराम मिळेल.

**पुदिना** –पुदिना पोटातील आम्लाची तीव्रता कमी करतो. पुदिन्यातील वायूहारक गुणधर्मामुळे पचनक्रिया सुधारते. पुदिन्यातील थंडाव्यामुळे पोटदुखी व जळजळ थांबते. पित्ताचा त्रास होतअसल्यास काही पुदिन्याची पाने कापा व पाण्यासोबत उकळा. थंड झाल्यावर हे पाणी प्या.

# कांदा चिरताना रडू येते...

कांदा चिरताना डोळे जळजळतात, डोळ्यांतून पाणी येते. यावर तुम्ही काही स्मार्ट उपाय करू शकता. कांदा चिरण्यापूर्वी १५ ते २० मिनिटे फ्रिजमध्ये ठेवा. थंड झाल्यामुळे त्यातील वायू हवेत लवकर पसरत नाही.

डोळ्यांची जळजळ कमी होते. कांद्याचे दोन भाग करून ते काही वेळ थंड किंवा साध्या पाण्यात ठेवा. कांदा चिरण्यासाठी नेहमी धारदार सुरी वापरा. कांद्याच्या मुळाशी असलेला पांढरा भाग काढून टाका. कांदा चिरताना खिडकीजवळ किंवा पंख्याखाली बसा.



# झेंडूचे फूल सौंदर्यासाठी वरदान

हिंदू धर्मामध्ये झेंडूच्या फुलाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. घराच्या कुंडीत वाढणारे झेंडूचे फूल एक उत्तम नैसर्गिक उपचारक देखील आहे. जीवनसत्त्वे अ, क, ई आणि आवश्यक खनिजांनी समृद्ध, झेंडू केवळ चेहऱ्याची चमक वाढवत नाही तर मधुमेह आणि रक्तदाब यांसारख्या आजारांवर नियंत्रण ठेवण्यास देखील मदत करते. आयुर्वेदात झेंडूला त्याच्या औषधी गुणधर्मासाठी खूप महत्त्व दिले जाते. ते जीवनसत्त्वे आणि खनिजांचे भांडार आहे जे अनेक आजार बरे करू शकते.



झेंडूच्या फुलांमध्ये व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन ई आणि व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. हे जीवनसत्त्वे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. शिवाय, त्यात लोह, पोटॅशियम, जस्त आणि मॅग्नेशियम सारखी आवश्यक खनिजे देखील असतात. हे घटक शरीराचे चयापचय राखतात आणि आपल्या पेशींना अंतर्गत नुकसानापासून वाचवतात.

झेंडू त्वचेच्या काळजीसाठी एक उत्कृष्ट नैसर्गिक उपाय आहे. जर तुम्हाला तुमच्या चेहऱ्यावर नैसर्गिक चमक हवी असेल किंवा मुरुमांमुळे त्रास होत असेल तर झेंडूच्या पाकळ्यांची पेस्ट खूप प्रभावी ठरते. त्याचे दाहक-विरोधी आर्णा बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारे गुणधर्म एक्जिमा, फोड आणि त्वचेची जळजळ दूर करतात. नियमित वापरामुळे त्वचा हायड्रेट राहते आणि वृद्धत्वाची लक्षणे कमी करून चेहऱ्याचे नैसर्गिक सौंदर्य वाढते.

झेंडू मधमेह आणि उच्च रक्तदाब (उच्च रक्तदाब) सारख्या समस्या नियंत्रित करण्यासाठी देखील फायदेशीर आहे. त्याच्या अर्काचे सेवन केल्याने रक्तातील साखरेची पातळी संतुलित होण्यास मदत होते आणि हृदयाचे आरोग्य सुधारते. झेंडूच्या फुलांचा चहा किंवा काढा शरीरातील अंतर्गत घाण काढून टाकण्यासाठी आणि अंतर्गत जळजळ कमी करण्यासाठी खूप फायदेशीर मानला जातो.


# आयुर्वेदात पपईला 'अमृतफळ' असे का म्हणतात....

निर्सगाने आपल्यासाठी भरभरून फळांचा खजिना दिलेला आहे. त्यातील पपई हे फळ अनेक व्याधींवर आणि रोगांवर रामबाण इलाज मानले जाते. आयुर्वेदात पपईला 'अमृतफळ' असं म्हणतात कारण पपईचा प्रत्येक भाग, फळं, पानं आणि बियांमधे अनेक गुणधर्म असतात. तापातून बरं करण्याची, रक्त शुद्ध करण्याची आणि त्वचा सुधारण्याची शक्ती पपईमधे आहे.

फलाहार म्हणजे निसर्गानं दिलेलं औषध. कारण फळ शरीराच्या अंतर्बाह्य पोषणासाठी अत्यंत महत्त्वाची. आरोग्यासाठी फायदेशीर फळांचा विचार केला तर पपईचा क्रमांक सगळ्यात वरचा. आयुर्वेदात याला 'अमृतफळ' असं म्हणतात कारण पपईचा प्रत्येक भाग, फळं, पानं आणि बियांमधे अनेक गुणधर्म असतात. तापातून बरं करण्याची, रक्त शुद्ध करण्याची आणि त्वचा सुधारण्याची शक्ती पपई ह्या अमृतफळामधे आहे. पपई आणि त्याच्या पानांमधे तिन्ही दोष संतुलित करण्याची आणि पचन सुधारण्याची शक्ती आहे.

पपई हे सर्व ऋतूंमधे सहज उपलब्ध असलेलं फळ आहे आणि त्यातले एंझाइम, पपेन हे घटक पोट आणि आतड्यांसाठी फायदेशीर आहेत. पचन सुधारण्यात, शरीर शुद्ध करण्यात आणि पोषक घटक शोषण्यासाठी हे गुणधर्म महत्त्वाचे आहेत. त्याची पानं आणि बियांमधे औषधाप्रमाणे गुणधर्म आहेत. केवळ पपईच नाही तर त्याची पानं आणि बिया देखील फायदेशीर आहेत आणि आयुर्वेदात औषध म्हणून वापरली जातात. पानं आणि बिया चवीला थोडी कडू असली तरी ते शरीराच्या अनेक समस्या मुळापासून बऱ्या करण्यासाठी हे उपयुक्त ठरतात. त्वचेच्या समस्या असतील तर पपईची पेस्ट खाणं आणि लावणं दोन्ही त्वचेसाठी फायदेशीर आहे. यासाठी, पपईच्या लगद्यामधे मध मिसळा आणि ते चेहऱ्यावर लावा. त्वचा घट्ट करण्यासाठी आणि डाग कमी करण्यासाठी याचा उपयोग होतो. याच्या नियमित वापरामुळे त्वचेवर चांगली चमक येते.

तापावर उपचार करण्यासाठी आणि रक्त शुद्ध करण्यासाठीही याचा उपयोग केला जातो. तापामुळे अशक्तपणा जाणवतो.



रक्तातील अशुद्धता वाढली असेल किंवा प्लेटलेट्स कमी झाले असतील तर पपईची पानं पाण्यात उकळून पिणं फायदेशीर आहे. पानांपासून बनवलेला काढा रक्त शुद्ध करतो आणि विविध आजार कमी करण्यास मदत करतो. ताप किंवा संसर्गानंतर रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत झाल्यास दररोज पपई खाणं फायदेशीर आहे. पपईतील व्हिटॅमिन सीमुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

# रात्रीचर्या

दिनचर्या आणि रात्रीचर्या संपूर्णत उलगडून सांगणे कठीण असते. यात आपल्याला प्रकृती, ऋतू आणि परिस्थितीनुसार बदल करावे लागतात. या लेखातून आपल्याला मार्गदर्शन सूत्र मिळाले तरी नक्कीच सर्वांचा फायदा होईल. आयुर्वेदानुसार संध्याकाळ हा वाताचा काळ असतो. या काळात साधारणत: बस्तीकर्म केल्यास अधिक गुणकारी ठरते असा अनुभव आहे. या वात काळात आणि पिणाऱ्या पित्त, कफ कालावधीमुळे मनाची हुरहूर वाविनाकारण चिंता, भीती निर्माण होते. अशा वेळी मन स्थिर राहण्यासाठी देवासमोर काहीवेळ शांत बसणे अत्यंत आवश्यक आहे. असा वेळ नसेल, तर प्रवासात असाल, जिथे कुठे असाल तिथे नामस्मरण, रामरक्षा किंवा आपल्या श्रद्धेनुसार प्रार्थना केली पाहिजे, ज्यामुळे मानसिक शांतता लाभेल, व्यसनापासून दूर राहाल, हुरहूर व चिंता कमी होतील.

सगळ्या धर्माच्या संस्कृतीत हा संधी समय प्रार्थना आणि ध्यानासाठी महत्त्वाचा मानला आहे. त्यानंतर येते जेवणाची वेळ. लवकर म्हणजे साधारणपणे ८.३० ला जेवणे अधिक फायद्याचे असते. उशिरा जेवण करणे आणि लगेच झोपणे हे लठ्ठपणा, मधुमेह आणि त्याबरोबर अनेक रोगांना आमंत्रण देणारे आहे. नोकरदारांची परिस्थिती अजून वेगळी आहे. दिवसभराच्या धावपळीनंतर रात्री आरामात आणि भरपेट जेवण जेवले जाते, ज्यात कर्बोदके भरपूर प्रमाणात असतात जसे की भात, गहू, गोड पदाथ.'असे पदार्थ जेऊन लगेच झोपल्यावर साहजिकच शरीराचे वजन वासतत आम्लपित्त होणे हे दुष्परिणाम दिसू लागतात. सध्या पाश्चिमात्य देशांमध्ये वन पॉट मीलचे फॅड आहे. आपल्याकडे ते पूर्वीपासून सांगितले आहेत. उदाहरणार्थ- डाळ ढळी किंवा वरणफळ, डाळ तांदळाची खिचडी, उकड इत्यादी. त्यामध्ये अजून काही पदार्थ वाशकतो. उदाहरणार्थ- सलाड आणि उकडलेले चिकन अथवा पनीर किंवा सोयाचंक, पापलेट, बांगडासारखे काळ्या पाठीचे मासे मीठ व मसाला लावून अख्खा आणि तेवच खाणे असे अनेक पर्याय आहेत, ज्यामुळे दिवसभराचं पोटही भरेल आणि आवश्यक ती प्रथिनेदेखील मिळतील.

जेवणानंतर शतपावली घालावी, परंतु उगाच भरपूर चालणे, बॅडमिंटनसारखे अतिव्यायाम करू नये. त्याचा परिणाम अन्न पचन न होणे आणि झोप कमी होणे असा होऊ शकतो.

निद्रा आयुष्याच्या तीन महत्त्वाच्या आधार स्तंभांपैकी एक आहे. त्यामुळे योग्य प्रमाणात झोप हे दीर्घायुष्याचे रहस्य आहे. झोपेच्या कमतरतेमुळे अनेक शारीरिक समस्या आणि आजारपणाला आमंत्रण मिळते.

वेळ मिळेल तसे झोपणे हे वृद्ध व्यक्तींना, शिफ्टच्या नोकऱ्या करणाऱ्या लोकांना आवश्यक आहे. परंतु निरोगी तरुण लोकांनी दिवसा झोपणे हे अनेक रोगांना कारणीभूत ठरते.



निद्रावस्थेत शरीर स्वतच स्वतःला दुरुस्त आणि रोगापासून मुक्त करण्याचा प्रयत्न करत असते. ही आपल्याला निसर्गाने दिलेली देणगी आहे. अखंड सहा-सात तास झोप मिळणे सध्या बहुतांशी लोकांना अवघड झाले आहे. ध्वनी प्रदूषण, मोबाईलचा वापर, विजेचा लपंडाव, बदलणारे हवामान, चिंता, नैराश्य, अतिविचार यामुळे एकंदरीतच झोपेची गुणवत्ता आणि मात्रा कमी होत आहे, त्यावर गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.दिनचर्या आणि रात्रीचर्या या दोन-तीन लेखांत उलगडून सांगणे कठीण आहे. प्रकृती, ऋतू आणि परिस्थितीनुसार त्यात बदल करावे लागतात. या लेखातून आपल्याला मार्गदर्शन सूत्र मिळाले तरी नक्कीच सर्वांचा फायदा होईल.

# अखेर 'ती' वेळ आलीच

अल्पेश म्हात्रे



जनतेची फक्त थोडीफार अपेक्षा असते,की आपल्या विभागातील सुख सुविधा आपल्या नगरसेवकांपुढे ठेवणे, मग त्यात पाणीपुरवठा, गटारे, उद्याने, रस्ते, पदपथ, वाहतूक सारख्या तत्सम गोष्टी सुरळीत ठेवणे व लोकाभिमुख असणे. त्यामुळे नागरिकांना सुखाचे जीवन जगता येणे एवढीच अपेक्षा असते, ती नगरसेवकांच्या मार्फत पूर्ण होते. आता ती पूर्ण होईल अशी नागरिकांची अपेक्षा.

मुंबईच्या प्रथम नागरिक म्हणजेच महापौर पदासाठी शनिवारी भाजपतर्फे अर्ज भरण्यात आला. मुंबईच्या प्रथम नागरिक म्हणून रितू तावडे यांचे नाव निश्‍चित झाले. विरोधी पक्षातर्फे कोणाचेही नाव निश्‍चित न झाल्याने आता बुधवारी रितू तावडे या महापौर बनणार हे निश्‍चित. म्हणजे आता मुंबई महानगरपालिकेचा कारभार पुन्हा पाच वर्षांनी का होईना सुरू होणार हे महत्त्वाचे. त्याचप्रमाणे इतर समित्यांचेही अध्यक्ष ठरतील आणि मुंबईकरांच्या समस्यांना कोणीतरी वाली निर्माण होईल व समस्या सुटतील अशी अपेक्षा धरायला हरकत नाही. एकदा का वैधानिक समित्या सुरू झाल्या, की पालिकेचे कामकाज सुरळीतपणे सुरू होईल. पाच वर्षे हीच सत्ता अधिकाऱ्यांच्या हातात होती. भले राज्यातील सत्ताधारी यावर नियंत्रण ठेवून होते मात्र काही प्रमाणात पालिका अधिकाऱ्यांची मनमानी एकाधिकार शाही सुरू होती, त्यावर आता चाप बसेल व अंकुश ठेवणे सोपे जाईल कारण आता खरेखुरे ट्रस्टी खऱ्या अर्थाने जनतेने निवडून दिलेले सेवक म्हणजेच नगरसेवक यांचा यावर अधिपथ्य स्थापन होईल आणि अशी अपेक्षा जनतेची असेल. जनतेची फक्त थोडीफार अपेक्षा असते आपल्या विभागातील सुख सुविधा आपल्या नगरसेवकांपुढे ठेवणे किंवा नवीन सुविधा निर्माण करणे, मग त्यात पाणीपुरवठा, गटारे, उद्याने, रस्ते, पदपथ, वाहतूक सारख्या तत्सम गोष्टी सुरळीत ठेवणे व लोकाभिमुख असणे हेच व त्यामुळे नागरिकांना सुखाचे जीवन जगता येणे एवढीच अपेक्षा असते, ती नगरसेवकांच्या मार्फत पूर्ण होते. आता ती पूर्ण होईल अशी नागरिकांची अपेक्षा.

मुंबईचे महापौर या पदावर स्थानापन्न झाल्यावर लगेच स्थायी समिती, आरोग्य समिती, बेस्ट समिती यासारख्या समित्याही लवकरच स्थापना केल्या जातील व त्यांचे अध्यक्ष घोषित होतील. मुंबई महानगरपालिकेचे सध्या सर्व आलबेल चालले असले, तरी मुंबई महानगरपालिकेच्या एक अविभाज्य अंग असलेल्या बेस्ट उपक्रमाची मात्र सध्या अवस्था बिकट झाली आहे. एक चांगला उपक्रम प्रशासना वरच्या व राज्यकर्त्यांच्या दुर्लक्षपणामुळे कशाप्रकारे मोडीस निघतो याचे उदाहरण म्हणजे बेस्ट उपक्रम. आज मुंबई महानगरपालिका आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे. निदान कर्मचाऱ्यांचे वेतन तरी वेळेवर होते. मात्र त्याच दुसरीकडे बेस्ट उपक्रमाकडे वेतन द्यायलाही महिना अखेर पैसे उपलब्ध होत नाही. बेस्ट कर्मचाऱ्यांच्या वेतनावर प्रचंड पैसा खर्च होतो. म्हणून पालिकेच्या दबावाने बेस्टवर खाजगीकरण मोठ्या प्रमाणात लादले गेले. मात्र दुसरीकडे मात्र पालिकेचे खाजगीकरण त्या प्रमाणात होऊ शकले नाही. मात्र बेस्ट उपक्रमात बेस्ट कर्मचारी बस गाड्यांपासून इतर सर्व गोष्टी कंत्राटदारांमार्फत मुंबईकरांवर लादल्या गेल्या.आज त्याचाच परिणाम म्हणजे कंत्राटीकरण झालेल्या बेस्ट बस गाड्यांमुळे प्रवाशांनाच मोठ्या प्रमाणावर त्रासाला सामोरे जावे लागत आहे. बेस्ट बस गाड्यांची संख्या कमी झाली, नवीन बस वेळेवर येत नाही, रस्त्यावरील बस गाड्यांची संख्या कमी झाल्यामुळे प्रवाशांची संख्या कमी झाली, बस गाड्यांवर काम करण्यास कंत्राटदारांना अपुऱ्या वेतनामुळे कर्मचारी मिळत नाही, त्यामुळे प्रवासी घटले व बेस्टचे उत्पन्नही घटले. खरंच खाजगीकरणामुळे बेस्ट उपक्रम फायद्यात येऊ शकेल का? मात्र त्याचे उत्तर अजूनही नाही असेच म्हणावे लागेल. कारण ज्या मोठ्या प्रमाणावर बेस्टला तोटा होत होता तो कमी करण्यासाठी खाजगीकरण आणले गेले असे समर्पक उत्तर मिळते. मात्र एकेकाळी दोन ते तीन हजार करोडचा निव्वळ तोटा असलेला बेस्ट उपक्रम आज तब्बल १३ ते १४ हजार करोड तोट्यात गेला.

आतापर्यंत मुंबई महानगरपालिकेने बेस्ट प्रकरणास आपली पालक संस्था म्हणून आठ ते नऊ हजार करोड रुपये दिलेत.

त्यामुळे बेस्ट उपकरणाचा तोटा काही अंशी भरून निघत आहे. मात्र आता मुंबई महानगरपालिकेनेही हात वरती केला असून बेस्ट उपक्रम लवकरच सुधारला नाही तर यापुढे मदत मिळणार नाही असे फर्मान सोडले आहे. त्यामुळे बेस्ट प्रकरणाची अवस्था अजूनच बिकट झाली आहे.

तर दुसरीकडे बेस्ट उपक्रमांमधून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची अवस्था ही अत्यंत बिकट झाली. आज कित्येक कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केली आहे, तर कित्येक कर्मचारी अजूनही दडपणाखाली आहेत. त्यांना त्यांच्या मुलांची लग्न करणे कठीण होऊन बसले आहे. तर किती कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचे शिक्षण थांबले आहे. दर दोन ते तीन महिन्यांनी विविध संघटनांच्याखाली बेस्टच्या निवृत्त कर्मचाऱ्यांना आंदोलने व उपोषण करावी लागत आहे. मध्यंतरी बेस्ट उपक्रमाने बस भाडेवाढ केली मात्र भाड्याने घेतलेल्या बस गाड्यांच्या कंत्राटदारांचे पैसे प्रथम अदा केले जातात मग राहिलेल्या पैशातून बेस्ट उपक्रमाचा दैनंदिन गाडा हाकला जातो. मग ते त्यातून काहीच नाही मग बेस्ट निवृत्त कर्मचाऱ्यांचे पैसे कसे अदा करणार? बेस्ट उपक्रमाचे गंगाजळी आज पूर्णपणे रिती झाली आहे. आज महापौर बसला तर उद्या बेस्ट समिती स्थापन होईल. बहुतेक बेस्ट समिती शिंदे गटाला मिळण्याची दाट शक्यता आहे. मात्र खाजगीकरणामुळे आज बेस्टमध्ये तसे विशेष काही राहिलेले नाही. आज मात्र तोट्यातून बाहेर येण्यासाठी बेस्ट उपक्रम मोक्याचे भूखंड बस आगारे, बस स्थानके, विद्युत संग्रह केंद्रे यांच्या जागेचा व्यावसायिक वापर करून बेस्ट उपक्रम फायद्यात येईल अशी अपेक्षा आहे.

बेस्ट उपक्रमातील मोक्याच्या जागांचा व्यावसायिक वापर कसा करता येईल याकडे साऱ्या यंत्रणांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे जरी व्यावसायिक वापर केला तरी त्यातून बेस्ट उपक्रम फायद्यात कसा येईल की ज्यामुळे बेस्ट उपक्रम पण टिकेल त्यातून स्वमालकीच्या बस गाड्या घेता येतील.

कर्मचारी भरती होईल व पुन्हा बेस्ट उपक्रमास त्याचा पूर्वीचा नावलौकिक प्राप्त होईल असा अध्यक्ष सध्या बेस्ट उपक्रमास भावा, . तरच मुंबईकरांची शान टिकेल, बेस्ट कर्मचारी टिकेल व बेस्ट बस उपक्रमातून प्रवास करणारे लाखो प्रवासी यांचा बेस्ट उपक्रम ही टिकेल हे नक्की!

***इंटरनेट आणि मोबाईलवरील बंदीमुळे इराणचे नाव जगभरात खराब झालेले आहे. जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर इराण सरकारने घाला घातल्याची भावना सर्वत्र वर्तवली जात आहे. इराणने लादलेल्या प्रतिबंधांचा धुरळा खाली बसत नाही, तोवर आता पाकिस्तान सरकारदेखील इराणच्या मार्गावरून चालत असल्याचा आरोप अनेक पाकिस्तानी नागरिक आणि काही माजी ज्येष्ठ अधिकारी करू लागले आहेत. इंटरनेटवर सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेक पाकिस्तानी नागरिक त्यांचा देशात इंटरनेटचा स्पीड जाणीवपूर्वक कमी केला जात असल्याच्या तक्रारी करत आहेत. त्याच बरोबर सोशल मीडिया साईट्स व ब्लॉगवर अघोषित बंदी घालण्यात आलेली आहे असाही आरोप होत आहे.***

# साय-फाय
# इराणमधील इंटरनेट बंदी

प्रसाद ताम्हणकर



इंटरनेट आणि मोबाईलवरील बंदीमुळे इराणचे नाव जगभरात खराब झालेले आहे. जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर इराण सरकारने घाला घातल्याची भावना सर्वत्र वर्तवली जात आहे. इराणने लादलेल्या प्रतिबंधांचा धुरळा खाली बसत नाही, तोवर आता पाकिस्तान सरकारदेखील इराणच्या मार्गावरून चालत असल्याचा आरोप अनेक पाकिस्तानी नागरिक आणि काही माजी ज्येष्ठ अधिकारी करू लागले आहेत. इंटरनेटवर सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेक पाकिस्तानी नागरिक त्यांचा देशात इंटरनेटचा स्पीड जाणीवपूर्वक कमी केला जात असल्याच्या तक्रारी करत आहेत. त्याच बरोबर सोशल मीडिया साईट्स व ब्लॉगवर अघोषित बंदी घालण्यात आलेली आहे असाही आरोप होत आहे.

पाकिस्तान सरकारने संसदेमध्ये हा आरोप पूर्णपणे नाकारला असून सरकारकडे अशी कोणतीही यंत्रणा नसल्याचा खुलासा केला आहे. मात्र पाकिस्तान चिनी बनावटीच्या इंटरनेट फायरवॉल (ंशए २.०) चा वापर करून देशातील इंटरनेटवर नियंत्रण ठेवत असल्याची बाब लपून राहिलेली नाही. इंटरनेटवरील बंधनाबरोबर पाकिस्तान सरकार ४० लाख लोकांच्या मोबाईलवरदेखील नजर ठेवून असल्याचे यापूर्वीच उघड झालेले आहे. खुद्द आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटना अम्नेस्टी इंटरनॅशनलने यासंदर्भात अहवाल सादर केला आहे. चीनच्या या यंत्रणेचा वापर पाकिस्तान गेल्या अनेक वर्षांपासून करत असल्याचेदेखील समोर आले आहे.

सन २०२३ मध्ये इम्रान खान यांना अटक झाल्यानंतर त्यांच्या समर्थकांनी मोठ्या प्रमाणावर आंदोलन उभे केले होते. या आंदोलनाची वाढती व्याप्ती आणि वाढत हिंसाचार बघता देशातील इंटरनेट बंद करण्यात आले होते व अनेक न्झ वरदेखील बंदी घालण्यात आलेली होती. त्यानंतर इंटरनेट सेवा बंद पडणे, इंटरनेटचा वेग मंदावणे, काही सोशल मीडिया साईट्स ओपन न होणे अशा अनेक समस्यांना पाकिस्तानी नागरिकांना वारंवार सामोरे जावे लागत असल्याचा आरोप सतत होत आहे. इंटरनेटच्या वेगावर परिणाम झाल्याने व्हिडीओ अथवा इतर मोठ्या फाइल्स एकमेकांना पाठवणे, व्हिडीओ कॉल करणे अशा इतर समस्यांनादेखील नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे. या समस्यांचा फटका पाकिस्तानातील अनेक मोठ्या कंपन्यांना बसतो आहे.

चीनकडून पाकिस्तानने खरेदी केलेल्या या सिस्टम मॉनिटरींग सिस्टमबद्दल ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या अहवालात सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. चीनची ही सिस्टम दोन प्रकारे कार्यरत असते. ही सिस्टम एक प्रकारची इंटरनेट फायरवॉल आहे, जिच्या मदतीने देशातील इंटरनेटवर नियंत्रण ठेवता येते आणि दुस?या बाजूला ४० लाख लोकांच्या मोबाईलची निगराणी करता येते, त्यांचे कॉल्स ऐकता येतात आणि मेसेजेसदेखील वाचले जाऊ शकतात. हा तेथील जनतेच्या स्वातंत्र्यावर आणि त्यांच्या मत व्यक्त करण्याच्या अधिकारावर घाला असल्याचे मत जगभरातील मानवी हक्क संघटना व्यक्त करत आहेत. पाकिस्तान सरकार एखाद्या यंत्रणेचा किती चुकीचा वापर करू शकते हे यापूर्वी २०२४ साली जगासमोर उघड झाले होते. पाकिस्तानचे भूतपूर्व प्रधानमंत्री इम्रान खान यांची पत्नी असलेल्या बुशरा बीबीने २०२४ साली इस्लामाबादच्या हायकोर्टात एक खटला दाखल केला होता. वैयक्तिक मोबाइल कॉल्स हे सार्वजनिक झाल्याचा आरोप त्यांनी केला होता. पाकिस्तान सरकार रक्षा मंत्रालय व तेथील सुरक्षा यंत्रणांनी हा आरोप फेटाळून लावला होता व अशा कोणत्याही कारवाया करत नसल्याचे स्पष्ट केले होते. मात्र कालांतराने पाकिस्तानच्या टेलिकॉम रेग्युलेटरने त्यांनी फोन कंपन्यांना थ्छ्शए ही देखरेख करणारी यंत्रणा बसवण्याचे आदेश दिल्याचे स्वीकार केले होते.

एका अहवालानुसार पाकिस्तान सरकारने तब्बल ६.५ लाख वेबसाइट्स ब्लॉक केल्या असून फेसबुक, ट्विटर अशा माध्यमापर्यंत नागरिक सहज पोहोचू नयेत अशी खबरदारीदेखील घेण्यात आलेली आहे. एक्स अर्थात पूर्वीचे ट्विटर तर देशात पूर्णपणे बंद करण्यात आल्याचा आरोपदेखील येथील नागरिक करत आहेत. देशाबाहेर केले जाणारे आणि देशाबाहेरून येणारे सर्व फोन कॉल्सवर सरकार लक्ष ठेवून असल्याचेदेखील हा अहवाल सांगतो.

# 'कोविड'पेक्षाही मोठ्या बदलाची नांदी

आर्टिफिशिअल इंटेलिजन्स हे आता केवळ भविष्यातील संकट नसून, ते प्रत्यक्षात आले आहे. 'हायपरराईट' या AI स्टार्टअपचे सीईओ मॅट शुमर यांनी एका निबंधाद्वारे जगभरातील कॉर्पोरेट नोकरदारांना करणाऱ्यांना गंभीर इशारा दिला आहे. 'जर तुमचे काम कॉम्प्युटर स्क्रीनवर होत असेल, तर घ् तुमची जागा घेण्यासाठी सज्ज झाले आहे', असे त्यांनी म्हटले आहे.

शुमर यांनी आपल्या 'समथिंग बिग इज हॅपनिंग' या लेखात स्पष्ट केले की, डिजिटल, संरचित आणि पुनरावृत्ती होणारी कामे पूर्ण करण्याची क्षमता घ् प्रणाली वेगाने आत्मसात करत आहेत. सध्याच्या घ् च्या स्थितीची तुलना त्यांनी २०२० च्या सुरुवातीच्या काळाशी केली आहे, जेव्हा कोविड-१९ साथरोगाने जागतिक बाजारपेठ हलवून सोडली होती. समाजाला या बदलाच्या वेगाचा अंदाज येत नसल्याचे त्यांनी नमूद केले.

या क्षेत्रांवर होणार सर्वाधिक परिणाम

शुमर यांच्या मते, खालील 'स्क्रीन-आधारित' व्यवसायांवर AIचा मोठा प्रभाव पडेल:

**विधी क्षेत्र:** करारांचे वाचन, कायदेशीर संशोधन आणि मसुदा तयार करणे.

**आर्थिक विश्लेषण :** आर्थिक मॉडेल्स तयार करणे आणि डेटा विश्लेषण.

**लेखन आणि आशय निर्मिती:** पत्रकारिता, मार्केटिंग आणि तांत्रिक लेखन.

**सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग:** कोडिंग आणि तांत्रिक प्रकल्प पूर्ण करणे.

**वैद्यकीय विश्लेषण:** लॅब रिपोर्ट्स तपासणे, स्कॅनिंग रिडिंग आणि निदानासाठी मदत करणे.

**ग्राहक सेवा:** गुंतागुंतीच्या समस्या सोडवणे.

**५० टक्के नोकऱ्या धोक्यात?**

केवळ शुमरच नव्हे, तर 'अँथ्रोपिक'चे (Anthropiced) सीईओ डारियो अमोदेई यांनीही भाकीत केले आहे की, पुढील सर्वधारणपणे ५ वर्षांत प्रवेश स्तरावरील (Entryed-leveled) ५०% पांढरपेशा नोकऱ्या AI मुळे संपुष्टात येतील.


**नोकऱ्या वाचवण्यासाठी काय करावे?**

या बदलाचा सामना करण्यासाठी शुमर यांनी काही महत्त्वाचे सल्ले दिले आहेत:

१.AI टूल्सचा वापर करा: केवळ प्रश्न विचारण्यासाठी नाही, तर प्रत्यक्ष कामासाठी प्रगत घ् टूल्स वापरा.

२. दररोज सराव: दिवसातून किमान एक तास नवीन घ् टूल्सचा प्रयोग करा. सहा महिने असे केल्यास तुम्ही इतरांपेक्षा अधिक सक्षम व्हाल.

३. आर्थिक स्थिरता: नोकरीवर येणाऱ्या संभाव्य संकटामुळे आर्थिक नियोजनावर भर द्या.



मॅट शुमर यांनी स्वतःचे उदाहरण देताना सांगितले की, 'आता मला तांत्रिक कामासाठी कोणाची गरज भासत नाही. मला काय हवे आहे ते मी साध्या इंग्रजीत सांगतो आणि ते काम पूर्ण होऊन माझ्यासमोर येते'.

**१. ही केवळ सुरुवात नाही, तर वेग प्रचंड वाढला आहे:**

लेखक म्हणतात की, आपण सध्या अशा स्थितीत आहोत जिथे लोकांना वाटतेय की AI बद्दलची चर्चा अतिशयोक्ती आहे. परंतु, जसा फेब्रुवारी २०२० मध्ये कोविडचा अंदाज कोणाला आला नव्हता, तसेच आता AI मुळे जग बदलणार आहे. २०२५ आणि २०२६ मध्ये AI च्या प्रगतीचा वेग इतका वाढला आहे की, दर काही महिन्यांनी येणारे नवीन मॉडेल्स (उदा. GPT-५.३ आणि Cla}d Opus ४.६) जुन्या मॉडेल्सना पूर्णपणे मागे टाकत आहेत.

**२. 'स्क्रीन'वर काम करणाऱ्यांच्या नोकऱ्या धोक्यात:**

ज्यांचे काम कॉम्प्युटर स्क्रीनवर चालते (वाचन, लेखन, विश्लेषण, कोडिंग किंवा निर्णय घेणे), त्यांच्या कामाचे महत्त्वाचे भाग घ् आधीच उत्तम प्रकारे करू लागले आहे. लेखकाने स्वतःचे उदाहरण दिले आहे की, आता त्यांना कोडिंग करण्यासाठी इंजिनिअर्सची गरज उरलेली नाही; ते फक्त साध्या भाषेत सूचना देतात आणि AI काही तासांत पूर्णपणे तयार, त्रुटीरहित 'अप' विकसित करून देते.

**३. 'इंटेलिजन्स एक्सप्लोजन'**

AI आता स्वतःलाच अधिक प्रगत बनवण्यासाठी वापरले जात आहे. घ् स्वतःमधील त्रुटी शोधतेय आणि स्वतःच्या पुढील आवृत्तीसाठी कोडिंग करतेय. यालाच 'इंटेलिजन्स एक्सप्लोजन' म्हणतात. तज्ज्ञांच्या मते, २०२६-२७ पर्यंत घ् बहुतेक सर्व कामांमध्ये मानवापेक्षा अधिक बुद्धिमान असेल.

**४. प्रभावित होणारी प्रमुख क्षेत्रे:**

कायदेशीर (Legal): कनिष्ठ वकिलांची जागा घ् घेऊ शकते.

आर्थिक (इर्ह्हिम): मॉडेल्स तयार करणे आणि डेटा विश्लेषण.

**सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग: मोठ्या प्रमाणात ऑटोमेशन.**

वैद्यकीय आणि लेखन: निदान करणे आणि तांत्रिक अहवाल लिहिणे.

**५. वास्तवाकडे दुर्लक्ष करणे धोकादायक:**

अनेक लोक अजूनही २०२३-२४ मधील AI च्या मर्यादांचा (उदा. चुकीची माहिती देणे) विचार करून याकडे दुर्लक्ष करत आहेत. परंतु, सध्याच्या 'पेड' आवृत्ती अत्यंत प्रगत आहेत. AI माझ्या क्षेत्रातील बारकावे समजू शकत नाही' हा समज आता चुकीचा ठरत आहे, कारण AI मध्ये आता 'निर्णयक्षमता' आणि 'चातुर्य' दिसू लागले आहे.

**६. बचावाचे आणि प्रगतीचे उपाय:**

**लवकर शिका:** जो व्यक्ती आतापासून AI चा वापर करून आपले काम वेगाने करेल, तोच मार्केटमध्ये टिकेल.

गंभीरपणे वापर करा: दिवसातून किमान एक तास AI सोबत नवीन प्रयोग करा. त्याला अवघड समस्या सोडवायला द्या.

आर्थिक तयारी: संभाव्य बदलांच्या पार्श्वभूमीवर आर्थिक नियोजनात लवचिकता ठेवा.

मुलांना वेगळे शिक्षण द्या: केवळ पदव्यांऐवजी त्यांना घ् सोबत काम करणे, सर्जनशीलता आणि नवनवीन गोष्टी शिकण्याची सवय लावा.

**निष्कर्ष:**

AI आता केवळ एक साधन राहिलेले नाही, तर ते मानवी बुद्धिमत्तेला पर्याय ठरत आहे. हे संकट नसून एक मोठी संधीही आहे, जर आपण वेळीच जागे होऊन या नवीन जगाशी जुळवून घेतले तर.